म. ग्रं. सं. ठाणें
विषय गूढ-प्रकाश
सं. क्र. १५३

REFBK-0004569

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

सचित्र

# बदरी-केदार-यात्रावर्णन.

वसुधारा, गंगोत्री, जम्नोत्री

आणि

गढवाल टिहरीचें साद्यंत व संपूर्ण माहितीसह

व नकाशासह.

८५६९

लेखक:—रामकृष्ण दामोदर रामेकर, B. A. LL. B.

वकील, अकोट.

REFBK-C004569

रा. र REFBK-0004569 चित्रशाळा प्रेस,
णें.

६५६९

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन )

किंमत १० आणे.


तीर्थस्वरूप प्रियबंधु

# कै. आबासाहेब दामोदर रामेकर.



ज्यांच्या कृपेनें विद्यादान मिळून ज्यांच्या सहवासांत या यात्रेचा योग जुळून आला त्यांच्या चरणीं कृतज्ञता-पूर्वक व सप्रेम अर्पण.

रा. दा. रामेकर.




मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे

# उपोद्घात.

नगाधिराज हिमगिरीचें संपूर्ण वर्णन करण्यास कोण समर्थ आहे ! हा पर्वत इतका प्रचंड आहे कीं त्याच्या अल्पांशाचाच शोध आजपर्यंत झाला आहे. उन्हाळ्याच्या प्रखर उष्णतेंत देखील १५००० फुटांवरील प्रदेश बर्फाखालीं सदैव गढलेले असतात व हिंवाळ्यांत चारपांच हजार फुटांवर ही हिमरेखा सहज उतरते. याची संबंध शोभा एकाच ठिकाणाहून पहातां येणें शक्य नाहीं. कांचनगंगा शिखर ( उंची २८१४६ फूट ) पहावें दार्जिलिंगवरून, तर गौरीशंकर ( कैलास ) उंची २९१४१ पहावें तिबेट व नेपाळाकडून. शिवाय अलमोराजिल्ह्यांत नंदादेवी ( उंची २५६६० फूट ) व ज्याच्या टोंकावर ब्रह्मा-विष्णु-महेश रहातात असें त्रिशूल (२३४००फूट), दुनागिरी(२३१८४ फू.), नंदकोट(२२५३०फू.) हीं शिखरें आहेत. आपल्याकडील विंध्याद्रि२०००फुटांपलीकडे व महाबळेश्वर मलबार खेरीज सह्याद्री ४००० फूटावर आपलें डोकें कोठेंही उचलतांना आढळत नाहीं, व हिमदर्शन तर कोठेंही होत नाहीं. या सर्व कारणामुळें हिमालय म्हणजे कांहीं निराळें जग असें वाटूं लागतें. आपलीं तीर्थस्थानें कमाऊन विभागांतलि उत्तर गढवाल व टिहरींत आहेत. हा हिमालयाचा मध्यभाग असून यांतूनच मोठमोठ्या हिमनद्या भारतवर्षाच्या कल्याणाची प्रतिज्ञा करून धांवत सुटतात; त्यायोगें ह्या प्रदेशास सुपीकपणाबरोबर अत्यंत रमणीयताही प्राप्त झाली आहे.

ह्या नितांतरमणीय प्रदेशाचा शोध लावणारा पहिला महापुरुष भगीरथ होय. १३५७० फुटांवर गौमुख हिमसंचयांतून भागीरथी निघाली असून, कांहीं जर्मन शोधकांचें म्हणणें आहे कीं भागीरथीचा प्रवाह दुसरीकडे असतां भगीरथानें पहाड कोरून तिचा ओघ भारतवर्षाकडे वळविला. युरोपांतल्याप्रमाणें मोठमोटां शोधकमंडळें स्थापल्याशिवाय किंवा राजाश्रयाशिवाय एकट्यादुकट्याच्या हिंमतीवर ह्या सदैव हिमाच्छादित भागांत शोध लावणें शक्य नाहीं. पाश्चात्य धाडशी शोधक दर दहापांच वर्षांनीं हिमालयांतील निरानिराळ्या शिखरांवरून आधुनिक यंत्रसामुग्रीच्या

सहाय्यानें नानातऱ्हेचे शोध लावीत असतात. त्यांपैकीं कित्येक प्राणांसही मुकतात पण प्रयत्न सोडीत नाहींत. मागल्याचा अनुभव पुढच्याच्या उपयोगीं येतो. गौरीशंकर ( उंची २९१४१ ) चा शोध एव्हेरेस्ट सा. नें इ. स. १८४१ सालीं लावल्यावरून त्या शिखराला मौंट एव्हेरेस्ट नांव पडलें आहे. कैलास–शिखर तें हेंच. १९२१ च्या एका मोहिमेंत एक डॉ. कैलास नामक बंगाली गृहस्थ गतप्राण झाले त्यांचे स्मरणार्थही कैलास हें नांव योग्यच होय. १६५०० फूट उंचीवर रोंगबक नांवाच्या दरींत एक मठ असून त्या ठिकाणीं ३०० ते ४०० साधु रहातात असें या मोहिमेच्या वर्णनावरून कळतें. २०,००० फुटांपेक्षांही अधिक उंचीच्या प्रदेशांत मनुष्याच्या पावलासारखीं पावलें उमटलेलीं आढळतात. हीं पावलें एखाद्या साधूचीं कां केसाळ जंगली माणसाचीं ? पाश्चात्यांनीं या उच्च प्रदेशाचे फोटो घेतलेले आहेत, फिल्म्स् तयार केल्या आहेत, नकाशे उतरले आहेत व अनेक दृष्टीनें पहाणी करून वर्णनें लिहून ठेविलीं आहेत व त्यांचे प्रयत्न अद्यापिही चालूच आहेत. पण एकेका मोहिमेला ५०,००० रुपये खर्च करण्याची त्यांची तयारी असते !

भारतीयांच्या दृष्टीनें विचार केल्यास भगीरथाच्या पश्चात् अनेक मुनींनीं आणि ऋषींनीं येथें तपश्चर्या करून आपल्या पदरजांनीं यात्रेचा हा भाग पुनीत केला आहे. भगवान् गौतमबुद्धाचे इकडे अनेक विहार होते व त्याचप्रमाणें आचार्यांनाहीं ज्योतिर्मठाची स्थापना करावी लागली. हिमाचलांतील प्रत्येक स्थल तपश्चर्येला योग्य आहे. ज्ञानराजांनीं वर्णन केल्याप्रमाणें ही तपोभूमि होय.

आणिकही एक पहावें । जें साधकीं वसतें होआवें । आणि जनाचेनि पायरवें रुळेचि ना ॥ जेथ अमृताचेनि पाडें । मुळाहीसकट गोडें । जोडती दाटें झाडें । सदा फलती ॥ पाउला पाउला उदकें । वर्षाकाळावीण अतिचोखें । निर्झरें का विशेखें । सुलभें जेथें ॥ हा आतपही अळुमाळ । जाणिजे तरी शीतळ । पवन अतिनिश्चळ । मंद झुळके ॥ बहुतकरूनि निःशब्द । दाट न रिघे श्वापद । शुक हन षट्पद । तेउतें नाहीं ॥ पाणिलगें हंसें । दोनी चारी सारसें । कवणें एके वेळे बैसे । कोकिळही हो का ॥ निरंतर नाहीं । तरी

आलीं गेलीं कांहीं । होतु कां मयूरेंही । आम्ही ना न म्हणों ॥ परी आवश्यक पांडवा । ऐसा ठाव जोडावा । तेथ निगूढ मठ होआवा । का शिवालय॥

ज्ञानेश्वरी अ० ६ ओंव्या ७०—७९

अगदीं आधुनिककालांत देखील स्वामी रामतीर्थ व विवेकानंद यांनीं हिमालयांत कांहीं काल तपश्चर्या करून मठ स्थापलेले आहेत. फार काय पण राजा राममोहनराय, महर्षि देवेंद्रनाथ ठाकूर व केशवचंद्रसेन वगैरे ब्रह्मसमाजी लोकांनींही येथें कांहीं काल निवास केला व त्यांना हिमालयानें मोहून सोडलें.

पाश्चात्त्यांचे धाडशी प्रयत्न व पौर्वात्य पुण्यपुरुषांच्या तपश्चर्येचे क्लेश यांच्या मानानें हल्लींची यात्रा म्हणजे "भुक्ते न तु मुक्तये" केवळ मनोरंजनार्थ होय; प्रौढी मिरवण्यासारखें त्यांत कांहींच नाहीं. यात्रेच्या काठिण्याचा मोठा बाऊ करण्यासारखें कांहींच नाहीं. ही यात्रा करायला मोठी पूर्वपुण्याई पाहिजे, किंवा केवळ अशा एखाद्या यात्रेनें देहाचें सार्थक झालें अशी दृष्टि ठेवण्यासारखा काल किंवा परिस्थिति आतां राहिली नाहीं. तथापि कांहीं ध्यानींमनीं नसतां, पूर्वी फारसा विचार केला नसतां, एकाएकीं बेत ठरून या यात्रेस निघाल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. उलटपक्षीं वर्षानुवर्ष बेत करून अखेर आयत्यावेळीं कांहींना कांहीं अनपेक्षित अडचणी उपस्थित होतात. हा केवळ योयायोग. प्रस्तुत यात्रा १९१४ त घडली.' चित्रमय—जगतांतून संपूर्ण वर्णन प्रसिद्ध होण्यासही आज १४ वर्षे झालीं. पूर्वी लेख देतांना पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याची त्यांची योग्यता असेल असें वाटलें नव्हतें. अगोदर एखाद्या अप्रसिद्ध व्यक्तीचें लेखांना मासिकांतून अग्रस्थान देऊन व नंतर बऱ्याच कालावधीनें माहिती शिळी होण्याचा संभव असतांही पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याची जबाबदारी घेऊन चित्रशाळेच्या मालकांनीं आम्हांस ऋणी करून ठेवलें आहे.

पूर्वी १९१५—१६--१७ सालीं प्रसिद्ध झालेल्या लेखांतच गढवाल गॅझेटिअरमधून थोडीशी अधिक नवीन माहिती घेऊन व इतर यात्रेकरूं-

कडील ही अगदीं ताज्या माहितीची भर घालून हें पुस्तक तयार केलें आहे. शिवाय यांत इंदूर–कॉलेजचे प्रो. देवधर M. A. यांचा बदरीनारायणापलाकडील वसुधारेचा प्रवासही त्यांनीं कृपा करून दिलेल्या परवानगीनें समाविष्ट करून व गंगोत्रीजम्नोत्रीची माहिती देऊन वर्णनास शक्य ती पूर्णता आणण्याचा प्रयत्न केला आहे.

या वर्णनांत पर्वतांच्या रांगा व त्यांचीं अनेकविध शिखरें, त्यांतून उगम पावून खालीं धावणाऱ्या लहानमोठ्या नद्यांचीं संपूर्ण वर्णनें, जंगलांतील झाडें व उत्पन्न, वनचर पशु व पक्षी, खनिज पदार्थ, व्यापार, लोकांची राहणी, करमणुकी, भाषा, लग्नविधी, शेती, राजव्यवस्था, पूर्वेतिहास, जमिनधाऱ्याची पद्धत, वगैरे एक ना अनेक गोष्टींनीं जाडा ग्रंथ फुगवितां आला नसतां असें नाहीं. पण त्याबरोबरच किंमतही अदमासाबाहेर वाढून सामान्य यात्रेकरूंना ह्या भारूडभरतीचा फारसा उपयोग होण्यासारखा नाहीं. थोडीफार माहिती ठिकठिकाणीं आली आहेच पण शिवाय एक नवीन प्रकरणही ' गढवाल व टेहरी ' या सदराखालीं जोडलें आहे. तथापि ज्यांची जिज्ञासाबुद्धि फारच प्रखर असेल त्यांनीं त्या प्रांतांतील गढवाल गझेटिअर व पाश्चात्य शोधकांचीं वर्णनें वाचावीं.

हिंदीभाषेंत या यात्रेची थोडीफार माहिती देणारे तक्ते व लहानलहान पुस्तकें आहेत. हरिद्वार येथें हीं कोणत्याही पुस्तकविक्याकडे मिळतात. पंडित रायबहादूर तारादत्त गिरोला B. A. LL. B. पौडी ( गढवाल ) हे सेवासमितीचे मुख्य असून यांजकडे चव्यांचे वर्णन तक्ते मिळतात. कै. वा. सिस्टर निवेदिता ( मिस मार्गरेट नोबल ) यांनीं ही यात्रा केली असून त्यांचेंही एक लहानसें पुस्तक हल्लीं प्रसिद्ध झालें आहे. परंतु १९१५ सालीं चित्रमयजगतांत सदर्हु यात्रावर्णनाचे लेख प्रसिद्ध होण्यापूर्वी महाराष्ट्रांत ह्या यात्रेसंबंधीं कांहींच माहिती उपलब्ध नव्हती.

हे लेख येऊं लागतांच अनेकांनीं लेखकांशीं पत्रव्यवहार करून जास्त माहिती घेतली व यात्रेचें श्रेय संपादन केलें. रा. फडकेमास्तरांनीं ही याचप्रमाणें माहिती घेऊन प्रवास केला व “ माझी तीर्थयात्रा ”

प्रसिद्ध करून आपल्या अनुभवाचा सर्वांस फायदा दिला. हल्लीं आणखीही एक वर्णन चित्रमयजगतांतून येत आहेच. पूर्वीप्रमाणें कोणालाही इकडील माहितीची अडचण आतां राहिली नाहीं व या पुस्तकानें ती आणखी दूर घेऊन अधिकाधिक सुशिक्षित लोक केवळ यात्रा करूनच न थांबतां मंडळें स्थापून शोधकबुद्धीनें हिमालयांत कांहीं काल का लागतील अशी आशा आहे.

श्री. बाबासाहेब पांगारकर B. A. LL. B. वकील एलिचपूर हे नुकतेंच ही यात्रा करून आले आहेत. त्यांनीं आपला बहुमोल वेळ खर्च करून व तसदी घेऊन लेखांतील बराच भाग वाचला व आजही परिस्थिति प्रत्यक्ष पाहतां हुबेहुब तशीच्या तशीच असल्याचा अभिप्राय दिला.

श्री. बाबासाहेब पांगारकर, चित्रशाळेचे मालक, व होळकर कॉलेजचे फिजिक्स प्रो. देवधर यांचा आणि रा. खांदेवाले भरत रामचंद्र कुळकर्णी व घिरणीकर वकील, अकोट, आणि ज्यांना पुष्कळ उपयुक्त माहिती दिली व उत्तेजन दिलें त्यांचा लेखक अत्यंत आभारी आहे.

अकोट
ता. १४।९।३१ } रामकृष्ण दामोदर रामेकर.

अ. भा. ग्रं. से.
ग्रंथालय
क्र.
रा.
ह. नो.
राठी २०

# श्रीबदरीकेदार-यात्रावर्णन.

अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा हिमालयो नाम नगाधिराजः ।
पूर्वापरौ तोयनिधी वगाह्य स्थितः पृथिव्या इव मानदण्डः ॥

—कुमारसंभव—

भारतवर्षाच्या उत्तरदिशेला देवतांचा आत्माच असा हिमालय नांवाचा पर्वतांचा राजा आहे. पूर्व आणि पश्चिम समुद्रांतील जलांचें अवगाहन करून पृथ्वीचें माप घेण्याचें तो एक साधनच बनलेला आहे. ( पूर्वसमुद्रापासून पश्चिमससुद्रापर्यंत तो पसरलेला आहे, इतका मोठा त्याचा विस्तार आहे. )

आमच्या देवतांचें निवासस्थान, आमच्या पूर्वजमहर्षींचीं पवित्र तपोभूमि, दिव्य वनौषधींचें उद्यान, सृष्टिदेवीचें रम्य क्रीडाभुवन, सृष्टि-सौंदर्याचें माहेरघर, शांततेचें आगर, मोठमोठ्या पतितपावनी गंगांचें उगमस्थळ, धर्माचें मूर्तिमंत साम्राज्यभुवन, साधुसंतांचें विश्रामस्थान असें जर कोणचें स्थळ असेल तर तें हिमवताशिवाय अखिल दुनियेंत अन्यत्र कोठेंही नाहीं. काय त्याचा विस्तार! केवढीं अनंत अत्युच्च हिमाच्छा-शृंगें! पर्वतमस्तकांवरून पतन पावून घो-घो वहात जाणाऱ्या नद्यांचा किती भयंकर वेग! केवढालीं निबिड अरण्यें आणि गिरिशिखरांशीं उंचींत स्पर्धा करीत असलेले त्यांतील नानातऱ्हेचे वृक्ष! अहाहा! पर्वत-मस्तकावरील हिमप्रदेशावर सूर्याचे किरण परावर्तन पावल्यामुळें जणू काय पर्वतराजानें आपला दैदीप्यमान मुकुट परिधान केल्याप्रमाणें दिसणारी कोण तरी दिव्य शोभा! या सर्व अनुपम देखाव्यांचें वर्णन कवीच करूं जाणोत. आमच्या मंत्र-द्रष्ट्यामुनींनीं येथील पवित्रतम स्थळांना स्वर्ग, कैलास, वैकुंठ वगैरे नांवें देऊन गौरविलें आहे तें उगीच नव्हे.

भारतवर्षांत ठिकठिकाणीं क्षेत्रांची आणि तीर्थस्थानांची स्थापनाच अशा कांहीं तत्त्वांना अनुसरून झालेली आहे कीं संसाराच्या त्रिविध

तापानें पोळलेलें अंतःकरण तेथें गेलें असतां सहजासहजीं विराम पावून शांतिसुखाचा अनुभव घेऊं लागतें. नद्यांचा संगम अगर उगम, डोंगर-पर्वतांचें सान्निध्य व वनश्रीचें भरपूर वैभव, या त्रयीच्या आश्रयानेंच बहुधा क्षेत्रांची योजना झालेली दिसते. परंतु पुढेंपुढें तेथें भाविक यात्रेकरूंना लुबाडण्याकरितां न्हाव्याभटांची वस्ती वाढूं लागली; मूळच्या साध्याभोळ्या भक्तीनें देवतांची तृप्ति न होतां पुजाऱ्यांच्या जिव्हालौल्यानुरूप देवदेवतांना नानाप्रकारच्या भोगांच्या वासना होऊं लागल्या; वस्ती वाढल्यामुळें वनांची छाटाछाट होऊन तेथें शेतें व ऐषआरामी बंगले निर्माण होऊं लागले आणि हल्लीं तर रेलवेकंपन्यांनीं आपले फांटे थेट-पर्यंत भिडवून आधुनिक सुधारणेच्या किलकिलाटानें देवतांना भिववून पळावयासच लावलें आहे! एवंच, अनेकक्षेत्रांचें माहात्म्य अलीकडे लोपून जाऊन त्यांच्या पूर्वींच्या खाणाखुणाही नाहींशा होत चालल्या आहेत. असो. कालचक्रावर बोट ठेवून त्याची गति कांहीं थांबत नसते. या सुधारणेच्या अवजड तडाख्यांतून हिमालयांतील तीर्थस्थानें अजिबात बचावलीं असून निदान विमान-कंपन्यांचा सुळसुळाट हिंदुस्थानांत होई-पर्यंत तरी तीं खास तशींच सोंवळीं रहाणार! हिंदुस्थानाच्या चार दिशांना जगन्नाथ, द्वारका, रामेश्वर आणि बदरीनारायण या चार धामांची योजना केलेली आहे. पूर्वींच्या काळीं या चार धामांची यात्रा करणाराला लोक महान् पुण्यात्मा मानून त्याची योग्यता फार मोठी समजत असत. चार धामांच्या निमित्तानें पूर्वीं सारें हिंदुस्थान पादाक्रांत केल्यामुळें अनेक ठिकाणची लोकस्थिति अवलोकनांत येऊन यात्रेकरूंना नाना-तऱ्हेचे सृष्टिचमत्कार पहावयास मिळत; त्यांना त्यावेळीं अलीकडच्या सारख्या सुखाच्या सोई नसत, तेव्हां अनेक संकटांना तोंड देऊन देह झिजवावा लागत असे. ते यात्रा करून मोठ्या कष्टानें बांधून आणलेली अनुभवरूपी ज्ञानाची मोट घरीं आल्यावर लोककल्याणार्थ मोकळी करीत. आपल्या ऐषआरामाचा नित्यनेम चालवीत आगगाड्यांतून या क्षेत्रावरून त्या क्षेत्रावर धार्मिक वेगार भरण्याकरितां अगर चैनीखातर भराभर उड्या मारीत चारी धामें केल्याची प्रौढी मिरविणाऱ्या आधुनिक सुखवस्तु यात्रेकरूंना पूर्वींच्या भाविक यात्रिकांची सर कधींही येणार नाहीं. त्यांतल्या-

त्यांत ह्या सुखलोलुप सुधारणा-युगांतही बदरीकेदाराचें माहात्म्य पूर्वीप्रमाणेंच बहुतेक अंशीं कायम आहे. जेथें घोड्यांना व बैलगाड्यांना जाण्यालायक देखील रस्ता नाहीं तेथें आगगाड्यांचा शिरकाव होणें दुरापास्त आहे. दाणाआटा जायचा म्हणजे बकऱ्यांच्या पाठीवरून. अशी जेथें स्थिति तेथें ऐहिकसुखाच्या मृगजळाचा लोभ ज्यांच्यानें क्षणभर देखील दूर सारवत नाहीं अशा लोकांनीं जाण्याचा विचारच मनांत आणूं नये. निसर्गविनाशक सुधारणेचा रिघाव होणें येथें वस्तुतः अशक्य असल्यामुळें हिमालयांतील तीर्थस्थलांची नितांतरमणीयता अद्याप कायम राहिली असून आपल्या पूर्वजांना धाम-यात्रांचें इतकें महत्त्व कां वाटत असे याचें स्पष्ट चित्र मनावर वठविण्याला तीं अद्यापि समर्थ आहेत. अगोदरच चारही धामांत बदरीचें माहात्म्य फार. "बदरीसदृशं तीर्थं न भूतं न भविष्यति" "जो जाय बदरी, तो नये उदरीं; जरी ये उदरीं, तरी न हो कधीं दरिद्री" अशी पूर्वींची म्हण आहे. पैकीं तीन धामांचें महत्त्व बहुतेक नामशेषच झालें आहे. तेव्हां विरुद्धाभासामुळें हिमाचलाचें महत्त्व अधिक वाटणें साहजिक आहे.

## हरद्वार किंवा हरिद्वार. (प्राचीन नांव गंगाद्वार)

हरिद्वारः—बदरीकेदारांच्या महायात्रेंत जीं अनेक लहानमोठीं तीर्थें पडतात त्यांपैकीं अग्रपूजेचा मान हरिद्वारासच मिळालेला आहे. त्याच्यापुढचें रेलवे-स्टेशन हृषीकेश-रोड आलें कीं रेलवेचा प्रवास संपून पायीं मार्गक्रमण करण्याकरितां कंबर बांधावी लागते. हृषीकेश-रोड वर्ज्य केलें तर हरिद्वार हें शेवटलेंच रेलवे-स्टेशन. कित्येक यात्रेकरू हरिद्वार करूनच आगगाडीला रामराम ठोकतात. जी. आय. पी. रेलवेच्या दिल्ली-एक्स-प्रेसनें निघाल्यास भुसावळेवरून केवळ ५० तासांत दिल्लीपर्यंत मजल मारतां येते. झांशी वगैरे ठिकाणीं कोठेंही गाडी बदलण्याचें कारण पडत नाहीं. पॅसेंजरनें निघाल्यास मात्र एकदोन ठिकाणीं उतरावें लागतें, व प्रवासही फार वेळपर्यंत करावा लागत असल्यामुळें मध्यें विश्रांति न घेतल्यास त्रास होतो. दिल्लीवरून आउध-रोहिलखंड आणि नार्थवेस्टर्न या दोन रेलवेंचे फांटे हरिद्वारास गेले आहेत. मध्यें शहारणपूर आणि केव्हां लक्सार या स्टेशनांवर उतरून गाडी बदलावी लागते. शहारणपूरपासून हरिद्वारा-

तापानें पोळलेलें अंतःकरण तेथें गेलें असतां सहजासहजीं विराम पावून शांतिसुखाचा अनुभव घेऊं लागतें. नद्यांचा संगम अगर उगम, डोंगर-पर्वतांचें सान्निध्य व वनश्रीचें भरपूर वैभव, या त्रयीच्या आश्रयानेंच बहुधा क्षेत्रांची योजना झालेली दिसते. परंतु पुढेंपुढें तेथें भाविक यात्रेकरूंना लुबाडण्याकरितां न्हाव्याभटांची वस्ती वाढूं लागली; मूळच्या साध्याभोळ्या भक्तीनें देवतांची तृप्ति न होतां पुजाऱ्यांच्या जिव्हालौल्यानुरूप देवदेवतांना नानाप्रकारच्या भोगांच्या वासना होऊं लागल्या; वस्ती वाढल्यामुळें वनांची छाटाछाट होऊन तेथें शेतें व ऐषआरामी बंगले निर्माण होऊं लागले आणि हल्लीं तर रेलवेकंपन्यांनीं आपले फांटे थेटपर्यंत भिडवून आधुनिक सुधारणेच्या किलकिलाटानें देवतांना भिववून पळावयासच लावलें आहे! एवंच, अनेकक्षेत्रांचें माहात्म्य अलीकडे लोपून जाऊन त्यांच्या पूर्वीच्या खाणाखुणाही नाहींशा होत चालल्या आहेत. असो. कालचक्रावर बोट ठेवून त्याची गति कांहीं थांबत नसते. या सुधारणेच्या अवजड तडाख्यांतून हिमालयांतील तीर्थस्थानें अजिबात बचावलीं असून निदान विमान-कंपन्यांचा सुळसुळाट हिंदुस्थानांत होईपर्यंत तरी तीं खास तशींच सोंवळीं रहाणार! हिंदुस्थानाच्या चार दिशांना जगन्नाथ, द्वारका, रामेश्वर आणि बदरीनारायण या चार धामांची योजना केलेली आहे. पूर्वीच्या काळीं या चार धामांची यात्रा करणाराला लोक महान् पुण्यात्मा मानून त्याची योग्यता फार मोठी समजत असत. चार धामांच्या निमित्तानें पूर्वीं सारें हिंदुस्थान पादाक्रांत केल्यामुळें अनेक ठिकाणची लोकस्थिति अवलोकनांत येऊन यात्रेकरूंना नानातऱ्हेचे सृष्टिचमत्कार पहावयास मिळत; त्यांना त्यावेळीं अलीकडच्या सारख्या सुखाच्या सोई नसत, तेव्हां अनेक संकटांना तोंड देऊन देह झिजवावा लागत असे. ते यात्रा करून मोठ्या कष्टानें बांधून आणलेली अनुभवरूपी ज्ञानाची मोट घरीं आल्यावर लोककल्याणार्थ मोकळी करीत. आपल्या ऐषआरामाचा नित्यनेम चालवीत आगगाड्यांतून या क्षेत्रावरून त्या क्षेत्रावर धार्मिक वेगार भरण्याकरितां अगर चैनीखातर भराभर उड्या मारीत चारी धामें केल्याची प्रौढी मिरविणाऱ्या आधुनिक सुखवस्तु यात्रेकरूंना पूर्वीच्या भाविक यात्रिकांची सर कधींही येणार नाहीं. त्यांतल्या-

त्यांत ह्या सुखलोलुप सुधारणा-युगांतही बदरीकेदाराचें माहात्म्य पूर्वी-प्रमाणेंच बहुतेक अंशीं कायम आहे. जेथें घोड्यांना व बैलगाड्यांना जाण्यालायक देखील रस्ता नाहीं तेथें आगगाड्यांचा शिरकाव होणें दुरा-पास्त आहे. दाणाआटा जायचा म्हणजे बकऱ्यांच्या पाठीवरून, अशी जेथें स्थिति तेथें ऐहिकसुखाच्या मृगजळाचा लोभ ज्यांच्यानें क्षणभर देखील दूर सारवत नाहीं अशा लोकांनीं जाण्याचा विचारच मनांत आणूं नये. निसर्गविनाशक सुधारणेचा रिघाव होणें येथें वस्तुतः अशक्य अस-ल्यामुळें हिमालयांतील तीर्थस्थलांची नितांतरमणीयता अद्याप कायम राहिली असून आपल्या पूर्वजांना धाम-यात्रांचें इतकें महत्त्व कां वाटत असे याचें स्पष्ट चित्र मनावर बठविण्याला तीं अद्यापि समर्थ आहेत. अगोदरच चारही धामांत बदरीचें माहात्म्य फार. "बदरीसदृशं तीर्थं न भूतं न भविष्यति" "जो जाय बदरी, तो नये उदरीं; जरी ये उदरीं, तरी न हो कधीं दरिद्री" अशी पूर्वीची म्हण आहे. पैकीं तीन धामांचें महत्त्व बहुतेक नामशेषच झालें आहे. तेव्हां विरुद्धाभासामुळें हिमाचलाचें महत्त्व अधिक वाटणें साहजिक आहे.

## हरद्वार किंवा हरिद्वार. (प्राचीन नांव गंगाद्वार)

हरिद्वारः—बदरीकेदारांच्या महायात्रेंत जीं अनेक लहानमोठीं तीर्थें पडतात त्यांपैकीं अग्रपूजेचा मान हरिद्वारासच मिळालेला आहे. त्याच्या-पुढलें रेलवे-स्टेशन हृषीकेश-रोड आलें कीं रेलवेचा प्रवास संपून पायीं मार्गक्रमण करण्याकरितां कंबर बांधावी लागतें. हृषीकेश-रोड वर्ज्य केलें तर हरिद्वार हें शेवटलेंच रेलवे-स्टेशन. कित्येक यात्रेकरू हरिद्वार करूनच आगगाडीला रामराम ठोकतात. जी. आय. पी. रेलवेच्या दिल्ली-एक्स-प्रेसनें निघाल्यास भुसावळेवरून केवळ ५० तासांत दिल्लीपर्यंत मजल मारतां येते. झांशी वगैरे ठिकाणीं कोठेंही गाडी बदलण्याचें कारण पडत नाहीं. पॅसेंजरनें निघाल्यास मात्र एकदोन ठिकाणीं उतरावें लागतें, व प्रवासही फार वेळपर्यंत करावा लागत असल्यामुळें मध्यें विश्रांति न घेतल्यास त्रास होतो. दिल्लीवरून आउध-रोहिलखंड आणि नार्थवेस्टर्न या दोन रेलवेंचे फांटे हरिद्वारास गेले आहेत. मध्यें शहारणपूर आणि केव्हां लक्सार या स्टेशनांवर उतरून गाडी बदलावी लागते. शहारणपूरपासून हरिद्वारा-

पर्यंत मधें तीनचार रिव्हर्सिंग स्टेशनें लागतात. म्हणजे आगगाडी ज्या दिशेनें अगोदर जात असेल त्याच्या उलट दिशेनें ती रिव्हर्सिंग स्टेशनावरून जाऊं लागते. पुढें ओढण्याऐवजीं एंजिन गाडीला मागें लोटूं लागतें. शहारणपूरपासूनच हिमालयाच्या चढणीला थोडथोडा प्रारंभ होतो. दिल्लीवरून हरिद्वारला जाणाऱ्या आगगाड्या बहुतेक यात्रेकरूंनींच बारमहा खेंचून भरलेल्या असतात. भुसावळेहून हरिद्वारपर्यंत, आगगाडीचें तिसऱ्या वर्गाचें १० रु. सरासरी भाडें पडतें.

हरिद्वार, हें शहारणपूर जिल्ह्यांतील लहानसें टुमदार शहर बारा मास हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांतील यात्रेकरूंनीं सदैव गजबजलेलें असतें. त्यांतही हरच्या पायरीवर यथासांग स्नानविधि उरकून हातीं पूजासाहित्य घेऊन पायांत विजार, अंगांत सदरा, त्यांवरून क्वचित्प्रसंगीं चढवलेलें जाकिट आणि वर घेतलेली पांढरी ओढणी, नाकांत बुलाख असा हुबेहूब मुसलमानी पेहराव करून बुरखा पडदा कांहींएक न ठेवतां देवदेवतार्चन करीत असलेल्या सुस्वरूप पंजाबी स्त्रियांची गर्दी पाहून तर मोठीच मौज वाटते. आमच्या महाराष्ट्रांतील एखाद्या मंदिरांत असली मंडळी जाऊं लागली तर बाह्य पोषाखांतच धर्माचें सर्वस्व भरलेलें आहे असें मानणारा आमचा भट-पुजाऱ्यांचा वर्ग त्यांवर काय गहजब उडविल कोण जाणे! इकडील कित्येक पुरुषांचाही फेटा, दाढी, विजार वगैरे पोषाख व शुद्ध उर्दू जबान पाहून त्यांना एकदम मुसलमानांतून निवडून काढणें कठीण जातें. परंतु भिन्न भाषा, भिन्न पोषाख, भिन्न चालीरीती व अनेक प्रांतिक किंवा पंथ-भेद यांच्या योगानें आम्ही हिंदुलोक एकमेकांपासून बाह्यत: अत्यंत विसदृश जरी दिसलों तरी जोंपर्यंत आमचें ध्येय एक आहे, आध्यात्मिक आनंदासमोर भौतिक सुखें तृणप्राय मानण्याची ताकद जोंपर्यंत आम्हांत आहे, जोंवर पूर्वपरंपरेनें बनलेली आमची मनोरचना व प्रकृति सारखीच आहे, जोंपर्यंत वेद, भारत, रामायण, भागवतावरची आमची श्रद्धा कायम आहे, जोंपर्यंत स्थितप्रज्ञ परंतु कफल्लक अशा साधुजनांना राजेमहाराजे यांपेक्षांही थोर लेखण्याची बुद्धि आमच्यांत सारखीच विद्यमान आहे तोंपर्यंत आम्ही हिंदु एकराष्ट्रीय आहोंत, याचा प्रत्यय हरिद्वारच्या बाजूला जसा येतो तसा दुसरीकडे क्वचितच

येईल. रामेश्वराकडला कट्टा सांवळा मद्रासी अय्या, बंगालचा मत्स्याहारी बंगाली बाबू, उत्तरेचा 'सतरा भय्ये अठरा चूलेवाला' परदेशी भय्या आणि गिरिपुत्र मजबूत नेपाळी हे सारे एकमेकांची भाषा न समजतांही सरासरी खाणाखुणांनीं व्यवहार चालवून अगदीं घरच्या माणसाप्रमाणें एकमेकांची काळजी वहात असतांना पाहून मोठें कौतुक वाटतें. परदेशी बंगाली लोकांच्या बायकाही पंजाब्याप्रमाणेंच आपला पडदा वगैरे साफ गुंडाळून सर्वांशीं मोकळेपणानें विचारपूस करितात. या भूमींत पडदा वापरणें पाप आहे असें सांगतात. इंग्रजींतल्या म्हणीप्रमाणें प्रसंग हा एक जालीम उपाय असून सर्व कांहीं ठीकठाक करून सोडतो.

हरिद्वार स्टेशनापासून गांव अगदीं जवळ सरासरी पंधरा मिनिटांची वाट आहे. स्टेशनावर टांगेही मिळतात. इकडे धर्मशाळांची रेलचेल असल्यामुळें उतरण्यासंवरण्याची मुळींच पंचाईत नाहीं. कलकत्त्याचे शेट श्रीमान् विनायकराव यांनीं बांधलेली धर्मशाळा फारच मोठी, प्रशस्त व भव्य आहे. वाटेल त्या धर्मशाळेंत उतरून आपल्या इच्छेप्रमाणें मन-मोकळेपणानें रहाण्यास कोणाचीही आडकाठी नाहीं व तेथें रहाण्या-करितां एक पैदेखील द्यावी लागत नाहीं. पंड्यांच्या घरीं रहाण्याची सोय नसते. हरिद्वार हें योगतीर्थ असल्यामुळें तेथें वस्ती करून संसार करणें अयोग्य म्हणून येथून २ मैलांवर कनखल येथें पंडे लोक वस्तीनें रहातात. परंतु यात्रेकरूंना लागेल तेव्हां धर्मशाळेंत किंवा वाटेल तेथें पंडे येऊन भेटतातच. त्यांचें घर शोधीत जाण्याची गरज नसते. वास्त-विक पाहतां त्यांना टाळलेलें तेवढें बरें, पण कठिण कर्म खरें.

हरिद्वारला गांवच्या कांठाकांठानेंच गंगा गेलेली आहे. तिचा वेग जरी बराच आहे, तरी उंच उंच पहाडांवरून उड्या घेत येऊन ती येथें अंमळ स्थिरावली आहे. गंगेचें जल स्फटिकाप्रमाणें शुभ्र, निर्मळ व अगदीं बर्फासारखें गार आहे. उन्हाळ्याच्या भर दोनप्रहरीं देखील स्नान करावेंसें वाटत नाहीं. तरी भाविक यात्रेकरू प्रातःस्नान उरकून गंगाद्वारपूजा केल्याशिवाय रहात नाहींत. गंगेला सुंदर आणि प्रशस्त घाट बांधून उत्तम फरसबंदी केली आहे. पैकीं हरच्या पायरीवर गंगा-पूजन आणि स्नान होतें. येथें तीन तीन हात लांब पिवळे मत्स्य असून

ते स्नान करतांना खुशाल माणसांना रेटून जातात इतके धीट आहेत. मत्स्यांना त्रास देऊं नये, हरच्या पायरीवर जोडे वापरूं नयेत, अहिंदूंनीं तेथें येऊं नये अशाबद्दल सक्त ताकिदीच्या सरकारी हुकमाच्या पाट्या जागोजाग लाविल्या आहेत. कलेक्टरच्या परवानगीशिवाय हरच्या पायरीचा फोटो घेण्याचीही मनाई आहे. येथील नित्यक्रमाचा संध्याकाळचा आनंदोत्सव तर.अवर्णनीय होय. संन्यासी, बैरागी, बैरागिणी आणि इतर स्त्री–पुरुषांचे थवे गंगेंत स्नानें करून कणखर कंठरवानें हरिहर–नामोच्चारण करीत इकडून तिकडे फिरत असतात. एकीकडे कोणी संन्यासी व्यासपीठावर उभा राहून ब्रह्मचर्याचा उपदेश करितो, तर दुसऱ्या बाजूला त्याचप्रमाणें एखादी स्त्री अवलासमाजाला पातिव्रत्याचा उपदेश करिते. आणि तिसरीकडे तर पंजाबीस्त्रीपुरुषांचा मिश्र समाज सुस्वर तालसुरावर हरिगुण गाण्यांत गुंग होतो. आपल्या दृष्टीनें या मागसलेल्या व पडद्याच्या मुलुखांत पुरुषांच्या मेळ्यांत धर्मकार्यार्थ स्त्रियांना वावरतांना पाहून मोठें नवल वाटतें. पंजाबी स्त्रियांना आणि बैरागिणींना गीता–रामायणादि ग्रंथ पठण करतांना पाहून त्यांनीं आमच्यापुढें अवलोन्नतींत अघाडी साधली असें वाटतें. संध्यासमयीं गंगेंत दिवे सोडण्यांत येतात. ह्या लहानशा प्रकाशनौका पाण्यांतून मंदगतीनें डुलत जातांना पाहून भारी मौज वाटतें. गंगेच्या मध्यभागीं तीनचारशें इसमांची सोय होण्यापुरता एक लाकडी पूल तयार केला आहे; त्यावरून ही सारी मजा पहात असतां वेळ कसा भरकन निघून जातो तें समजत देखील नाहीं.

गंगेच्या कांठाकांठानें पहाडाच्या उंचभागीं गेल्यावर एका मोठ्या झऱ्यांतून पाणी कारंज्यासारखें वर येतें.त्याभोंवतीं चुनेगची कुंड बांधून त्याला सूर्यकुंड हें नांव दिलेलें आहे. येथें वानरसेना बरीच आहे. त्यांच्या वाटेस न जाण्यांतच मनुष्याची धडगत आहे. एरवीं ते मथुरा–वृंदावनाच्या वानरांप्रमाणें विनाकारण कोणाच्या अंगावर जात नाहींत, तथापि त्यांच्याकरितां आगाऊच फुटाण्याची तरतूद करून ठेवलेली बरी.

येथें पहाण्यासारखीं अनेक सुंदर मंदिरें आहेत. "गंगाद्वार" मंदिर हरच्या पायरीवरच आहे. जागोजाग संस्कृत शिकविण्याच्या पाठशाळा

तर किती आहेत हें नक्की सांगणें कठीण आहे. संस्कृत न जाणणारा ब्राह्मण क्वचित्. गांवापासून स्टेशनच्या पलीकडच्या बाजूलाच कनखल तीर्थ आहे. येथें जातांना वाटेंतच गंगेचा प्रचंड कालवा लागतो. गंगेंतून सर्व पाणी काढून घेतल्यामुळें कनखल येथें गंगेला मुळींच पाणी नाहीं. येथें गंगेच्या काठींच दक्षप्रजापतीच्या यज्ञांत पार्वतीचा अपमान झाल्यामुळें तिनें आत्मयज्ञ केला तें कुंड दाखविण्यांत येतें. येथें जवळच रामकृष्ण-सेवाश्रम असून त्यांतील विद्वान संन्यासी श्रीमद्विवेकानंदाचें कार्य पुढें चालवितात. येथून जरा पलीकडच्या वाटेनें गेलें कीं, थोड्या अंतरावरून ऋषिकुलाची भव्य इमारत दिसूं लागते. कनखलापासून तीन मैल आर्यसमाजाचें गुरुकुल आहे. आमच्या प्राचीन विद्यालयांच्या आदर्शभूत अशा ह्या दोन्ही नमुनेदार संस्था पाहिल्याशिवाय कोणींही राहूं नये. विद्यार्थ्यांची सतेज कांति, संस्कृत-पारंगतता, आणि साधी राहणी पाहून मनाला अत्यंत आनंद होतो. ( Plain living and high thinking). साधा आचार आणि उदात्त विचार शिकविणाऱ्या संस्था हल्लीं आपल्या देशांत ह्या दोनच आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. सर्वस्वी जुन्या वाङ्मयावरच भर देणें जरी अनुचित असेल तरी स्वतंत्रबाण्यानें उत्तम शिस्तीनें चाललेलीं हीं विद्यापीठें पाहून आम्हां महाराष्ट्रीयांना शिकण्यासारखें कांहींच नाहीं काय ?

हरिद्वार येथें रेल्वेप्रवास बहुतेक संपतो, म्हणून पुढील प्रवासांत लागणारे सर्व सामान-काठी, जोडे, मोजे, पायबंद, ( गेटिस ) बनाती, कानटोप, गंजिफ्राक, चोळणें, मेणकापड, टॉर्च, (विजेचा दिवा) यात्रेचे नकाशे, आगपेट्या येथेंच विकत घ्यावें लागतें.

पायीं प्रवास करावयाचा तर हातीं काठी असल्याशिवाय होणें नाहीं. पहाडाच्या चढउतारींत काठीचा उपयोग तिसऱ्या पायाप्रमाणें होऊन शिवाय हाताला दांडा ( Fulcrum ) लावल्याप्रमाणें प्रवास हलका जातो. काठी सबळ पण हलकी व खांद्याइतकी उंच असावी.

हिमालयाचा पायीं प्रवास करावयाचा म्हणजे जोडा—काठीशिवाय अशक्य. आपल्याकडे जोडा नसला तरी एकवार चालण्यासारखें असतें.

परंतु स्त्रियांपेक्षां पुरुषांची प्रकृति अधिक नाजूक आहे अशा समजुतीनें कीं काय न कळे, जोडाछत्र्यांची आवश्यकता फक्त पुरुषवर्गालाच भासते. कुलवधूंनीं असल्या वस्तु वापरणें म्हणजे महत्पाप! प्रत्यक्ष व्यभिचार!



**कुलीच्या पाठीवरील कंडी.**

जणूं काय त्यांना पुरुषांपेक्षां ब्रम्ह्यानें स्वभावतःच अधिक मजबूत केल्या-मुळें त्यांनीं देहरक्षण करण्याचें कारण नाहीं!! पण इकडच्या प्रांतांत हे

-सारे क्षुद्र भेद आणि अवास्तव कल्पना बाजूला ठेवाव्या लागतात. साधुसंन्याशांना देखील निरुपायास्तव जोडे वापरणें भाग; तेथें संसारी नाजूक स्त्रीवर्गाची काय कथा ?

खडकादगडांतून चालण्याच्या सपाट्यांत चांगले मजबूत बूट देखील चिंध्या उडाल्यामुळें फेंकून द्यावे लागतात. प्रसंगापुढें इलाज नाहीं. चांगल्याचांगल्या ब्राह्मणांना देखील फाटक्या जोड्याला स्वतां कपड्याचा जोड शिवून तात्पुरती सोय करावी लागते. निरुपायास्तव कित्येकदां पायांना महारोग्यासारख्या चिंध्या देखील गुंडाळण्याचा प्रसंग येतो. सुतळी तळाचे किंवा नाजूक खरी जोडे तीन दिवसांत फेकावे लागतात. चपला किंवा पुणेरी जोडे पायांतून निसटतात. करितां स्त्री-पुरुषांनीं **इकडे येतांना साधारण नवीन आणि मजबूत बूट दोन जोड किंवा कोंकणी वाहाणा बरोबर घेतल्याशिवाय कधींही राहूं नये.** हरिद्वाराला कोंकणी वहाणा मुळींच मिळत नाहींत आणि बूट मिळाले तरी किंमत जास्त द्यावी लागते.

पायमोजे येथें केवळ ऐषआरामाची वस्तु नसून अगदीं आवश्यक आहे. येथें डांस आणि माशा मनुष्याचा पाठलाग करून चावतात व रक्त काढतात. यांचा चावा फार विषारी असून त्यामुळें सर्वांगाला मनस्वी कंडू सुटून मनुष्य अगदीं पिसाळल्याप्रमाणें होतो. पहाडी डांस फार मोठमोठे असतात. रिकामपणा मिळाला कीं मनुष्याचे हात स्वाभाविकपणें अंग खाजविण्याचा उद्योगाला लागतात. पुढें त्या चाव्याचे ठिकाणीं फोड उठतात व फार वेदना होतात. ते फोड पुष्कळ दिवसपर्यंत बरे होत नाहींत. पायाच्या माथीं प्रवास. त्यांचें रक्षण करण्याकरितां चांगले गुडघ्यापर्यंत लांब पायमोजे वापरणें अवश्य. हे क्षुद्र जंतु 'पंडिताः समदर्शिनः' ह्या भगवदुक्तिप्रमाणें स्त्री-पुरुषांत कांहीं भेदाभेद करीत नाहींत, हें लक्षांत ठेवणें अवश्य आहे. स्त्रियांनीं देखील चोळणें वापरणें योग्य असें वाटूं लागतें !

बँडेजेस ( गेटीस ) किंवा पट्टया घेतल्यास चालण्याचे श्रम फारसे जाणवत नाहींत; पण त्यामुळें नडतें असें नाहीं.

भर उन्हाळ्यांत देखील बदरीकेदारच्या आसपासच्या टापूंत पाऊस किंवा दंव नहमीं पडतें. तेव्हां सामानसुमानाचा बचाव करण्याकरितां मेणकापड घेणें जरूर असतें.

**चामड्याचे जोडे व काठ्या पुढें कोठेंच मिळत नाहींत,** व बाकीचें सामान श्रीनगर येथें मिळालें तरी हरिद्वारापेक्षां दीडपट किंमत द्यावी लागते.

तिकडील प्रदेशांत खाण्यापिण्याचे कोणतेही पदार्थ चांगले मिळत नसावेत असा आपलेकडील लोकांचा वृथा गैरसमज आहे. उदरपोषणाला आवश्यक असें पदार्थ दर शेरास तूप २, दूध -।-, तांदूळ -॥-, गव्हाची कणीक -।≈ तूर ।≈, मुग। ≈, उडीद आणि मसूर यांच्या डाळी, वेसन-।≈. भाजीकरितां बटाटे. -।-, किंवा क्वचित कोहाळे ८≈, साखर १ या भावानें मिळतात. पैकीं दूध आणि तांदूळ पहिल्या प्रतीचे असतात. इकडे आवश्यक पदार्थांपैकीं फक्त मिरच्या, मसाले, साबुदाणा, लोणचीं व पोहे मुळींच मिळत नाहींत. क्वचित् मिरच्या मिळाल्या तरी अत्यंत महाग. पैशाच्या पैसाभार व त्याही तिखट नसतात. जागोजाग खनिज मीठ व सैंधव मिळतें, हरिद्वाराला तर ढोरांना चाटण्याकरितां सैंधवाच्या मोठमोठ्या शिला प्रत्येक ठिकाणीं ठेवलेल्या दिसतात. यात्रेकरू समजतात त्याप्रमाणें तें अपायकारक नसून अत्यंत शुद्ध असतें.

**दक्षिणी यात्रेकरूंनीं आपलें कोणचेंही सामान हरिद्वाराला मागें ठेवूं नये.** पंजाबीशिवाय इतर सर्व यात्रेकरूंना परत येतांना रामनगर स्टेशनावरून आगगाडींत बसावें लागत असून विनाकारण बराच फेरा घेतल्याशिवाय हरिद्वार वाटेंत पडत नाहीं.

पहाडांतील हवापाणी अत्यंत थंड असल्यामुळें वातावरणांत एकदम फरक पडतो. त्यामुळें **कित्येकांना हिंवताप, अमांश, बद्धकोष्ठ, अतिसार वगैरे विकार होतात. करितां सदरहू विकारांवर आणि पटकी पित्त, वगैरेकरितां देखील कांहीं औषधांचा संग्रह टिंक्चर आयोडीन, अमृतधारा, कर्पूरार्क, पेपरमिंटाचा अर्क, हेमगर्भ, अफु, किनाइन वगैरे जवळ बाळगायला विसरूं नये.** डेहराडूनचा

नोंद नं. ६६६२
स. क्र. ९९०
३१/५/३२



चहा फक्त श्रीनगर वगैरे दोन तीन मोठमोठ्या ठिकाणींच मिळतो. पण लिप्टन मुळींच मिळत नाहीं. झांशीपासून पुढें विड्याचें पान वर्ज्यच करावें लागतें. कारण दिल्लीला देखील पानें पैशाचीं तीन. हरिद्वार व श्रीनगर येथें त्याहूनही महाग. आणि पुढें रामनगर लागेपर्यंत मध्यें कोठेंही मिळत नाहीं. रोठा ( पुरभयी ) व निमाचिकणी (दखनी ) सुपारी मात्र पैशाला दोनपासून चार या भावानें मिळते. तंबाखूशिवाय तल्फेच्या वस्तु मध्यें कोठें मिळत नाहींत. ज्यांना गंगोत्री करावयाची आहे अशा यात्रेकरूंना दोन मार्ग आहेत. एक तर हरिद्वार येथून पुन्हां आगगाडींत बसून रेलमार्गानें डेहराडूनपर्यंत जाऊन पुढें गंगोत्रीपर्यंत पायवाटेनें जाण्याचा आणि दुसरा हृषीकेशरोड येथें उतरून देवप्रयागावरून टिहरी स्टेटमधून गंगोत्रीला जाण्याचा. ज्याला बदरीकेदार न करतां नुसती गंगोत्री व जम्नोत्री करावयाची आहे त्यानें डेहराडूनवरून सुलभ मार्गानें जाणें उत्तम. परंतु या मार्गानें हृषीकेश, लछमन झूला, देवप्रयाग वगैरे उत्तमोत्तम तीर्थें पडत नाहींत हें एक, आणि दुसरें गंगोत्रीपासून पुढें केदारचा मार्ग अत्यंत अवघड आहे. मांडीपर्यंत मनुष्य बर्फांत फसतो असें सांगतात. हरिद्वार येथूनच कंड्या, झंपानें ठरवून कुलींना गाडींत बसवून न्यावें लागतें व यात्रेकरूंना पुढें हृषीकेश येथेंही कंड्या, झंपानें पुष्कळ मिळतात.

हरिद्वाराच्या पुढचेंच स्टेशन **हृषीकेश रोड** येथून **हृषीकेश** सात मैल आहे. स्टेशनावरच टांगे *मोटारी मिळतील. आठ आणे स्वारीप्रमाणें भाडें पडतें. टांगे इतके खिळखिळे व चमत्कारिक असतात कीं जपून बसलें नाहीं तर टांग्यांतून एखाद्या दचक्यासरशीं माणूस खालीं पडावयाचा स्टेशनापासूनच जंगल सुरू होतें. या जंगलांत हत्ती असतात. त्याकरितां जंगलाचा मक्ता जाहीर लिलांव करून विकण्यांत येतो. रस्त्यांत ठिकठिकाणीं देवळें, धर्मशाळा, पाणपोया व दवाखाने आहेत.

स्टेशनापासून टांग्यानें सरासरी ३ तासांचा रस्ता हृषीकेश. कालीकमलीवाले बोवांच्या कृपेनें हरिद्वारपासून हिमालयाच्या गर्भांतील अत्यंत

---

* लक्ष्मणझूल्यापर्यंत हल्लीं मोटारची सोय झाली आहे. दर माणशीं -॥- आणे.

बिकटप्रदेशापर्यंत क्षेत्रोक्षेत्रीं आणि रस्तोरस्तीं धर्मशाळा, सदावर्तें, पाणपोया स्थापन होऊन त्यांची व्यवस्था आजतागायत उत्तम प्रकारें चालत असल्यामुळें संन्याशी-बैराग्यांना व इतर यात्रिकरूंना देखील उतरण्याच्या सोईकरितां चिंता करण्याचें कारण नाहीं. पुष्कळ वर्षांपूर्वी जेव्हां नारायणाला जायला धड रस्ता नव्हता, गंगेवर हल्लींसारखे सुंदर लोखंडी लोंबते पूल नसून दोराचे झुले होते. रात्रीं विश्रांति घेण्याकरितां निसर्गनिर्मित गुहांपेक्षां दुसरें ठिकाण नव्हतें, एकदां यात्रेस गेला म्हणजे पुन्हा परत येण्याची आशा नसे, अशावेळीं कालीकमलीवाले–महाराज प्रथमच यात्रेस गेले. तेव्हां तिकडे यात्रेकरूंचे हाल होत असलेले पाहून महाराजांचें नवनीतमृदु हृदय विरघळून गेलें आणि तेव्हांपासून यात्रेकरूंचा मार्ग सुलभ करण्याबद्दलची भीष्मप्रतिज्ञा करून त्यांनीं देशाटन सुरू केलें. मोठमोठ्या लक्ष्मीपुत्रांकडे जाऊन त्यांनीं भिक्षांदेही करावी, पण ती स्वतःकरितां नव्हे, तर यात्रेकरूंच्या सुखाकरितां; एकट्या स्वतःला मुक्ति मिळण्याकरितां नव्हे तर सर्वांनी नारायण–दर्शनाचा मार्ग सोपा करून देण्याकरितां. त्यांच्याजवळ साधनसामग्री म्हणजे काय ती एक काळी कांबळी. त्यांचें अंथरूण म्हणा, पांघरूण म्हणा, अंगरखा म्हणा कीं घर म्हणा, फक्त एक काळी घोंगडी. त्यावरून त्यांचें नांव काळीकमलीवाले बोवा पडलें. त्यांच्या चरित्राविषयीं म्हणण्यासारखी कांहीं माहिती मिळत नाहीं. अनुभवप्रकाश म्हणून त्यांचा एक ग्रंथ वेंकटेशेटसमाचारानें प्रसिद्ध केला आहे. पण केवढा प्रभाव त्यांचा ! सबंध हिमालय त्यांच्या लोककल्याणाची कहाणी वक्तृत्वपूर्ण भाषेनें प्रत्येकाच्या हृदयाला सांगतो. त्यांच्या कर्तृत्वाची छाप तेथील प्रत्येक वस्तूवर पडली असून त्यांचें नांव जेथें निघत नाहीं असा पहाडांतील एकही भाग नाहीं. जणूं काय हिमालयांत बोवांचें धार्मिक साम्राज्य आहे.

हरिद्वाराप्रमाणेंच हृषीकेश येथेंही कालीकमलीवाले बोवांच्या विस्तीर्ण धर्मशाळेंत उतरण्याची उत्तम सोय आहे. श्रीमान् अथवा दरीद्री कोणीही येऊन राहो. मज्जाव असा कोणाला नाहीं. आल्याबरोबर घडा-दोन घडे पाणी आणवून सत्रंजीबिछायत वगैरे घालून देतात. स्वयंपाकपाण्याकरितां वाटेल तीं भांडीं घ्यावींत. त्यांचा हिशेब कोणी ठेवीत नाहीं व भांडीं

परत करतेवेळीं कांहीं विचारपूसही होत नाहीं. येथें पातेलीं, पितळ्या थाळे वगैरे भांड्यांच्या राशिच्या राशी लागलेल्या असून तोंडांतून शब्द निघण्याचा अवकाश कीं हवीं तितकीं भांडीं हजर. संध्याकाळीं दिवाबत्तीची योजना प्रत्येक खोलींत करून धर्मशाळेंतील गुमास्ता हरएक यात्रेकरूजवळ हात जोडून मोठ्या विनयानें म्हणतो, " ठिकाण आपलें आहे. शीधाआटा किंवा अन्न हवें असल्यास आणून देतों. सेवकाला आज्ञा व्हावी. " धर्मशाळेंतलि एकंदर कारभार मोठा सुरळीत आणि सुव्यवस्थित चालतो. गोंधळ, घोंटाळा, आरडाओरड कोणच्याही प्रकारची नसते. कोणाला एक कपर्दिकदेखील इनामादाखल देण्याची जरूर नाहीं. स्वखुषीनें वाटल्यास धर्मशाळेच्या फंडाला वर्गणी द्यावी. येथिल धर्मशाळेंतील मुख्य व्यवस्थापक बोवांचा पट्टशिष्य असून तो येथून सर्व धर्मशाळांचीं सूत्रें हालवितो. त्याला नाथजी म्हणतात. यात्रेकरूंच्या सर्व अडचणींकडे तो मोठ्या तत्परतेनें लक्ष देतो. हा सदासर्वदा कोणच्याना कोणच्या कामांत निमग्न असतो. हिशेब ठेवणें, डाक--मनिआर्डरी घेणें व पाठविणें, वगैरे कारकुनी कामांवर निराळा इसम असतो. संध्याकाळीं हात जोडण्याचा फार्स करणारा इसम निराळाच, व याशिवाय इतर कामावर स्वतंत्र नोकर आहेतच. सूर्योदय होण्याच्या अगोदरच पाकनिष्पत्ति सुरू होते व सुमारें नऊ वाजण्याचे सुमारास कमंडलू-लोटा घेऊन संन्यासी- वैराग्यांच्या झुंडीच्याझुंडी धर्मशाळेकडे लोटूं लागतात. प्रत्यहीं कमींत कमी सातआठशें इसमांना डाळरोटीची पोट भरेल इतकी भिक्षा मिळते. शिजलेलें अन्न चालत नसल्यास सुखा शीधा, तूप, लांकडें देण्यांत येतात. कोणी विन्मुख म्हणून जात नाहीं. याप्रमाणें १२ वाजेपर्यंत अन्नदान चालतें. येथून जातांना प्रत्येक यात्रेकरूला मिठाई, पुऱ्या, भजीं वगैरे दुष्ट पदार्थ न खाण्याविषयीं मोठ्या कळकळीनें बजावण्यांत येऊन, मलबद्ध, हागवण व पटकी याकरितां व शिवाय पाणी बाधूं नये म्हणून नित्यनेमानें घेण्याकरितां औषधांच्या पुड्या बांधून देतात. ज्यांना पुढें सदावर्तें हवें असेल त्यांना येथें त्याबद्दल चिठ्या घ्याव्या लागतात. गरीबाची पुढें दैना उडूं नये म्हणून ज्या जवळ ५ रु. देखील नाहींत अशा यात्रेकरूना चिठी न देतां मागें परतून लावतात. दुष्काळाचे

वेळीं तर निदान ३० रु. असल्याशिवाय कोणींच पुढें जाऊं नये अशी प्रत्येकास ताकीद असते. व इतकेंही करून रामनगरला निःकपर्दिक बनलेले भणंग यात्रेकरूकरितां तिकीट काढून देण्याची सोय रामनगरच्या सेवासमितीनें केली आहे.

ह्या चिठ्या पुढील सदावर्तांत देऊन तेथून पुन्हां निराळ्या चिठ्या घ्याव्या लागतात. **चिठ्ठीशिवाय सदावर्तांतून अन्न किंवा शिधा मिळत नाहीं.** अर्थात् चिठीच्या नियमामुळें वाटेंत पुंजी संपलेल्या यात्रेकरूंची दैना होते, पण चिठीशिवाय खर्चाचा नीट हिशेब रहावयाचा नाहीं. म्हणून इलाज नसतो. तथापि वाटेंत अनाथ झालेल्यांचीही कांहीं सोय होणें आवश्यक आहे.


**हृषीकेश** येथें धर्मशाळेंत उतरल्याबरोबर कंडीवाले व झंपानवाले कुलीभोंवतीं जमतात. त्यांच्याशीं भाडें ठरवीत बसण्याची आवश्यकता नाहीं. कारण टिहरीच्या महाराजांनीं सर्व तऱ्हेनें योग्य बंदोबस्त करून एकच भाव ठरवून टाकला आहे. त्यांतही कांहीं अडचण आल्यास नाथजी ( धर्मशाळेचा व्यवस्थापक ) ला सांगितलें कीं ताबडतोब सर्व नीट जुळतें.

**कंडी** हा करंडी शब्दाचा अपभ्रंश आहे. ही बारीक बांबूंची व वेतांची विणलेली वाटोळी पेटारी असून पेल्याप्रमाणें बुडाकडे लहान व वरच्या बाजूकडे पसरट होत गेलेली असते;व पाय बाहेर काढण्याकरितां वरल्या अंगास एक बाजू कापल्याप्रमाणें थोडीशी उघडी असते. हिला दोहों बाजूंला दोऱ्या घातल्या असून कंडीवाला दोऱ्या हातांत घालून कंडी पाठीवर घेतो. नंतर एखाद्या उंच ठिकाणावर कंडी टेंकून स्वारीला बसण्यास सांगतो. स्वारीला मांड्या पोटाशीं घेऊन व कापलेल्या भागांतून पाय काढून हलनचलन न करितां तीवर पाय ठेवून अडचणींत बसावें लागतें. समोरच्या बाजूला लगामाच्या रिकाबीप्रमाणें पाय ठेवण्याकरितां एक लहानशी फळीही असते. कंडींत बसून कुलीच्या पाठीवरुन जाणें फार त्रासदायक असतें. जरा हालचाल करतां येत नाहीं कीं खोकतां येत नाहीं. थोडा तोल इकडे तिकडे झाला कीं कंडीवाल्याची गुरकावणी

टेकावी लागते. कंडीवाले मधूनमधून स्वारीला पायींही चालायला साग-तात. त्यांच्या मर्जीप्रमाणें न चालल्यास प्रसंगविशेषीं तोंडमुख घ्यायलाही हे लोक कमी करीत नाहींत. कंडींत बसतांना एखाद्या धोतरानें कंडीशीं पाय आवळून घ्यावे लागतात. न जाणों प्रसंग आहे. इतकेंही करून एखादे वेळीं जर दुर्दैवानें कंडीवाल्याला ठोकर लागली तर बरच्या स्वारीसकट उभययांना तेथेंच मुक्ति मिळायची ! शिवाय **जाड्याजुड्या माणसाला कंडींत बसून जाणें शक्य नसतें.** स्वारीपेक्षां सामानाकरितां कंड्यांचा खरा उपयोग असतो. गंगोत्रीस न जातां फक्त सरळ केदार आणि नारायणालाच जाणें असल्यास महेलचौरी म्हणजे अखेर मुक्कामा-पर्यंत ओझ्याला दरमणीं ३५ रु. आणि गंगोत्रीवरून केदार करून आल्यास दरमणीं ६४ रु. भाडें पडतें, शिवाय प्रत्येक कुलीला चण्या-चबीण्याकरितां अर्धा आणा रोज. केदार, बदरी व त्रिजुगी नारायण येथें आणि ज्या दिवशीं प्रवास अगदींच एक मैल देखील होणार नाहीं ते दिवशींही शेरशेर खिचडी, आणि शिवाय महा क्षेत्रीं प्रत्येकीं इनामाचा १ रु. द्यावा लागतो. स्वारीकंडी केल्यास मनुष्याचें जें वजन भरेल त्याप्रमानानें भाडें पडतें, बहुधा माणशीं रोज १ रु.प्रमाणें १॥ महिन्याच्या बदरीकेदारच्या प्रवासास ६० रु. पडतात असा अंदाज आहे. स्वारीकंडीला कंडीवाला चांगला मजबूत पाहून घ्यावा. हे पहाडी कंडवाले ओझें वहाण्यांत खंबीर असतात. एक इसम सरासरी मणभर ओझें कंडींत लादून पहाडाच्या भयंकर कड्यांवरून सहज लीलेनें मार्ग चढत जातो. त्यांत नेपाळी लोक तर विलक्षण मजबूत असतात. खरे मेहनतीचे पैसे यांचेच. यांजपाशीं रामदासी कुबडीप्रमाणें ( माटू ) असते, तीवर कंडी टेकून हे चालतां चालतां विसावा घेतात.

झंपान म्हणजे दोन वांबूच्या मध्यभागीं बांधलेली लहानशी चौकोनी खाट किंवा डोली. अ ब क ड याठिकाणीं सरळ रेषेंत चार माणसें झंपान खांद्यावर घेऊन चालत असतात. य र ल व या चौकटींत माणूस बसतो. कंडीपेक्षां हें बरेंच सुखावह आणि सोईस्कर असतें. पण त्यांत एखाद्या दुसऱ्या गांठोड्याशिवाय दुसरें कोणचेंही सामान जाऊं शकत

नाहीं. ऊन--पाऊस यांपासून बचावाकरितां अगोदरच सोय करून घ्यावी, मागाहून कुली कांहीं करीत नाहींत. मनुष्याच्या वजनाप्रमाणें यांचें भाडें बहुधा दर कुलीस १ रु. किंवा ‌‍-॥|- प्रमाणें दररोज दरमणीं ३।४ रु.




पडतें. म्हणजे एका माणसाला १०० रु. पासून १५० रु. पर्यंत पडतात. शिवाय दरमाणशीं इनाम खिचडी व चनाचवीना कंडीप्रमाणेंच द्यावा लागतो.

झंपानाहूनही उत्तम बरेली दांडी. हें आकारानें लहानशा बिनचाकी बगीप्रमाणें असून यांत आरामखुर्चीप्रमाणें टेंकून व वाटेल तेव्हां पाय पसरुन अघळपघळ बसतां येतें, व झोंपही घेतां येते. थंडी, वारा, ऊन व पाऊस यांपासून बचाव होण्याकरितां वरून टप असतो. परंतु हें भाड्यानें मिळत नसून १५ रुपयांस विकत मिळतें. व नंतर आपणांस कुली ठरवावे लागतात. सुखवस्तु श्रीमान् लोक यांतूनच प्रवास करितात. याला उचलण्याकरितां ४ पासून ८ कुली असतात. मात्र यांतही सामान ठेवतां येत नाहीं.

कंडी, झंपान व कुली ठरविण्याचें ऑफिस धर्मशाळेतच एके बाजूस आहे. एक ऑफिस लछमन झूल्यापलीकडे आहे. तेथें यात्रेकरू* व कुली यांच्यातील कराराच्या सर्व शर्ती यथायोग्य लिहिण्यांत येऊन त्यावर उभय पक्षांची नांवें आणि पूर्ण पत्ते लिहून सह्या घेतात. या चिठ्या तीन होत

*चौका वासनांचा, तुंगनाथ, वसुधारा, डिवरीताल वगैरेच्या शर्ती चिठ्ठींत नमूद कराव्यात. म्हणजे पुढें तक्रारीस जागा रहात नाहीं.

असून एक चिठी दप्तरांतील नोंदबुकांत रहाते आणि एकेक प्रत यात्रेकरू व कुली यांस देण्यांत येते. ×

हल्लीं हरिद्वार अगर हृषीकेश येथूनच कंड्या, झंपानें करावीं लागतात. रस्त्यांत वाटेल तेथें मिळत नाहींत. देवप्रयाग, श्रीनगर, उरवीमठ, गुप्तकाशी येथें जरी कांहीं कंडीवाले आढळतात तरी अंतराच्या मानानें दाम फारच कसून घेताल. हृषीकेशवरून जितकें भाडें पडतें तितकेंच भाडें अर्धें अंतर चालून गेल्यावरही मागतात. घोडीं प्रत्येक मोठ्या चट्टीवर मिळतात.

इकडील लोक इमानी असतात. दहापंधरा वर्षांपूर्वी इकडे कुलुपकिल्ली देखील माहिती नव्हती. कोणी यात्रेकरू झऱ्यावर, नदीवर, रस्त्यांत अगर चट्टींत ( दुकानांत ) पैशाची पिशवी अगर दागिना विसरून पुढें निघून गेला तरी कैक दिवसांनीं परत आल्यावर त्याची वस्तु त्याला जेथच्या तेथें मिळे, अशी आख्यायिका आहे. सुधारलेल्या मुलखाप्रमाणें पोलीसचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्याची गरजच नाहीं. पोलीसचा काळा डगला औषधालाही रस्त्यांत मिळत नाहीं. मोठ्या ठिकाणीं पोलीसचीं ठाणीं आहेत, पण त्यांना खुशाल चैनींत दिवस काढावयास मिळतात. पहाडांत चोऱ्या व डाके यांची यत्किंचित् भीति नसल्यामुळें यात्रेकरु पैशाची गांठोडी जवळ घेऊन वाटेल तेथें निर्धास्तपणें प्रवास करितात व झोंपीं जातात. तसेंच बायकाही पाहिजे तितके दागिने अंगावर घालून एकएकट्या जंगलांतून रस्त्यानें मागेंपुढें एकएक मैल सोबत नसतां खुशाल प्रवास करितात. सारांश, या देवभूमींत सत्ययुगाची प्रचीती अद्यापि येते. तथापि, सुधारणेच्या प्रभावासमोर इकडील सत्याचें तेज हळुहळू मंदावत चाललें आहे. प्रत्यक्ष चौरकर्म जरी नाहीं तरी लहानसहान लबाडीचे प्रकार इकडे घुसले आहेत. थोड्याच अवधींत आमच्या

× बरेलीदांडीची हल्लीं किं. १२॥ रु. रामनगरची सेवासमिति हे आपल्यापासून प्रवासाच्या अखेरीस विकत घेतात किंवा मेलचौरीपासून करावयाच्या कुलींना प्रवास–अखेरीस हें बक्षीस देण्याचें कबूल केल्यास कुलींचा दर सवलतीचा ठरतो.

साहचर्यानें हे लोक सुधारून चोरी लबाडी वगैरे सुधारलेल्या ढंगांत लवकरच प्रवीण होतील अशीं अस्पष्ट चिन्हें आतांच क्वचित् प्रसंगीं दृग्गोचर होऊं लागलीं आहेत! परमेश्वर करो आणि असल्या सुधारणांपासून त्यांचा बचाव होवो! कुली लोकांना थोडी चिरिमिरी देऊन अथवा अन्नाचें आमिष दाखवून खुष ठेवलें तर ते आपल्या सोबतच्या नोकरांपेक्षांही अधिक उपयोगी पडतात. त्यांची चिलीम्–हुक्याची लहरही आपणांस संभाळावी लागते. पण तितकें केलें कीं ते आपला बिस्तव पेटवितील, पाणी आणतील, भांडीं घांसतील व पायही चेपतील. आपल्या सोबतचा नोकर आपल्याप्रमाणेंच थकून गेल्यामुळें अर्थात् निरुपयोगी होतो. कांहीं पहाडी लोक इतके घाणेरडे असतात कीं त्यांच्या वाऱ्याला उभें रहावत नाहीं. पंधरापंधरा दिवस स्नान न केल्यामुळें त्यांचे कपडे किटून जातात व अंगांत लिचोड (उवा) पडतात. त्यांचा थोडाबहुत प्रसाद यात्रेकरूंना मिळतोच. त्यांचा नेहमींचा उद्योग म्हटला म्हणजे फुरसतीच्या वेळीं उन्हांत कपडे काढून लिचोड मारीत बसणें. पण अनेक प्रसंगीं निरुपायास्तव त्यांच्या हातचें पाणी पिणें अगदीं भाग पडतें. सोंवळें, ओवळें व त्यांच्या अनुषंगी स्वच्छतेच्या साऱ्या कल्पना गुंडाळून ठेवाव्या लागतात. आपली स्वतःची देखील स्वच्छतेशीं फारकत झाल्यामुळें आपलें इतकें रूपांतर होतें कीं आरशांत पाहिलें तर आपलें प्रतिबिंब देखील ओळखतां येत नाहीं. दीड महिना धोब्याशीं गांठ नसते. साबण मिळत नाहीं, आणि घरून कपड्यांचीं ओझीं आणतां येत नाहींत. दुसऱ्याच्या अंगाची घाण येते तशीच आपल्या अंगाचीही इतरांना थोडीतरी घाण येत असेल.

इकडे आमच्याप्रमाणें जातिभेदाचें प्रस्थ मुळींच नाहीं. ब्राम्हण म्हणजे मुख्य जात व ब्राम्हण नसतील ते सारे क्षत्रिय. रोटीव्यवहार ब्राम्हणक्षत्रियांत राजरोसपणें चालतो. कदाचित् सर्वच लोक मांसाहारी असल्यामुळें कांहीं अडचण उपस्थित होत नसावी. परंतु ब्राह्मण मत्स्याहार मात्र करीत नाहींत. वैश्य ही निराळी जात नाहीं. त्यांचा अंतर्भाव क्षत्रियांतच होतो. त्यामुळें क्षत्रियांत अनेक पोटजाति आहेत. त्यांच्यांत बेटीव्यवहारासंबंधीं कांहीं निर्बंध आहेत; पण ते कडक नसावेत. धोबी, तेली,

माळी, न्हावी हे सारे क्षत्रियच. ब्राह्मणानें तेल्याच्या हातची रोटी खाल्ल्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं. पण त्यांच्यांत बेटीव्यवहार मात्र होणार नाहीं. कदाचित् इकडे उद्योगधंद्याचा प्रसार न झाल्यामुळें जातिभेदही फैलावला नसावा. तथापि त्याचें बीज येथें सूक्ष्मरूपानें आहेच. क्वचित् ठिकाणीं शूद्र आहेत; पण फक्त डोंब, चांभार, भंगी अशाच लोकांना ही संज्ञा देण्यांत येते. आमच्याकडल्या एखाद्या मराठ्यानें मी शूद्र आहे असें म्हटल्यास त्याला येथें डोंब वगैरे समजून देवदर्शनही होणें नाहीं. या शूद्रांचा स्पर्श झाला असतां एखादा पाण्याचा शिंतोडा घेतल्यानें शुद्धि होते. शूद्रेतर लोकांत व्रतबंध असून ते सर्व यज्ञोपवीत घालतात. महेलचौरी सोडल्यावर एके ठिकाणीं तर मासे पकडणाऱ्या लोकांचे थवे-च्याथवे जानवीं घातलेले पाहून मोठा चमत्कार वाटला. यांना महाराष्ट्रांत कोणी शिवणार देखील नाहीं, पण इकडील ब्राह्मण लोक यांच्या हातचें विनदिक्कत अन्नग्रहण * करितात. दक्षिणेंतील कडक जातिभेदाला धर्माचें अत्यंत आवश्यक अंग समजून त्यांत हात घातल्यास आपण हिंदु रहाणार नाहीं, धर्मापासून च्युत होऊं असा हेका धरणाऱ्या लोकांना इकडच्या परिस्थितीवरून पुष्कळच बोध होण्यासारखा आहे. त्याचप्रमाणें या लोकांत सवर्गालंकार आहे, ब्राह्मणांप्रमाणें व्रतबंधादि संस्कार होऊन त्यांच्याप्रमाणें वर्तन करण्याची पूर्ण मुभा आहे तरी यांच्या कपाळची अवनति मात्र टळली नाहीं. हें आमच्या सांप्रतच्या ऱ्हासाचें खापर सर्वस्वीं जातिभेदाच्या कपाळीं फोडणाऱ्या सुधारकांनीं अवश्य लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

हृषीकेश येथें लहानमोठीं अनेक मंदिरें असून त्यांतून रात्रंदिवस चालणारे पूजापाठ, गोसाव्यासंन्याशांच्या आखाड्यांतून सतत होत असलेला जयजय सीताराम, अनेक पवित्र तपोवनांतून होत असलेलें पवित्र वेदाध्ययन यांहींकरून ह्या स्थलास मोठी शोभा आली आहे. भर दोनप्रहरीं देखील गंगेंत पाय बुडवत नाहीं अशा थंड जलांत प्रातःस्नान करून गंगेच्या वाळवंटांत एकांतस्थळीं पुस्तक घेऊन संस्कृतपठण करणारे तपो-


---

* भाताला कांहीं प्रतिबंध आहे, पण पोळीला मुळींच नाहीं असें समजतें.


वनांतील विद्यार्थी पाहून त्यांच्याविषयीं मोठा आदर वाटतो व जुन्या पद्धतीनें विद्याग्रहण करण्याची तन्हा अद्याप राष्ट्राच्या एका भागांत कायम असलेली पाहून मोठा आनंद वाटतो.

येथें गंगेच्या बाजूला पोस्ट ऑफिस, तारघर व पोलीसठाणा आहे. येथें वानर फार आहेत, कोणी इसम जेवीत असतां चटकन मागून झडप घालून ताटांतील पोळी लांबवितात. स्वयंपाक करतांनाही थोडें दुर्लक्ष झालें कीं तोच प्रकार. करितां प्रत्येक वेळीं काठी जवळ घेऊन बसावें लागतें. येथून आतां पहाडी मुलुख सुरू झाला. दुकानावर कोणचीही भरभराटीची कळा दिसत नाहीं. भाजी-शाक दुर्मिळ; मिळालें तर बटाटे मिळतात.


**लछमन-झूला:**—हा येथून एक मैल आहे. झूला म्हणजे पाळणा असा हिंदी भाषेंत रूढार्थ आहे. पण इकडे झूला पुलाला म्हणतात. पूर्वी गंगापार होण्याकरितां ठिकठिकाणीं दोरांचे पूल असत. दोन्ही कांठाला मोठमोठे आडवे दोर मजबूत बांधले असून त्यावरून काठ्या व फळ्या बांधलेले उभे दोर पात्रावर सोडलेले असतात. काठ्यांच्या व फळ्यांच्या दोन्ही टोकांना व त्यांच्याखालीं आणि वर पुन्हा दोर लावून त्यांत त्या बसवून बळकट जखडलेल्या असतात. पाय ठेवतातांक्षणींच असला दोरांचा पूल करकर करीत हालून, ५०।६० फूट खालीं धबधब्याप्रमाणें गर्जना करीत वहाणाऱ्या नदीच्या पाण्याला पाहून, भिणाऱ्या यात्रेकरूंच्या हृदयाचा किती थरकांप करीत असेल त्याची आतां कोणाला नीटशी कल्पना व्हायची नाहीं. वारा आला म्हणजे झोंपाळ्याप्रमाणें असल्या पुलावर झोंके मिळत. यावरून ह्या पुलाला झूला म्हणत असावेत. हल्लीं यात्रेकरूंना असल्या पुलावरून जाण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. देवप्रयाग आणि दुसऱ्या कित्येक ठिकाणीं अद्यापि हे पूल पाहाण्यांत येतात यावरून जिज्ञासाबुद्धीनें जाऊन पाहातां लोक सांगतात इतकी भीति वाटत नाहीं. हल्लीं फक्त तत्रस्थ पहाडी लोकच ह्या पुलावरून जाणें-येणें करतात. या दोरांच्या झुलत्या पुलाशिवाय इकडील लोकांनीं आपल्या सोईकरितां शिंक्यांची योजना केलेली असते. या कांठावरून



सस्पेन्शन अथवा हँगिंग ब्रिज. पृ. २२



लछमन झूला.



साधा प्राथमिक झूला.



जुन्या तऱ्हेचा फळ्यांचा व दोरांचा झूला. पृ. २१.

त्या काठापर्यंत एक जाडा दोर बांधलेला असून त्यांतून दोरीनें मजबूत विणलेल्या टोपलीप्रमाणें मनुष्याला आडवें पडण्यालायक शिंकें मार्गेपुढें सरकत असतें, ज्या इसमाला पलीकडे जावयाचें असेल तो शिंक्याच्या खालीं लावलेल्या बारीक दोरीनें तें अलीकडच्या कांठावर ओढून घेऊन त्यांत उताणा पडल्याप्रमाणें बसतो. कांठावर शिंकें जमिनीलगत असल्यामुळें बसण्याला अवघड जात नाहीं. त्यांत बसल्यावर नांव वल्हविल्याप्रमाणें आपले हातांना वरच्या दोरांना डोकीच्या मागल्या भागाकडे ओढून पाठीनें शिंकें मागें रेंटतो, याप्रमाणें सरतसरत तो पलीकडे पोंचतो. अर्थात् ह्या शिंक्यांत प्रत्येक खेपेस एकच मनुष्य जाऊं शकतो. जुन्या पुलांचा हा अवशेष आतां क्वचित् ठिकाणीं देवप्रयागजवळच पहाण्यांत येतो. यात्रेकरूंना याची ही भीतिप्रद मजा पहाण्याचा प्रसंग आतां कधीं येत नाहीं. कारण ठिकठिकाणीं आतां लोखंडी सस्पेन्शन ब्रिज ( झुलते पूल ) झाले आहेत. या पुलांना दोन टोकांना कांठावरच काय तो आधार असतो. मधें पात्रांत एकदेखील खांब नसतो. या पुलाच्या वरच्या दोहोंबाजूला लोखंडी तारांचे दोन जाड दोर असून हे लोखंडी दोर दोन्हीं कांठा-वरच्या उंच बांधकामांतून ओंवून खडकांत मजबूत पुरलेले असतात. या दोरांवरून लोंबत सोडलेल्या लोखंडी सळयांशीं खालचा पूल जखडलेला असतो.

सारांश, या पुलांना दोन्हीकडच्या बांधकामाशिवाय मध्यें खालून कांहीं आधार नसून फक्त ते वरच्या तारांच्या दोरांवरच टांगलेले असतात. कातरणीच्या ( कोळ्याच्या ) सूक्ष्म जाळ्यावरून ( Conic section ) नांवाच्या शास्त्राची उत्पत्ति झाली आहे, व झुलत्या पुलांच्या कल्पनेचें उगमस्थान देखील या लहानशा गणिती प्राण्याच्या तंतुजालकौशल्यांतच आहे. ह्या तीनही प्रकारच्या पुलांचे फोटो घेण्याची लेखकास उत्कट इच्छा झाली, परंतु कॅमेऱ्याच्या अभावीं त्याचा निरुपाय होता.

आतां या लोंबत्या पुलांमुळें पूर्वीप्रमाणें यात्रिकरूंची कष्टमय स्थिति राहिली नाहीं. गंगा ओलांडायची म्हणजे शिंक्यांत बसवून झोंके देतात आणि मग सर्कशींतल्या खेळाप्रमाणें दुसऱ्या कांठावरील मनुष्य शिंकें धरतो. जरा झोंका कमी पडला कीं मनुष्य शिंक्यांतून निसटून गंगेत

पडून वाहून जातो वगैरे भीति–उत्पादक गप्पा लोकांत दाट पसरलेल्या असतात. त्यांना यत्किंचित् आधार नाहीं. असला प्रकार पूर्वी केव्हांच नव्हता, व आतां तर दोरीच्या पुलावरून व शिंक्यांतून जाण्याचा प्रसंग सबंध यात्रेंत एकदांही येत नाहीं.

लछमनझूला येथें पहिला सस्पेन्शन ब्रिज असून तो २८० फूट लांब आहे. हा कलकत्त्याचे राय सुरजमल बहादूर यांनीं आपल्या खर्चानें बांधला आहे. इकडे आपल्या कडल्याप्रमाणें खालीं खांबाचा आधार देणें शक्यच नाहीं, गंगेचा वेग इतका भयंकर आहे कीं वाटेल तसें मजबूत बांधकाम ढासळून पडेल. बांधकाम काय तें दोन टोंकाला पुलापेक्षां बरेंच उंचीपर्यंत केलेलें असतें. येथून देवप्रयाग–रुद्रप्रयाग–कर्णप्रयागवरून सरळमार्गानें (केदार–गंगोत्री न केल्यास) बदरीनारायण १६६ मैल आहे. मार्गांतच स्वामी रामतीर्थांचे स्मरणार्थ लाला वैजनाथनामक एका माजी न्यायाधीशानें भव्य मठ बांधलेला आहे. गंगेच्या कांठाकांठानें अत्यंत विकट पण सुरम्य स्थलीं संत–वृंदांनीं आपल्या पर्णकुटिका बांधल्या आहेत. ह्या आश्रमांतून गंगेच्या सान्निध्यांत संन्यस्तवृत्ति धारण करून तपेच्या तपें ईश्वराराधन करीत असलेल्या साधुसंतांच्या मेळ्यांत मिसळून दुर्लभ नरदेहाचें सार्थकच करावें असे विचार निरंतर मनांत घोळतात. आतां बदरीकेदाराचा रस्ता लागतो. ज्यांना पुढें जावयाचें नसतें ते लोक हृषीकेशावरून लछमनझूल्यास येऊन श्रीरामलक्ष्मणांचें दर्शन करून परततात.

लछमनझूल्यापलीकडे स्वर्गभूमि लागली. गंगेनेंच पहाड फोडून भक्तजनांना कैलासाचा मार्ग खुला करून दिला आहे. इकडे रस्त्याची सर्व्हे करण्यास इंजिनिअरची जरूरी नाहीं बहुतेक रस्ता नद्यांच्या कांठाकांठानेंच केला पाहिजे. एके हाताला नदी आणि दुसऱ्या हाताला पहाड, मध्यें लहानसा रस्ता, असा सारा मार्ग आहे, व ही गोष्ट लेखांत दिलेल्या नकाशावरून कळून येईल. कारण गंगोत्री, बदरीकेदार व बदरीनारायणाचे रस्ते भागीरथी, मंदाकिनी व अकलनंदा या नद्यांच्या कांठाकांठानेंच आहेत. फक्त एवढेंच कीं कधीं एका कांठानें तर कधीं दुसऱ्या कांठानें. पुढें पुढें कांहीं ठिकाणीं ही वाट पहाडांच्या सरळ कड्यावरून

एकपावली होत गेली आहे. पण सुरवातीचा मार्ग इतका अवघड नाहीं. मार्गांत यात्रेकरूंच्या सोईकरितां ठिकठिकाणीं चट्ट्या आहेत, चट्टी म्हणजे यात्रेकरूलोकांचें मुक्कामाचें ठिकाण. चट्टीवर अनेक झोंपड्या घातलेल्या असतात व प्रत्येक झोंपडीवाल्याचें दुकान झोंपडींतच एके बाजूस असतें. अशा प्रत्येक झोंपडीसही चट्टी म्हणतात. चट्टीवाले यात्रेकरूंच्या खुशामती करून त्यांना बोलावतात. पण यात्रेकरू जेथें उतरतील तेथलेंच सामान विकत घ्यावें लागतें. दुसऱ्याच्या येथून एक पैचा जरी जिन्नस आणला तरी चट्टीवाला अंगावर तुटून पडतो. प्रत्येक चट्टीवाला भाजीपासून तें तेलापर्यंत सर्व जिन्नस थोडेथोडे ठेवितो. त्याच्या दुकानांत जी वस्तु नसेल ती तो दुसऱ्याकडून स्वतः आणवून देतो. यात्रेकरूनें त्याला कळविल्याशिवाय परभारें ती विकत घेतां कामा नये. पाण्याजवळ ज्याची चट्टी असते त्याजकडे यात्रेकरू झुकतात. म्हणून इतर चट्टीवाले त्यांच्याकरितां पाण्याचे घडे आयत भरून तयार ठेवतात. स्वयंपाकाचीं भांडीं चट्टीवाल्याकडून मिळतात. परंतु मुख्य मुख्य भांडीं आपलीं आपल्याजवळ असावींत हें बरें. सर्वच भांडीं त्यांच्याकडून मिळत नाहींत. यात्रेकरूंची गर्दी असली म्हणजे एखादे वेळ मैदानांतही स्वयंपाक करण्याची व एखादवेळ रात्रही पण काढण्याची पाळी येते. स्वयंपाकाच्या मागें त्यांची विक्री असते म्हणून नुसत्या फराळ करणारास भाडें देण्यास तयार असतांही चट्टींत जागा मिळत नाहीं. कारण येथें चट्ट्यास भाडें घेत नाहींत. हृषीकेशपासून देवप्रयागपर्यंत कोणत्याही चट्टीवर एक गिनीचेसुद्धां रुपये मिळत नाहींत. कारण चट्टीवाल्याचें सारें भांडवल आठदहा रुपयांपेक्षां कधींही जास्त नसतें. रुपयाचें चिल्हर अगर खुर्दा देखील त्याजवळ नसतो, मग १५ रुपये कोठून मिळणार ! चट्टीवाल्याशीं भाव करीत बसण्याचा उपयोग नाहीं. चट्टींत राहावयाचें असल्यास तो मागेल तो भाव त्याला द्यावा लागतो. पण बहुतेक साऱ्या चट्ट्यांतून एकच भाव असतो. यात्रेकरूंना कुजके नासके पदार्थ अगर जवाचा आटा विकूं नये म्हणून सरकारनें सक्त नियम केले असून सॅनिटरी इन्स्पेक्टरची वेळोवेळीं पहाणी होत असते. कदाचित् याच कारणामुळें चट्ट्या कल्पनेबाहेर स्वच्छ साफसुफ करून ठेव-

झेल्या असतात. प्रत्येक चट्टीवर दोन मेहतर असतात. यांच्याकडून यात्रेकरूंना केव्हां केव्हां फार त्रास होतो. चट्टीच्या दोन्ही बाजूला लाल झेंड्या लावल्या असून शौचविधीकरितां झेंडीबाहेर जावें लागते. गंगेच्या कांठीं शौचास बसण्याची मनाई आहे. आरोग्याच्या व स्वच्छतेच्या दृष्टीनें हे नियम खरोखरच चांगले आहेत. मुलें व आजारीलोकांनीं वाटेल तेथें बसल्यास चालतें. पण झेंडीबाहेर गेल्यावर देखील हे लोक माणशीं पैसा पैसा उकळण्याकरितां कधीं पहाड चढायला, तर कधीं दरींत उतरण्याकरितां मागें ससेमिरा लावतात व इकडे यात्रेकरूं-गरीबलोकांचाच भरणा फार असल्यामुळें ते सर्व छळ निमूटपणें सोसतात. भंग्याला इकडे **चूडा** म्हणतात. याशिवाय प्रत्येक मोठ्या चट्टीवर चौधरी असतो. कंडीवाला पळून गेल्यास अगर आणखी कांहीं रिपोर्ट वगैरे केल्यास तो पोलिसस्टेशनवर बातमी पोंचविण्याची तजवीज करतो.

**लछमनझूला** येथें पाणपोई, धर्मशाळा, सदावर्त, डाकबंगला आणि एक दोन लहान दुकानें आहेत. **हृषीकेशपासून येथपर्यंत तपोभूमि होती.** आतां **पलीकडे स्वर्गभूमि** असून येथून सारा मार्ग अत्यंत रमणीय वनप्रदेशांतून गंगेच्या कांठाकांठानें पहाडापहाडांतून गेल्याचें मागें सांगितलेंच आहे. जर मागेंपुढें दृष्टी फेंकली तर आपण कोणत्या दिशेनें आलों व कोणत्या दिशेला जाणार याचा कांहीं अंदाज होत नाहीं. गंगेच्या वरच्या बाजूला डेहराडूनकडे जंगलांतून इमारती झाडें तोडून त्यांची कांपीव लांकडें बनविण्याचा मोठा कारखाना आहे; लांकडें तयार झाल्यावर तीं गंगेंत टाकून देतात म्हणजे गंगेच्या ओघाबरोबर वहात वहात तीं हरिद्वारपर्यंत जातात व मग तेथें पकडून त्यांना आगगाडींतून बाहेरदेशीं पाठवितात. हीं लांकडें वहात जातांना पाहून मोठी मजा वाटते. इकडील जंगलांत कढीलिंबाचीं झाडें अतोनात आहेत. भंगी लोक खुशाल गोडलिंबाच्या खांद्याच्या खांद्या तोडून त्यांचा उपयोग रस्ते झाडण्याच्या कामीं करितात. इकडील पहाडी लोक त्याला ‘ गंदना ’ म्हणतात. ह्या प्रदेशांत आंबे, जांबूळ वगैरे उष्णप्रदेशांतील झाडें

मुळींच नाहींत. ॲपल, पीअर, चेरी ऑप्रिकॉट वगैरे झाडें थंड प्रदेशांत मुबलक. आतां आपलें वातावरण अगदीं बदलतें. अगदीं नवीनच सृष्टींत आतां आपण येतों. मागें घरीं ठेवलेल्या माणसांची चिंता आणि संसारांतील दुःखें यांचें पार विस्मरण होतें. गंगेच्या गंभीर गर्जनेबरोबर यात्रेकरूंचा "जय गंगामाई जय बद्री," असा जयघोष मिलाफ पावून अंतःकरण तल्लीन होऊन जातें. आपल्या मनांत रागद्वेषादि विचारांना अगर इतर मनोविकारांना देखील आपोआप थारा मिळेनासा होतो. काय असेल तें असो. अंतःकरणांतच विलक्षण क्रांति होत असल्याचा अनुभव येथें प्रत्येक यात्रेकरूला येतोच येतो.

लछमनझूल्यापासून २ मैल **गरुडचट्टी.** येथें दोन तीनच झोपड्या आहेत. राहण्याची सोय विशेष चांगली नाहीं, तरी पाण्याच्या तोटीवर तृषा शांत करून तेथें असलेले तंबाखू व भाजीपाल्याचे मळे पहात वृक्षांच्या छायेंत विश्रांति घ्यावीशीं वाटतेच. इकडील प्रत्येक चट्टीवर साधुसंतांच्या सोईकरितां गांज्याखालीं थोडीना थोडी जमीन गुंतलेली असतेच. आपलेकडे गांज्याचें एकाद दुसरें झाड जर चुकून कोठें परसांत वाढलें तर त्या बिचाऱ्या गृहधन्याच्या कपाळीं चारसहा महिने विनभाड्याच्या घरांत सरकारचा पाहुणा होऊन बसण्याचें आलेंच म्हणून समजावें. पण अबकारीखात्याचे निर्बंध इकडे गांज्याला लागू केले नाहींत असें दिसतें.

येथें प्रत्येक केळीचें खोड लावण्याप्रीत्यर्थ २॥- रु. चा संकल्प सोडण्याकरितां यात्रेकरूंच्या मागें ससेमिरा आहेच!

गरुडचट्टीपासून **फुलवाडी** चट्टी ४ मैल आहे. येथील गंगादर्शन अत्यंत रम्य आहे. गंगेंत सुंदर पांढऱ्या व भस्मी रंगाच्या गारेचे गुळगुळीत मोठमोठे दगड असून त्यांतून भक्तजनतारणाची घोर प्रतिज्ञा करीत गंगेचा प्रवाह अनेक धारांनीं खडकांदगडांतून मोठ्या जोरानें मार्गशोधन करतांना दिसतो. गंगेंत स्नान करून या दगडीवर गंगेच्या मध्यभागीं बसून तिच्या नादांत आपल्या अंतःकरणाची तंद्री लावण्यांत कांहीं अनुपम शांति मिळून अवर्णनीय आनंद होतो. गंगेचा सबंध किनाराच असा कांहीं पवित्र व रमणीय आहे, कीं मनन-चिंतन-पठन

करण्याकडे तेथें मनाची साहजिक प्रवृत्ति होते. मनुष्य कितीही दमून थकून आलेला असो, तो गंगेचा गंभीर स्वर श्रवण करीत व तिच्या शोभेचें सारखें अवलोकन करीत जलौघांत पाय सोडून देऊन थोडा वेळ बसला कीं त्याचे सर्व श्रमांचा परिहार होऊन त्याचें मन प्रसन्न होतें. त्याचप्रमाणें गंगेच्या हिमजलांत चटपट पांचदहा मिनिटें स्नान केलें कीं १५।१५ मैल चालण्याचा शीणभाग पार नाहींसा होतो. गंगेचें माहात्म्यच कांहीं अलौकिक आहे. गंगा म्हणजे एक निर्जीव पदार्थाचा मोठा प्रभाव आहे या भावनेपेक्षां बऱ्याच उच्च भावना आपोआप मनांत उद्भवतात. ती सचेतन आहे असाच ठाम विश्वास होऊन तिच्या मांडीवर सदोदित संन्निधिसौख्याचा आस्वाद घेत एखाद्या लहान बालकाप्रमाणें क्रीडा करीत रहावें अशी लालसा मनाला उत्पन्न होते. त्यांत येथून गंगा सोडून जावें लागणार असें मनांत येऊन तर गंगाकिनाऱ्यावरून उठावेंसेंच वाटत नाहीं; जणूं काय आपण एखाद्या प्रिय स्नेह्याला अगर निकटच्या नातलगाला सोडून चाललों आहोंत इतकें वाईट वाटतें. रस्त्यानें वाट चालतांनाही आतां गंगा कधीं भेटेल म्हणून कंडीवाल्यांना यात्रेकरू विचारूनविचारून पुरेवाट करून सोडतात.

फुलवाडीचट्टीपासून चढण सुरू होऊन पुढें १०।१२ मैलपर्यंत ती सारखी लागलेली आहे. येथून मोहनचट्टी १ मैल, गुलरचट्टी ३ मैल व मध्यें आणखी इतर लहानसान चट्या आहेत. गुलरचट्टी येथें एका नाल्यावरील सस्पेन्शन ब्रिज ओलांडल्यावर कठीण मार्ग लागतो. आतांपर्यंत धीरेधीरे पहाड चढत होतों, पण येथून मात्र खडी चढण ७।८ मैलांची आहे. मध्यें पाणी देखील लवकर मिळत नाहीं. यात्रेकरू व्याकूळ होऊन जागोजाग बसतात. ही चढण बिजनीचढाई म्हणून प्रसिद्ध आहे. ह्याच्यापेक्षां पुढें भयंकर कठीण चढ आहेत, त्यांजसमोर बिजनीचढाई कांहींच नव्हे; पण संवय नसतां प्रथमच चढण लागल्यामुळें फार जिवावर जाते. 'भय्या ! चट्टी कितनी दूर है !' म्हणून येणाऱ्याजाणाऱ्या माणसांना कितीदां तरी विचारावें, व " भय्या नजीक है, अभी चले जावगे. " म्हणून उत्तर आलें कीं आतां संपलेंच म्हणून समजून पुन्हां जिवांत जीव येऊन चालूं लागावें व पुनः चट्टी लवकर आली नाहीं

म्हणजे श्रांत होऊन बसावें असें अनेकदां होतें. गुलरचट्टीपासून बिजनी-चट्टी ४ मैल आहे. बिजनीला पाण्याची फार हांकाहांक, कारण ठिकाण अत्यंत उंचीवर पहाडाच्या माथ्यावर आहे. पहाडांतून एक लहानसा झरा वहात येतो त्याची नळी चट्टीजवळच लाविली आहे. करांगुलीसारखी लहानशी पाण्याची धार पडत असून नळीवर गर्दी भयंकर असते. या बिजनीच्या अलीकडे सुमारें अर्धमैलांवर,छोटी बिजनी म्हणून लहानशी चट्टी आहे. ती अगदीं नुकतीच तयार झाल्यामुळें दुकानें दोन तीनच आहेत, पण पाणी मुबलक आहे. मोठ्या बिजनीवर पाण्याच्या कमतरते-मुळें स्नान, कपडे धुणें वगैरे चांगलेंसें होत नाहीं. माशांचाही बराच ताप आहे.

येथून पुढची बंदरचट्टी ६ मैल आहे. आतां अवघड चढण बहुतेक संपलीच. एक दीड मैल आणखी चढावें लागतेंच,पण तें खड्या चढणी-वरून नव्हे. सावकाश चढत चढत आपण अचानक पहाडाच्या शिरः-प्रांताजवळ दोन मोठमोठ्या पहाडांची गांठ घालून देणाऱ्या ७।८ हात रुंदीच्या संयोगीभूमीवर येऊन पोंचतों. अशा खिंडीस नोडखाल म्हण-तात, व तेथेंच एका कानपूरच्या तुळशीराम नांवाच्या धर्मात्म्याची प्याऊ ( पाणपोई ) आहे. रस्त्याच्या दोहों बाजूंनीं मैलोंगणती खोल गेलेल्या दऱ्या व त्यांतील हिरव्यागार वृक्षांची दाट गर्दी आणि त्या पलीकडे १०।१५ मैल अंतरांतील टापूंत आलेल्या अनेक लहान मोठ्या पर्वतांच्या रांगा आणि एके बाजूस लांबून झळकत असलेलें गंगेचें उदक यांनीं सृष्टिशोभेला कांहीं अपूर्व भरती चढली होती. पहिल्या प्रथमच इतकें उंच येऊन शेंकडों मैलांतील देखावा दृष्टीस पडल्यामुळें आपल्या नेत्रांचें पारणें फेडीत बायनाक्युलरमधून या शोभेचें आकंठ पान करीत तासचे तास घालावेसे वाटतात. आपण किती चढलों हें पाहण्याकरितां अशा वेळीं वायुभारमापक यंत्राची वारंवार आठवण येते.

या यंत्राची योजना वातावरणाचा दाब मोजण्याकरिता केलेली असते. जितकें उंच चढावें तितकें वातावरण विरळ होत जातें, व नळींतील पाऱ्यावरील हवेचा दाब कमी होऊं लागतो, त्यामुळें यंत्रांतील पारा खालीं उतरूं लागतो. समुद्रसपाटीला त्यांतील पाऱ्याची उंची ३० इंच

असते. १०८० फूट उंच गेल्यास त्यांतील पारा १ इंच खालीं उतरतो असा शास्त्रज्ञांनीं सिद्धांत काढला आहे. यंत्राच्या अभावीं आपण किती उंच चढलों असूं याचा तर्क करीत बसणें विफल आहे. येथून १ मैलपर्यंत साधारण सपाट रस्ता व पुढें उतार लागला आहे. पहाड उतरायचा म्हणजे उतार कधीं सरळ नसतो. रिव्हर्सिंग स्टेशनापासून आगगाडीची गति ज्याप्रमाणें घटकेंत उलट व घटकेंत सुलट होते त्याचप्रमाणें उतारावरील नागमोडी रस्त्यानें आतां पूर्वेला तर लगेंच पूर्वीच्या रस्त्याच्या खालच्या बाजूनें पुन्हां पश्चिमेला असें करीतकरीत पहाड उतरावा लागतो; उताराच्या रस्त्याला फार फेरे खात जावें लागतें, पण उताराच्या भरांत मनुष्य पळत निघतो, किती चाललों त्याचें भान रहात नाहीं. आतांपर्यंत जेवढा पहाड चढलेला असेल तेवढा सर्व उतरावा. या पहाडांतील रस्ता इतकीं वांकणें–वळसे खात गेलेला आहे कीं कित्येकदां चट्टी अगदीं समोर आपल्याजवळ दरीच्या पलीकडच्या दरडीवर दिसते. तेथील माणसें दृष्टीस पडतात व त्यांचें बोलणेंचालणें स्पष्ट ऐकूं येतें. पण तेथें प्रत्यक्ष जाऊन पोंचायाला दोन दोन तास लागतात. एक चट्टी या कांठावर व पुढील चट्टी नदीच्या किंवा दरीच्या म्हणा पुढल्या कांठावर. सरळ रेषेनें अंतर मापलें असतां फार तर अर्ध्या मैलाचा पण चांगला ५।६ मैल मार्ग आक्रमण करावा तेव्हां पलीकडच्या बाजूला मनुष्य जातो. चढापेक्षां उतार सुलभ जातो खरा, पण फेरा फार खावा लागून उतारावरून साहाजिकच सपाट्यानें निघाल्यामुळें मनुष्य अतिशय दमतो. त्यामुळें कित्येकदां चढापेक्षां उतार त्रासदायक वाटतो.

याप्रमाणें **बिजनीचट्टीपासून** १ मैल चढ $\frac{1}{2}$ मैल सपाट, आणि ४$\frac{1}{2}$ मैल उतार ओलांडल्यावर फार वेळानें **बंदरचट्टी** येते. बंदरचट्टीपासून पुन्हां सावकाशपणें थोडथोडी चढण सुरू होते. पुढें ४ मैलांवर **महादेवचट्टी** आणि तेथून पुढें २ मैल **रामचट्टी** आहे.

बंदरचट्टीपासून पूर्ववत् मार्ग गंगाकिनाऱ्यानेंच गेला आहे. पण ह्याचा अर्थ इतकाच कीं रस्त्यानें चालतांना उसळ्या मारीत जाणारें गंगेचें पाणी डोळ्यांनीं दिसतें व त्याचा खळखळ आवाज कानांनीं ऐकूं येतो. गंगेंत उतरून पाणी घेऊं म्हटलें तर जवळ जवळ अशक्य. येवढ्या

मोठ्या जलौघाच्या सान्निध्यांत देखील दुसऱ्या एखाद्या झऱ्याच्या अभावीं अनेकदां तहान मारणें भाग पडतें. तृषेनें प्राण कासावीस होऊन निर्वाणीची वेळच आली तर पहाडी लोक वाटेल तशा बिकट वाटेंतून देखील पाणी आणून देतात हा भाग वेगळा. महादेवचट्टी उतरण्याला वाईट नाहीं. तेथून सरासरी दीड मैलांवर पहाडाचा लांबचलांब कडा रस्त्यावरून बिनखांबी मंडप सोडल्याप्रमाणें पुढें आलेला असून रस्ता त्याच्या खालून गेलेला आहे. त्या एके बाजूनें उघड्या बोगदेवजा रस्त्यांतून जाण्यांत मोठी मौज वाटते. तेथें उन्ह किंवा पाऊस कधीं लागत नाहीं. याच रस्त्याच्या पलीकडच्या बाजूनें पाण्याचा एक सुंदर झरा पहाडावरून धबधब्याप्रमाणें खालीं पडत असलेला पाहून अत्यंत आनंद होतो. असल्या झऱ्याखालीं स्नान करण्यांत काय मौज आहे ती प्रत्यक्ष अनुभवाशिवाय कळणें शक्य नाहीं. कितीही दुःखीकष्टी माणूस असो, कितीही श्रम झालेले असोत, अंतःकरण आनंदानें भरून येतें. साऱ्या श्रमांचें आणि दुःखांचें परिमार्जन होतें. या झऱ्याकडे किती वेळ तरी नुसतें पहात बसावेंसें वाटतें. यासारखे लहानमोठे झरे पुढेंही आणखी पुष्कळच आहेत, पण ते सर्वच इतके सुंदर नाहींत. यापुढें लवकरच **रामचट्टी** लागते.

रामचट्टीहून दुर्बिणींतून पाहिलें असतां समोर दरीच्या पलीकडच्या कांठावर उंचभागीं **कांडीचट्टी** दृग्गोचर होते. पण तेथें जाण्याकरितां दीड-मैल वळसे घेत जावें लागतें. कांडीचट्टी उतरण्याला मोठी सुंदर आणि सोइस्कर आहे. पाणी तर अगदीं विपुल आहे. पाणी अनेक पाटांतून खेळवून बागाईत केलेली आहे. व वृक्षांच्या गर्द छायेंत दुकानासमोर यात्रेकरूंना बसण्याकरितां बांकें ठेवलेलीं आहेत.

स्फटिकासारख्या शुद्ध निर्झरांचा मंजुळ ध्वनि ऐकून आणि जलक्रीडा करून त्याबरोबर आपलें संगीत मिसळून आनंदानें नाचतबागडत ह्या झाडावरून त्या झाडावर भुर्रदिशीं उडून जाणारे पक्षी पाहून यात्रेकरूंची अंतःकरणेंही प्रफुल्लित होऊन नृत्य करूं लागतात.

**व्यासघाटः**—येथून ४॥ मैलांवर व्यासघाट आहे. हृषीकेश सोड-

त्यावर पहिलें महत्त्वाचें स्थळ लछमनझूला आणि दुसरें व्यासघाट. व्यासमहर्षींनीं येथें तपश्चर्या केल्यामुळें या स्थळाला महत्त्व आलें आहे. येथें व्यासांचें एक लहानसें मंदीर आहे, व सुंदर पाठशाळा आहे. १४० विद्यार्थी शिकत असतात. रस्ता बहुतेक सपाटीवरूनच पण डोंगराच्या माथ्यावरून आहे. व्यासघाटाच्या अलीकडे एक मैल अगदीं खडी उतरण लागते.

राजमार्गानें गेल्यास फेरा पडतो म्हणून बहुतेक लोक पगदंडीवरून ( पहाडांतील जवळची पण बिकट पाऊलवाट ) जातात. पगदंडीवरून चढणें सोपें पण उतरणें कठीण असतें. ही एकपावली वाट तर विशेष बिकट आहे. उतरतांना पाय न घसरतांना तोल संभाळून बसतउठत जावें लागतें. खालीं खोल दरी पाहून डोळे फिरतात, घेरी येते. यापेक्षां आपला मोठा रस्ता पुरवला असें वाटतें. तरी भगवान् आपल्या भक्तांना सांभाळून नेतो; कधींही अपघात होऊं देत नाहीं.

येथेंही ही खडी उतरण संपल्यावर व्यास–गंगेवर ( नायरनदी ) सस्पेन्शन ब्रिज लागतो. ( रुंदी १६० फूट ) या पुलाच्या तारांच्या दोरांवरून वानरांना भराभर पळत असतांना पाहून मोठी मजा वाटते. पुलापलीकडे एक रस्ता ४० मैलावर कोटद्वार रेलवेस्टेशनकडे गेला आहे व दुसरा व्यासचट्टीवर गेला आहे. व्यासघाट येथें व्यासगंगा व भागीरथीचा संगम झाला आहे. व्यासगंगेचें पिवळें पाणी व भागीरथीचें पांढुरकें पाणी संयुक्त झाल्यावरही बऱ्याच दूरपर्यंत एकमेकांत मिसळत नाहीं, व स्पष्ट अलगअलग दिसतें. इकडील नद्यांच्या संगमांवर बहुतेक हाच प्रकार आढळण्यांत येतो. ह्या संगमाच्या ठिकाणीं भागीरथीचा प्रचंड जलौघ, तो तिचा भयंकर वेग, आणि विशाल पात्र व वाळवंटापलीकडे कांठावरील चट्या आणि मंदिरें यामुळें या स्थळाला फारच रम्यता आलेली आहे. येथेंही काळीकमलीवाले बोवांची धर्मशाळा, सदावर्त, डाकघर, व लहानसा दवाखानाही आहे. येथें खाण्यापिण्याचे जिन्नसही अंमळ बरे

मिळतात व चट्टया उत्तम आहेत. लछमनझुल्यापासून येथपर्यंत सरासरी ३२ मैलांच्या रस्त्यांत मधें कोठें सदावर्त वगैरे नाहीं असें दिसतें. त्यामुळें गरीबांचे हाल होतात.

परत फिरावयाचें मनांत आल्यास येथून १० मैल बाणघाट ( उंची २३५० फूट ) नंतर ६ मैल द्वारिखाल ( उंची ५३५० फूट ) पुढें ६ मैल दादमंडी व १६ मैल कोटद्वार रेलवेस्टेशन असा मार्ग आहे. बाणघाट येथें श्रीनगर–पौडी–कोटद्वारचा राजमार्ग लागतो. वाटेनें महत्वाचीं गावें व बाजार लागतात. लँडस्डाऊनची छावणीही नजीकच आहे. जिल्ह्यांतील मालाची वहातुक याच मार्गानें होत असल्यामुळें रस्ता सारखा वहात असतो. श्रीनगरपासून पौडी तहशील ८ मैलावर आहे. देवप्रयाग ( बाहा ) येथून पौडी तहसिलीला १५ मैलांचा निराळा रस्ता आहे. पण जिल्ह्यांत शहरें काय तीं दोनच–पहिलें कोटद्वार व दुसरें श्रीनगर. बरेचसे हौशी प्रवाशी हरिद्वारपर्यंत येतात. त्यांनीं आणखी थोडे श्रम करावयाचें मनांत आणल्यास त्यांना हिमवताच्या वैभवाची कल्पना या मार्गानें सहज होईल. पण व्यासघाट ते बाणघाट मार्ग अत्यंत अवघड आहे.

व्यासघाटापासून देवप्रयाग ९ मैल आहे. हा रस्ता म्हणण्यासारखा विकट किंवा चढउतारीचा नाहीं. पुढें **झाल्टूरी** व **उमरासू** ह्या चट्टया दोन दोन मैलांवर असून पुढें **सौरचट्टी** तीन मैल व तेथून देवप्रयाग दोन मैल आहे. हरिद्वार सोडल्यापासून अंब्याचीं झाडें येथेंच प्रथम एका चट्टीवरील बगीच्यांत दृग्गोचर होतात. मेची १५ तारीख असून देखील आंबे फक्त मोहोरावर होते. फळ धरलेलें नव्हतें. हे आंबे आश्विन-अखेर पिकतात असें कळलें. या प्रदेशांत एकंदर आंबा कमी. केदार-वरून परत येतांना रामनगरच्या रस्त्याला लागले म्हणजे मात्र आंबराईला कांहीं कमी नाहीं. देवप्रयागच्या पलीकडेही केदारबदरीपर्यंत आम्रवृक्ष क्वचितच दिसतो.

सौरचट्टी सोडली कीं थोड्याच वेळानें देवप्रयाग येथील भव्य मंदिरांचे सोनेरी कळस व दगडांनीं बांधलेल्या सुंदर इमारतींची शोभा दृग्गोचर होते. इकडील इमारतींचें बांधकाम शास्त्रीय दृष्टीनें पाहिल्यास अगदीं निर्दोष आढळून येतें. घरें खालपासून वरपर्यंत दगडाच्या बांध-

णीचीं असून छपरावर कौलाऐवजीं दगडांच्या ( स्लेटीच्या ) पातळ तत्त्यांची छावणी केलेली असते. लहान खेड्याच्या वस्तींतील गरिबांची दुमजलीं घरें देखील दोरीसूत नीटनेटकीं आंखून बांधलेल्या लहान लहान बंगल्यासारखीं सुंदर बांधलेलीं असतात. आमच्या इकडील मोठमोठ्या सुधारलेल्या गांवांतदेखील ओबडधोबड वांकडींतिकडीं घरें आणि निसर्गाच्या प्रियपुत्रांचीं हीं सुंदर टापटिपीचीं घरें यांतील तफावत पाहून वाटतें कीं या पहाडी लोकांस उपजतच बांधकामाचें कौशल्य प्राप्त होत असावें. वृक्षांच्या गर्द छायेंत, पहाडाच्या शिरोभागीं, खालून हरहर गर्जना करीत जाणाऱ्या गंगेला मिठी मारण्याकरितां उड्या मारीत जाणाऱ्या अनेक झऱ्यांचें संगीत श्रवण करीत आनंदानें वास करीत असलेल्या ह्या लोकांचा खरोखर हेवा वाटतो.

**देवप्रयाग**—येथें उंच ठिकाणीं वस्तीच्या सुरवातीस डांक व तारघर आहे. खालच्या बाजूला अलकनंदेच्या दोन्हीं कांठावर दुकानें आणि इतर वस्तीचींघरें आहेत.जुन्या प्रकारचा रस्स्यांचा पूल येथेंच गंगेवर आहे. व तेथेंच केव्हां शिंकेंही पहावयास मिळतें. अलीकडच्या थडीवर एकाबाजूला काळीकमलीवाले बोवांची धर्मशाळा आणि सदावर्त आहे. आतांपर्यंतचा सारा मुलुख ब्रिटिशहद्दींतला होता. अलकनंदेवरील लोखंडी लोंबता पूल ( २८० फूट लांबी ) ओलांडला कीं टीहरी संस्थानची सरहद्द लागली. पलीकडच्या बाजूला थोड्याच अंतरावर अनेक सुंदर मंदिरें आहेत. त्यांतील श्रीभैरवजीचें मंदिर विशेष प्रसिद्ध आहे. वागीश्वरीचेंही स्थान मोठें रम्य वाटतें. पूजेअर्चेकरितां दक्षिणी पंडित म्हणून शंकराचार्यांनीं आपल्याबरोबर तेलंग पंडे इकडे आणले त्यांच्या वंशजाकडेच अद्यापिही तो अधिकार चालत आहे. येथें देवळाचे दरवाजे सुमारें १०।११ वाजतां बंद होत असल्यामुळें स्नान, पिंड वगैरे सर्व लवकर आटपावें लागतें. याच्या खालच्या बाजूला भागीरथी आणि अलकनंदा यांचा संगम आहे. अलकनंदा महापूर आलेल्या नदीप्रमाणें सपाट्यानें वहाणारी खरी, पण भागीरथीच्या घनघोर गर्जना करीत जाणाऱ्या प्रचंड ओघासमोर ती स्थिर व शांतपणें वाहणारी अशी भासते. भागीरथीचा तो वेग पाहून मोठ्या मी मी म्हणणाऱ्या पट्टीच्या पोहणाऱ्याचीही छाती धडधडूं लागेल.

पायरीला मजबूत खिळलेली लोखंडी सांखळी धरून यात्रेकरू स्नान करितात. गुडघाभर पाण्याच्या पलीकडे जाण्याची हिंमत होत नाहीं. हरिद्वारप्रमाणेंच येथेंही मोठमोठे सुंदर मत्स्य आहेत. कांहीं ४—५फूट लांब व ४० शेर म्हणजे १ मण वजनांत भरतील. त्यांच्या शेवाळलेल्या पिंवळ्या पाठीवरून वाटेल त्यानें हात फिरवावा इतके ते धीट आहेत. संगमाजवळच पिंडदान करितात. क्षौर करितांना कित्येक परदेशी बाया सबंध डोक्यावरील केंस न काढतां मध्यभागीं पुरुषांप्रमाणें एक लांब शेंडी ठेवितात ! !

देवप्रयागाजवळ राघवपर्वतावर श्रीरामचंद्राचें सुंदर मंदिर आहे. १८०३ च्या धरणीकंपांत हें देऊळ व इतर मोठमोठीं घरें ढासळलीं. दौलतराव शिंद्यानें या देवळाचा जीर्णोद्धार केला. संगमस्थळाची उंची १५५० फूट, वरती त्यापेक्षां १०० फूट व त्यापेक्षां मागल्या टेंकड्याची उंची ८५० फूट अधिक आहे. अलकनंदेंत वसिष्ठकुंड व भागीरथींत ब्रह्मकुंड आहे. थोडथोड्या अंतरावर दशरथ पर्वत, हनुमान पर्वत, सूर्यकुंड वगैरे स्थळेंही प्रेक्षणीय आहेत. पण हीं यात्रेकरूंच्या मार्गावर नसल्यामुळें थोडेच लोक तीं पहाण्याकरतां थांबतात. तथापि टिहरी-पलीकडील बहिरवघांटीचा उल्लेख केल्याशिवाय रहावत नाहीं. टिहरीसंस्थानांत जान्हवी व भागीरथीच्या संगमावर जुनाट पण धरणीकंपानें दुभंग झालेल्या किल्ल्याप्रमाणें हें स्थळ असून देखावा अवर्णनीय आहे. दोन्हीं नद्या सरळ तुटलेल्या कड्याच्या कोंडींतून फार खोलीवर वहात आहेत. २५० फूट लांबीचा झूला जान्हवीवर असून खालीं पात्र ३५० फूट खोल आहे. तिकडे पाहतांना अंधारी येते.

या देखाव्याचा नंबर जगांत दुसरा आहे, पहिला नंबर दक्षिण-आफ्रिकेंतील झांबेझी नदीवरील झुल्याचा आहे. ६०० फूट लांबीच्या पुलाखालीं झांबेझी नदीचें पात्र ४०० फूट खोलीवर आहे.

देवप्रयाग, रुद्रप्रयाग, विष्णुप्रयाग, नंदप्रयाग व कर्णप्रयाग ह्या पंचप्रयागांपैकीं देवप्रयाग मुख्य असून हरिद्वारानंतर टुमदार व मोठ्या वस्तीचें प्रथम ठिकाण हेंच लागतें. येथें सॉवरिनचे रुपये अल्प प्रयत्न केल्यास मिळतात.

येथून आतां दोन रस्ते फुटतात. एक रस्ता टिहरीसंस्थानांतून गंगेच्या कांठाकांठानें गंगोत्रीस गेलेला असून दुसरा ब्रिटिशहद्दींतून अलकनंदेच्या कांठानें केदारबदरीस गेलेला आहे. कित्येक यात्रेकरू गंगोत्रीला जाऊन नंतर तिकडील अवघडमार्गानें केदारास जाण्याकरितां त्रिजुगीनारायणावरून गौरीकुंडास येतात. ज्यांना गंगोत्री वगळावयाची आहे ते आपले सरळ मार्गानें जातात. या केदारच्या मार्गानें गेल्यास तीन मैलांवर विद्याकोटी व पुढें पांच मैलांवर राणीबाग नांवाची सुंदर चट्टी आहे. येथून थंडी आपला प्रभाव चांगलाच गाजवूं लागते. मेच्या भर–उन्हाळ्यांत देखील रात्रीं जाड्या दुलयांची अवश्यकता भासते. तेथेंही जवळच मागें वर्णन केलेलें शिंकें पहाण्यांत येतें व पुढें रामपूर २ मैल आणि तेथून बिल्वकेदार ५ मैल आहे. हा सारा मार्ग बहुतेक सपाटीवरून असून पहाड व रस्ता यांच्या दरम्यान मधूनमधून मैदानें व शेतें आहेत.

बिल्वकेदार किंवा भिल्लकेदार येथें पाशुपतास्त्राच्या प्राप्तीकरितां अर्जुन तपश्चर्या करीत असतां शिवानें त्याचें सत्व पहाण्याकरितां एक वराह निर्माण केला. दोघेही त्याची शिकार करीत असतां तो मरण पावला. तेव्हां ही शिकार कोणाची म्हणून शिव व अर्जुन यांचें युद्ध जुंपून अखेर अर्जुनाच्या पराक्रमानें शिव प्रसन्न होऊन त्यांनीं आपलें रूप प्रगट केलें, तेंच हें बिल्वकेश्वराचें लिंग म्हणून अलकनंदेच्या कांठीं एका विशाल वृक्षाच्या घनच्छायेंत लहानसें शिवालय व अर्जुनपद दाखविण्यांत येतें. पुण्यक्षेत्र म्हणून अद्यापिही येथें आसपासच्या गांवांतून प्रेतें दहनविधीकरितां आणतात. हा विधि मोठा चमत्कारीक वाटतो. कशीबशी लहानशी चिता रचून त्यावर प्रेत ठेवण्यांत येतें व त्यावर आणखी थोडी लांकडें व गवत टाकतात व अग्नि देतात. सुमारें अर्धा पाऊण तास जळल्यानंतर एक बांबू घेऊन निष्ठुरतेनें मस्तकाची टिकोरी फोडून अर्धवट जळलेलें प्रेत तसेंच गंगेंत लोटून देण्यांत येतें. नदींतले मासे त्यावर मेजवानी झोडीत असल्यामुळें लवकरच हाडांचा सांपळा खालीं बुडतो व प्रेत दिसेनासें होतें. ह्या पुण्यक्षेत्रीं प्रेतें आठ आठ कोसांहून नेतात व कित्येक ठिकाणीं तर प्रेत तसेंच गंगेंत टाकून चालते होतात. मंत्र, विधि, संस्कार कांहीं नाहीं.

जेव्हां जीवन्मुक्त ज्ञानी । त्यांचे शरीर पडो रानीं । अथवा पडो स्मशानीं । तरी धन्य झाले ॥ अशी समजूत करून घ्यावी !

बिल्वकेदार येथें फक्त तीनच चट्ट्या आहेत. पाणी खोलांतून आणावें लागतें आणि माशांचा त्रास तर कांहीं विचारूच नये. दिवसाची वेळ असल्यास अंमळ पलीकडे जाऊन वृक्षांच्या छायेंत गंगाकिनाऱ्याजवळील मैदानांत स्वयंपाक केलेला बरा. येथें गंगेचें पाणी म्हणजे शुद्ध हिमजल. ऐन मेचा उन्हाळा, मध्यान्हीची वेळ, पण तहान लागली कीं पाणी एकदम पिववत नाहीं. घोट घोट सावकाश प्यावें लागतें; दांताला कळा लागतात इतकें गार असतें. पुढें तर तें याहीपेक्षां अधिक गार होत गेलें आहे. बाजूला अलकनंदेवर सस्पेन्शन ब्रिज(झुलता पूल)आहे पण त्यावरून जाण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं.

**श्रीनगर** उंची १७०६ लोकसंख्या २०९१. १९०१ सालीं पावसाचें मान ३५ इंच.बिल्वकेदारपासून ४ मैल आहे.रस्ता पूर्वीप्रमाणेंच मैदानांतून आहे; चढउतार मुळींच नाहीं. २ मैल मार्ग चालल्यावर श्रीमान् लोकांनीं प्रशस्त ठिकाणीं बांधलेले बंगले आणि त्यांच्या सभोंवतालच्य बागा, मळे वगैरे पाहून आपल्या मुलखांत आलों कीं काय असें क्षणभर वाटतें. श्रीनगर हें गढवालप्रांतांतील मोठें शहर असून येथें म्युनिसिपालिटी, हायस्कूल, दवाखाना, तारघर, डाकघर, डाकबंगला, पोलीस स्टेशन वगैरे शहरगांवच्या सर्व सोई आहेत. इकडे दवाखान्याला सफाखाना म्हणतात. बाजार ओलांडून रस्त्यानें नीट पलीकडे गेल्यावर वस्तीच्या शेवटींशेवटीं काळीकमलीवालेबाबांची भव्य धर्मशाळा आहे. येथें चट्ट्यांची सोय नसल्यामुळें कीं काय कोण जाणें धर्मशाळेंत सारे यात्रेकरू व साधुसंतांची गर्दी असते. निजण्याच्या खोल्या पडल्या माडीवर, आणि स्वयंपाकाची जागा मिळते खालीं. यामुळें गैरसोय होते. अलकनंदेचें पाणीही जरा लांबून आणावें लागतें. धर्मशाळेच्या खालच्या मजल्यावर समोरच्याच बाजूला सर्व दुकानें आहेत. अमुकच दुकानांतील माल घेतला पाहिजे असा कांहीं कोणाचा जोरा नाहीं.

हरिद्वारहून ज्या वस्तु बाजारांतून घ्यावयाच्या राहिल्या असतील अगर वाटेंत संपल्या असतील त्या येथें अवश्य घ्याव्या. भाविक लोक

देवाकरितां पंचमेवा, रेशमी कापड, वगैरे जिन्नस येथून नेतात, पण ते केदारबदरीलाही मिळतातच. इकडच्या प्रांतांत सर्वत्र देहराडूनचहाचें चलन विशेष आहे. लिप्टन कोठें मिळत नाहीं. हरिद्वारापेक्षां सर्व जिन्नस दीडपटीनें महाग असल्याचें मागें लिहिलेंच आहे. मात्र **येथून आगपेट्यांचें डझन आणि मेणवत्तीचा पुडा घेण्यास तरी निदान विसरूं नये.** कारण आगपेट्या पुढें एक तर मिळत नाहींत. मिळाल्याच तर दोन पैशास अर्धवट भरलेली डबी ( पेटी ) व तीही सरदलेली. मातीचें तेलही ( रॉकाईल ) कोठें मिळतें व कोठें मिळत देखील नाहीं.


ब्रिटिश गढवालांत मोठीं शहरें दोनच. एक येथून ५६ मैलांवरचें रेल्वेस्टेशन कोटद्वार व दुसरें श्रीनगर पूर्वी टिहरीचे राजाचें वास्तव्य असलेलें श्रीनगर १८९४ सालच्या प्रसिद्ध गोहना–महापुरानें वाहून गेलें व त्या ठिकाणापासून सुमारें अर्धा मैल लांब हें नवीन श्रीनगर वसलेलें आहे. जुन्या शहराच्या थोड्याशा पडक्या इमारतीशिवाय कांहीं मागमूस उरलेला नाहीं. शहराच्या जागेवरून शेती झाली असून तेथें नांगर फिरत असतो. या पुराच्या तडाख्यांतून दोनतीन देवळें काय तीं बचावलीं. बाकी वस्तींत असलेल्या देवळांचा आतां कांहीं पत्ता उरला नाहीं. कमळेश्वर महादेवाचें देऊळ वस्तीपासून ·॥· मैलावर आहे. प्रत्येक वैकुंठचतुर्दशीला स्त्रिया पुत्रप्राप्तीच्या लालसेनें हातांत तुपाचे दिवे घेऊन या देवळांत रात्रभर जागर करितात. जिचा दिवा सकाळेंपर्यंत राहील तिची मनोवांच्छा तृप्त होणार अशी समजूत आहे.

दुसरी पाहाण्यासारखी वस्तु म्हणजे श्रीमच्छंकराचार्यांनीं स्थापन केलेलें श्रीयंत्र. उलट सुलट त्रिकोणांत त्रिकोण त्रिकोणांत त्रिकोण घालून हें तयार केलेलें असतें. मंत्रशास्त्रांत या यंत्रांचें महत्त्व फार. बहुतेक देवी उपासकांना यांची चांगली माहिती असून तांब्यावर कोरलेलीं यंत्रें काशीला विकतही मिळतात. बहुतेक *देवतांचीं ध्यानें या निरनिराळ्या प्रकारच्या यंत्रांवर बसविलेलीं आहेत.


---

*विशेष माहितीकरितां " त्रिपुरा तापिनी " उपनिषत् पहा.

श्रीयंत्र



श्रीयंत्र



आज आपणा हिंदूंना याची मुळींच माहिती नाहीं, पण जयपूरच्या सुप्रसिद्ध मुसलमान मूर्तिकारांना हे ध्यानाचे श्लोक पाठ असून कोणी शंका प्रदर्शित करतांच हे मुसलमान अस्खलितपणें संस्कृत श्लोक म्हणून दाखवितात !

कमलेश्वर महादेव आणि श्रीमच्छंकराचार्यांनीं स्थापन केलेलें श्रीयंत्र यांचें दर्शन घेऊन नंतर यात्रिकरू पुढें जातात. **पुढें जाण्याच्या अगोदर सॉवरिन मोडून घ्यावेत. कारण पुढें रुद्रप्रयागास किंवा कोठेंही रुपये मिळतीलच असा नेम नाहीं.** एखादे वेळ पुष्कळसे सॉवरिन असूनही रुपये न मिळाल्यामुळें उपाशी रहाण्याची पाळी यावयाची.

**सुकृताचट्टी** श्रीनगरपासून ५ मैल असून अगदीं सावकाश पहाड चढावयास सुरवात होते. पुढें **भट्टीसेरा चट्टी** ३ मैल आहे. या चट्टीच्या अंमळ अलीकडे सुमारें अधमैलावर पहाडांतून उंचीवरून शॉवरबाथप्रमाणें अनेकधारांनीं स्फटिकासारखें शुभ्र जल खालीं पडतें. लहानपणीं मोठ्या पावसांत उभें राहून नाचण्याबागडणाऱ्या बालकाप्रमाणें या जलधारांत क्रीडा करावीशी वाटते. असें शुद्ध जल भट्टीसेरा येथें मिळत नाहीं. पाण्याचा एक मोठा झरा आहे खरा; पण त्याचा प्रवाह अगोदर मळ्यांतून खेळवून पाणचक्कीवर आणून सोडलेला आहे. तेथें गरगर यंत्रें फिरवण्यांत म्हणा किंवा मळ्यांत उन्ह लागल्यामुळें म्हणा त्यांत उष्णता उत्पन्न झाल्यामुळें हिमजलपानाला संवकलेल्या जिभेला त्याची गोडी वाटत नाहीं. येथें प्रत्येक चट्टीसमोरून पाण्याचा पाट नेऊन त्यांतून तें सारखें वहात ठेविल्यामुळें या ठिकाणाला फार शोभा आली आहे. पुढें प्रसिद्ध खांकरा चढाई एकसारखी लागत असल्यामुळें येथेंच विश्रांति घेऊन ताज्या दमानें पुढें निघणें बरें.

**खांकराचट्टी** पुढें ३॥ मैल आहे. व्यासचट्टीपासून भट्टीसेरापर्यंत मार्ग फारसा कठीण जात नाहीं, कारण चढउतार असले तरी ते मुळींच बिकट नाहींत. पूर्वींची बिजनीचढाई बिकटच गेली पण आतां लागणारी चढण बिजनीला मागें टाकील. हातभर रुंद रस्त्यांतून सारखा उभा चढ आहे. मागें–पुढें खालीं–वर पहातां येत नाहीं. बाजूच्या दरीकडे पाहिलें कीं डोळेच फिरतात. ह्या दरींतून दीड

दोन कोस खोलीवर गंगामाई नित्याप्रमाणें धो धो वाहात असतेच. पण दुर्बिणीच्या साहाय्याशिवाय तिचा प्रवाह दिसत नाहीं; आणि इतक्या उंचीवर तिचा आवाजही ऐकूं येत नाहीं. वर आकाश, आजूबाजूला उंच उंच पहाड आणि खालीं खोल अक्राळविक्राळ मुख पसरून बसलेल्या दऱ्या असा हा सारा प्रदेश आहे.+ चढण इतकी खडी आहे कीं अगदीं मुंगीच्या पायानें चालून देखील दम भरून आल्यामुळें श्रमित झालेले यात्रेकरू जागोजाग बसलेले आढळतात. त्यांच्या तोंडांतून शब्द निघत नाहीं. श्रमामुळें घशाला कोरड पडते. तहानेनें प्राण व्याकुळ होतात. झरे एवढ्या उंचीवर नाहींतच, पण इमानी पहाडी लोक आज्ञा होतांच ह्याच्याहीपेक्षां बिकट ठिकाणांतून खोल दरींत उतरून किंवा वानरासारखे पहाड भराभर चढून कोठून तरी १५।२० मिनिटांत पाणी शोधून आणतात.

इतकें उंच चढूनही आपण पर्वताच्या शिखरावर आलों असें क्वचित्तच होतें; आपल्या खालीं जशा अनेक लहान लहान टेंकड्या दिसतात तद्वतच आपल्या शिरावर देखील मैलअर्धमैल उंचीचे पहाड असतातच असला एक पहाड फोडून पुढें वाट केलेली आहे. ह्या ठिकाणीं आपल्या पुढें नुकताच निघून आलेला यात्रेकरूंचा जमाव एकाग्र मन करून आतुरनेत्रांनीं एकसारखी टक लावून काय पहातो बरें ? अहाहा कैवल्यदर्शन ! ! पहाडाचा पडदा एकाएकीं दूर सरल्यामुळें एकसमयावच्छेदेंकरून हिमाचलाचीं चित्रविचित्र आकाराचीं अनेक शिखरें उत्तरोत्तर उंच होत जाऊन एकमेकाला भिडलेलीं दिसतात व अगदीं पलीकडे नीलवर्ण आकाशाला टेंकून जणूं काय रत्नखचित मुकुट घातलेली हिमाच्छादित शुभ्र पर्वतराजी आपलें पूर्ण ऐश्वर्य प्रगट करीत असलेली दृश्यमान होते. कपाशीच्या गंजीप्रमाणें दिसणाऱ्या त्या हिमराशी क्षणांत सूर्यकिरणांनीं झळकत, क्षणांत कृष्णमेघच्छायेनें त्यांचा रंग पालटे आणि क्षणांत विरलमेघांच्या आवरणांत गुरफटून अदृश्य होत. दुतर्फी पर्व-

---

+ हें पाहून "नभःस्पृशम् दीप्तमनेकवर्णं व्यात्ताननं दीप्तविशालनेत्रम्।" ह्या विराटस्वरूपदर्शनाच्या भगवद्गीतेंतील श्लोकार्धाची सारखी आठवण येते.

तांच्या रांगांतून वाहात जाणारें गंगेचे फेनयुक्त शुभ्र हिमजल लांबून गोठल्याप्रमाणें स्थिर दिसत असल्यामुळें त्या देखाव्यामुळें आनंदातिशयानें गंगेचा प्रवाह देखील यात्रेकरूंप्रमाणेंच स्तब्ध झालेला आहे कीं काय असा भास होतो. केदारबदरी ह्या हिमांतच सदैव निवास करितात; त्यामुळें म्हणा किंवा ह्या उदात्त देखाव्यानें उचंबळणाऱ्या वृत्तींच्या सहज स्फूर्तीनें म्हणा येथें साष्टांग दंडवत घातल्याशिवाय रहावत नाहीं. हा देखावा पाहून आतांपर्यंत झालेल्या सर्व श्रमांचा परिहार होऊन एकदम शीण उतरतो; व आणखी चार दिवसांनीं ह्या हिमाच्छादित शिखरांच्या पहाडांत प्रवेश करून, सहाव्या अगर सातव्या दिवशीं बर्फ प्रत्यक्ष दिसून त्यांतून चालत जाऊन हिमाच्या गर्भांत असलेल्या केदारपुरीचें दर्शन घडेल असें वारंवार मनांत येऊन आपण अगदीं आनंदसागरांत निमग्न होऊन जातों. बर्फांतून क्रीडा करावयास केव्हां मिळेल, पुढें,मागें,खालीं, वर बर्फ केव्हां दिसूं लागेल, बर्फाचें आइसक्रीम खावयास केव्हां मिळेल, ही उत्कंठा अलीकडील मंडळीला आणि भगवंताचे चरण केव्हां दिसतील हा ध्यास भाविकभक्तांना सारखा लागलेला असून त्यामुळें पुढल्या मार्गाचा बिकटपणाही लक्षांत येत नाहीं. येथून दीड मैल खडी उतरण असून लगेच खांकराचट्टी येते.

इतका उतार उतरल्यावरही या चट्टीची उंची पुष्कळच रहाते व झरे वगैरे जवळपास नसल्यामुळें येथें पाण्याचा मनस्वी ताप आहे; पण पुढें **गुलाबराई चट्टी** ६ मैल चढउताराच्या मार्गानें असल्यामुळें पूर्वीच्या चढणीनें थकलेल्या लोकांना खांकरा येथेंच उतरावें लागतें.

**रुद्रप्रयाग**—गुलाबराईला जातांना पूर्वीसारखा बिकट मार्ग नाहीं तरी चढउतार बराच आहे. पुढें रुद्रप्रयाग फक्त १॥ मैल आहे. वस्तीच्या पाव मैल अलीकडे रस्त्याच्या कांठालाच वृक्षांच्या गर्द शीतल छायेंत झऱ्यापाशीं मोठें मैदान आहे. याच्यापलीकडे दृष्टि फेंकली असतां **अलकनंदेच्या** दुतर्फा लहानशी वस्ती दिसते. अलीकडेच मुख्य वस्ती असून तेथें दोनतीन मोठीं दुकानें, एका दुकानांतच लहानसें डांकघर आणि १०।१५ इतर घरें आहेत. **सस्पेन्शनब्रिज** ओलांडून पैलपार गेलें म्हणजे प्रथमच कालीकमलीवालेबोवांची धर्मशाळा व पुढें इतर दुकानें

गंगेच्या कांठावर एकाच रांगेनें आहेत. या रस्त्यानें गेल्यावर शेवटीं **रुद्रेश्वर ( रुद्रनाथ )** महादेवाचें देवालय असून त्याच्याच खालीं **अलकनंदा व मंदाकिनीचा संगम** होतो. घाट सुंदर पण बराच खोल असून पायऱ्या फार लांबलांब खडकांतून बहुतेक कोरून काढलेल्या आहेत. श्रमलेल्या जिवाला पाणी आणण्याकरितां ह्या ५०।६० पायऱ्यांची चढउतार करतांना नाकीं नळ येतात. मंदाकिनीचें पाणी हिरवें असून नांवाप्रमाणेंच वेगही इकडच्या मानानें मंदच आहे. पण अलकनंदेचें पाणी अंमळ गढूळ व पांढरें असून ती मोठमोठ्या शिलांशीं धाडधाडधाड टकरा मारीत येऊन मंदाकिनीवर आदळते. जणूं काय ती मोठ्या क्रोधानें खवळून मंदाकिनीवर प्रहार करण्याकरितांच धांवून येत आहे. संगमाच्या ठिकाणीं लहानशा समुद्रासारख्या लाटा उसळून त्यांचे फवारे तीनतीन हात वर उडतात. संगम झाल्यावरही दोहोंचें पाणी तुटकपणानें वागणाऱ्या सपत्न्यांप्रमाणें बऱ्याच लांबवर अलग-अलग ओळखतां येतें. संगमाच्या ठिकाणीं इतकें भयानक रुद्र स्वरूप आहे कीं घोंटाभर पाण्याच्या पलीकडे जाण्याची छाती होत नाहीं. गुडघाभर पाण्यांत मनुष्य खास वाहून जाईल. पाणी गारही पण तसेंच आहे. एका मिनिटांत पायांत कळा उठून पाय बाहेर काढावे लागतात; जणूं काय त्या पवित्र माईला मानवाच्या पादस्पर्शाचा प्रमाद सहन होत नाहीं ! पण घाट चढून वर वस्तींत येतांच हवामानांत एकदम फरक होतो; कारण एक निव्वळ काळाकाभिन्न दगडांचा पहाड दरवाज्यापलीकडे दोन हातांवर येऊन ठेंपला असून त्यामुळें एक तर हवा बरोबर खेळत नाहीं व तो पहाडही उन्हांत तापल्यामुळें वस्तींत बरीच उष्णता भासते. मे अखेरीस १०'८.

रुद्रप्रयागापासून पुन्हां दोन मार्ग फुटतात. एक मार्ग केदाराकडे न जातां कर्णप्रयागावरून चमोलीस येऊन थेट बदरीनारायणाला जातो. आणि दुसरा मार्ग गुप्तकाशीवरून प्रथम केदाराला जातो आणि केदारची यात्रा आटपून त्याच मार्गानें परत आल्यावर, गंगेच्या पलीकडच्या कांठानें गुप्तकाशीसमोर उखी मठाजवळ पुन्हां माघारा वळून चमोलीहून बदरीला जातो. **केदारबदरीची यात्रा वारंवारची नव्हे म्हणून**

दोन्ही ठिकाणीं जाणेंच इष्ट होय. येथून केदारचा मार्ग मंदाकिनीच्या कांठाकांठानें गेलेला आहे.

येथून पुढची छतोलीचट्टी फक्त ३ मैल आहे; पण मार्ग फारच बिकट आहे. त्यामुळें तेथें पोंचण्याला ३।४ तास सहज लागतात. रस्ता बिलकूल एकपावली असून चढण अति अवघड-खडी आहे. खालीं शेंदोनशें फूट कडा सरळ तुटलेला असून कडेनेंच गंगामाईचें ( मंदाकिनीचें ) पात्र खळखळ करीत वहातें. दगडाखडकांवरून पाय घसरेल कीं काय अशी एखादे वेळ भीति वाटते; पण नारायणाच्या कृपेनें आंधळेपांगळेदेखील सुरक्षितपणें पार होतात; कोणी दगावत नाहीं. वाट अरुंद असल्यामुळें घोड्यांना स्वारी घेऊन समोरून कोणी येत असल्यास पहाडाशीं चिकटावें लागतें. येथून आतां पुढें पुढें सर्व माल बकऱ्यांवरून रवाना होतो. वाटेनें पाठीवर लहानलहान गोण्या घातलेले ५०।६० बकऱ्यांचे कळप भेटतात. हे बकरे माल वहाण्याकरितां मुद्दाम खच्चीं केलेले असल्यामुळें फारच मजबूत असतात. एक बकरा सरासरी पक्के बारा शेर माल नेतो; व त्याला खायला कांहीं खर्च नको. यामुळें घोड्यांपेक्षां बकरेच माल नेण्याकरितां पसंत करितात असें दिसतें; बकऱ्यांचे कळप रात्रीं वस्तीजवळच पहाडाच्या एखाद्या गुहेंत सहज कोंडतां येतात; हे बकरे आपल्याकडील बोकडांसारखे नसून यांच्या अंगावर वीत दीडवीत लांब केंस असतात. यांचीं शिंगेंही फारच मोठमोठीं व सुंदर असून कधीं कधीं हरणाच्या शिंगाप्रमाणें मुरडलेलीं असतात. बांधाही अंमळ मोठा आणि फार मजबूत असतो. त्यांच्या केंसांचीं घोंगडीं वगैरे करितात. असल्या बकऱ्यांचे कळप रस्त्यानें भेटले कीं ते मार्ग देतपर्यंत सगळा रस्ता रोखतो. त्यांना हुकमतींत वागविण्याकरितां मेंढपाळ मधूनमधून शीळ घालीत असतो.

इकडील कुत्रेही दिसण्यांत भयंकर, भव्य आणि सुंदर असतात. तो त्यांचा वाघासारखा जबडा आणि त्यावरील लांब आयाळीसारखे केंस पाहिले कीं त्यांच्यापुढें जाण्याची कोणाची छाती नाहीं. त्यांची उंचीही या त्यांच्या आकृतीला शोभण्यासारखी अस्वलाइतकी असून अस्वलाप्रमाणेंच दीडदीड वीत लांब त्यांच्या अंगावर मऊ केंस व शेवटीं झुबके-

दार शेंपटी असते. असला एखादा प्राणी जर झार्डीत गुहेशेजारीं बसलेला आढळला तर खास ओळखतां न येऊन विलक्षण त्रेधा उडेल; परंतु आकृतीप्रमाणें हे कुत्रे बहुधा द्वाड नसतात. आपल्याकडील उष्ण हवेंत हे कुत्रे जगणार नाहींत, म्हणूनच नाइलाज असतो, नाहीं तर असला एखादा कुत्रा बाळगण्याकरितां आपल्याबरोबर नेण्याचा विलक्षण मोह पडतो. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे इकडील कुत्रे सिंहाच्या बछड्याप्रमाणें दिसतात. इकडे कुत्र्यांच्या लोकरीचींही वस्त्रें करितात.

छतोलीपासून **अगस्तिमुनि** सरासरी ६ मैल आहे. इकडे मैलांचे दगड दिसत नाहींत, व मधूनमधून कोठें ( रोवलेले ) दिसलेच तरी पुन्हां केव्हां त्यांवर तपासणी झाली नसावी असें वाटतें. पहाडी लोकांच्या सांगण्यावरून आणि सरासरी आपल्या चालीवरून अंदाज कांहीं तरी ठोकळमानानें करावा लागतो. अगस्तिमुनीला पाण्याचा ताप आणि माशांचा त्रास फार म्हणून पुढें दोन मैलांवर एका लहानशा चट्टीवर मुक्काम करणें सोयीस्कर आहे. वाट इतकी भयंकर चढउताराची आहे कीं पुढें एकएक पाऊल टाकणेंही जिवावर येतें. मार्ग काटायचा म्हणजे म्हाताऱ्याप्रमाणें हळुहळू हातांतील विश्वासुकाठीच्या बळावर. देवप्रयागापासून अर्धेअधिक यात्रेकरू गंगोत्रीला जात असल्यामुळें आतां रस्त्यानें यात्रेकरूंची म्हणण्यासारखी गर्दी नसते; पण चट्ट्या मात्र सारख्या भरलेल्या असतात.

अगस्तिमुनीपलीकडे चार मैलांवर उतरण्यालायक चट्टी चंद्रापुरी आहे. खांकरा चढाईवर हिमदर्शन प्रथम घडल्यापासून थंडीला चांगलीच सुरुवात होऊन दर मुक्कामास ती वाढत जाते. रात्रीं पाणी पिणें बहुतेक वर्ज्यच करावें लागतें. मध्यान्हीच्या बारा वाजेपर्यंत देखील ऊन कोंवळेंच असल्याचा भास होतो. हिमजलांत आंघोळ करणें जिवावर येतें. खांकऱ्यापासून आतांपर्यंत हिमदर्शन मधूनमधून उंच ठिकाणीं आल्यावरच घडत असे; पण अगस्तिचट्टी सोडल्यापासून हिमाच्छादित शुभ्र शिखरें सतत दृष्टीसमोर येत असून त्यांच्या आड इतर पहाड येत नाहींत.

येथून तीन मैलांवर असलेली **भीरीचट्टी** देखील उतरायला वाईट

नाहीं. मंदाकिनीवरील सस्पेन्शन ब्रिज ओलांडून पलीकडून मार्ग आहे. आतांपर्यंतच्या साऱ्या नद्या रस्त्याच्या डाव्या हातानें वहात होत्या; पण यापुढें मंदाकिनी उजव्या हातावर घेऊन पुढें जावयाचें असतें. रस्त्यापासून मंदाकिनी फारशी खोल नाहीं. हवेंत फार गारठा भासूं लागतो. बर्फाचे पहाडही सन्निध दिसतात. पहांटे आठनऊ वाजेपर्यंत सूर्यदर्शन होत नाहीं. वाटेनें गर्द झाडी असल्यामुळें सूर्योदय झाल्याचेंही लवकर दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या वृक्षांच्या खांद्या परस्परांत गुंतल्यामुळें लांबच लांब कमानदार गुंफा बनलेली आहे, त्यांतून गळलेल्या कुसुमरेणूंनीं सर्व मार्ग आच्छादित केलेला आहे. मधूनमधून हिमाच्या धवलतेशीं स्पर्धा करणारे गुलाबांचे ताटवेच्या ताटवे लागून गेल्यामुळें दिशा सुगंधानें भरून गेलेल्या असतात. गुलाब आणि तो इतका विपुल; प्रथम हें खरेंच वाटत नाहीं, गुलाबाचीं फुलें शुभ्र एकेरी पांच पांकळ्यांचीं असून त्यांचा सुगंधही आपल्याकडल्यापेक्षां बराच मंद असतो. त्यांवर भ्रमरांचे थवे निरंतर गुंजारव करून त्यांतील अमृतपान करीत बसलेले आढळतात. आपल्याकडल्याप्रमाणें मोठें व डौलदार गुलाबाचें फूल इकडे नाहीं. गुलाबाप्रमाणेंच इतरही फुलझाडें पुष्कळच आहेत. येथल्यासारखें सृष्टिसौंदर्य या निसर्गदेवतांच्या माहेरघरीं देखील दोनतीनच ठिकाणीं पहाण्यांत येतें. वनदेवतेचें क्रीडाकुंज तें हेंच. कोसचे कोस ही वनशोभा सारखी लागलेली आहे. आतां एक सीन, तर पुढें दुसराच अगदीं निराळ्या प्रकारचा; पण शोभेंत खंड म्हणून नाहींच. आतां जर चित्रविचित्र फुलांनीं सुशोभित लांबच्यालांब गुंफा असली तर पुढें रस्त्याच्या वरील पहाडांत आणि खालीं नदीपर्यंत खोल दरींत अनेक प्रकारच्या फर्न्सचा ( सुभोभित वनस्पतींचा ) अफाट बगीचाच सृष्टिदेवीनें लावल्याचा भास होतो. त्याच्याही पुढें जावें तर लहान झुडपांचें नांव नसून मोठमोठे आक्रोड, जरदाळू वगैरेंचे विशाल वृक्ष पर्वताच्या शिखराशीं उंचींत चढाओढ करतांना दिसतात. कुसुमगुच्छांनीं नटलेल्या अनेक प्रकारच्या सुंदर वेली मोठमोठ्या वृक्षांना आपल्या मोहपाशांत बद्ध करून या वृक्षावरून त्या वृक्षावर जाऊन मंदवायूच्या झुळकेंत डुलूं लागल्या म्हणजे वनदेवताच पुष्पपल्लवयुक्त वेलींच्या हिंदोळ्यावर बसून

झोके घेऊन क्रीडा करीत आहेत असा भास होतो. ही वनशोभा पाहून चित्त फारच उल्लसित होते; आणि आपण किती मार्ग आक्रमण केला याचें भानदेखील रहात नाहीं.

**गुप्तकाशी**—भीरीचिट्टीपासून कुंडचट्टी २ मैल आणि पुढें गुप्तकाशी आणखी ३ मैल आहे. हा मार्ग इतका अडचणींचा आणि अवघड आहे कीं, आतांपर्यंत आलेली खांकऱ्याची चढाई देखील यासमोर कांहीं नाहीं. एक पहाड चढल्याबरोबर लगेच त्याच्याहीपेक्षां उंच असा दुसरा व तो संपल्यावर तिसरा असे अनेक पहाड एकसारखे चढावे लागतात. येथें मधूनमधून पगदंड्याही ( पाऊलवाटा ) आहेत. पुढें कांहीं अंतरावरून चालत असलेल्या लोकांकडे पाहिलें कीं अंगावर कांटा उभा राहून अंतःकरणापासून नारायणाचें स्मरण वारंवार होतें. असल्या अडचणीच्या प्रसंगीं " बोलो बद्रीविशाललाल की जय ", " बोलो गरुडभगवान की जय ", "बोलो केदारनाथस्वामी की जय"; असला जयघोष मधूनमधून होत असून त्याचा प्रतिध्वनि आसपासच्या पहाडांतून अनेकदां उठून तो पुष्कळ वेळपर्यंत घुमत रहातो. पहाडाच्या शिखराजवळून सरासरी दोन हजार फूट सरळ तुटलेला कडा; आणि त्याच्या कांठावरून एकपावली वाटेनें एका ओळीनें जात असलेले यात्रेकरू; जीवित आणि मृत्यु यांत अंतर दोन वितींचें; पाय घसरला किंवा ठोकर लागली तर मनुष्याच्या ठिकऱ्याठिकऱ्या उडून त्याचा पत्ता लागणें अशक्य; असा देखावा पाहून काय वाटत असेल त्याची कल्पनाच करावी ! खालच्या बाजूला नजर फेंकली कीं डोळे फिरतात; खालून सोसाट्यानें वहाणारी मंदाकिनी एखाद्या बारीकशा फेनरेखेप्रमाणें दिसते; तिचा आवाजही हळुहळू मंदावत जाऊन वरती अगदीं ऐकूं येत नाहीं; पक्षीदेखील पहाडाचा आश्रय सोडून दूर उघड्या हवेंत फारसे संचार करतांना दिसत नाहींत; उंच उडणारी घार देखील पहाडाचा शिखरप्रदेश सोडून दरीवर उडण्यास सहसा धजत नाहीं. दम लागल्यामुळें व भीतीमुळें माणसाच्या तोंडून एक शब्दही निघत नाहीं. नामघोष आपोआप बंद होतो. अखिल सृष्टि अगदीं स्तब्ध, निःशब्द व शांत असल्यामुळें ती पुढें नजीकच दिसत असलेल्या हिमधवल

केदारनाथाचें एकाग्रमनानें चिंतन करण्यांत गुंग होऊन गेली आहे असें वाटतें. ह्या उंचीवर पाणीही दुर्मिळच आहे; मंदाकिनी ८०० फूट खोलीवर पण बिकट मार्ग संपल्यानंतर वरच्या भागाला एका पाणपोई-वाल्यानें बसण्याकरितां एक चबुत्रा घालून पाण्याची बरीच सोय केली आहे. तो पाण्याचा पैसा घेत नाहीं; पण त्यानेंच स्थापन केलेल्या देवतेसमोर दक्षिणा ठेवण्याची मात्र अपेक्षा धरतो. पोईचा पैसा घेण्यांत दोष आहे. तो टाळण्याकरितां मोठी उत्तम योजना आहे खरी ! * खालीं रस्त्याच्या खालचे कडे सरळ तुटलेले नाहींत; व पहाडाच्या वरपासून खालीं नदीपर्यंत जिन्याच्या पायऱ्यासारखीं शेतें आहेत. तीं पाहून आनंद होतो. तेथून आणखी थोडीशी चढण आहेच; पण बिकट मार्ग मात्र नाहीं.

गुप्तकाशीच्या अगदीं समोरच्या बाजूला **उखीमठ** म्हणून प्रसिद्ध स्थळ सुमारें तीन मैलांवर आहे, दरीच्या एका थडीवर गुप्तकाशी आणि पलीकडच्या थडीवर गंगेवरील १४० फूट रुंदीचा (पूल) झूला ओलांडला कीं, उखीमठ. हीं दोन स्थळें दिसायला अगदीं जवळशीं वाटतात; पण अंतर मात्र खासें ३ मैल. पुलापलीकडील रस्त्यावरून केदार करून बद्रीशधामाला जाणारे यात्रेकरू दुर्बिणींतून पाहिले तर एका हातापेक्षां अधिक मोठे दिसत नाहींत. पलीकडील विशाल मंदिरें व माड्या लहान लहान खोंपटाप्रमाणें दिसतात.

गुप्तकाशी हें बऱ्याच उंचीवरचें ( मंदाकिनीच्या सपाटीपासून ८०० फूट) ठिकाण असून ह्याचें माहात्म्य वाराणशी–काशी पेक्षांही अधिक मानतात. वाराणशी काशी व ( अलाहाबाद ) प्रयाग हीं यात्रेकरूंच्या सोईकरितां इकडील तीर्थांची नक्कल म्हणूनच तिकडे स्थापन करण्यांत आलीं असावींत.

---

* निस्पृहतेचा बाणा बाळगून फक्त वडिलांचें ऋण फेडण्याच्या निमित्तानें कीर्तनानंतर झोळी फिरवून वित्तैषणातृप्तीकरितां योजिलेल्या हरदासी काव्याचीच ही अल्पावृत्ति म्हणायची ! दोहोंत फरक इतकाच कीं पोईवाला पाण्याच्या मेहनतीचा एक पैसा प्रत्यक्ष तोंडानें मागायला संकोच धरतो व फुकटंभाई हरदासाची तृप्ति रौप्यदर्शनाशिवाय होत नाहीं.

औरंगजेब बादशहाच्या धाकानें श्रीविश्वेश्वरांनीं काशीहून पलायन करून या क्षेत्रीं गुप्तपणें निवास केला, यावरून या स्थानास गुप्तकाशी नांव पडलें + अशी एक आख्यायिका कोणी सांगतात, तिच्यांत कांहीं एक तथ्य नाहीं. " औरंगजेबाच्या सोट्याला भिऊन देवानें गंगेत उडी घेतली व स्वतांचा बचाव केला आणि कांहीं कालानें संकट निघून गेल्यावर गंगेतून ज्ञानवापींत प्रगट होऊन तेथून काढण्याबद्दल पंड्यांना दृष्टान्त दिला, " ह्या प्रचलितकथेला निदान काशीखंडाचा तरी आधार आहे; पण त्यांत केदारखंडांतील गुप्तकाशीचा उल्लेखही नाहीं. चिकित्सक-दृष्टीनें विचार केल्यास ही पलायन–कथा तर्काच्या कसोटीला उतरत नाहीं. सर्वदृक्, सर्वशक्तिमान् ब्रह्माण्डनायक विश्वेश्वराला मदांध झालेल्या यःकश्चित् मानवाचा सोटा बघून पळ सुटावा व त्यानें आपली पत्नी जी गंगा तिच्याआड दडी मारावी, ही कल्पना हास्यास्पदच नव्हे तर अत्यंत हानिकारक व लाजिरवाणी आहे. धर्महानि व राष्ट्रहानि होण्याला कारण असलें थोतांडच. मुसलमानांच्या सहस्रशः समशेरींनीं किंवा ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या मायावी कपटवाग्जालांनीं जो धर्म–नाश शंभर वर्षांत होणार नाहीं, तसला नाश असल्या गप्पांनीं एका क्षणांत होतो. करितां विषयांतराचा दोष पदरीं घेऊनही त्यांचा थोडक्यांत ऊहापोह करणें इष्ट वाटतें. त्या काळीं असली दैवदुर्विपाक–कथा ऐकतां-क्षणींच लक्षावधि भोळ्याभाबड्या हिंदूंच्या मनावर काय परिणाम झाला असेल! त्यांच्या ऋजु अंतःकरणाला व धर्मनिष्ठेला केवढा जबरदस्त धक्का पोंचला असेल! अरे, एकूण मुसलमानांना आपला देवाधिदेव महादेव देखील भितो अँ!!

आपल्या भित्र्या व पळपुट्या देवाला आपण शरण जाऊन काय हंशील? ज्याला स्वतःच्या जीवाची पंचाईत पडली तो आपल्या सेव-कभक्तांचें काय रक्षण करणार! मुसलमान अजिंक्य! त्यांचें दैव प्रबळ! त्यांचें दैवत खडतर! त्यांचा अल्ला बलवत्तर! त्यांचा धर्म खरा! त्यांच्या समोर आतां आपला टिकाव लागण्याची आशा व्यर्थ! मग

---

+ रघुवीरदासकृत बद्रीनारायणयात्राप्रकाश हिंदी. पृ. ३५.

काय ? वाकवा मान, घ्या अल्लाचें नांव, आणि बना मुसलमान अगर देवाचें अनुकरण करून द्या गंगेंत प्राण ! !

क्षणैक असा संशय मनांत डोकावतो कीं, देव, धर्म, राष्ट्र, जनता व हिंदी संस्कृति यांचें रक्षण करण्याकरितां रणकुंडांत प्राणाहुति समर्पण करण्यास सिद्ध झालेल्या क्षात्र वीरांना हतवीर्य करण्याकरितां असल्या गप्पा पसरण्याचें कृत्य वारांगनेव नृपनीतीचें तर नसेलना ? पण ऐतिहासिक पुराव्याच्या अभावीं आपल्या प्रत्यक्ष शत्रूंवर देखील असलें भलतेसलते आरोप करीत सुटणें हिंदूंचें व हिंदूधर्माचें ब्रीदच नव्हे. ज्यांनीं या आख्यायिकेस धर्मकथांत गोवून दिलें त्यांनाही दोष देतां येत नाहीं. कारण पृथ्वीच्या पाठीवरील सुधारणेची शेखी मिरविणाऱ्या कोणच्याही देशांतील धर्मकल्पना घ्या. त्यांत प्रभुभोजनासारखे * कांहीं वेडगळ प्रकार असतातच व विचारपरिणति होण्याच्या अगोदर अज्ञ जनांच्या उत्कट भक्तींतून—अंधभक्ति म्हणा वाटेल तर-हे प्रकार एका घावासरशीं काढून टाकूं म्हटल्यास त्यांच्या धर्म-लतेचा जीवनाधारच नष्ट होऊं पहातो.

तथापि वरील आख्यायिकेंतील साराच भाग निव्वळ कपोलकल्पित व सपशेल खोटा म्हणून प्रक्षिप्त ठरवून काशीखंडाचीं पानें तेवढीं चट-

---

* ख्रिस्ती लोकांत प्रभुभोजन म्हणून एक महत्वाचा विधि आहे. ह्या दिवशीं ख्रिस्ती लोक एकत्र जमून रोटीचे तुकडे करून तें ख्रिस्ताचें मांस आहे अशा भावनेनें भक्षण करितात व नंतर दारूला ख्रिस्ताचें रक्त म्हणून सुरापान करितात.

मद्यमांससेवक वाममार्गी शाक्तांतही असा प्रकार आहे. दारूला साक्षात् शक्ति, मांसाला शिवस्वरूप म्हणून त्याचें शाक्तपंथी लोक यथेच्छ सेवन करितात; व तज्जन्य मत्तावस्थेला ब्रह्मानंद समजून खुशाल धुडगूस घालतात. त्यांचा महामंत्र म्हणजे—

सुरा शक्तिः शिवो मांसं तद्भोक्ता भैरवः स्वयम् ॥
एतत्संयोगजातस्य आनंदो मोक्ष एव च ॥

अर्थ स्पष्टच आहे.

दिशीं फाडून मोकळे होण्यापेक्षां तत्त्वनिरीक्षण करावयास पाहिजे. एकच सुवर्णरज मिळाला तरी खंडोगणती माती गाळणाऱ्याच्या मेहनतीचें सार्थक होतें. सृष्टीतत्व ज्याप्रमाणें कोंड्याकचऱ्यासकट सतुप धान्य फेंकून दिलें असतां बीज तेवढें निवडून घेऊन, अनेकपटीनें फल देतें व कोंडाकचऱ्याचा केवळ त्यागच न करतां त्याचाही खताच्या कामीं उपयोग करून घेतें तद्वतच आपणही आपल्या लक्षावधि आख्यायिकांचें पृथक्करण करून तत्त्वग्रहण करावयास हवें.

विश्वेश्वर–पलायनाच्या प्रस्तुत आख्यायिकेंत तथ्यांश इतकाच आहे कीं, पुजाऱ्यांनीं निरुपाय म्हणून विश्वनाथाची पिंडी मूळठिकाणाहून हालवून लगतच्याच एका विहिरींत ( जिला हल्लीं ज्ञानवापि हें नांव मिळालें आहे तींत ) लपवून टाकिली; व औरंगजेब निघून गेल्यावर पुन्हा तिची स्थापना केली. आदिवल्लभाचार्योनीं दिल्लीश्वराच्या धाकानें आपल्या पूजेच्या गोपालकृष्णाच्या मूर्ति दिल्लीहून पळवून मारवाड-प्रान्तीं नाथद्वारास स्थापिल्या. त्याचप्रमाणें पंढरीच्या श्रीविठ्ठल मूर्तीला देखील प्रल्हाद बडव्यानें एका भुयारांत लपवून ठेवून वांचविलें हें इतिहासज्ञांस माहीत असेलच, त्यावरून खरा प्रकार लक्षांत येईल. अस्तु.

विश्वेश्वराचें ( सर्वेश्वर ) मंदिरासमोर बनारसकाशीप्रमाणेंच सुमारें १५ फूट औरसचौरस व दीड पुरुष खोल कुंड असून त्यांत दोन बाजूंना पितळेच्या गज आणि गौ यांच्या मुखांतून मोठमोठ्या दोन जलधारा सोडलेल्या आहेत. कुंडांत कंबरेइतकें खोल पाणी असून अनेक यात्रेकरूंनीं सकाळपासून दुपारपर्यंत त्याच पाण्यांत स्नान केल्यामुळें तें घाण होतें; त्यामुळें अंगास कंडू सुटतो दोनतीन दिवसांतून एकदां हें पाणी बाहेर सोडण्यांत येतें असें समजतें. विश्वेश्वराचे देवळांत जरी दुपारीं १२ च्या सुमाराला दरवाजे लागतात तरी दर्शन घेण्यास केव्हांच मनाई नाहीं. थोडी पिशवी सैल सुटण्याची आशा दिसतांच पुजारी वाटेल तेव्हां दार उघडून देतात. देवळांत विश्वेश्वराचें लिंग असून पार्वतीची सुंदर रौप्यमूर्ति नंदीवर आरुढ झालेली आहे. या देवळाचा कळस सोन्याचा आहे. देवळाचे पुजारी वीर-शैव ( जंगम )

असून श्रीमच्छंकराचार्यांनीं त्यांच्या पूर्वजांची येथें नेमणूक केली असें म्हणतात. केदारनाथ आणि पुढें **गोपेश्वर** येथील रावलजी ( महंत ) देखील शैवच आहेत; तेही वीरशैव ( लिंगाईत ) होत. अर्थात् इकडे भेदाभेद नसल्यामुळें हे सारे ब्राह्मणांतच मोडतात; पण बदरीनारायणाच्या कट्या मद्रासी-ब्राह्मण रावलजीला हा प्रकार सहन न होऊन ते यांजवर जळफळत असतात. इकडील इतर लोकांना हा रावलजीचा अंतस्थ द्वेष माहीत नाहीं म्हणून लोक यांना देवांसारखा मान देतात व यांची योग्य संभावना करितात. देवळाच्या चौकांभोंवतीं चौफेर कालीकमलीवाले बोवांच्या धर्मशाळेची व्यवस्था आहे; पण केदारला जाणाऱ्या आणि गंगोत्री-केदार करून मुद्दाम **विश्वनाथाच्या** दर्शनार्थ येणाऱ्या यात्रेकरूंचा संगम तेथें होत असल्यामुळें पुरेशी जागा मिळत नाहीं. माशांचा त्रास तर कांहीं विचारूंच नये ! म्हणून बहुतेक यात्रेकरू स्नानदर्शन उरकून स्वयंपाकाकरितां एक मैलावर असलेल्या **नालाचट्टीस** जाऊन मुक्काम करितात.

भाद्रपद महिन्याच्या अखेरीस थंडी पडूं लागून गुप्तकाशीच्या पलीकडे बर्फ जमण्यास सुरवात होते. या वेळीं केदारेश्वराला रहाणें अगदीं अशक्य मंदिर वगैरे बर्फांत पार बुजून जातें. गुप्तकाशीच्या पलीकडची वस्ती फक्त यात्रेपुरतीच सरासरी चारपासून सहा महिनेपर्यंत असते. हिंवाळ्यांत सर्व लोक गुप्तकाशीस रहावयास येतात व कित्येक समोरच्या उखीमठासही रहातात. गुप्तकाशी व उखीमठ येथेंही हिंवाळ्यांत हिमवृष्टि झाल्याशिवाय रहात नाहींच; पण ह्या दोन स्थळांच्या पलीकडे सर्व प्रांत शुभ्रहिमाखालीं बुडून जातो म्हणून सांगतात. त्या दिवसांत उखीमठावरील रावलजीच्या वाड्यांतील मोठ्या व भव्य मंदिरांत केदारच्या प्रतिमेची पूजा होत असते.

इतर मोठ्या क्षेत्रांप्रमाणें पंड्यांचीं घरेंही गुप्तकाशीस असल्यामुळें त्यांच्या त्रासामुळें मनुष्याला कांहीं सुचेनासें होतें. प्रत्येक मोठमोठ्या ठिकाणीं त्यांनीं आपले गुमास्ते पोसलेले असून यात्रेकरूंचा द्रव्यभार हलका करण्यांत हे मोठे पटाईत बनलेले असतात. यात्रेकरूंचा त्रास काढीत हे स्टेशनास्टेशनावर हिंडून यात्रेकरूंशीं आपली बकबक सुरू

करितात. जों जों तीर्थाच्या जवळ पोंचावें तितका यांचा घोळका भोंवतीं अधिक जमतो. केदार, बदरी, देवप्रयाग येथील तारऑफिसांचा अमुक यात्रेकरू येतात अशा बातम्या पाठविण्याकरितां पंड्यांनाच जास्त उपयोग होतो. ' जात्री ' आले अशी बातमी समजली कीं धांवले त्यांना लुटण्याकरितां हे लोक. यात्रेकरूंच्या पाठीमागें लागून आपल्या पदरचें तिकिट आणि वाटखर्च सोसून गुमास्ते लोक पंड्यांच्या घरीं यात्रेकरूंची शिकार पोंचती करितात. गुमास्त्याचा काडीइतका ही उपयोग नाहीं. फक्त तो भोजनभाऊ बनून हस्तेंपरहस्तें यात्रेकरूंचा द्रव्यभार कमी करितो; व पंड्यांचा उपयोग बदरीनारायणाला फक्त राहण्याची सोय करून देण्यापुरता होतो. देवप्रयागाला श्राद्ध–पिंड--तर्पण करविणारे घाटावरील ब्राह्मण ( घाटे ) निराळेच असतात. त्यांना दोनचार आणे दक्षिणा दिली तरी ते खुष होतात. पण बऱ्याच लोकांना इकडची माहिती नाहीं हें एक आणि अंधपरंपरेनें जाणाऱ्या भोळ्या यात्रेकरूंचात्र भरणा फार; म्हणून पंड्यांची पोळी पिकते. हरिद्वारला निदान तो पिंडश्राद्ध तरी करवितो. पण देवप्रयाग, केदार व बदरी येथें त्याचे काम मुळींदेखील पडत नाहीं. बद्रिकाश्रमीं श्राद्ध करविणारा निराळा व तर्पण करविणारा पुन्हा निराळाच इसम असतो. तेव्हां पंड्यांचें खूळ विनाकारण माजलेलें असून ते व त्यांचें गुमास्ते यात्रेकरूंची जेणावाखाण्याची अगर स्वयंपाकाची वेळ पहात नाहींत; कठीण चढण लागून यात्रेकरूंच्या तोंडांतून शब्द निघत नाहीं हें पहात नाहींत; यात्रेकरू नुकता कोठें थकूनभागून आलेला भूकाप्यासा होऊन मुक्कामाला घरचा शोध करीत खांद्यावर ओझें घेऊन हिंडून राहिला हें पहात नाहींत; पांच वर्षांच्या शेंबड्या पोरापासून उठला सुटला इसम कौण जिल्हा, कौण गांव, बडा नागपूर का छोटा नागपूर, खास नागपूर कीं बंबईके तरफका नागपूर, कितने आदमी कौण पंडा करीत, नुसतें भंडावून सोडतात. त्यांची काक-रवमधूर चर्पटपंजरिका सारखी चालू असते. तुमची द्रव्य-निष्ठा कळेपर्यंतच खुशामत. नाहीं तर पुढें " चले कहींके दलिंद्दर मुलुखके बडे जात्रा करनेको " हा आशीर्वाद अखेरचा आहेच !

त्रिजुगीनारायण व केदार यांची भयंकर चढण पुढें लागत असल्यामुळें

निदान गुप्तकाशीपासून त्रिजुगीनारायण व केदारपर्यंत कंडी किंवा झंपान केल्याशिवाय कोणीही राहूं नये. कंडीला ५।६ रुपये व झंपानाला त्याच्या दुप्पट किंवा २॥ पट आकार सरासरी पडतो. सर्व यात्रेंत इतकाच मार्ग अतिकठीण आहे, त्यासमोर बदरीनारायणाची चढण देखील कांहींच नाहीं. गुप्तकाशीपासून केदारनाथ सुमारें १५ कोस आहे.

गुप्तकाशीपासून नालाचट्टी उर्फ नालाग्राम मैलभर आहे. केदार आटपून बदरीनारायणाला जाण्याकरितां पुन्हां त्याच मार्गानें नालाचट्टीपर्यंत परत फिरून नंतर गुप्त काशीसमोरील उखीमठावरून जावें लागतें. येथें पलीकडे केदारला जाणाऱ्या व तेथून परत फिरणाऱ्या यात्रेकरूंची बरीच गर्दी असते. येथेंही गुप्तकाशीप्रमाणेंच १५ फूट औरसचौरस भद्रकुंड असून त्यांत दोन नळ पडतात. या कुंडाजवळ हल्लीं अगदीं लहान मंदिरें असून त्यांत घरच्या देवपूजेच्या मूर्तीइतक्या लहान मूर्ति आहेत. यांच्याजवळ एक मोठें मंदिर होतें; पण सुमारें दहा वर्षांपूर्वी झालेल्या धरणीकंपामुळें तें जमीनदोस्त झालें असें सांगतात. आतां बहुतेक हिमांत प्रवेश झाल्यासारखाच असून तें समोर व बाजूला दिसूं लागतें. केव्हां सूर्यकिरणांनीं हिमांत लखलखाट पडतो तर केव्हां आकाश मेघांनीं व्याप्त झालें असतां त्यावर मलिनता येते, तर केव्हां बर्फावर दाट धुक्याचें आवरण पडून, बर्फ, धुकें आणि मेघ यांचा बेमालूम एकजीव होऊन बर्फ संपून मेघ कोठें सुरू होतो तें स्पष्ट दिसत नाहीं.* हा मेघाचा व बर्फाचा चमत्कार पहात किती तरी वेळ नकळत निघून जातो.

नालाचट्टीहून दीड मैल वेदचट्टी आहे. ती ओलांडल्यावर हिमशिखरें आपल्या डाव्या बाजूस अंमळ मागें राहिलेलीं दिसून त्यांची दुसरी बाजू पाहावयास मिळते; व हळुहळू तीं दुसऱ्या पहाडांच्या आड होऊन आपल्या पश्चाद्भागीं राहतात. आतांपर्यंतच्या ह्या भागांत गुलाब, आक्रोड, जरदाळू, तेजपाळ आणि बारीक कळकांचीं बेटें ह्यांनीं झाडें इतकीं किर्र झालीं आहेत कीं कांहींशीं भीति देखील वाटते. पण येथून वनशोभेचा दुसराच पडदा उघडून निराळाच देखावा दिसूं लागतो. मोठ-

मोठें गगनचुंबित वृक्ष आणि गुलाबाच्या दाट जाळ्या एकदम नाहींशा होऊन लहानमोठ्या अनेक निर्झरांनीं सिंचन केलेल्या पहाडांतून विलायती फर्न्स-सारखीं अनेकविध सुशोभित झुडपें आपली कोमल रुचिर हिरवीगार पालवी हळूच बाहेर काढून मंदशीत सुगंधित वाऱ्याच्या झुळकेबरोबर आनंदानें आंदोलन करून श्रांतपथिकांच्या हृदयाचेंही तसेंच आनंदाच्या लहरींत आंदोलन करवितात. मोठमोठ्या सरकारी बागिच्यांतून bowers (हरित-गृहां)मधून लहानलहान कृत्रिम उंचवटे करून त्यांतून जागोजाग नळाच्या पाण्याचे फवारे सोडतात व कृत्रिम गिरिशोभा उत्पन्न करीत असतात. तो देखावा इकडूनच उतरून नेलेला असावा; पण नारायणानें खुद्द स्वहस्तानें निर्माण केलेल्या सृष्टिसौंदर्याची सर मानवी कृत्रिम बागबागि-च्यांना कोठून येणार ! ही शोभा सरासरी अर्धा मैल सारखी लागलेली आहे. यापुढें एकदम उतरण सुरू होऊन पुन्हा शेतांची सोपानपरंपरा पहावयास मिळते.

हीं शेतें सपाट जमिनीच्या अभावामुळें पहाडावर पायऱ्यापायऱ्या सारखीं केलेलीं असून तीं पहाडांच्या शिखरांपासून खालीं दरींतील नदी-पर्यंत सारखीं केलेलीं असतात १५।२० हात लांब आणि ५।६ हात रुंद असा यांचा आकार असतो. असलीं हीं ग्यालरीसारखीं शेतें पाहून मोठी गंमत वाटते. यांतून पहाडी लोक कांहीं ठिकाणीं वर्षांतून दोन व कांहीं ठिकाणीं तीनही पिकें काढतात. मुख्य पिक म्हणजे गहूं किंवा धान ( भात ); याशिवाय मक्यासारखें आणखीं एक धान्य पेर-तात. हा गहूं मे—अखेरीस तयार होतो. बहुतेक ठिकाणीं हा गहूं सुकून त्याची कापणी सुरू होते. तरी केदारबदरी-टापूंतील अगदीं थंड प्रदे-शांत मेअखेरीसरीसही कोंवळ्या ओंब्या खावयास मिळतात. हे गहूं जास्त उष्ण असून आपल्याकडल्याप्रमाणें रुचकर नसतात व पचावयास जड असतात. **यात्रेकरूंना पोळी जास्त खाल्यामुळेंच अपचनादि विकार या वाटेंत होतात.** येथला तांदूळ तर मागें सांगितल्याप्रमाणें अगदीं पाहिल्या प्रतीचा असतो. आपल्याकडल्याप्रमाणें मांडी मांडी चिखल करून त्यांत एका ठिकाणीं लावलेलीं रोपें उपटून आणून पुन्हा रोंवण्याची गरज पडत नाहीं. इतर धान्यांप्रमाणें धानाची ( भाताची )

ही पेरणी तिफनीनेंच करितात. ज्यांना झऱ्याच्या पाण्याची अनुकूलता असेल ते बागाईत करून, लसूण, कांदे, केळी, भाजीपाला व तंबाखू पेरतात. मिरची इकडे मुळींच होत नाहीं. इकडील लोक आळशी फार. बायकांकडूनच सर्व कामें करवितात. माणसानें तास दोनतास शेतांत वखर फिरविला कीं बाकीचा वेळ तो चिलीम, तंबाखू व गप्पांत घालवितो. व बाकीच्या सर्व कामांचा सर्व कामांचा बोजा बायकांवर लादतो. इकडील बैल अगदीं लहानलहान असून त्यांची वेसण वगैरे कांहींच टोंचीत नाहींत. इकडील शेतांना बहुधा कुंपण नसतेंच कारण, पिकांची नासाडी करणारे वानराशिवाय दुसरे प्राणी नाहींतच.

**व्योमचट्टीः**—(येथें) जोरानें वहाणाऱ्या पाण्याचें साहाय्य घेऊन लांकडाचे पेले, बश्या, कमंडलू वगैरे नानातऱ्हेच्या सुबक वस्तु करण्याचे लहानलहान कारखाने चालतांना पाहून मोठी गंमत वाटते. ह्या वस्तु फारच स्वस्त मिळतात, परंतु यांचें लांकूड ओलें असल्यामुळें लवकरच भेगा पडून त्या फुटतात. येथें पाणचक्याही ३।४ आहेत. चट्टयाच्या आजूबाजूला हे सारे प्रवाह रात्रभर धो धो वहात असल्यामुळें कडक उन्हाळ्यांतही भरपावसाळ्याचाही भास होतो; थंडी मनस्वी पडून ती पावसाळ्याच्या भासामुळें तर जास्तच जाणवते; सकाळीं उठून पाण्याच्या धारेंतील फिरतें चक्र कसें असतें तें पाहण्याकरितां लेखक एका झोंपडींत शिरला. तेथें कदाचित् विलायती ओतीव लोखंडी कॉगव्हील (दंतचक्र) लावलें असावें अशी त्याची कल्पना होती; पण तो अंदाज चुकला. सुदैवानें कारखाना बंद होता. लांकडी तक्तपाशीची फळी फाडून खालचे लांकडी चक्र बाजूला रिकामें ठेवलेलें आढळलें. याचा आकार व व्यवस्था पंख्याप्रमाणें असून तें पाण्यांत टाकल्याबरोबर अतिवेगानें गरगर फिरूं लागतें. एखादा पोकळ वृक्ष चिरून तयार केलेल्या साध्या अर्धगोल नळांतून मोठ्या जोरानें वाहणारा पाण्याचा प्रत्येक झोत या पंख्याच्या पात्याला ताडण करतो, तो पडदा पुढें सरला कीं त्याच्या ठिकाणीं दुसरा पडदा येतो. ह्याप्रमाणें चक्रावर गति उत्पन्न होउन तोच पंखा सारखा फिरत रहातो. अर्थात् हा पंखा नेहमीं पाण्यांत राहून ओला असतो. यांत बस-

विलेल्या गोल लांकडाला दोरी लावून त्याची गति वरच्या बाजूला दुसऱ्या एका चक्राकडे पोंचवून त्यांत तयार करावयाची वस्तु बसवितात; व त्या वस्तूवर निरनिराळ्या बाजूनें नुसतें हत्यार धरून ठेवल्यानें लांकूड गुळगुळीत कांतून वाटेल तसा आकार देतां येतो. काम इतक्या झपाट्यानें होतें कीं, कारखाना चालू असतां निरनिराळ्या व्यवस्थेचें नीटपणें पृथक्करण करतां येत नाहीं.

व्योमचट्टीपुढें अर्ध्या मैलावर छोटी व्योम; नंतर ३ मैलांवर **फाटाचट्टी** व पुढें अर्ध्या अर्ध्या मैलांवर वडासूवेखंडा व बदलापूर ह्या लहान लहान चट्ट्या आहेत. हाही मार्ग पूर्वीप्रमाणें अतिरमणीय वनप्रदेशांतून आहे. फाटाचट्टीपासून पुढें रस्त्यावर वृक्षांची दाट छाया असून उन्हाचा ताप बिलकूल होत नाहीं. मात्र गुलाब पूर्वीइतका दाट नसून येथें दालचिनी, आक्रोड वगैरे मोठमोठ्या वृक्षांचें जंगल आहे. एकेक वृक्ष कमींत कमी ७५ फूट उंच असावा व प्रत्येकाला बुडापासून शेंड्यापर्यंत हिरवीगार शेवाळ असून त्यांतून सुंदर नक्षी काढल्याप्रमाणें सर्व वृक्षभर सुंदर फर्नसची बांडगुळें आहेत. जणूं काय, वृक्षांनीं हे सुंदर तुरे अगर दागिनेच जागोजाग खोवले आहेत. मधूनमधून बारीक वेतांचीं व बांबूचीं झाडें ही आहेत. * येथील कोट्यावधि जातींचीं झाडें आणि दिव्य वनस्पति यांच्या गुणधर्माचें पूर्णज्ञान मिळविण्याकरितां तपेंच्या तपें खर्च करून ग्रंथद्वारा भारतवर्षावर किंबहुना अखिल जगावर अनंत उपकार करणारी कोणी साधु मिळेल काय ? ह्याही रस्त्यानें उतारचढ पुष्कळ आहेतच; पण आतां बहुतेक संवय झाल्यामुळें त्याचें कांहीं वाटत नाहीं.

बदलापूरपासून **रामपूर** २। मैल आहे. मार्गांत एका उतरणींतून गंगामाईचा लोंढा उंचउंच पहाडांतून खालीं हूडबालिकेप्रमाणें उड्या मारून गोंगाट करीत जातांना पाहून फारच मौज वाटते. येथपर्यंत सृष्टिसौंदर्य अगदीं अनुपम आहे. गुलाबांचें तर ताटवेच्या ताटवे लागून

---

* कंडी, टोपल्या वगैरे याच वेताच्या विणलेल्या असतात. बारीक बांबूच्या लेखण्या फारच सुंदर होतात; व त्याकरितां एक बांबूचा गड्डा बरोबर बांधून घ्यावासा वाटतो; पण प्रश्न पडतो ओझ्याचा.

गेलेले आहेत, पण त्यांच्या शोभेचा आणि सुगंधाचा आस्वाद घेणारे रसिकजन त्यांच्यापासून किती तरी लांब रहातात. यांचीं फुलें रोज फुलतात आणि तेथेंच गळून सृष्टिदेवीची पूजा करितात. यावरून ग्रे नामक इंग्लिशकवीच्या प्रसिद्ध काव्यांतील खालील ओळींची आठवण होते.

Full many a flower is born to blush unseen
And waste its sweetness on the desert air.

मात्र वरील प्रवाहापलीकडे स्वार्थपरायण नरांनीं ह्या नैसर्गिक उद्यानांतील झाडांची छाटाछाट करून जेथेंतेथें शेतें तयार केलीं आहेत. गुलाबांचा उपयोग ह्या शेतांना कुंपण घालण्याकरितां झालेला पाहून विषाद वाटतो. " अतिपरिचयादवज्ञा " म्हणतात ती हीच.

**रामचट्टी** बरीच मोठी असून रमणीय आहे. येथून **त्रिजुगी नारायण** ५ मैल असून त्यांपैकीं ४ मैलपर्यंत खडी व अत्यंत बिकट चढण आहे. करितां यात्रेकरू रामचट्टीवरच थांबून मुक्काम करितात. मध्यें **पाटीगाड** म्हणून २ मैलांवर लहानशी चट्टी आहे, पण तेथें उतरण्याची किंवा राहण्याची मुळींच सोय नाहीं. दुधाशिवाय खाण्यापिण्याचे कांहीं पदार्थ मिळत नाहींत. पाटीगाडवरून पूल ओलांडून गेलें असतां दोन मार्ग फुटतात. पैकीं अधिक उंचीवरचा मार्ग त्रिगुगी नारायणाचा व कमी उंचीवरचा केदारचा. केदारची चढण बिकट आहेच; पण ती हिच्यासमोर कांहींच नव्हे, वरून पाहिलें असतां केदारचा रस्ता दोनचार हजार फूट खालीं दिसतो. मार्ग चालतांना उन्ह असलें तर जीव फारच दमतो. पहाडाच्या कांठावरून अरुंद मार्ग आहे. मध्यें कांहीं दूरपर्यंत ओबडधोबड पायऱ्याही आहेत. या पायऱ्यांवरून जाण्यापेक्षां त्यांच्या बाजूकडील मळलेल्या मार्गानेंच जाणें बरें वाटतें, पण फार धोक्याचें आहे. कारण पलीकडेच खोल दऱ्या आहेत, तिकडे पहावत नाहींच. पायऱ्या संपल्यावर विश्रांति घेण्याकरितां झऱ्यापाशीं बसावेसें वाटतें. येथेंच शाकंबरी देवतेची स्थापना केलेली आहे. इकडील देवतांना नव्या किंवा जुन्या वस्त्रांची

एखादी लहानशी चिंधी फाडून चढवितात. गोंडांतल्या चिंधी-देवतेच्या पूजनाचा प्रकार असाच असतो. गोंडांत एखाद्या झाडाला पुष्कळ चिंध्या टांगलेल्या दिसतात; पण तेथें मूर्ति वगैरे कांहीं नसतें. असा प्रकार इकडेही कोठेंकोठें पहाण्यांत येतो. आर्यसंस्कृतीच्या पूर्वीच्या टयुरानिअन सुधारणेचा हा अवशेष होय. या देवतेपाशीं चढण संपेल असें वाटतें, पण नाहीं. ती पुढें इतकी अवघड नाहीं येवढेंच. या मार्गांतून वृक्षांची इतकी गर्दी आहे कीं, खालची दरी किती खोल आहे तें देखिल समजत नाहीं. जणूकाय खालीं हिरवागार पानांचा समुद्र आहे असें वाटतें. रस्त्यावरही सूर्यकिरणांचा प्रवेश व्हावयाला रतीभरदेखील जागा नाहीं, खुद्द नारायणाच्या वरीं वनश्रीच्या प्राबल्या-समोर त्याचें देखिल तेज फिकें पडतें म्हणायचें ! ! नारायण थेट शृंगावर अत्यंत उंच ठिकाणीं आहे. या शृंगाची उंची केदारच्या बरोबरीनें असावी.

हिम वितळून त्याचें बनलेलें ताजें हिमजल दुधासारखें शुभ्र असल्या-मुळें शुद्धजलांतील व त्यांतील भिन्नत्व चटदिशीं स्पष्टपणें दिसून येतें. अशा हिमजलाचे प्रवाह दुधाच्या नद्यांप्रमाणें या पहाडांत जागोजाग झुळझुळ वहातांना दिसतात. यावरून आपल्या डोक्यांतील शिखरांवर कोठें तरी खास हिम असावें असें वाटतें, प्रत्यक्ष दिसत नाहीं मात्र. केदारशृंगावरील हिमराशी येथून अगदीं नजीक दरीच्या पलीकडच्या बाजूला दिसतात. आतांपर्यंत जे पहाड ओलांडले त्यांच्याही मस्तकावर थोडेथोडे हिमाचे पट्टे असलेले दिसतात. सर्व ठिकाणच्या हिमांतून त्याला अग्नि लाविल्याप्रमाणें निघत असलेला धूर पाहून मोठें नवल वाटतें; बाष्पयुक्त वायुला हिमस्पर्श झाल्याबरोबर सूक्ष्म जलतुषारांची वाफ अलग होऊन तिचें बनलेलें धुकें धुराप्रमाणें भासतें. हें धुकें दाट होऊन त्यांचीं पांडुरवर्ण अभ्रें होतात व लवकरच त्यांचे उष्ण मेघ बनूं लागतात. पदार्थविज्ञानशास्त्रांतील condensation च्या धड्याचें स्पष्टीकरण इतकें उत्तम दुसऱ्या कोठेंच होणार नाहीं. वाफेचे जलतुषार जलकणांचें धुकें व धुक्याचे मेघ इतक्या लवकर बनतात कीं, त्यांचा एक मोठा सृष्टिकृत कारखानाच चाललेला आहे असें वाटून मनास

मोठी करमणूक होते. येथें थंडी इतकी मनस्वी आहे कीं, कडक उन्हाळ्याच्या भरदोनप्रहरीं लठ्ठ लठ्ठ लोकरीचे कपडे चढवून देखील ऊन खात बसावेसें वाटतें. येथें रात्रीं मुक्काम करण्याचा प्रसंग येणें भयंकर खरें पण अंगावर लंगोटीशिवाय दुसरा कपडा न घेतां तपेंच्या तपें रानावनांत समाधि लावून आयुष्याचे सार्थक करणारे साधुसंत या पहाडांत कितीतरी आहेत. तितिक्षा साधावी ती त्यांनींच आम्हीं मात्र गप्पा माराव्या.

त्रिजुगीनारायणाचें मंदिर शिखराजवळ असून जवळच ब्रह्मा, विष्णु महेश ( रुद्र ) यांचीं तीन तीर्थकुंडें आहेत; यांतील पाणी किती गार असतें तें वर्णन करणें कठीण आहे. बुडी ( गोता ) मारल्याबरोबर गात्रें घट्ट आवळून बाहेर यावें तों अंगांतील सारें रक्त गोठून गेल्याप्रमाणें वाटतें. यांत छातीच्या खालोखाल पाणी असतें. यापैकीं दोनच कुंडांत स्नान करून तिसऱ्या लहानशा कुंडाचें नुसतें वंदन करितात. पिण्याचें पाणी शुद्ध राखण्याकरितां मुद्दाम ही योजना आहे. शिवाय येथें एक सरस्वती कुंड आहे तेथें तर्पण करावें लागतें. दहादहा इसमांस ओळीनें बसवून सर्वांकडून एकदम तर्पणें करवितात. देवळांत नारायणाची अष्टधातूंची सुंदर मूर्ति असून समोर अग्नि जळत आहे. शिवपार्वतीच्या लग्नाच्या वेळचा हा अग्नि तीन युगांपासून सारखा जळत आहे. असें सांगतात मात्र हा आतां आपोआप जळत नसून मुद्दाम लांकडें पेटवून सदोदित धूमि जळत ठेवतात. पूर्वीं कदाचित् येथें ज्वालामुखीची ज्वाला निघत असावी. परंतु एकीकडे ज्वालामुखी व त्याच्या सभोंवार बर्फ हा तरी सृष्टीचा केवढा चमत्कार आहे !

त्रिजुगीनारायण हें स्थान अत्यंत उंच असल्यामुळें येथील हवा सपाटीवरील प्रदेशापेक्षां पुष्कळ विरळ होते, व त्यायोगानें हवेचा दाब कमी होऊन १०० अंशांच्या खालींच पाणी उकळूं लागतें. पाण्यावरील हवेचा दाब जर अगदीं नाहींसा केला तर तें ० अंशावर देखील उकळूं लागेल हें पदार्थविज्ञानशास्त्रांतील तत्त्व सर्वांसच माहीत नसेल. अर्थात् कमी उकळूं लागणाऱ्या पाण्यांत उष्णताही बेताचीच असायची. तेव्हां त्यांत अन्न लवकर शिजत नाहीं. शिवाय येथें थंडी मनस्वी असून पाणी गार असतें हेंही दुसरें एक कारण आहेच. युरोपखंडांत आल्प्ससारख्या उंच

पहाडावर हीच स्थिति असते, म्हणून तिकडे अन्न शिजविण्याकरितां Papin's Digester सारखीं यंत्रें वापरतात; आपणाला हे यंत्र वापरणें अनेक कारणामुळें शक्य नाहीं; तेव्हां निदान आधणांत थोडें तूप घातल्या शिवाय राहूं नये. तेलतूप सोडल्यानें पाणी १००" अंशांच्या वर उकळूं लागतें व मिठासारख्या क्षार पदार्थांनीं तें कमी अंशावर उकळतें,याचा अनुभव रोजच्या स्वयंपाकांत येतोच; **पण आधणांत तेलतूप टाकूनही येथें बटाटे आणि तुरीची डाळ शिजत नाहीं.** हे पहाडी बटाटे (आलू) आपल्याकडील बटाट्यासारखे दिसत नाहींत, स्वादही कांहीं निराळा असतो आणि लवकर शिजतही नाहींत. मोठ्या बटाट्यांपेक्षां लहान बटाटे घेऊन त्यांच्या पातळपातळ चकत्या काढव्या लागतात.

त्रिजुगीनारायणापासून सोनप्रयाग सरासरी ३॥ मैल आहे. आल्या रस्त्यानें परत फिरून मागें पाटीगाड येथील केदारच्या रस्त्यापर्यंत न जातां मधेंच पायवाटांचे दोन मार्ग फुटतात. त्यांपैकीं खालची वाट धरावी लागतें. वाटेनें गर्द झाडी आहे. मोठे वृक्ष नाहींत. तरी १॥-२ पुरुष उंचीचीं बारीक झुडपें आहेत. मागेंपुढें कोणी दिसत नाहीं. चारही दिशांना झाडी, आपण कोठें आहोंत हें पण समजत नसून वारंवार वाट चुकल्याचा भास होतो. ही झाडी इतकी गर्द आणि दाट आहे कीं, दोनचार हातावरील माणूस बोलतांना ऐकूं येतें पण दिसत मात्र नाहीं. ही ३॥ मैलांची उतरण अगदीं खडी असून झाडीच्या बाहेर आल्याबरोबर एकदम सोनप्रयाग दिसूं लागतें............ **सोनप्रयाग** हें क्षेत्र सोनगंगा ( वासुकीनदी ) आणि मंदाकिनी या दोन नद्यांच्या संगमावर असून तेथें फक्त २।३ दुकानेंच आहेत.

येथून **गौरीकुंड** फक्त तीन मैल आहे. नदीवरील सस्पेन्शन ब्रिज ( झुला ) ओलांडून पुन्हां पहाड चढावा लागतो. ही खडी चढण फक्त १ मैलपर्यंत असून पुढें ती तितकी खडी नाहीं. या चढणीच्या शेवटीच ( मुंडकटा ) गणेशाचें लहानसें मंदिर आहे. नांवाप्रमाणें मूर्ति शिर-विहीन आहे. पार्वतीनें गौरीकुंडांतील उष्णोदकांत स्नान करीत असतां अंगाची मळी काढून द्वाररक्षणार्थ गणेशाची स्थापना केली. त्यानें शंकराला न ओळखतां प्रतिबंध केला; तेव्हां शंकरानें रागावून त्याचा

शिरच्छेद केला म्हणून पुराणांत जी कथा आहे तीच हा गणपति-येथून चढण सावकाश होत गेली आहे; पण मार्ग कमी बिकट नाहीं. सरळ तुटलेल्या कड्यावरून एकपावली वाट असून कोठें कोठें ह्या वाटेखालील कडा खचलेला असून ती वाट कशीबशी थोडक्या आधारावर राहिलेली व कोठें तर तो सबंध ढासळल्यामुळें लांकडें व खांद्या आंथरून व त्यावरून थोडीशी माती घालून तात्पुरता नवीन रस्ता केलेला असा सारा मार्ग आहे. खालीं पहाण्याची तर सोय नाहीं. दरीची खोली कोठें हजार फूट तर कोठें १२०० फूट तरी निदान असावी. पलीकडच्या पहाडावरील हिरवी गर्द झाडी पाहून मात्र त्या देखाव्याच्या आनंदांत मार्गाची कठिणता व चालायचे कष्ट यांचें कांहीं भान रहात नाहीं. हिरव्या वृक्षपल्लवांनीं अनाच्छादित एक बोटभरही जागा मिळायची नाहीं; त्यामुळें वृक्षपल्लवांच्या समूहांनीच हा हरिद्वर्ण गिरि निर्माण केला कीं काय असें वाटतें. आपल्या वरच्या बाजूचा गौरीचा पहाड मात्र अगदीं उघडाबोडका आहे, त्यावर एकही हिरवें झाड नाहीं, हा कदाचित् ज्वालामुखी तर नसेल ना ? या प्रदेशांत ज्वालामुखी पर्वत तर खास असलेच पाहिजेत; त्याशिवाय तप्तकुंड, क्षार व उष्णोदकाचे झरे, त्रिजुगीनारायणाची ज्वाला आणि नालाचट्टीवरील धरणीकंप संभवत नाहींत. तसेंच बदरीकेदारचे पाठीमागील टेकडीवर गेलें तर वरचेवर बंदुकीसारखे आवाज होतात, लहानमोठे धोंडे कोसळतात व लांबपर्यंत जाऊन पडतात.

याच जंगलांत ८००० फूटांवरील भागांत कस्तुरीमृग आहेत. पहाडावरून भराभर पळत असतां यांच्या खुरांनीं दगड खालीं येतात व वाटेवरून जाणाऱ्या यात्रेकरूंना लागून एखादे वेळ त्यांना भारी दुखापत होते. सबंध डोकीवर लांब लांब केस असल्यामुळें टोपी घातल्याप्रमाणें दिसणारे मोठेमोठे चमत्कारिक कृष्णमुखी वानर आहेत. हिंस्रपशूंपैकीं ह्या रानांत फक्त हिमालयी पांढरें अस्वल असतें असें म्हणतात; पण कधीं तें रस्त्यांत येत नाहीं. जंगलाच्या अगदीं आंतल्या बाजूला असतें. कोल्ह्याची कुई तर कधींहि ऐकावयास येत नाहीं. लांडगे–तरस वगैरे नाहींतच. येथें साप बहुधा

दिसत नाहींत; आणि जे थोडेसे आहेत ते विषारी जातीचे नाहींत. क्वचित् दिसली तर आपलीं तीक्ष्ण नखें खुपसून पहाड चढणारी घोरपड एखादे वेळ पाहण्यांत येते. जंगलांत आणखीही हिंस्र पशु नसतील असें नाहीं; पण आजपर्यंत कोणाही यात्रेकरूला जनावर आडवें आलें किंवा कांहीं दगा झाला असें कोठेंही ऐकिवांत नाहीं. या प्रदेशांत थंडीमुळें म्हणा किंवा उंचीमुळें म्हणा पक्षी असावे तितके नाहींत. नेहमींच्या पक्ष्यां-पैकीं घार आणि काळेभोर डोमकावळे हे पुष्कळ आहेत. कधींकधीं कोकिल, वनकुक्कुट आणि मोठे चित्रविचित्र रंगांचे पोपटही पाहण्यांत येतात. कीटकांपैकीं मुंग्या व मुंगळे यांचें नांवही नाहीं. विंचूगोमही दिसत नाहींत. भ्रमर आणि मधमाशा आहेत; पण मोहोळ मात्र कोठेंही दृष्टोत्पत्तीस आलें नाहीं. येथें एकप्रकारच्या आळ्या आहेत. त्यांचा प्रकाश रात्रीच्या वेळीं सोनकिड्यापेक्षां निदान दसपट अधिक पडत असावा. अर्थात् ही हकीकत हिमानें सतत अच्छादिलेल्या प्रदेशापुरतीच असून सर्व ठिकाणीं सारखी लागूं पडणार नाहीं.

गौरीकुंड हें बरेंच महत्वाचें क्षेत्र असून येथें चट्या व दुकानें पुष्कळच आहेत. केदारला जाणारेयेणारे यात्रेकरूं येथें उतरतात व शिवाय गंगोत्रीहून त्रिवेणीनारायण करून आलेल्या यात्रेकरूंचीही येथेंच गांठ पडते असा हा त्रिवेणीसंगमाचा योग येत असल्यामुळें चट्यांत जागा मिळत नाहीं. **येथल्या चट्टीवाल्याइतके मगरूर लोक कोठेंही नसतील.** येथें व याच्यापलीकडे मातीचें तेल ( राकेल ) मिळत नाहीं. केदारला अती थंडी असल्यामुळें त्या ठिकाणास येथून दुधदुभत्याचा पुरवठा होतो. तेथल्या थंडींत ढोरें पटापट मरतात. यामुळें येथें गवळ्यांची वस्ती बरीच आहे. हे गवळी म्हणजे क्षत्रियच; शूद्र नव्हेत. रुद्रप्रयाग-पासून अलीकडे बहुतेक चट्यावर बारीक बांबूच्या विणलेल्या सुंदर चटया येथून तेथपर्यंत आंथरलेल्या असतात. त्यामुळें आमच्या सोंवळ्या मंडळीला बराच त्रास होतो. इकडच्या लोकांत रोटीव्यवहाराला कांहीं अडचण नसल्यामुळें सर्वजण चटईवर बसून स्वयंपाक करितात व चटईवर जेवतात. गौरीकुंडांपासून पुढें मात्र सोंवळ्या मंडळीला मोठें संकट प्राप्त होतें. चटईवर बसून स्वयंपाक करून जेवतां येत नाहीं. खालीं बसावें

तर भुई बर्फासारखी गार. तेव्हां कोणी एखादा कपडा आंथरून बसतात तर कोणी घोंगडी आंथरून बसतात. अंगांतून कपडा काढून बसण्याची सोय नाहीं. गंगेचें जल इतकें गार (५२ फॅ.) असतें कीं पिण्याकरितां झऱ्याच्या पाण्याचा उपयोग करण्याशिवाय गत्यंतर नाहीं. गंगेच्या पाण्यांत हात बुडवत नाहीं, मग पिणें लांब राहिलें. गंगाजल म्हणजे निव्वळ द्रवरूप हिम म्हटल्यास चालेल. हिमकणाचें मिश्रण झाल्यामुळें रुद्रप्रयागला दिसणारा तिचा हिरवा रंग साफ लोपून शुद्ध दुधासारखा शुभ्रवर्ण झालेला आहे. तेव्हां हें जल किती गार असेल याची कल्पना करावी परंतु काय चमत्कार पहा! ह्या हिमप्रवाहाच्या कडेलाच खळखळ करीत वर येणारा उष्ण पाण्याचा झरा आहे, व शेजारच्या कुंडांत तर (६ अक्टोबर ५ वाजतां).F १२८ अशांवर उकळणाऱ्या कढत. पाण्याची मुसळधार पितळी गोमुखांतून सारखी अहर्निश पडत असतें. प्रसिद्ध गौरीकुंड तें हेंच. पार्वतीचें न्हाण्याचें ठिकाण हेंच. अद्याप हरिद्वारपासून केदारपर्यंत डोकीवरून न्हायचें ठिकाण हें एकच आहे. ह्या संबंध मार्गांत असें दुसरें स्थल नाहीं. थंड हवा लागल्यामुळें कुंडांतलें पाणी धारेंतल्या पाण्याइतकें उष्ण रहात नाहीं. तरी कुंडांत उतरून स्नान करवत नाहीं. याला गंधकाच्या क्षाराची चमत्कारिक चव असल्यामुळे स्वयंपाकाच्या अगर चहाच्या कामीं याचा उपयोग होत नाहीं. दिवसांतून एकदां हें पाणी बाहेर सोडून देण्यांत येतें, त्यामुळें तें घाण होत नाहीं. येथून २४ तास सारख्या ऊन ऊन वाफा निघत असतात. बदरीनारायणालाही असेंच तप्त कुंड आहे; पण जम्नोत्रीचें तप्त कुंड याहीपेक्षां विलक्षण आहे असें सांगतात याची उष्णता मे अखेरीस १९४°.७ F असतें तांदळाची पुरचुंडी बांधून अगर कणकेचा रोट करून आंत टाकला तर पांच मिनिटांत शिजून वर येतो. इतकें तें पाणी सळसळ उकळ्या मारीत असतें. अशीं स्थळें पाहून परमेश्वराच्या अगाध लीलेचें अपरंपार कौतुक वाटतें. ‘ धन्य धन्य प्रभो ! ’ हो उद्गार साहजिक मुखावाटे येतात. वरील तप्त कुंडांत आणि गंगेंत फार तर तीनचार हातांचें अंतर असेल व दुसरा एक बुडबुड करणारा झरा तर गंगेच्या कांठाशीं अगदीं संलग्नच असून वारकाईनें हात बुडवून पाहिल्याशिवाय

गंगेच्या पाण्यापासून त्यांचे पाणी भिन्न असेल असें वाटत देखील नाहीं. तप्तकुंडाच्या अलीकडेच सारकुंड आहे. यांचें पाणी चवीला अधिक उग्रट असून आपल्याकडल्या साध्या पाण्याइतकेंच थंड येईल. याशिवाय एक गोड्यापाण्याचें अमृतकुंड आहे. हीं कुंडें गुप्तकाशच्या मणिकर्णिकाकुंडांप्रमाणें एकाच आकाराचीं येतील व त्यांत पाणीही कंबरेइतकेंच असतें.

येथून केदारपुरी सुमारें १० मैल आहे. मध्यें २ मैलांवर रानचट्टी आणि ५ मैलावर रामवाडा आहे. मार्ग सर्वंध चढणीचा ओबडधोबड खडकादगडांतून आणि बर्फांतून अति विकट आहे. कोठें एकावर एक दगड रचून रस्ता केला आहे तर कोठें रस्त्याखालील जमीनच पोकळ झाली आहे. तर कांहीं ठिकाणीं खालची जमीन आणि कडा खचल्यामुळें तात्पुरता मार्ग कसा तरी फांद्या आंथरून किंवा नुसते दगड ठेवून केलेला आहे. पाय ठेवल्याबरोबर खांद्या वांकतात व दगड हलतात. दुःखांत सुख येवढेंच कीं, चढण खडी नाहीं. अंगांत दिवसभर थंडी रहाते. उन्ह तर पडत नाहींच सर्व प्रांत सदैव धुक्यानें आच्छादित झालेला दिसतो. एकंदरींत भर हिंवाळ्यासारखा भास होतो. आतां निर्मळ शुद्ध हिमविरहित जल कोठेंच मिळत नाहीं. जिवंत झरे आतां नाहींत. गिरिशिखरांवरून जागोजाग दुग्धवत् स्रवणाऱ्या द्रव–हिमधारा पहावयास मिळतात, व व कित्येक वेळ तर त्यांतून चालत जावें लागतें.

रामवाड्याजवळ पुढेंमागें, खालींवर, आजूबाजूला शुभ्र हिमाशिवाय दुसरें कांहीं दिसत नाहीं. बर्फाच्या मोठमोठ्या शिला नदींत पसरलेल्या दिसतात, व नजीकच २०।२५ फूट रुंद आणि शेंदीडशें फूट लांब अशा बर्फाच्या मोठ्या थरावरून जावें लागतें. पायांत बूटस्टॉकिंग असून देखील पायाचे तळवे गार होतात. ज्यांच्या पायांत जोडे नाहींत त्यांना तर रक्त गोठून पाय भाजल्याप्रमाणें व्यथा होते. हें हिम सारखें घट्ट रहात नसून मॉरिशस–साखरेप्रमाणें याचेवरील बारीक कण एकमेकाला चिकटलेले असतात. वाळूसारखें वाटेल तितकें उकरून काढतां येतें. अशी जरी येथें हल्लीं बर्फाची स्थिति होती तरी सर्वकाळीं व सर्वच ठिकाणीं अशी स्थिति नसते. कधींकधीं व कोठेंकोठें तर

बर्फ पाहिल्याबरोबर तो खाण्याचा मोह होतो; पण त्याचा पृष्ठभाग केर-कचऱ्यानें आणि लोकांच्या पायांनीं बराच मलिन झालेला असल्यामुळें खाण्यालायक नसतो. नदींत बर्फ विरघळून जेथें कडा तुटला असतो तेथें तो अगदीं लोण्यासारखा दिसतो. तेथला किंवा जरा वरचा भाग खणून आंतल्या बाजूचा हिम काढून एखादा खडा तोंडांत घालावा तर तो खावबत नाहीं. बर्फ खाल्यानें थंडी बांधते व मळमळतें. नुसत्या हिमस्पर्शानें देखील पित्त भडकतें, सारखी मळमळ लागते, भोंड येते व डोकें दुखतें. अंमळ खालचे थर कांचेच्या शुभ्र दगडाप्रमाणें घट्ट असतात. बर्फावरून चालतांना पाय घसरण्याची भीति फार असते. मनुष्य घसरण्याला सुरुवात झाली म्हणजे थेट तो नदीच्या कांठपर्यंत निर्वेध जाईल. कारण हातीं धरण्यासारखें एक गवताचें पानदेखील मध्यें नसतें. यात्रेकरूंच्या पायांनीं मळलेल्या मार्गांतून आपली विश्वासू मैत्रिण जी काठी तिच्यावर भार टाकून एकेक पाऊल टाकीत गेल्यास कधीं अपघात होत नाहीं. या बर्फाच्या थराखालून नदी वहात असते. जर तो वितळत वितळत अगदीं पातळ झालेला असला तर एखाद वेळ फस्सदिशीं मांडीपर्यंत माणूस आंत जायचा. आजूबाजूनें बर्फ कायम असमुळें सबंध मनुष्य आंत जायची भीति बहुधा नसते. गंगोत्रीजम्नोत्रीच्या रस्त्यानें याच्याहीपेक्षां जास्त बर्फ असून तिकडे असे प्रसंग येतात; पण बदरीकेदारच्या मार्गानें कोणी गुडघ्याइतक्या बर्फात देखील कधीं फसत नाहीं. बर्फ पाहिल्यावर पहिल्या दिवशीं तर त्याशीं खेळत बसण्याची प्रवृत्ति होते. इतर अनवाणी चालणारांची त्रेधा उडाली म्हणजे लहान अजाण बालकासारखें हसूंदेखील येतें; पण मागाहून आइसक्रीम वगैरे करण्याचे मनाचे बेत थंडीमुळें मनांतच गोठतात, पुष्कळांची प्रकृति बिघडते व भोंड येऊन उलट्या होतात; तेव्हां " कोणास कोणीं हसूं नये " ह्या कँडीसाहेबांच्या मराठी चवथ्या पुस्तकांतील धड्याची आठवण येते.

रामवाड्यापासून थंडी असह्य सुरू होते. जिकडेतिकडे बर्फ आणि दाट धुकें याशिवाय दुसरी गोष्ट नाहीं. सूर्यदर्शनाचें नांव नाहीं. गरम कपड्यांचीं ओझीं अंगावर घालूनही दांतखिळी वाजते. चट्ट्यांची

जमीन देखील हिमशिलेसारखी गार असते. त्यांत केदारला थंडीची अंतिम सीमा झाल्यामुळें तर एक दिवस देखील राहणें कठीण जातें. शिवाय केदारपर्यंतची ५ मैलांची चढण कांहीं विचारूं नये. करितां रामवाड्याला राहून अंमळ विश्रांति घ्यावी जेवण करावें आणि दशम्या-भाजीची भक्कम शिदोरी खांद्यावर अडकवून घ्यावी. केदारला राहण्यास व स्वयंपाक करण्यास जागा अडचणीची म्हणून कित्येक यात्रेकरू आपलें किरकोळ सामान रामवाड्यास किंवा गौरीकुंडास सोडून पुढें जातात. केदारला लांकडें ओलीं मिळतात, उंचीमुळें अन्न लवकर शिजत नाहीं व थंडीमुळें तिष्ठत बसवत नाहीं. मात्र रामवाड्याला केदारसारखी पडदपोशी जागा मिळत नाहीं तेव्हां आंथरुणापांघरुणाचा विशेष बंदोबस्त असल्याशिवाय रामवाड्यास रात्रीं राहण्याचें टाळावें. केदारला राहिल्यास पंड्याकडून कांबळ्या किंवा दुलया मिळतात. कालीकमली-वाले बोवांच्या धर्मशाळेंत देखील दर यात्रेकरूमागें एकएक घुस्सा मिळतो. हे घुस्से जुनेपुराणे घाणेरडे नसून अगदीं नवीन स्वच्छ दिसतात.

रामवाड्यापासून केदार ५ मैल आहे. पैकीं बिकट चढण ३॥ मैल येईल. या मार्गाला रस्ता म्हणावें कीं नाहीं हेंच समजत नाहीं. कारण मोठमोठे खडक आणि ओबडधोबड शिला यांवरून वाट काढावी लागते. मधूनमधून निदान ७।८ वेळ बर्फाच्या लांबच लांब थरांतून चालत जावें लागतें. रस्त्यानें बऱ्याच ठिकाणीं पाला कुजल्यामुळें घाण येते व थंडीनेंही भोंवळ येऊन मळमळतें. धुकें दाट पसरलेलें असून क्षणोक्षणीं पाऊस येतो कीं काय, असें वाटतें. धुक्यामुळें दहाबारा हातांच्या पलीकडील वस्तु दिसत नाहीं व पहाडाची उंची पण समजून येत नाहीं. नदी तर सारखी लांबवर गोठून गेलेली आहे. इकडे मोठे वृक्ष तर मुळींच नाहींत. पण लहान झुडपांना देखील पालवीचें नांव नाहीं. त्यामुळें तीं वाळूनकोळून गेलेल्या खराट्यासारखीं दिसतात. गौरी-कुंडापासूनच वनशोभा कमी होत जाते व रामवाड्यापुढें तर ती निःशेष नाहींशी झाली आहे. जणूंकाय पवित्र केदारभूमिकेंत सृष्टिदेवीनें राजस-

गुणाचे पुष्पपल्लवादिक अलंकार वर्ज्य करून एक हिमधवल वस्त्र परिधान करून तपस्विनीच्या वेषानें शिवाराधन चालविलें आहे.

३॥ मैलांची चढण संपल्यावर हिमशृंगांनीं अर्धचंद्राकार बनलेल्या कांठाच्या आंतील सपाटीवर कैवल्यधाम केदारपुरी आणि नाथांचें भव्य देवालय ( उंची ११७५३ फूट ) दृग्गोचर होतें. त्याबरोबर नेत्रांचें पारणें फिटतें. श्रमांचा परिहार होतो. सात्त्विक आनंदांत मनुष्य पोहूं लागतो. आनंदातिरेकानें हृदय उचंबळून येतें. कंठ सद्गदित होतो. नेत्रांत प्रेमाश्रूंचा उद्भव होतो. कैवल्यधाम साक्षात् स्वर्गभूमि गांठली; आतांपर्यंत केलेल्या श्रमांचें आणि सोसलेल्या कष्टांचें चीज झालें; नरदेहाला येऊन एक महत्कार्य केलें. साक्षात् परमेश्वराला आपण कडकडून आलिंगन देऊं; माणसांचा वारा नाहीं, पाखरांचा प्रवेश नाहीं, पान नाहीं, फूल नाहीं, कोण्या प्राण्याची–फार काय पण वाऱ्याची चाहूल नाहीं, अशा ठिकाणीं दडी मारून बसला, पण अखेर त्याचा ठाव लागला–अशा अनेक तरंगावर आरूढ होऊन चित्त डोलूं लागतें. केवढा हा शिवाच्या किल्ल्याचा दुर्भेद्य, अनुल्लंघनीय, विशाल कोट ! वायूला देखील अगम्य ! ज्यांत दक्षिणायनाचे षण्मासीं सहस्रांशु चंडकिरणांचा रिघाव झालेला कोणीही चर्मचक्षूंनीं पाहिला असेल असें वाटत नाहीं; उत्तरायणांत प्रवेश झालाच तर आपलें उग्र रूप टाकून तो मंद तेजानें शिवपदीं शरण येऊन लीन होतो. आपल्या सहस्रकरांनीं सकाळसंध्याकाळ जेव्हां तो हिमाचलाला वंदन करतो तेव्हां त्याच्या सुवर्णप्रकाशाचा लोळ हिमशृंगांच्या भेगींतून परावर्तन-प्रतिपरावर्तन पावून लक्षावधि विद्युद्दीपिकांची प्रभा फांकून होणारा दिव्य लकलकाट पाहून देहभान विसरतें; त्या शोभेची तंद्री लागते; धन्य धन्य प्रभो ! काय अगाध तुझी लीला म्हणून आत्मारामीं मन अंतर्धान पावतें; आपण मर्त्यभूतलावर आहों ही आठवण पार बुजून जाते; भगवान् नारायणानें हिमनाथाला आपल्या सहस्रकरांनीं आरती ओंवाळून तो पलीकडील प्रदेशांत अंतर्धान पावून निघून गेला तरी ह्या दिव्य चिंतनांत निमग्न झालेलें मन मनुष्यसृष्टींत यावयाला बराच अवकाश लागतो.

मंदाकिनीवरील लांकडी पुलावरून पलीकडे गेलें कीं वस्ती लागते, व भक्ष्याकरितां टपत बसलेल्या काकावलीप्रमाणें कोकावणाऱ्या पंड्यांचा गराडा भोंवतीं पडतो. त्यांच्या अखंड प्रश्नावलीच्या भडिमारानें मनुष्य गांगरून जातो. खरें पाहिल्यास या क्षेत्रोपाध्यायांचें ( म्हणण्यापेक्षां क्षेत्रोपाधीचें ) बिलकूल काम पडत नाहीं. पिंडतर्पण करविणारे बिचारे घाटकरी ब्राम्हण अगदीं निराळे असतात. ह्यांच्या घरीं राहण्याची उत्तम सोय होतें म्हणावें तर तसेंही नाहीं. यांच्यापेक्षां वस्तीच्या सुरवातीसच असलेल्या कालीकमलीवाले बोवांचें धर्मशाळेंत यात्रेकरूंचें येवढें अगत्य ठेवतात कीं, प्रत्यक्ष सासऱ्याच्या घरीं जावईबोवांचेंही तितकें अगत्य रहात नसेल ! यात्रेकरूंची हिमानें गारठलेली स्थिति लक्षांत आणून अगोदर धगधगीत निखाऱ्यांची शेकोटी समोर ठेवतात व लागतील तीं भांडींकुंडीं, घुस्से, कांबळ्या वगैरे जें काय हवें तें मोठ्या नम्रतेनें व व आस्थेनें विचारून घेऊन चांगली पडदपोशींची खोली देऊन, पाणी दिवाबत्ती वगैरेंची सर्व व्यवस्था बिनबोभाट लावितात; व यात्रेकरूंस शीधाआटा पण हवा असल्यास विचारतात. ज्याचें जीवितसर्वस्व म्हणजे एक काळी कांबळी अशा संन्याशाचा हा “ धन्यो गृहस्थाश्रमः” पाहून कितीही धन्यवाद गाईले तरी थोडेच होणार आहेत !

बुधवार ता २७।५।१४ ( मिति ज्येष्ठ शु० २ रोजीं ) च्या मे महिन्याच्या प्रखर उन्हाळ्यांत देखील येथें वस्तींत प्रत्येक घरासमोर **छातीयेवढाले बर्फाचे ढीगच्याढीग** पाहून लेखकास किती चमत्कार वाटला असेल याची वाचकांनीं कल्पनाच करावी ! एखाद्या रिकाम्या टाळा ठोकलेल्या घराच्या खिडकींतून आंत दृष्टि फेंकावी तों कपाशी भरल्याप्रमाणें आंत खच्चून शुभ्र हिम सांठविलेलें ! ऐन उन्हाळ्यांत ही स्थिति ! हिंवाळ्यांत गुप्तकाशीपासून केदारचा सर्व टापू प्रचंड हिम-सागराखालीं दडपून गेलेला असतो. हिमांत गडप झाल्यामुळें मंदिरांचा-देखील पत्ता नसतो. ह्यावेळीं पूर्वीं सांगितल्याप्रमाणें उरवीमठाहून पूजा व्हायची. अक्षय्यतृतीयेला मंदिराचीं कपाटें उघडतात तेव्हां हिम पातळ झालेलें असतें. तरी पण शेवाळ्यांनीं (फावड्यांनीं) कापून खरडून मार्गांतून व मंदिरांतून हिम दूर काढून टाकावें लागतें. ह्यानंतर यात्रा येऊं लागते.

त्या सुमारास दुकानदार वगैरेचें पहिलें कर्तव्य म्हणजे हिम साफ करण्याचें. इतकी साफसफाई होऊन बहुतेक हिम वितळून गेल्यावरही वस्तींतले हे हिमाचे मोठमोठे संचय पाहिले म्हणजे महाश्चर्य वाटतें ! हें हिम धिम्मे धिम्मे विरघळून त्यांतून थेंबथेंब पाणी टिपकत असतें; परंतु तें निःशेष विरघळून गेलें असें कधींही होत नसावें; बहुधा बाराही महिने तें असतेंच.

या ठिकाणीं थंडीची पराकाष्ठा झालेली असते. ( Ventilation ) मोकळ्या हवेच्या सर्व कल्पना बांधून ठेवून रात्रीं दिवाबत्तीनंतर खिडक्या दारें वगैरे गच्च बंद करून जवळ शेकोटी घेऊन लठ्ठलठ्ठ आंथरूणपांघरुणांत दडावें लागतें. रात्रीं पाणी पिणें अथवा बहिर्दिशेला जाणें म्हणजे महत्संकट. उजाडल्यावर निदान चांगलें ८-८॥ पर्यंत आंथरुणाबाहेर पडावेंसें वाटत नाहीं, घराच्या खिडक्या उघडून बाहेर पहावें तों जिकडेतिकडे पांढरें शुभ्र हिम. प्रातर्विधीकरितां घराबाहेर पडणें भारी जिवावर येतें. मंदाकिनी बहुतेक गोठलेली. स्नानाचा विचार मनांत आणला कीं अंगावर कांटा उभा राहतो,ज्या महायात्रेकरितां आतांपर्यंत कष्ट सोसून देह झिजविला तेथें येऊन स्नानहीन अमंगल रहाणें म्हणजे केलेले श्रम विफल दवडणेंच होय; अशी महापर्वणी जन्मजन्मांतरींच्या पुण्याईनें इहलोकीं एखादेच वेळ लाभावयाची आणि हातीं येऊन ती गमावणें म्हणजे मूर्खपणाचा कळस होय.ह्याच विचारानें दांतावर दांत घट्ट दाबून मोठ्या मनोनिग्रहानें दोनचार तांबे द्रव-हिम अंगावर ओतून चटदिशीं मोकळें व्हावें लागतें. गंगामाईला हस्तस्पर्श करवत नाहीं, बोटें आंखडतात. गंगेंत पाय ठेवून सावकाशपणीं स्नान करूं म्हटल्यास रक्त गोठून जाईल. तांब्या दोन तांब्यानेंच पुरी खात्री होऊन हाडांपर्यंत थंडी जाऊन भेदते व दांतखिळी बाजूं लागून अंग थरथर कापूं लागतें. कडक हिंवाळ्यांत देखील आपल्याकडे अशी थंडी कदापि पडत नाहीं.

स्नान केल्यावर दर्शनास जातात. समोरच दोन मंदिरें दिसतात. पैकीं केदारनाथांचें भव्य मंदिर वस्तीच्या शेवटच्या टोंकांस असून देवळासमोरील चबुत्र्यावरच रावलजींच्या खरी शिक्याचें तिकिट माणशीं ८१॥ देऊन विकत घ्यावें लागतें. मुलांना तिकीट नको. तिकिटा-

शिवाय देवळांत प्रवेश होत नाहीं. देवळांतील सभामंडपाच्या आंतील गाभाऱ्यांत श्रीकेदारेश्वराची ओबडधोबड त्रिकोणाकृति शिला आहे. मूर्ति किंवा समोरच्या प्रशस्त सभामंडपांत मात्र पंचपांडव, कुंतीद्रौपदी वगैरेंच्या अनेक अत्यंत सुंदर लहानलहान मूर्ति आहेत. लिंग वगैरे कांहीं नाहीं. केदारेश्वराच्या पूजाविधीकरितां नारळ, पंचमेवा, मिठाई वगैरे आणून आपल्या भक्तिभावाप्रमाणें देवाला समर्पण करून पूजा करितात व यथाशक्ति दक्षिणा ठेवतात. अमुकच ठेवा असा पूजाऱ्यांचा मुळींच जाच अथवा सक्ती नाहीं. नंतर देवाला तूप चोपडून आलिंगन देतात व श्रमाचें साफल्य झालें असें मानून कृतकृत्य होतात. देवळांत अंधेर असून बरेच दगडी खांब असल्यामुळें जरा सांभाळून प्रदक्षिणा घालावी लागते. याठिकाणीं शिवप्राप्त्यर्थ भीमसेनानें तप केलें तेव्हां त्याला शंकरानें रेड्याच्या रूपानें दर्शन दिलें असें म्हणतात. पण शिलेला रेड्याचा आकार स्पष्ट दिसत नाहीं. श्रीकेदारेश्वराची ज्योतिर्लिंगांत गणना आहे.

अक्षय्यतृतीयेला केदारमंदिराचीं कपाटें उघडतात. तेवेळीं प्रथमज्योतिच्या दर्शनाचें माहात्म्य फार असल्यामुळें महान् महान् साधुसंत अक्षय्यतृतीयेस केदारला रहातां येईल अशा बेतानें फार लवकर निघतात. ते वेळीं हिमांतून जेमतेम मंदीर मोकळें झालेलें असतें. पुष्कळदां कुदळीपावड्यांनीं केदारेश्वराच्या हिमसमाधीचा भंग करण्याचा प्रसंग येतो असें सांगतात. त्यावेळीं येथें कोण थंडी असेल त्याची कल्पनाही आपणांला होणें शक्य नाहीं. सामान्यजनांना सोसावयाची नाहीं म्हणून साधारणपणें या महायात्रेला सुरुवात अक्षय्यतृतीया झाल्यानंतर होते.

सहा महिनेपर्यंत मंदिर हिमांत गडप झालेलें असतें, तरी थंडी पडण्याचे सुमारास मंदिराचीं कपाटें लावतेवेळीं तेलवात घालून प्रज्वलित केलेला दीप सारखा सहा महिने जळत राहून पुन्हां इतक्या दिवसांनंतर अक्षय्यतृतीयेस तो त्याच स्थितींत पहावयास मिळतो, अशी एक समजूत यात्रेकरूंत रूढ आहे. निर्वातस्थळीं सहा महिने-

पर्यंत दिवा जळत रहाणें ही रसायनशास्त्राच्या दृष्टीनें अशक्यकोटींतली गोष्ट दिसतें. कपाटें उघडतांना हिम बरेंच असल्यामुळें पुजारी आणि प्रथमज्योतिदर्शनेच्छु अल्पसंख्याक भाविक साधुवर्ग यांशिवाय अन्य कोणी नसल्यामुळें हा प्रकार खरा आहे किंवा काय हें समजण्यास मार्ग नाहीं. पुजाऱ्यांकडून तर सर्व कांहीं मुलामा चढलेलें यावयाचें. गौरीकुंडाला उष्णोदकाचे झरे आहेत तेव्हां या भागांत ज्वालामुखी पहाड असून केदारशिलाही ज्वालामुखीचाच एखादा भाग असावा व पूर्वी केव्हां तरी तो ज्वलत स्थितींत असतांना त्याची ज्योति दृश्यमान होत असावी, तेव्हां मात्र प्रथमज्योतिचा चमत्कारजनक देखावा दृष्टीस पडत असेल.सहा महिने ज्वालामुखीची ज्वाला हिमांत गुप्त असावयाची व हिम काढतांच पुन्हा दृष्टिगोचर व्हावयाची. अशा सृष्टचमत्कारामुळें यात्रेकरूंत वरील प्रकारची समजूत रूढ होऊन त्यावर पुजाऱ्याची मखलाशी चढून ज्वाला नाहींशी झाली तरी जुनी समजूत आपली कायम आहेच! शास्त्रीय उपपत्ति कशीही असो. हिमांतून ज्वाला निघण्याचा हा सृष्टीचा अद्भुत चमत्कार अपूर्व खरा ह्या पूर्वींच्या चमत्काराचें स्मरण हल्लीं प्रचलित समजुतींत राहिलें आहे.

केदारेश्वराच्या देवळाच्या अलीकडेच जें एक लहानसें मंदिर आहे त्यांतही लिंग अथवा मूर्ति नसून एक पाण्याचें कुंड आहे. तेथेंही पूजा वगैरे करून एक रेशमी कापडाचा तुकडा चढवितात.

या क्षेत्राजवळच भैरवझांप ( भृगुपतन ) म्हणून क्षेत्र आहे. तेथें पूर्वी साधुसंत पर्वताच्या अत्यंत उंच कड्यावर चढून खालच्या दरींत उडी घालून देह विसर्जन करीत. ही चाल अर्थात् आतां बंद आहे. ह्या प्रकाराला आत्महत्येशिवाय दुसरें नांव देतां येत नाहीं; पण उदात्त ध्येयाच्या प्राप्तीकरितां जडदेहावरची ममता सोडून त्याच्या ठिकऱ्याठिकऱ्या करायला तयार होण्यांतही एक प्रकारची जादू आहे. याच जादूनें भारून हल्लींच्या कालांत देखील निरनिराळ्या ध्येयाच्या मार्गी लागून आत्मयज्ञ करणाऱ्या लोकांना आपण अलौकिक विभूति म्हणतो. कोणी चंद्रावर स्वारी करावयाला सिद्ध होतो, तर कोणी ध्रुवाच्या शोधार्थ निघतो. एक ज्वालामुखीच्या गंधक उकळणाऱ्या कढईत पाह-

ण्याची हांव धरतो तर कोणी विमानांतून अत्यंत उंच उड्डाण मारण्याच्या भरांत मृत्युमुखीं पडतो.कोणी तत्त्वाकरितां लोकक्षोभाच्या अग्नींत दिव्य करतो तर कोणी स्वातंत्र्याकरितां स्वार्थावर लाथ मारून जन्माचा जन्म कारागृहांत घालवितो. स्थूलदृष्टीला विनाश पावल्याप्रमाणें भासणाऱ्या ह्या दिव्य विभूतींच्या मृत्यूंतच जगाच्या उन्नतीचें बीज पेरलें जातें, परंतु कालचक्राप्रमाणें ध्येयाचीही गति नेहमीं बदलणारी असते. भैरवझांप येंथे उडी घालणाऱ्या महात्म्याचें ध्येय निराळें होतें; त्यांचा काल निराळा होता; आपला काल निराळा; तेव्हां आपलें ध्येय निराळें असणें स्वाभाविक आहे.

केदार येथें सरासरी पन्नास साठ घरांची वस्ती असावी. घरें बहुतेक दुमजली असून संबंध दगडांनीं बांधलेलीं आहेत. हिमामुळें येथें उभ्या वर्षांतून फक्त चार किंवा पांच महिनेच रहातां येणें शक्य आहे, म्हणून येथील लोक यात्रेच्या वेळीं चारपांच महिने येथें राहून यात्रा संपली कीं उखीमठ गुप्तकाशी येथें जातात. यात्रेकरूंना एक दिवस एक रात्र यापेक्षां ज्यास्त वेळ रहाणें फार कठीण,-जवळजवळ अशक्य आहे. हिमामुळें यात्रेकरू घाबरून जातात. बदरीनारायणाला हिम इतकें नाहीं. शिवाय स्नानाकरितां तप्तकुंड असून वस्ती बरी आहे. म्हणून त्रिरात्र रहाण्याचें कठीण जात नाहीं. केदाराची वस्ती लहान असून तेंथें बाजारांत खाण्याचे पदार्थ म्हणजे घाणेरड्या पुऱ्या, भर्जी व मिठाई. कित्येक ह्या वस्तु कशा खात असतील ते खावोत. पुऱ्या, भर्जी, शेव, मिठाई खाणें म्हणजे पैसे देऊन रोग विकत घेणें होय. लांकडें फार महाग व ओलीं असून स्वयंपाक करणें कितीही कष्टदायक असलें तरी बाजारी पक्वान्नांपेक्षां पिठलेंभातासारखें साधें अन्न देखील श्रेयस्कर होय. केदारला गौरीकुंडाहून दूध येत असल्यामुळें दूध -॥- शेराच्या खालीं कधीं मिळत नाहीं व तेंही फार लवकर खपून जातें. केदारला तारघर नाहीं, लहानसें डांकघर आहे; व तेथें पोष्टमास्तरला अगाऊ लिहूनही पत्रें ज्याचीं त्याला मिळतीलच असा नेम नाहीं. कारण येथील निरनिराळीं डाकघरें यात्रेकरूंनीं एक दिवसांत पत्रें न नेल्यास वाट न पहातां लगेंच बदरीनारायणाला पाठवून देतात. करितां आपल्या पंड्याचा

अगर सर्वांत उत्तम मार्ग म्हणजे कालीकमलीवाले धर्मशाळेचा पत्ता देणें अधिक सोईस्कर. या क्षेत्रांत सरकारी दवाखाना नाहीं. वरील धर्मशाळेंत यात्रेकरूंना गरज लागल्यास मोफत औषधी मिळते. केदारशृंगाची उंची सरासरी २२००० फूट आहे. मंदीर आणि वस्ती अनेक शृंगश्रेणीच्या आंतील विस्तीर्ण सपाटीवर आहे.

गंगोत्री आणि बदरीनारायण याच पर्वतशृंगांच्या दुसऱ्या बाजूला आहेत; परंतु तीं शृंगें सदैव हिमानें आच्छादित असून त्यावरून चढून जाणें शक्य नाहीं, म्हणून हीं दोन्ही स्थलें एकमेकांपासून कित्येक आठवड्यांच्या मजलेवर लांब असलेलीं भासतात. पूर्वीं केदार, बदरी आणि गंगोत्री हीं तिन्हीं क्षेत्रें इतकीं जवळ असत कीं, एकाच पुजाऱ्याला या तिहींचें पूजन दररोज सहज उरकतां येत असे; पण कांहीं कारणामुळें देवतांचा क्षोभ होऊन तीं एकमेकांपासून हल्लींप्रमाणें लांब अंतरावर झालीं आहेत. अशी आख्यायिका आहे. धरणीकंपामुळें असला प्रकार घडण्याचा संभव आहे. भूकंपानें नद्यांचे ओघ फिरतात, समुद्रांतून मोठमोठीं जपानसारखीं बेटें वर फेंकलीं जातात, भूपृष्ठावर अचानक पहाड येऊन बसतात, व सपाट मैदानांचीं सरोवरें व सरोवरांचीं अरण्यें बनतात वगैरे सृष्टींत भयंकर उलथापालथ होते हें कित्येकांस ऐकून माहीत असेलच. अस्तु.

या मूर्तीचे बाहु तुंगनाथास, मुख रुद्रनाथास, नाभी मध्यमहेश्वरीं आणि जटा कल्पेश्वराला आहेत अशी कल्पना केली आहे. पंच केदार ते हेच.

गढवाल्यांतलीं ६०, अममोरा नैनीतालचीं ४५ एकूण सरासरी २००० रु. सरकारी साऱ्याचीं खेडीं देवस्थानच्या मालकीचीं आहेत. यात्रेकरूंकडून सालीना सरासरी १०००० रु. येतात. यात्रेकरूंचा बराच पैसा पंड्यांच्या घरांत जातो.

रावल स्वतः केदारनाथाची पूजा करीत नाहीं. तें काम शिष्यवर्गावर सोंपविलेलें असतें.

बदरीनारायण केदार येथून ९४ मैल, म्हणजे आठदहा दिवसांच्या रस्त्यावर आहे. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें नालाचट्टीपर्यंत आल्यामार्गानें

परत फिरावें लागतें. मार्ग सबंध उतरणीचा, आणि महाक्षेत्राची कठीण यात्रा आटपली, या विचारानें मनास येणारा उल्हास यामुळें लांबलांब पल्ल्याच्या मजला मारीत दोन दिवसांत आपण नालाचट्टीपर्यंत येतो. परत येतांना देखील गौरीकुंडांत उष्णोदकानें स्नान करून विश्रांति घेणें अवश्य आहे. मध्यें सोनप्रयागास उजव्या हाताला त्रियुगीनारायणाचा मार्ग मिळतो तो सोडून बदरीनारायणास डाव्या हाताच्या राजमार्गानें सरळ जावें लागतें.

नालाचट्टीवरही असेच दोन रस्ते फुटतात; पैकीं उजव्या हातचा रस्ता गुप्तकाशीचा व डाव्या हातचा उरवीमठावरून बदरीनारायणाचा. चट्टीपासून सारखी खडी उतरण ३॥ मैलांची गंगेपर्यंत आहे. वाट इतकी नागमोडीची आहे कीं, दरीपलीकडील शेंपाऊणशें हातांवरील स्थळ गांठण्याकरितां एक मैल दीड मैल रस्ता चालावा लागतो. जेथें खडी उतरण किंवा खडी चढण असते तेथें अशा नागमोडी आपल्या ठेवलेल्याच. गुप्तकाशीला उरवीमठापासून चढत जाणें म्हणजे कठीणच काम. आडव्यातिडव्या वळणांतून खडी चढण चढावी लागत असल्यामुळें "तीन मैल चाले नऊ रोज" अशी ह्या पहाडी मार्गाविषयीं म्हण पडलेली आहे. मंदाकिनीवरील झुला (१४० फूट) (सस्पेन्शन ब्रिज) ओलांडल्यावर एक मैलाची चढण लागते.

उरवीमठ—ऊंची ४३०० फूट (उषामठ याचा अपभ्रंश) हें ह्या टापूंत बरेंच मोठ्या वस्तीचें क्षेत्र आहे. येथें धर्मशाळा, सदावर्त आहे. पण अशा क्षेत्राच्या ठिकाणीं जागेची नेहमीं अडचणच असते. पाणीही गांवाच्या अखेर टोंकावर जरा लांब आहे. धर्मशाळेबरोबरच ओंकारेश्वराचें फार मोठें भव्य मंदीर आहे. मंदिरांत ओंकारेश्वर महादेव, पार्वती, ओंकार, मांधाता, अनिरुद्ध, उषा वगैरेंच्या दर्शनयोग्य मूर्ति असून त्यांवर सुबक घडणीचीं रुप्याचीं बहुमोल छत्रचामरमुकुटादि उपकरणें आहेत. केदार हिमाच्छादित असतां ह्याच ओंकारेश्वराची पूजा केली असतां केदारला पावते असें म्हणतात. देवळाच्या विस्तीर्ण पटांगणाच्या एका बाजूला रावलजीचा टोलेजंग वाडा आहे. येथील

लोक रावलजीला राजाप्रमाणें मानतात. रावल म्हणजे महंत. केदारेश्वराची व्यवस्था सर्व यांच्याच हातीं असते. देवळाच्या उत्पन्नाशिवाय यांचें स्वतःचें उत्पन्नही बरेंच भक्कम असावें. रावलजीचें दर्शन घेतल्याशिवाय कोणी यात्रेकरू रहात नाहीं. त्यांच्यापुढें रुप्याच्या तबकांत बरेंच रुपये पडलेले दिसतात. मात्र कोणावर दक्षिणेची सक्ति नाहीं. स्वखुषीनें किंवा भिडेस्तव वाटेल तें ठेवावें. रावलजीला स्वतःला इंग्रजी येत नाहीं, पण त्यांनीं एक इंग्रजी येणारा गुमास्ता ठेविला आहे. हे महंत वीरशैव आहेत; परंतु ते भगवीं वस्त्रें वापरीत नसून पांढरे कपडे घालतात. यांची मूळ वस्ती मद्रासची आहे हें मुद्दाम सांगितल्याशिवाय समजत नाहीं. यांजवळच गिनी, नोटांचे रुपये मिळतात. यांच्या वाड्यांतही चार युगें, गरुड वगैरेंच्या कृष्णपाषाणाच्या मोठमोठ्या मूर्ति आहेत. चार युगांच्या मूर्ति पदार्थ-संग्रहालयांतील इजिप्तमधील देवतांच्या मूर्तीप्रमाणें दिसतात. उरवीमठाला दुकानेंपाकानेंही बरीं आहेत. शिवाय डांकघर, दवाखाना, ( सफाखाना ) पोलिसस्टेशनही आहे. थोड्या आडवाटेवर डिवरीताल सरोवर प्रेक्षणीय आहे. तेथून चौखंबाशिखराचें आपादमस्तक दर्शन घडतें.

उरवीमठापासून पुन्हां चढण सुरू झाली. या मार्गांत बऱ्याच लांबवर वनशोभा मुळींच नाहीं. पहाड, वृक्ष-वनस्पति-लताविहीन आहेत. पाण्याचे झरेही म्हणण्यासारखें नाहींत. मानवानें सृष्टीवर आपल्या स्वामित्वाचा पूर्ण अंमल गाजवून पहाडभर कृषि केलेली दिसते. तीन मैलांवर **कंथाचट्टी** आहे. येथें दूध देखील मिळत नाहीं. याच्या पलीकडे ३ मैलांवर **ग्वालियाबगड** आहे, पर्वतमस्तकावरून वर्षाजलाप्रमाणें सहस्रधारांनीं पतन पावून गंभीर आवाजानें गातगात खालीं खोल दरींतील गंगेस मिळणारा झरा पाहून मन प्रसन्न होतें. येथून थोडथोडी वनस्पतिशोभाही पहावयास मिळते. ग्वालियाबगड येथें चट्ट्या भिकार आहेत; तरी पाणी वगैरे विपुल आहे. पुढें भयंकर चढण आहे, दैडाचट्टीवर एक मैल जायला दीड तास लागतो, हलुहळू बांबूचें कळक आणि इतर आणि झुडपें यांचें जंगल सुरू होतें. दैडाचट्टीवर सरळ खालींच अगदीं थोड्या अंतरावर ग्वालियाबगड स्पष्ट दिसतें. सरासरी दीड तासपर्यंत सारखे चढत असून

इतकें थोडें कसें आलों हें पाहून फार आश्चर्य वाटतें. तेथून मैल दोन मैलांच्या अंतरानें **पोथी, दोगडभीटा, बाणियाकुंड** व **चौपत्ताजंगलचट्टी** ह्या चट्ट्या आहेत. पण सबंध मार्ग कठीण चढणीचा असून अत्यंत गर्द झार्डीतून आहे. चट्ट्या एकमेकांपासून फार लांब नसल्या तरी चढाईमुळें लवकर येत नाहींत. एक मैल अंतर जायला एक तासापासून दीड तास लागतो. ह्या जंगलांत गुलाब किंवा बांबूंसारखीं झुडपें फारशीं नसून मैलच्येमैल शंपाऊणशें फूट उंचीचे मोठमोठे विशाल वृक्ष आहेत. येथील वनशोभा अवर्णनीय आहे. वृक्षांच्या गर्दपालवीचें हिरवेंगार छत वरतीं बनलेलें असून त्यांतून भरदुपारचें सूर्याचे किरण अगर पर्जन्याची धारा पतन पावण्याला तिळमात्र जागा नाहीं. आपल्यावर जणूं काय वृक्षांनीं छत्रच धरलेलें आहे.! वृक्षांवर वीत दोन विती शेवाळ वाढून तीं खांद्यांवरून केंसाच्या झुबक्याप्रमाणें लोंबत असल्यामुळें या निसर्गाच्या साम्राज्यांत जटाभार वाढवून तप करीत बसणाऱ्या सांधूंचेंच ते अनुकरण करिताहेत असें वाटतें. त्यांच्या एकाग्रतेचा भंग होऊं नये म्हणूनच कीं काय येथील सृष्टि अगदीं निःशब्द आहे, वायूची गति मंद आहे, पक्ष्यांचा किलकिलाट नाहीं व जलाचे निर्झर देखील अगदीं गुपचिप आपला मार्ग आक्रमण करीत आहेत. जणूं काय नारायणाचें चिंतन करण्यांत अखिल चराचर सृष्टि ध्यानस्थ आहे. मधूनमधून जमिनीवरील वनस्पतींना पांढरीं, तांबडीं, पिवळीं आणि जांभळीं वगैरे रंगांचीं, सारखीं लहान लहान असंख्य फुलें उगवलेलीं असल्यामुळें रस्ताभर जणूं काय चित्रविचित्र रंगाचा बहुमोल सुंदर गालीचा पसरल्याप्रमाणें शोभा दिसते. हीं कोमल फुलें पायाखालीं तुडवीत जावें लागल्यामुळें भारी वाईट वाटतें. केदारच्या मार्गांत लागणारें जंगल आपणांपासून अंमळ लांब असून आपणाला रस्त्यावरील खोल दऱ्या आणि आसपासच्या पर्वतश्रेणी किंवा मधूनमधून शेतांची ग्यालरी दृश्यमान होते. पण येथें तसें नाहीं. आपल्या चारही दिशांना सारखे वृक्षांशिवाय दुसरें कांहीं दिसत नसून आपण पर्वताच्या शिखरावर आहोंत किंवा एखाद्या खोल दरींत आहोंत, किंवा पहाडापासून बरेंच लांब सपाटीवर आहोंत तें मुळींच दिसत नाहीं. आठदहा हातांवरील आपले सोबती झार्डींत गडप झाल्याप्रमाणें दिसेनासे

होतात. एकट्या माणसाला येथें भीतिच वाटावयाची. उखीमठाच्या रावलजीच्या वाड्यांत नुकतांच शिकार करून आणलेला वाघ पाहिला. त्यावरून वाटतें कीं, अगदीं अंतर्भागांत श्वापदें असलींच पाहिजेत. तरी आजपर्यंत कोणा यात्रेकरूला कांहीं दगा झाल्याचें ऐकिवांत नाहीं. निदान यात्रेच्या दिवसांत तरी तीं रस्त्याच्या बाजूला कधीं फिरकत नसावींत. कारण तमोगुणी हिंस्र पशु जितके क्रूर असतात तितकेच भित्रे-पण असतात. इकडच्या रानांत पाऊस बारमहा असतो. आकाश निरंतर अभ्रांनीं आणि धुक्यानें आच्छादित असतें. पण पांवसापासून वृक्षपर्णांच्या घनत्वामुळें फारसा त्रास होत नाहीं हें एक व शिवाय मधूनमधून प्रशस्त गुहा ह्या वायु, शीत, पर्जन्यापासून रक्षण करण्याचें उत्कृष्ट नैसर्गिक साधन बनल्या आहेत. ज्या वेळीं चट्या व धर्मशाळा नव्हत्या त्या वेळीं यात्रेकरूंचे विश्रामस्थान ह्या गुहाच होत्या.

चौपत्ता चट्टीपासून तुंगनाथ-तृतीय केदारला * मार्ग जातो ( उंची १२०७१ फूट ) तुंगनाथाची चढण व उतरण अगदीं अकल्पनीय आहे. केदार त्यासमोर कांहींच नाहीं. तीन मैल खडी चढण आणि तितकीच भयंकर उतरण आहे. धट्याकट्या ताज्या रक्ताच्या तरुणाशिवाय इतरांना तेथें जाणें होत नाहीं. इतका कठीण मार्ग दुसरा कोठेंही नाहीं असें सांगतात. मार्ग अत्यंत बिकट असल्यामुळें बहुतेक यात्रिकरू तुंगनाथास जात नाहींत. चौपत्ता चट्टीसमोरील पगदंडीनें-( जवळची पायवाट ) १॥ मैल खडी चढण चढल्यांवर भोग-मूर्ति आहे. अगदीं एका उंच सुळक्यावर लहानशी मूर्ति आहे. तुंगनाथाला न जाणाऱ्या यात्रेकरूंनीं येथेंच नाथांना कल्पून पूजा अर्पण करावी म्हणजे नाथांना पावली. कारण ही त्यांची भोगमूर्ति आहे असें सांगण्यांत येतें. येथून चढण संपली. पुढचा मार्ग उतारीचा सुलभ आहे. आपण पहाड चढलों व एका उंच ठिकाणीं आलों ही कल्पना ह्या साऱ्या वनमार्गांत प्रथम येथेंच होते. ह्या ठिकाणावरून उभें राहून सभोंवार नजर फेंकली असतां दिसणाऱ्या मनोरम देखाव्याची आठवण जन्मांत कोणी कदापि विसरणार नाहीं. सरळ तुटलेल्या कड्यावरील शृंग

---

* केदार पांच आहेत. केदार, मध्यम, तुंग, रुद्र, कल्प.

केदारचें, जळून गेलेल्या ज्वालामुखीच्या पोकळीप्रमाणें खुडलेलें शृंग चौखांब्याचें, व अशाच उंचउंच शृंगांवर आरोहण करून मेघमालेच्या पलीकडे आपले बाहु पसरणारे अनंतकोटि विशाल वृक्ष या देवभूमीचें पावित्र्य दर्शित करणारें शुभ्र हिम, आपल्याखालीं बऱ्याच अंतरावर हिमराजाच्या कटिप्रदेशावर मेखलेप्रमाणें विराजमान होऊन आसमंतांतील सर्व-प्रांताला गुरफटून टाकणारें मेघपटल, दीडदीडशें फूट उंचीवरून गर्जना करीत पतन पावून स्वर्लोकाहून घोरध्वनि करीत कोसळणाऱ्या भागीरथीचें अनुकरण करूं पाहणारे अनेक निर्झर, इतकें साहित्य सृष्टिदेवीनें आयतें तयार ठेवल्यावर असा कोण दैवाचा करंटा आहे, कीं, ज्याचें अंतःकरण प्रफुल्लित होणार नाहीं ? आप्तइष्टमित्रगोत्र सोडून अत्यंत कष्ट सोशीत जे परमेश्वराच्या पायीं आपलें सबंध आयुष्य अर्पण करून इकडील रानावनांत तपाचरण करितात त्यांचा परामर्ष घेण्याकरितां भगवंतानें आपली गृहलक्ष्मी जी सृष्टि तिची योजना केली आहे. ह्या निर्जनवनांत ती आपल्या प्रियपुत्रांना यथेच्छ अमृततुल्य कंदमूलांचें भोजन घालून स्फटिकासारख्या निर्मल निर्झरांतील जलाचें पान करविते. दिवसां सृष्टिमातेच्या अंकावर क्रीडा करीत वाटेल तेथें भटकत फिरा, कोणाची आडकाठी नाहीं. रात्रीं विश्रांति घेण्याकरितां तिनें जागोजाग गुहारूपी शय्या–मंदिरें निर्माण करून ठेविलीं आहेत; त्यांतलि वाळलेल्या वृक्षपर्णांच्या मऊ बिछान्यावर खुशाल झोपीं जा. वारा–उन्ह–पाऊस–थंडी हीं तेथें बाधणार नाहींत. निरनिराळ्या पुष्पांचा आणि वनस्पतींचा शुद्ध आमोद वायूच्या लहरींवर आरोहण करून संतांचा शोध करीत साऱ्या प्रदेशभर सदैव हिंडून त्यांना तृप्त करीत असतो. पूर्ण स्वातंत्र्याचें साम्राज्य जर कोठें पृथ्वीवर असेल तर तें येथें आहे. जन्मजन्मांतरींच्या पुण्यसंचयाखेरीज तें लाभणारें नाहीं. मानवांची आणि मानवी शृंखलांचीं कृत्रिम बंधनें झुगारून देऊन जे करणीचे नर येथील निसर्गस्वातंत्र्याचा अखंड अनुभव घेत परमेश्वराच्या चिंतनांत आयुष्याचा सद्व्यय करितात ते धन्य होत ! ज्या सुखाच्या मागें मनुष्यप्राणी लागला आहे तें मृगजलवत् आहे किंवा कसें ह्याची शंका येऊन जर तूं उदास झाला असशील तर मानवा, येथें ये आणि श्रेष्ठ सुख कोणचें त्याचा प्रत्यय पहा !

मऊमऊ बिछान्यावर लोळूनही रात्रभर डोळ्याचें पात्याला पातें लागत नसेल तर निद्रेकरितां येथील एखाद्या ओबडधोबड कठीण खडकाचा आश्रय घेऊन पहा! राजवाड्यांत राहून जर चित्ताची तळमळ शांत होत नसेल तर गंगातटाकावरील एखाद्या तपोवनांत निवास करून पहा! पंजपक्वान्नांनीं जिव्हालौल्याची तृप्ति होत नसेल तर साधुसंताना मिळत असलेलीं कंद-मुळें भक्षण करून पहा! गाडीघोडे-मोटारींतून सहल केल्यानें पायांना गोळे येत असून अंगचेपीशिवाय एक दिवस बरें वाटत नसेल तर येथील तुंगनाथाची चढण चढून पहा! Similia Similibus Curantur विरुद्ध उपाययोजना केली असतां रोग्यांना आराम पडतो हें जें होमियो-पाथीचें तत्त्व, त्याच्याच परिणामानें चित्ताला शांति मिळेल.

तुंगनाथापासून उतार सुरूं होतो. जंगल पूर्वीप्रमाणेंच घनदाटवृक्षांनीं हिरवें गर्द आहे. कोठकोठें आकाश देखील दिसत नाहीं. खालीं असलेले मेघ हळूहळू आपल्या सन्निध दिसूं लागतात, पाऊस येण्यापूर्वी चोहोंकडून धुकें आणि मेघ यांनीं सर्व प्रदेश व्याप्त होऊन वृक्ष, दऱ्या पर्वत सर्व कांहीं त्यांत गुरफटून जातें व मागेंपुढें खालींवर एका भस्मी पडद्याशिवाय दुसरें कांहीं दिसत नाहीं. खालीं रस्त्याच्या बाजूला दरी असून त्यांत कांहीं वृक्षासारखें आहे हें आपणाला माहीत असतें पण खालीं दरी किती खोल आहे अगर पहाड वर किती उंच आहेत ते कळण्यास मार्ग नसतो. आकाश आणि पृथ्वी शुभ्र सूक्ष्म पदार्थांनीं एकमय होऊन त्यांत पहाड-पर्वत, झाडेंझुडें, जीवजंतु, दरेखोरे सर्व कांहीं ह्या दाट आवरणामुळें लुप्तप्राय होतें. पांचदहा हातांवरील वस्तु दिसत नाहीं. ऐन मध्यान्हीं अंधेर पडल्याप्रमाणें दिसतें. मेघ आणि धुकें यांचा बे-मालूम मिलाफ झाल्यामुळें आपण मेघांत आहोंत कीं धुक्यांत आहोंत तें कळणें कठीण आहे. कदाचित् मेघांतच असूं. कांहीं मार्ग आक्रमण केल्यावर नाटकाचा पडदा एकाएकीं ओढल्याप्रमाणें ह्या मेघाच्या बाहेर येऊन वनशोभा दृग्गोचर होऊं लागते, व मेघ आपल्या बाजूला स्पष्ट दिसूं लागतात. आडवाटेनें निघून जर अशा एखाद्या मेघांत सांपडलें तर रस्ता मिळणें महादुष्कर, पण हिमाचलांत एकच धोपट मार्ग करून ठेवल्यामुळें कधीं वाट चुकण्याची भीतिच नाहीं. इंग्रजी पुस्तकांतून

अशी वादळांचीं आणि धुक्याचीं पुष्कळ वर्णनें येतात; पण त्याची आम्हास यथार्थ कल्पना कशी व्हायची ? ' आम्ही मेघांत सांपडलों होतो ' असें जर आमच्याकडे कोणी म्हणूं लागला तर त्याची गणना वेड्यांत किंवा थाता मारणाऱ्या लफंग्यांत झाल्याशिवाय रहाणार नाहीं. पृथ्वी आणि आकाश यांच्यांत अतिविस्तीर्ण अंतर्पट धरल्याप्रमाणें सर्व वस्तुमात्र लोपवून टाकणाऱ्या मेघमंडलाचा अदभुत चमत्कार ज्यांनीं पाहिला त्यांनाही तो शब्दांनीं वर्णन करणें कठीण आहे. पण ही भूमिच चमत्कारमय आहे. योग्य वर्णन करणारे मात्र दुर्मिळ आहेत. आमच्या कवींनीं व कादंबरीकारांनीं येथवर येण्याचे श्रम घेतले तर त्यांना सृष्टिदेवीचें खरें हृद्गत कळून पाश्चात्यांचीं उष्टीमाष्टीं वर्णनें चोरण्याचीं गरज रहाणार नाहीं. कवि-कल्पनेच्या अत्यंत उंच भरारी-सही असे अनेक अद्भुत चमत्कार येथें प्रत्यक्ष चर्मचक्षूंनीं पहावयास मिळतात.

चौपत्तापासून १॥ मैल **बोकणा** आणि पुढें १ मैल भीमवड्यार चट्टी आहे. तुङ्गनाथाहून परत फिरणारे लोक येथें येऊन मिळतात. पुढें पांगारवासा २॥ मैल आहे. पण येथें कोणी थांबत नाहींत व पुढें ४ मैल असलेल्या **मण्डलचट्टी** ( मंगळाचट्टी ) वर निघून जातात; कारण ह्या साऱ्या मधल्या चट्ट्या अगदीं भिकार आहेत. यावर कोठें गूळ आहे तर फुटाणे नाहींत, दूध आहे तर साखर नाहीं, तांदूळ आहेत तर कणीक नाहीं अशी अवस्था आहे. शिवाय मार्ग सबंध उतरणीचा असून अगदीं साफ. खडकदगड मुळींच नाहींत. झाडीमुळें व धुक्यामुळें सूर्यदर्शन होत नाहीं; मग ऊन्ह कोठलें ? हा आठनऊ मैलांचा उतार भराभर उतरतो. यात्रेकरू तर सारखे पळत सुटतात.

**मंगळाचट्टी**—(मण्डलचट्टी ) सारखी सुंदर, मोठी आणि सोइस्कर चट्टी उखीमठ सोडल्यापासून मधें मिळत नाहीं. येथें आपण अगदीं पहाडाच्या पायथ्याशीं एकदम जंगलाबाहेर येतो. ह्या चट्टीपासून थोडथोडक्या अंतरावर बरींच तीर्थस्थानें आहेत. पण बहुतेक यात्रेकरू आडवाटेनें न जातां सरळ नारायणाचा मार्ग सुधारतात. एका नारा-

यणाचें चरणकमल दिसलें कीं, त्यांत सर्व तीर्थांचें सार आलें. मंदाकिनी उरवीमठापासून सुटते व पुन्हां दिचें दर्शन घडत नाहीं. मध्यें कोठेंकोठें लहानसहान नद्या लागतात पण त्यांच्याविषयीं लिहिण्यासारखें कांहीं नाहीं. मंगळाचट्टीलाही वस्तीच्या शेवटीं वालासुती–वालखिल्यानामक एक लहानशी नदी आहे. नदीवरील लांकडी पूल ओलांडून पुढें मार्ग गेलेला आहे. जंगल अगदीं नाहींसें होऊन जिकडेतिकडे शेतांची सोपानपरंपरा दिसते. कोंकणांतल्याप्रमाणें इकडेही जमीन भाजून काढतात. आपल्याकडल्याप्रमाणें एक धान्य काढून घेतल्यावर दोनचार महिने शेत मोकळें टाकण्याची गरज नाहीं. एक पीक झाल्यावर लगेंच दुसरें काढतात. कारण झऱ्याचें पाणी आणि वरचा पाऊस या दोहोंचीही विपुलता आहे. ह्या प्रदेशांत कोठें गहूं उभा होता तर कोठें कापणी होत होती, कोठें धानाची ( भातांची ) पेरणी होत होती, तर कोठें तो वीतवीत वाढलेला होता. पहाडाची चढउतर म्हणण्यासारखी नाहीं. इकडील पहाडांतील दगड अनेकप्रकारचे चित्रविचित्र रंगांचे फारच सुंदर असून ते उन्हांत चकाकतात. स्लेटपाटीच्या दगडाप्रमाणें त्यांचे एकावर एक पातळ पडदे असून त्यांचा उपयोग घरें शाकारण्याकरितां कौलांऐवजीं करितात. मध्यें **रामचट्टी, सैंटना व देवलदरा** या मैल दीडमैलांच्या अंतरानें असलेल्या लहानलहान चट्ट्या सोडून पुढें सहा मैलांवर गोपेश्वर क्षेत्र आहे.

**गोपेश्वर**—गोपेश्वराला वैतरणी तीर्थाचें स्नान करून गोपेश्वर-महादेवाचें दर्शन घेतात. महादेवावर चांदीचा मुकुट, छत्री वगैरे आहे. आवारांत लोखंडी त्रिशूल व त्यावर कांहीं तरी पुसट लेख आहे. देवळांत व देवळाच्या बाहेर नेहमींप्रमाणें मूर्ति दक्षिणेचा ताप आहेच. येथील महंत गवलजी वीरशैव लिंगाईत असून त्यांचेंही दर्शन घेऊन यथामति दक्षिणा देण्याचा परिपाठ आहे. हे मूळचे महाराष्ट्रांतीलच राहणारे. यांना इंग्रजी व मराठी चांगलें येत असून वीरशैवांच्या उन्नतीकरितां ज्या इकडे खटपटी होताहेत त्यांची यांना बरीच माहिती असून वीरशैवावर यांचें बरेंच वजन असावेंसें वाटतें. या गांवीं पाण्याचा फार ताप आहे. नदी दूर आहे. झरे ( झन्नाझरना )

नाहींत. विहिरींतून फार खोलांतून पाणी काढावें लागतें. म्हणून पंप वगैरे लावून पाण्याची सोय करण्याकरितां हे वर्गणी गोळा करीत आहेत. येथें जंगल अगदीं नाहींसें झालें आहे. वनश्रीचें नांव नाहीं. उन्हही फार पडतें. पण दगड मात्र फार पहाण्यालायक आहेत. गोपेश्वर हें बऱ्याच मोठ्या वस्तीचें टुमदार गांव असून येथें लोणचीं वगैरे मिळतात.

येथून लालसांगा–( चमोली ) तीन मैल आहे. अलकनंदेवरून मोठा झुलता पूल (लांबी २३३ फूट) केलेला आहे.त्याच्या पलीकडून रामनगर रेल्वे-स्टेशनाला सडक गेली आहे. नारायणाला जाण्याकरितां पुलावरील मार्गानें न जातां समोरच्या रस्त्यावरून नदीकाठानें गेलें पाहिजे. पुलावर जाण्याची गरजच नाहीं. पुलापलीकडे तारघर, डांकघर, दवाखाना ( सफाखाना ), धर्मशाळा व दोनतीन दुकानें वगैरे आहेत. दवाखान्यांत १०।६।२९ रोजीं उष्णतामान ९८° F परंतु यावरून वस्ती मोठी आहे, अशी कल्पना करणें चुकीचें होईल. वरील १०।५ घरांपेक्षां येथें कांहींच अधिक नाहीं. शिवाय पाण्याचा मनस्वी *ताप आहे. पूर्वी वस्ती मोठी असून ती पुरानें वाहिली तेव्हांपासून पुन्हा जास्त वस्ती झाली नाहीं असें सांगतात. पुलाच्या बाजूचा केदारचा रस्ता दगडाची फरशी वगैरे करून फार सुंदर बांधला आहे. सूर्याचीं किरणें पडलीं असतां तो सारखा चकाकत असतो.येथून बदरीनारायण अवघा ४५ मैल म्हणजे सरासरी ५ दिवसांचा रस्ता आहे. रुद्रप्रयाग–कर्णप्रयागावरून थेट नारायणाला जाण्याकरितां निघालेला रस्ता येथेंच येऊन मिळतो.

* या पुराची हकीकत फार चमत्कारिक वाटल्यावरून येथें देत आहे:—

चमोलीपासून सुमारें साडेचार मैलांवर अलकनंदा व विरहगंगेचा संगम झालेला आहे; पूर्वदिशेकडे २५ मैलांवर त्रिशूलशिखरांतून (उंची २५,६६० फूट ) ही निघालेली असून हा सर्व प्रदेश जितका रमणीय तितकाच ( Land Slips ) पहाड कोसळण्याकरितां प्रसिद्ध आहे. इ. स. १८९३ च्या सप्टेंबरांत डोंगर कोसळल्याबद्दलचा मामुली रिपोर्ट पटवा-

* ही हकीकत मनोरंजक वाटल्यावरून गढवाल गॅझेटीअरवरून घेतली आहे.

त्यानें करून दिला. ही केवढी भयंकर आपत्ति होती याची बिचाऱ्या पटवाऱ्याला काय कल्पना! अर्थात् तिकडे कोणीं लक्षही दिलें नाहीं! परंतु त्याच सुमारास सुदैवानें इंजीनीअर सर्वेअर वगैरे पहाणी करणारे बडे अधिकारी फिरतीवर असल्यामुळें ९०० फूट उंच, ११००० फूट बुडाशीं रुंद आणि २००० फूट वरच्या बाजूला रुंद असलेला बांध विरहीगंगेला अडवून बसलेला दिसला. पुराणांतरीं त्रिवेणी–वाराणशींना असुरांनीं अडविल्याचें वर्णन आपण वाचतों! या विरहीगंगेच्या वाटेंत असाच एक असुर आपले हातपाय पसरून पडला होता! जिकडे-तिकडे तारा होऊन बडेबडे एक्सपर्ट (तज्ज्ञ) तेथें जमून ह्या भावी अनर्थाबद्दल बरीच भवतिनभवति सुरू झाली. कोणी म्हणत पाणी ९०० फूट चढून वरून आपोआप निघून जाईल, कोणी म्हणत पाणी बांधांतून झिरपून जाईल. परंतु ले. कर्नल पुलफोर्ड R. E. यांचें भविष्य तेवढें खरें ठरलें. त्यांनीं गणित करून वर्तविलें कीं जवळजवळ एक वर्षानीं आगस्ट १९२४ चे दुसऱ्या आठवड्याचे अखेरीस पाणी बांधावर ९०० फूट चढल्यावर लगेंच बांध फुटून महापूर येईल व नदीकांठचीं मोठमोठीं गांवें वाहून जातील. सरकारलाही हाच रिपोर्ट पसंत पडून लगेंच तेथें एक लहानसें तार ऑफिस स्थापन झालें. गोहना, चमोली, नंद–प्रयाग, कर्णप्रयाग, श्रीनगर, देवप्रयाग, व्यासघाट, हृषीकेष, हरिद्वार येथें भावी पुराची उंची अजमावण्याकरितां खांब रोवण्यांत आले. गांवोंगांवीं पुराची व्याप्ति दर्शविणारीं बांधकामें लोकांनीं त्यांच्यापासून लांब वस्ती न्यावी हें सुचविण्याकरितां तयार झालीं, व पुलांवरील झुले काढून ठेवून वस्ती हटविण्यांत आली व यात्रेला निराळा मार्ग काढून दिला. ऑगस्ट महिना आला! पाणी चढत चाललें; १५ तारीख उलटली, सर्वांची नजर आतां काय होणार इकडे लागली! तिसऱ्या आठवड्याचे अखेरीस २२ ता.ला तारा सर्वत्र रवाना झाल्या कीं हुशार रहा! ४८ तासांत पूर ठेवलेला आहे. २५ ता.ला सकाळीं बांधावरून पाणी उतरूं लागलें, उत्तरोत्तर प्रवाह वाढूं लागला. अखेरीस मध्यरात्रीचे सुमारास पहाडांतील शांततेंतून ध्वनिप्रतिध्वनि करणारा भयंकर स्फोट होऊन ३९० फुटाचा बांध कोसळला. त्यांतून १०,०००,०००,००० घनफूट

पाणी पहाटेपर्यंत म्हणजे सहा तासांत वाहून गेलें. मालमत्तेची विशेषत: श्रीनगरची अत्यंत हानि झाली. प्राणहानी मात्र, सरकारच्या दक्षतेनें, मुळींच झाली नाहीं. गोहना येथें आतां एक सुंदर तलाव बनलेला आहे व या बांधाच्या वरून पाणी आपलें सहज वाहून जात असतें. ह्याची लांबी २ मैल, रुंदी -॥- मैल व खोली ५०० फूट असून त्यानें ४०० एकर जागा व्यापिली आहे. ह्या भागांत इतकें मोठें सरोवर दुसरें कोणचेंही नसून हें नैनीतालच्या तिप्पट मोठें आहे. उरवीमठाजवळही एक सुंदर सरोवर आहे व गोहना ( डुर्मी ) सरोवरापूर्वी त्याचेंच फार महत्व होतें, कारण तेथून चौखंबा (केदार) टोंक पायापासून शिखरापर्यंत आपादमस्तक दर्शन देत असतें.

पुढें २ मैल **मठचट्टी.** चमोलीला न थांबतां येथेंच सर्व यात्रेकरूं उतरतात. मठचट्टी विस्तीर्ण असून येथील बागबगीच्यांतील हिरवीगार केळींचीं पानें वाऱ्याच्या झुळुकेंत यात्रेकरूंना पाचारण करीत असल्याप्रमाणें मागें पुढें हालत असलेली पाहून मोठा आनंद होतो. चट्टीजवळच डाव्या बाजूला एका पहाडांतून सरासरी १०० फुटांवरून पाण्याचा झरा खालीं पडत असून त्याच्या लाखों फवाऱ्यांतून सूर्यबिंबाचें किरण परावर्तन पावून इंद्रधनुष्याचे रंगाप्रमाणें चकाकत असलेलें पाहून मोठा आल्हाद होतो. ह्यांत स्नान करण्यांत काय मौज आहे त्याची कल्पना मोठ्या राजवाड्यांतील शॉवर–बाथखालीं बसूनही यावयाची नाहीं. एका स्नानानें १०।१२ मैल मार्ग चालून येणारा शारीरिक शीण किंवा कांहीं आकस्मिक आपत्तीमुळें येणारी मानसिक उद्विग्नता पांच मिनिटांत पार नाहींशीं होऊन चित्त गारेगार होतें. याच झऱ्याच्या अंमळ पलीकडे पहाडांतून एक कडा पुढें येऊन त्याचेखालीं वरील खडकांतून पाणी झिरपून तेथें हिरवेचार फर्न्स, सुशोभित वनस्पति, आणि सपाट जमिनीपर्यंत लोंबणाऱ्या कोमलपल्लवपुष्पयुक्तलता, ह्यायोगें रमणीय शीतल कुंजवन बनलें आहे, उन्हांतून आल्यावर ही शोभा पहात या ठिकाणीं उभें राहण्याचा मोह सुटत नाहीं. ही चट्टी विश्रांति घेण्यालायक उत्तम सोईस्कर आहे. यापुढें मधील चिणका, भोंवरा ह्या मैलामैलावरील लहान चट्ट्या सोडल्यास ५ मैल **सियासैण** आणि अर्ध्या मैलावरील **आठचट्टी** सोडून

पलीकडे ३ मैलांवर **पीपळकोटी** लागते. आठचट्टीपासून हलकेंहलकें चढण लागते. पण मार्ग साफ व रुंद असून बाजूच्या सरळ कड्यांना पुलासारखे बांध घातलेले आहेत. पीपळकोटी हें एक लहानसें शहरच आहे, असें म्हटल्यास चालेल. यात्रेंतील फोटो, शिलाजित, चवरें, आणखी इतरही आवश्यक सामान येथें मिळतें. कॅटलॉग, जाहिराती, हस्तपत्रकें वगैरे प्रसिद्ध करून मालाचा खप वाढविण्याचा येथील लोकांनीं यथा-योग्य उपक्रम केलेला आहे. येथें पाणी वगैरे पिऊन घ्यावें व थोडें संग्रहीं पण घ्यावें. **कारण पुढें ४ मैल गरूडगंगेपर्यंत पाण्याचा एकही झरा मिळत नाहीं.** यात्रेला जातांना येथें वाटेंत कांहीं विकत घेऊं नये. कारण शिलाजित, चवरें, पुढेंही प्रत्येक चट्टीवर मिळतात व गरजच असल्यास ती परत फिरतांना घ्यावींत. यात्रेकरू गरुडगंगेंत स्नान करून तीर्थांतील दगड उचलतात व त्याला येथील गरुडाच्या मूर्तीचा स्पर्श करवून तो बरोबर नेऊन घरच्या देवांत मांडतात +गरुडगंगा अगदीं लहान असून घाटा-समोरच दगडांचें धरण बांधलें आहे. पण या तीर्थाचें उदक फारच स्वच्छ असून त्यांतून तळचे पदार्थ स्पष्ट दिसतात. इकडच्या पहाडांत स्लेटीचा दगड पुष्कळच आहे, पण आपल्या इकडे वाहून नेण्याचीं साधनें उप-लब्ध होईर्यंत त्याचा देशाला उपयोग नसून हल्लींप्रमाणें ऑस्ट्रियाकडेच स्लेटीकरितां पहात बसणें अपरिहार्य आहे. गरुडगंगेहून लहान टेंगणी-चट्टीची झोंपडी १ मैल असून पुढें **पाताळगंगा**क्षेत्र दोन मैल आहे. हेंही बरेंच रमणीय क्षेत्र असून चट्ट्या व दुकानेंही पुष्कळ आहेत. पुढें गुला-बकोटी व कुंवार (कुंम्हार-कुंभार) चट्टी दोनदोन मैलांवर आहेत. कुंवा-रचट्टीला फार सुंदर दुमजलीं दुकानें वगैरे बरींच असून राहण्याची उत्तम सोय आहे. धर्मशाळाही आहे. येथून समोर हिमाचा पहाड स्पष्ट दिसूं

+ सर्पदंशावर अगर कोणच्याही विषावर हा दगड घासून प्याल्यास विष उतरतें अशी समजूत आहे.

न तत्र सर्पजभयं विद्यते न तथा विषात् ।
विषग्रस्तोऽपि यो मर्त्यो जले घृष्टं पिबेत्तु वै ॥

बदरी-माहात्म्य.

लागतो, व थंडीलाही सुरवात होते. रात्रींच्या प्रशांतसमयीं हिमांशूचे शीतल कर हिमराशीवर पडून चांदण्यांत अपूर्व शोभा दृष्टीस पडून अखिल सृष्टि मृदु हास्य करीत आहे असा भास होतो. सुधांशूमुळें प्राप्त झालेल्या ह्या आल्हादजनक सृष्टिसौंदर्याचें आकंठ पान करीत असतां सभोंवार पडत असलेल्या दहिंवराचें आणि थंडीचें भान रहात नाहीं. हिमवताच्या भालप्रदेशावर गंधाप्रमाणें शोभणाऱ्या प्रकाशमान चंद्रमसी ज्योतीकडे एकसारखी टक लावून बघत असतां तरंग मनांत येतात कीं, चंद्रशेखर गंगाधर तृतीयनेत्री वैश्वानरधारी शंकर तोच हा हिमाचल होय. त्रिजुगीनारायणाची पूर्वी दृश्यमान होणारी ज्वाला हीच त्याचा तृतीय नेत्रांतील अग्नि होय. रामनगर आणि हृषीकेशकडील रानांतील हस्ति-यूथांच्या वैपुल्यामुळेंच शिवाला गजचर्मधारी म्हणत असावेत. येथील वृक्षश्रेणी हीच त्याच्या अंगावरील रोमावलि, हैमवती, हिमधवला गौरी हीच त्याची पत्नी. या प्रदेशांतील सर्पांचें गरल त्यानें प्राशन केल्यामुळें साप निर्विष झाले असावेत. इंद्र आपल्या सोनेरी आणि रुपेरी ढगांच्या झारीनें त्याला प्रत्यहीं अभिषेक करितो व इंद्रधनुष्याकृति गंध कपाळीं लावून मेघनादरूपी शंख वाजवून प्रत्यहीं त्याचें अर्चन करितो.

**जोशीमठ**—यापुढें झडकुला १॥ मैल, स्युंगधार पहाड २ मैल, आणि जोशीमठ ( ज्योतिर्मठ ) ३ मैल असून गुलाबकोटीपासून लागलेली चढण तशीच अगदीं थोडथोडी जोशीमठापर्यंत आहे. जोशीमठाजवळच एक रस्ता खालच्या बाजूनें जोशीमठासमोरील विष्णुप्रयागास गेलेला आहे. मध्यें पहाड आल्यामुळें लांबून जोशीमठाची वस्ती दृग्गोचर न होतां एकदम पहाडाला वळसा घातल्याबरोबर आपण वस्तींत येतों. जोशीमठ पाताल-गंगेपासून दहा मैलांवर आहे. हें उरवीमठाप्रमाणें बऱ्याच मोठ्या वस्तीचें ठिकाण असून दुकानें पुष्कळ आहेत व त्यांतून सर्व पदार्थ मिळतात. थंडीच्या सहा महिन्यांत बदरीनारायण आणि त्याच्या आसपासचा प्रांत हिमांत बुडून गेला असतां येथूनच देवाचें पूजन होतें. हिमाला सुरवात होतांच पलीकडच्या हिमप्रदेशांतील लोक जोशीमठांत येऊन राहतात. येथें तारघर, डाकघर, दवाखाना, पोलीसस्टेशन वगैरे असून यांतील सर्व

लोक फार सज्जन आहेत. या सर्वांची मैफल 'कैलासकीर्ति आश्रम' म्हणून हियालयांतील औषधी विकण्याच्या दुकानांत दररोज संध्याकाळीं जमत असते. 'कैलासकीर्ति आश्रमा'चा सर्व व्यवहार इंग्रजी धर्तीवर पद्धतशीर चाललेला असून त्यांनीं दक्षिणी गिऱ्हाईक वळविण्याकरितां केसरी ऑफिसांतून एक पत्र घेऊन ठेवलें आहे व लो. टिळकांची शिफारस म्हणून आपल्या प्रसिद्धी पत्रकांत छापून काढलें आहे.

येथील पोलिस सबइन्स्पेक्टर पंडित जयकिसन हे साधुजनांचे फार चहाते आहेत. कोठेंही योगी उतरला अशी वार्ता कानीं येतांच त्याचें दर्शन घेऊन शक्य ती सेवा करण्यांत बिलकूल कसूर करीत नाहींत अशाबद्दल त्यांची ख्याति आहे. त्यांच्या तोंडून इकडील सिद्ध सुंदरनाथजीबाबा यांजविषयीं हकीकत कळते:—

१९१२ च्या दिसेंबर महिन्यांत हे कोटद्वार येथें असतांना शिपायानें बातमी आणली कीं कोणी डाकू ( दरोडेखोर ) स्मशानांत आला असून जवळच्या जंगलांत लपून बसला आहे. त्याच्या खाणाखुणा विचारतांना तो कोणी महात्मा असावा अशी खात्री होऊन पं. जयकिसन एकदम निघाले व महाराजांची भव्य मुद्रा व जटाभार पाहून पायावर लोटांगण घातलें. त्यांनीं प्रसादाकरितां ५ शेर जिलबी आणविली होती. शिवाय गांवकरी लोक ही बातमी कळतांच त्यांना अर्पण करण्याकरितां आपापले दुधाचे चंबू तेथें घेऊन आले. एकंदर १०।१५ शेर दूध जमलें असावें. महाराज कोणाशीं भाषण करीत नव्हतेच. त्यांच्याभोंवतीं शेंकडों लोक गोळा झाले होते. पण बाहेरील जग आहे किंवा नाहीं अशीच त्यांची स्थिति होती. आसनमांडी घातलेली आणि डोळे लागलेले ध्यानस्थ. त्यांनीं डोळे किलकिले उघडतांच पंडित जयकिसन यांनीं नैवेद्य ग्रहण करण्याकरितां प्रार्थना करितांच संमति दिल्याचें चिन्ह म्हणून तोंड उघडलें. पंडित जयकिसन हे स्वहस्तांनीं त्यांना खाऊं घालीत होते. थोडी मिठाई आणि दोनतीनजणांनीं आणलेलें दूध ग्रहण केल्याबरोबर त्यांनीं तोंड मिटलें. तेव्हां बाकीचे लोक दुधाचा स्वीकार न केल्या-

मुळें स्वतांला अभागी मानून दुःखी होताहेत अशी पुन्हां विनंति करितांच त्यांनीं पुन्हां आपलें तोंड उघडून सर्व मिठाई आणि सर्व दूध संपेपर्यंत तोंड मिटलें नाहीं. एकाचवेळीं ५ शेर मिठाई आणि कमींत-कमी १० शेर दूध एकट्या मूर्तीनें पार करणें असंभवनीय दिसतें खरें; पण हा चमत्कार प्रत्यक्ष पाहणारे संभावित लोक अद्याप हयात आहेत. त्यांच्या दर्शनाचा लाभ केव्हां आणि कोठें घडेल याचा कांहीं नेम नाहीं आज बदरीला तर उद्यां केदारला, जिकडेतिकडे सर्व प्रदेश हिममय असून कोणाची जाण्याची हिमत नाहीं अशी बिकट ठिकाणीं छातीच्या खालचा सर्व देह बर्फांत गढला आहे अशा स्थितींतहीं त्यांचें कधींकधीं दर्शन होतें असें सांगतात. परंतु केव्हांही असो त्यांचें आसन मात्र ढळत नाहीं. कांहीं समाजिस्टांनीं प्रचीति पाहण्याकरितां त्यांच्या मांडीवर निखारे ठेवून पाहिलें, त्यांनीं मांस भाजून गेलें, पण महाराजांनीं हूं का चूं केलें नाहीं असें येथील सरकारी डॉक्टर व पंडित जयकिसन यांनीं सांगितलें. रात्रीं त्यांच्या डोळयांची ज्योति एखाद्या ताऱ्याप्रमाणें चकाकते असें सांगतात. हें निरंतर आसनमांडी घालून ध्यानस्थ स्थितींत असल्यामुळं त्यांनीं जडसमाधी घेतली आहे अशी समजूत आहे. यांचा फोटो संग्रहणीय असून वरील 'कैलासकीर्ति आश्रमांत' विकत मिळतो. त्यावरून पाहातां त्यांच्या भव्य शरिराचा आकार साधारण मनुष्यापेक्षां निदान दीडपट तरी दिसतो. या फोटोकडे सारखें पहात राहवेसें वाटतें. असे अलौकिक पुरुष ह्या भागांत किती तरी असतील! ज्यांचें भाग्य उदयास येईल त्यांनाच त्यांचें दर्शन घडेल!

बदरीनारायणाचे पंडे आणि व्यवस्थापक रावळजी येथेंच रहातात. येथें ज्योतिर्मठ, नृसिंहबदरी, वासुदेव, दुर्गादेवी, गरुड वगैरे स्थानें प्रेक्षणीय आहेत व दंडधारा तीर्थाचें स्थान आहे. दोन पितळी मुखांतून दोन जलधारा सारख्या वहात असतात त्यालाच दण्डधारा हें नांव आहे. येथून जवळच जोतेश्वर महादेव, कल्पवृक्षादि तीर्थें दर्शनयोग्य आहेत. जोशीमठापासून नारायणक्षेत्राची पवित्र भूमि लागली. येथूनच एक मार्ग कैलास मानस-सरोवराला गेला असून त्याची १२५

मैलांवर असलेलीं उंच उंच हिमशृंगें पाहून तेथें जाऊं न शकणाऱ्या लोकांना येथूनच नमस्कार करून समाधान मानून घ्यावें लागतें. याच्या भोंवतालचा सर्वच प्रदेश हिमशृंगांनीं व्याप्त असून त्यांच्या गर्भांत जोशीमठ आहे असें म्हटल्यास चालेल. एके बाजूला कैलास, दुसऱ्या बाजूला बदरीनारायण आणि त्याच्याच जवळ केदार वगैरे हिमशृंगांच्या असंख्य मालिका एकामागून एक दृग्गोचर होऊन त्यामुळें गंगेच्या प्रवाहाप्रमाणें चित्तांत आनंदाच्या उकळ्या फुटून त्या देखाव्याकडे सारखें टक लावून पहात बसावेसें वाटतें. येथून बदरीनारायण फक्त २० मैल आहे. या स्थळाची उंची ७५०० फूट म्हणजे १॥ मैल आहे असें म्हणतात.

येथून १॥ मैलाची खडी उतरण पगदंडी रस्त्यानें उतरल्यावर **विष्णुप्रयाग** लागतें. येथें विष्णुप्रयाग आणि अलकनंदा मोटमोठ्या पहाडांच्या उतरणीवरून भीषण गर्जना करीत मोठ्या वेगानें धाडधाड धांवत येऊन एकमेकींस कडकडून आलिंगन देतात; संगमस्थळीं त्यांचें पाणी कित्येक हात सपाटीपेक्षां उंच उसळून त्याच्या फवाऱ्यांतील सूक्ष्म जलतुषार सूर्यकिरणांत जांभळ्या, निळ्या, उद्या, हिरव्या, पिंवळ्या, नारिंगी आणि तांबड्या अशा इंद्रधनुष्याच्या सप्तरश्मींनीं नानातऱ्हेच्या रत्नांप्रमाणें प्रकाशमान होऊन, त्याच्या जवळून पाण्यांत भूशिराप्रमाणें पुढें गेलेल्या उंच खडकाच्या सुळक्यावरून ही शोभा प्रसन्न चित्तानें अवलोकन करणाऱ्या पथिकजनांचें अंतःकरण आणि शरीर आपल्या सुखस्पर्शानें गारेगार करून सोडतात. ह्या खडकावर बसून आचार्यांच्या गंगाष्टकस्त्रोत्रांतील खालील श्लोक गुणगुणण्यांकडे साहजिक प्रवृत्ति होते.

भगवति तव तीरे नीरमात्राशनोऽहं विगतविषयतृष्णः कृष्णमाराधयामि
सकलकलुषभंगे स्वर्गसोपानसंगे तरलतरतरंगे देवि गंगे प्रसीद ॥ १ ॥
भगवति भवलीलामौलिमाले तवांभःकणमणुपरिमाणं प्राणिनो ये स्पृशंति ।
अमरनगरनारीचामरग्राहिणीनां विगतकलिकलंकातंकमंके लुटंति ॥ २ ॥
ब्रह्मांडं खंडयंती हरशिरसि जटावल्लिमुल्लासयंती ।
स्वर्लोकादापतंती कनकगिरिगुहागंडशैलात्स्खलंती ।
क्षोणीपृष्ठे लुठंती दुरितचयचमूर्निर्भरं भर्त्सयंती
पाथोधिं पूरयंती सुरनगरसरित्पावनी नः पुनातु ॥ ३ ॥

विष्णुप्रयाग जणूं काय बदरीशधामाचें द्वारच होय. म्हणूनच म्हटलें आहे " यावद्विष्णुर्महीपृष्ठे यावद्गंगा महेश्वरी । तावद्वै बदरी गम्या दुर्गम्या च ततःपरम् ॥

बदरीमहात्म्य.

धरणीतलावर जोंवर विष्णु आणि गंगा विद्यमान आहेत तोंवरच बदरीधाम गम्य होय. विष्णुगंगेंतील मोठमोठे खडक लांकडी तक्त्यांच्या साध्या पुलांनीं जोडलें असून त्यावरून उंच ठिकाणीं माथ्यावर तें असलेलें दिसतें. विष्णुप्रयागाला फक्त दोन लहान दुकानें आणि एक मंदिर इतकीच वस्ती आहे. एकदां चढून आल्यावर संगमावर जाण्याकरितां पुन्हां घांट उतरावा लागतो. संगमाच्या ठिकाणीं पाण्याचा वेग इतका आहे कीं मोठमोठे हत्ती देखील सहज वाहून जातील.एखाद्या दगडावर थोड्या पाण्यांत बसून तांब्यानें स्नान करावें लागतें. येथून सहा मैल घाटचट्टीमध्यें उतरण्याला किंवा पाणी पिण्याला एकही ठिकाण नाहीं. रस्ता पाहून थोडथोडी केदारची आठवण येते.' वाटेंत खडकादगडांची रेलचेल असून कांहीं मार्ग पहाडाच्या सरळ कड्यावरून गेलेला आहे. पण खडी चढण नसल्यामुळें मनुष्य दमत नाहीं. गौरीकुंड सोडल्यापासून खडकाळ रस्ता प्रथम येथेंच लागतो. आतां हा सबंध मार्ग नारायणापर्यंत अलकनंदेच्या कडेकडेनेंच गेलेला असून तिचा अनुहतध्वनि सारखा ऐकावयास मिळतो. तिचें पाणी इतकें गार आहे कीं, तहान लागली असतांही ओंठांना स्पर्श करवत नाहीं. घाटचट्टी मोठी आहे पण पाणी लांबून आणावें लागत असल्यामुळें उतरण्यालायक नाहीं. पुढें एकएक मैलावर नंदिकेश्वर आणि पंडुकेश्वर हीं स्थळें लागतात *. पंडुकेश्वरक्षेत्रीं धर्मरा-

---

* पाण्डुना च तपस्तप्तं शप्तेन मृगरूपिणा ।
मुनिना परकोपेन पाण्डुस्थानं ततः स्मृतम् ॥

बदरीमहात्म्य.

पण्डुराजानें मृगया करीत असतां मृगरूपानें रतिक्रीडा करीत असणाऱ्या एका ऋषीला बाणानें घायाळ केल्यावरून, त्यानें तूंदेखील रतिसमयीं मृत्यु पावशील, असा राजाला शाप देऊन प्राण सोडला, अशी या क्षेत्राची कथा प्रसिद्ध आहे.

जानें स्वर्गारोहणकालीं स्थापन केलेली बदरीनारायणाची प्रसिद्ध मूर्ति आहे. येथें राहाण्याकरितां कालीकमलीवालेबावांची धर्मशाळा आहे व नेहमीं-प्रमाणेंच तेथील व्यवस्था चोख आहे. येथून थंडी असह्य होऊं लागते व हिमाचे पहाड आपल्यासमोर अगदीं निकट दिसतात. ह्या गांवीं लोक शौचनियम पाळीत नसल्यामुळें स्वच्छता चांगलीशी नाहीं. येथून ३ मैल **लामबगड** येथेंही चट्ट्या पुष्कळ असून २ धर्मशाळा आहेत. त्यांच्याच मागल्या बाजूला मोठमोठे पहाड असून त्यांवर सदोदित हिमाचें आवरण असतें. संध्यासमयीं अस्तमान होणाऱ्या सहस्ररश्मीचा आनंदमय प्रकाश पर्वतशिखरावरील रत्नजडित-मुकुटाप्रमाणें चकाकणाऱ्या हिमसंचयांतून परावर्तन पावल्यामुळें केदाराप्रमाणेंच अपूर्व शोभा दृश्य-मान होते. कृष्णपाषाणाच्या विशाल भिंतीप्रमाणें आकाशाला टेंकलेले पर्वतांचें सरळ कडे, त्यांवरून नित्य होणारी मेघगर्जनेची सतत सरबत्ती, वरच्या बाजूनें पताकाप्रमाणें शोभणाऱ्या देवदारूंच्या ( पाईन ) रांगांच्या रांगा आणि पायथ्याशीं हरहर नामाची प्रचंड गर्जना करीत जाणाऱ्या गंगेचा दुस्तर जलौघ यांच्या योगानें आपण नारायणाच्या भव्य किल्ल्यांत कामक्रोधादि षड्रिपूंचा शिरकाव होणें अशक्य अशा सुरक्षितस्थळीं आहोंत असा मनास भास होतो. यापुढें हनुमान चट्टी ३ मैल आणि नारायण ५ मैल आहे. येथून मार्ग खडकादगडांतून चढणीवरून गेलेला आहे. चारी दिशेला शुभ्र हिम दिसूं लागून मनस्वी थंडी सुरू होते. त्यामुळें इकडे दूध फार दुर्मिळ आहे. मिळालेंच तर ‑॥, ‑|||‑ शेर प्रमाणें मिळतें. हनुमानचट्टीपासून चढण फार बिकट जाते. केदारप्रमाणेंच रस्ता वगैरे नाहीं. सात आठ वेळ ४०।५० फूट रुंद असे हिमाचे थर ओलांडून पुढें जावें लागतें. पण हिम जमिनीसारखें घट्ट आहे. हें कधींच निःशेष वितळून जात नाहीं. कोठें मार्गांतून साफ वितळल्यामुळें त्याच्या ठिकाणीं खोल दऱ्या बनलेल्या असतात आणि मार्ग पहाडाच्या कडेनें फक्त वीतवीत जागेंतून गेलेला असून वर पहावें तर बर्फाचा कडा तुटलेला असून त्यांतून थेंब थेंब पाणी टपकत असतें. पहाडाच्या शिखरापासून हिमानें गोठलेल्या अलकनंदेपर्यंत सारखे पसरलेले हे लांबच्या लांब हिमाचे पाट नद्यांप्रमाणें भासतात. एके ठिकाणीं तर हा

थर १०० फूट रुंद आणि तीन-चारशें फूट लांब होता. हा सर्वांत मोठा थर ओलांडल्यावर एकदम वस्ती व नारायणाच्या मंदिराचें उंच शिखर दिसूं लागल्यामुळें अत्यंत आनंद होतो.

**बदरीनारायण**—हा आनंद हिरावून नेण्याकरितांच कीं काय कोण जाणे, पंडे लोक आणि त्यांचीं ४।५ वर्षांच्या वयाचीं शेंबडीं पोरेंसोरें-देखील भोंवतीं जमून कावकाव करूं लागतात. येथेंही पंड्यांचें कांहीं काम पडत नाहीं. ब्रह्मकपालीं पिंडदान करविणारा ब्राह्मण निराळा आणि तर्पण करविणाराही निराळाच. त्या ठिकाणीं हा पंडा उभा-देखील रहात नाहीं. एखादें घर पाहून रहावयाला जागा दिली आणि त्याला देवळांतून आयता विकत मिळत असलेला भोग-भात आणि वरण-दिला, किंवा मुबलक द्रव्यप्राप्तीची आशा दिल्यास गारेगार करून पैसे उपटण्याकरितां लाडू, मालपुवा, भजी, मुरंबा वगैरे अनेक जिन्नस बाजारांतून आणून दिलें कीं पंडाजीचें काम दक्षिणा घेऊन 'तेरी जात्रा सुफल हुई' म्हणण्याचेंच बाकी राहिलें. इतक्याचकरितां त्यांनीं मोटमोठ्या ठिकाणांतून आपल्या गुमास्त्यांचें जाळें पसरून ठेविलें आहे. हे गुमास्ते यात्रेकरूंच्या गोटांत येनकेनप्रकारेण प्रवेश करून त्यांजकडून सांजसकाळ पोटपूजा आणि पत्रंपुष्पं दक्षिणा तर घेतातच, पण शिवाय पंड्याला जें मिळेल त्यांतही अर्धा हिस्सा ठेवतात. गुमास्ता बरोबर घेतल्यानें पंड्या एकपट पैसा घेण्याऐवजीं दुप्पट रक्कम घेतो व पुन्हा वाटखर्चीबद्दल गुमास्त्यालाही कांहीं द्यावें लागतें. ह्याप्रमाणें कांहीं फायदा न होतां, यात्रेकरूं दोन्हीकडून नाडले जातात. पंड्यांशीं दक्षिणेकरितां भांडाभांडी झाल्यामुळें कित्येकदां पोलिसांत रपोट देण्या-पर्यंत मजल येऊन पोहोंचतें. बिचारे भोळेभाबडे यात्रेकरूं पंड्यांकडून पूर्ण नागविले जाऊन दक्षिणेकरितां उलट त्यांजकडून कर्ज घेण्याचें कबूल करून संकल्प सोडतात. धर्माचें कर्ज बुडविण्याची नियत यात्रे-करूंची कदापि व्हायची नाहीं हें पक्कें माहीत असल्यामुळें पंडे त्यांना वाटेल ती रक्कम देण्यास तयार होतात. बर्फाच्या असह्य थंडींत नेसा-यला धड चिंधी नाहीं, पोटाला भाकरीचा तुकडा नाहीं, अशा स्थितींत भगवंताचें दर्शन घेण्याकरितां उत्सुक होऊन बद्रीविशालाच्या

जयघोषांत देहाला होत असलेल्या कष्टांचें विसर्जन करीत अनवाणी पायीं रखडत येणाऱ्या लुले, लंगडे, आंधळे, पंगू इ. उपकारास पात्र व एका पैशानें देखील संतुष्ट होऊन दुवा देणाऱ्या लोकांना यत्किंचित् साहाय्य न करतां पैशानें गब्बर होऊन आळसांत व चैनींत दिवस घालविणाऱ्या पंड्यांचीं घरें भरतांना आमच्या यात्रेकरूंना पाहिलें म्हणजे,–भगवंतानें स्वमुखानें कंठरवानें सांगितलेल्या "दरिद्रान् भर कौंतेय मा प्रयच्छेश्वरे धनम् । रुग्णस्यैवौषधं पथ्यं नीरुजस्य किमौषधैः" या वचनाचा त्यालाच साक्षीभूत करून कसा विपर्यास होत असतो हें प्रत्यक्ष पाहिलें म्हणजे जिव तिळतिळ तुटतो. भुकेल्यांच्या पाठीं कांठीं घेऊन धांवणारे पाटील पंड्यांच्या घरीं रुपयांचे हंडे मोजून यमराजाचे दंडे खाण्याची मात्र तयारी करून ठेवितात. सदावर्तें बऱ्याच लांबलांब अंतरावर मुख्य मुख्य ठिकाणींच असून मागील चिठ्ठी दाखविल्याशिवाय पुढल्या सदावर्तांत कांहीं मिळावयाचें नाहीं, हा नियम पुष्कळ गोरगरिबांना माहीत नसल्यामुळें त्यांचे वाटेंत हाल होतात. धर्मशाळाही पुरेशा नसून साधूसंन्याशांची त्यांत अतोनात गर्दी असल्यामुळें पुष्कळांना नाइलाजास्तव पंड्यांच्या वतीनें रहाण्याची सोय पहावी लागते. हीं घरें पंड्यांचीं स्वतांचीं नतून तीं त्यांनीं बहुतेक भाड्यानें घेतलेलीं असतात किंवा यात्रेकरूंकडून यात्रेकरूंस धर्मार्थ राहण्याकरितांच दान घेतलेलीं असतात व त्यांत कोणचीही सोय नसते. अशा मोठाल्या क्षेत्रीं एखादी कमेटी नेमून यात्रेकरूकरितां सोईस्कर चाळी बांधून त्या त्यांना माफक भाड्यानें दिल्या व त्यांतच योग्य दरानें खाण्यापिण्याचें व आंथरूणपांघरुणाचें सामान पुरविण्याची व्यवस्था केली तर यात्रेकरू पंड्यांच्या जाचांतून सुटून कमिटीलाही बराच फायदा होईल. हल्लीं हरिद्वार, श्रीनगर, रामनगर, बदरीनाथ वगैरे ठिकठिकाणीं यात्रेकरूंना अनेकप्रकारची मदत करण्याकरितां सेवासमिति स्थापन झाल्या आहेत.

अलकनंदेच्या पूर्व तीरावर, पश्चिमेस नारायण व पूर्वेस नर नामक पर्वतांच्या मधोमध, तीन मैल लांब व एक मैल रुंद दरींतील सपाटीवर वस्तीच्या उंच भागास बदरीनारायणाचें सुप्रसिद्ध मंदीर आहे. याची मूळ स्थापना ८ व्या शतकांत श्रीमच्छंकराचार्यांनीं केली. पण

हिमशिलांच्या तडाख्यांत त्याचा केव्हांच चक्काचूर उडाला असावा. हल्लींचें देवालय सुमारें ४०–५० फूट उंचीचें चुन्यादगडांनीं नीटनेटकें बांधलेलें आहे. अर्थात् हें अगदीं अलीकडचें आहे. दरवर्षीस सुमारें ५०,००० यात्रेकरू दर्शन घेऊन पुनीत होतात. कुंभमेळ्याचे वेळीं ही संख्या कितीपट होत असेल तें सांगणें कठीण आहे. या क्षेत्राचे आसमंतांतील भागास वैश्णव क्षेत्र म्हणत असून पंचकेदारप्रमाणेंच पंचबद्रीही आहेत. बद्रीनारायण ( विशालबद्री ), योगबद्री ( पंडुकेश्वर ), भविष्यबद्री ( तपोवन जोशीमठापासून ९ मैल ) वृद्धबद्री (अनीमठ), ध्यान बद्री ( सिलांग ). तारघराच्या जवळच यात्रेकरूंची संख्या नोंदण्याचें ऑफिस आहे. त्यावरून किती यात्रा आली तें कळतें. धन्य आहे इंग्रजांच्या दोरीसूत शिस्तीची ! !

बद्रीनारायण येथेंही केदारइतकीच थंडी असून भरदुपारींदेखील गंगेच्या हिमजलानें स्नान करणें जवळजवळ अशक्य आहे. पण इतके कष्ट करून थंडींतून आलेल्या यात्रेकरूंचे श्रम हरण करण्याकरितां **या हिमानें व्याप्त अशा ठिकाणीं तप्तकुंडासारखी अजब चीज निर्माण करून ठेविली आहे.** पितळी गोमुखांतून हत्तीच्या सोंडेसारखी मोठी उष्णोदकाची संतत धार कुंडांत अहोरात्र अखंड पडत असते. धारेचें पाणी अत्यंत उष्ण मेअखेरीस ११ वाजतां १२० F.° असून त्याचे चटके बसतात, पण कुंडांत पडून तें थंड हवा लागल्यामुळें निवून स्नानाला योग्य होतें. यावरून उष्ण उष्ण वाफेचा ढग सारखा हेलकावे खात असतो. वाटेल तर व्हेपरबाथ (बाष्पस्नान) घ्या किंवा फूटबाथ (पादस्नान) घ्या किंवा कुंडांत उडी मारून सबंध स्नान करा. पहिल्या दिवसाच्या स्नानाला पैसा दोन पैशाच्या दक्षिणेशिवाय कोणाला कांहीं द्यावयाला नको, कोणाचा मज्जाव नाहीं. कुंडांतील पाणी कंबरेपेक्षां थोडें अधीक खोल असून त्यांत बुडी ( गोता ) मारल्याबरोबर दीड महिन्याच्या कठीण यात्रेचा शीण एका सेकंदांत पार नाहींसा होऊन माशा–मच्छरांच्या चाव्याचे कंडू फोड वगैरे एकदम शमल्यासारखे वाटतात. या पाण्यांत गळ्यांपर्यंत बुडले रहाण्यांत अशी मौज वाटते कीं ती वर्णन करवत नाहीं. अर्धा अर्धा तासपर्यंत बाहेर यावेसें वाटत नाहीं. पण

जास्त वेळ राहिल्यास घेरी येऊन मनुष्य बेशुद्ध होईल असें सांगतात. हें कुंड गौरीकुंडापेक्षां अंमळ मोठें १६॥×१४। फूट असून पाणी तितकें मच्चूळ नाहीं. पण गंधक—क्षारमिश्रित असल्यामुळें पिण्याच्या उपयोगी नाहीं. नाहींतर कोणी शोकी मनुष्य सोपा उपाय म्हणून यांतच आपला चहा घालून प्यायचा ! या कुंडावर टिनाचें पक्कें छपर केलें आहे. पाणी घाण झालें कीं, बाहेर सोडून देण्यांत येतें ह्या उष्णकुंडामुळेंच येथें वाटेल तितके दिवस राहवतें. जरा हिंडून फिरून हातपाय गार झाले कीं तप्तकुंडांतील पाण्यांत बुडवून यावें. याजवळ उष्णोदकाचे आणखी लहानसहान झरे आहेत. त्यांचें पाणी घेऊन अनेक लहानलहान कुंडें बनविलीं आहेत. ह्या उष्णकुंडांत आणि अलकनंदेच्या हिमौघांत अंतर काय तें दहापांच हातांचेंच. पण काय चमत्कार पहा ? एकांत उष्ण म्हणून हात बुडवत नाहीं तर दुसऱ्यांत तें गार म्हणून स्पर्श करवत नाहीं ? आतां ज्वालामुखीच्या प्रभावामुळें हा उष्ण झरा उत्पन्न झाला असेल हें जरी खरें आहे तरी ज्या पर्वतांच्या शिरावर बारमहा न वितळणाऱ्या हिमाच्या राशींच्या राशी असतात त्यांच्याच उदरांत प्रखर अग्नि प्रदीप्त झालेला आहे हा तरी काय लहान चमत्कार आहे ?* मग ह्याला सृष्टचमत्कार म्हणा किंवा दैवी चमत्कार म्हणा.

ह्या कुंडाच्या पश्चिमभागीं समुद्रसपाटीपासून १०२८४ फूट उंचीवर बदरीनारायणाचें मंदिर आहे. ह्याची स्थापना मूळ श्रीमच्छंकराचार्यांनीं केली. देवळांत नर, नारायण, नारद, कुबेर आणि लक्ष्मी यांच्या मूर्ती आहेत. मधली मोटी ३ फूट उंच मूर्ती नारायणाची असून तिला सुवर्णाचा मुखवटा घातलेला असतो. मस्तकावरील मुकुट आणि छत्री देखील सोन्याची आहे. त्यांत मध्यभागीं साधारण मोठा हिरा आहे. एकंदर ऐवज १०००० रु. किंमतीचा आहे. ह्या मूर्ती काळ्या पाषाणाच्या

---

*हनुमानचट्टीजवळ वैखानस तीर्थ आहे. त्याच्या आसपास अद्यापही ज्वाळा दिसतात असें बदरीमहात्म्यांत सांगितलें आहे. " अद्यापि तत्प्रदेशे वै यवा दग्धास्तथा तिलाः । अंगाराश्चापि दृष्टास्ते होतृस्थाने महात्मनाम् ॥ "

असून फार सुंदर आहेत. बदरीनारायणाची मूर्ती परिसाची आहे असें म्हणतात तें अगदीं खोटें आहे. तसें असतें तर येथील द्रव्यलोभी पंडे आणि पुजारी कांचनमयच बनले असते. यात्रेकरूंना त्रासविण्याचें त्यांना कारण उरलें नसतें. उलट हरभऱ्याच्या डाळीच्या प्रसादाऐवजीं त्यांनीं प्रत्येक यात्रेकरूच्या ओंट्यांत पूजनाकरितां एकेक नारायणाची सुवर्णमूर्ती प्रसाद म्हणून टाकली असती. निदान भगवंताचीं देवळें तरी सोन्याचीं बनलीं असतीं. पण तसा कांहीं एक प्रकार नसून फक्त देवळाचा घुमट आणि कळस सोन्याच्या पत्र्यांनीं मढविलेला आहे. मूर्तीच जर परिसाची नाहीं तर कोणी सोनारानें देवळांत शिरून सुवर्णलोभानें देवाची अंगुली तोडली आणि रक्तस्नान होऊन मंदीर भरून गेलें व ह्याच वेळेपासून देवाजवळ जाऊन देत नाहींत ह्या साऱ्या बाष्कळ गप्पाच आहेत. या मंदिराच्या उत्पन्नाचे मालक रावलजी असून त्यांच्याकडून सर्व व्यवस्था चालत असते. केदारप्रमाणें देवळांत जाण्याकरितां तिकीट वगैरे नाहीं. त्याचप्रमाणें• दाक्षिणा ठेवण्याबद्दल अगर अटका चढविण्याबद्दल कोणावर सक्ती नाहीं. देवळाच्या आवारांत गरुड वगैरे देवांच्या मूर्ति आहेत. जवळच गरुडशीला आहे तेथें दाक्षिणा ठेवतात व होम वगैरे करितात. सकाळीं ६ ते ११ आणि तीनप्रहरीं ४ ते ७ पर्यंत देवळाचीं कपाटें उघडीं असतात. गर्दी कमी झाल्यावर जरा पुजाऱ्याला पत्रंपुष्पं केल्यास मूर्तीचें दर्शन आंत जाऊन जवळून करतां येतें. नाहीं तर दरवाज्यांतूनच करावें लागतें, येथें निरंतर फार गर्दी असते.

### देवस्थानचें उत्पन्न व व्यवस्थाः—

अलमोराजिल्ह्यांतील १७५० रु. सरकारी साऱ्याची ४५ संपूर्ण खेडीं व २६ अंशतः मालकीचीं खेडीं, आणि गढवाल्यांतील १६४ संपूर्ण व १११ हिश्याचीं ५४२९ रु. साऱ्याचीं खेडीं देवस्थानच्या मालकीचीं आहेत. याशिवाय यात्रेकडून मिळणारे थाली, अटका व गद्दी भेटीचें उत्पन्न. यांपैकीं मुख्य थाली भेट. थाली म्हणजे "स्थाली" —ताट. दर्शनाचे वेळीं देवासमोरील मुख्य दक्षिणा कमींत कमी रुपया म्हणजे थाली भेट, दुसरी अटका. जगन्नाथाच्या यात्रेकरूंच्या परिच-

याचा हा शब्द. देवाला भोग चढतो व त्यांतला जो अंश यात्रेकरूंला भोजनार्थ मिळतो त्याबद्दल द्यावयाची दक्षिणा ऊर्फ किंमत. फरक इतकाच कीं आपण रुपयाचें अन्न खाल्लें तर दोन रुपये घेतात; मात्र सक्ति नाहीं. तिसरी भेट म्हणजे रावलजींचें दर्शन घेतांना त्यांना दिलेली दक्षिणा; ही त्यांच्या खाजगी मालकीची होत नसून देवस्थानाकडे विनियोग होतो. माणशीं तीनच रुपये धरलें तरी हें उत्पन्न १,५०,००० रु. होतें.

रावलजी सकाळसंध्याकाळ पूजा उरकून दिवसभर कचेरींत अटकाभेट गद्दीभेट घेत असतात. कारकून हिशेब लिहितात. संध्याकाळ होतांच बेरीज ताळा करून उत्पन्न खजीन्यांत जमा होतें. खजीनदार म्हणजे भांडारी पंडुकेश्वरचे रजपूत आहेत. देवळांतील त्यांना सालीना १२० रु. मिळतात. सर्व कारभार रावलजींचे हातीं असून टेहरीसरकारची देखरेख असते. पूर्वी रावल हा आपल्या हयातींतच देवस्थानांतील सर्व अधिकाऱ्यांच्या मतानें यथाशास्त्र वारसर नेमून टाकी. पुढें बराच घोटाळा उडून इंग्रजसरकारला दिवाणी दावा लावावा लागला. हल्लीं टिहरी सरकारकडे व्यवस्था सोंपविल्यापासून कारभार सुखांत चालूं लागला आहे. पूर्वी रावलजी शंकराचार्यांच्या जातीचे दक्षिणेकडील नंबुद्री ब्राह्मण असत. हल्लीं गादी वंशपरंपरा चालते. त्याचप्रमाणें देवळांत इतर पुजारी मान्याकडील संन्याशी असत ते आंता गृहस्थाश्रमी बनले असून रजपूतांश त्यांचा विवाहसंबंध होतो.

मंदिराच्या आवारांतच एके बाजूला मोठी पाकशाला आहे. दुपारीं तीनचार वाजण्याच्या सुमाराला देवाला भोग चढविल्यावर उन्ह उन्ह भातांचीं भांडींच्याभांडीं विकण्यांत येतात. पंडे लोक हींच भांडीं यात्रेकरूंकरितां विकत घेऊन त्यांना खावयाला घालतात. हा प्रसाद वाटेल त्याला विकत घेता येतो. आठ दहा आण्यांचें भाताचें भांडें घेतल्यास दोनतीन इसमाचें चांगलें पोट भरतें. या क्षेत्रीं कोणी स्वयंपाक करीत नाहींत. उन्ह भात आणि मुगाचे वरण हें देवळांत मिळतें आणि बाकीचे सारे पदार्थ भाज्या, भजीं, लोणचीं, डाळ, मुरंबे, लाडू, पुऱ्या, पापड बाजारांत नेहमीं ताजे आणि बरे मिळतात. दूध फार



ब्रह्मकपाल -( ब्रम्हकपालीं पिंडदान करण्याचें माहात्म्य फार मोठें आहे. )   पृ. ९७.

दुर्मिळ असून ॥।≈किंवा १ रुपाया शेर असतें. केदारइतके येथें खाण्याचे हाल होत नाहींत; कारण दुकानें पुष्कळ असून पदार्थ पुष्कळ तऱ्हेचे व बरे मिळतात. शून्य अंशावर असलेलें हिमजल आणि थंडीमुळें लवकर प्रदीप्त न होणारा अग्नि यांमुळें स्वयंपाक करणें त्रासदायक असलें तरी ज्यांना येथें जास्त दिवस राहावयाचें आहे, त्यांनीं तो सकाळीं तरी अवश्यमेव करावा, नुसत्या बाजारी पुऱ्यावर राहूं नये.

देवळासमोरूनच जरा पलीकडे गेल्यावर अलकनंदेच्या कांठींच ब्रह्मकपाल म्हणून विशाल शिला लागते. याला पितृतीर्थ असेंही म्हणतात. ब्रह्मकपालीं पिंडदान करण्याचें माहात्म्य फार मोठें आहे. आमच्या वंशामध्यें कोणी तरी एखादा कुलदीपक निघून तो आमचा उद्धार करील काय ? असा ध्यास घेऊन मोक्षाकरितां आतुर झालेले पितर ह्याच ब्रह्मशिलेवर पिढ्यानपिढ्या आशाळभूतपणें सोत्कंठ वाट पहात बसतात. येथें पिंडदान केल्यावर पितरांना अक्षय स्वर्गसुख मिळतें. यानंतर केव्हांही पिंड देण्याची गरज नाहीं, येवढेंच नव्हे तर पुन्हां कोठें दुसऱ्यांदा पिंड दिल्यास येथलें पिंडदान विफल होऊन पितर स्वर्गांतून भूलोकीं पतन पावतात ! !

बदरीमाहात्म्यांतील मूळ श्लोक असा:—

**तत्रैव बदरीक्षेत्रे पिंडं दातुं प्रभुः पुमान् ।**
**मोहाद्गयायां दद्यात् यः स पितृन पातयेत् स्वकान् ॥**

( सनत्कुमारसंहिता, अ० १ श्लो. ३८ ).

“ जो मनुष्य बदरीक्षेत्रीं पिंडदान करण्यास समर्थ असून मोहामुळें नयेंत पिंड देतो तो आपल्या पितरांचा अधःपात करतो ” असा ह्या श्लोकाचा सरळ अर्थ सोडून हिंदी टीकाकारांनीं “ श्रीबदरीक्षेत्र ( ब्रह्मकपाल ) में पितरोंके अर्थ पिंडदान करके जो मनुष्य फिर मोहसे गयाजीमें पिंडदान देते है वह अपने पितरोंका अधःपतन करतें है ॥ ( महेशानंदशर्माकृत बदरीमहात्म्य. )

असा अर्थ केलेला असून तोच अशिक्षित हिंदी पंड्यांनीं उचलल्यामुळें तर वरील समजूत रूढ झाली नसेल ना ?

पिंडाकरितां मुद्दाम चरू घेऊन भात शिजवीत बसण्याची गरज नाहीं. आयते देवाच्या प्रसादाच्या भाताचे पिंड जव, कुश वगैरे घालून पैशादोनपैशाला तयार मिळतात. पिंडावर झांकण्याकरितां एकादें वस्त्र आणि यज्ञोपवीत ह्या वस्तुबरोबर बाजारांतून घ्याव्या लागतात; पण त्याशिवाय सर्व कांहीं येथेंच विकत मिळतें. मागें सांगितल्याप्रमाणें पिंड करणारा पंडा अगदीं निराळा असतो. त्याची तृष्णाही फार नसते. तो चारसहाजणांचीं श्राद्धें एकदम उरकतो. **येथें बसण्याकरितां एखादें जाडेंसें आसन जरूर आणावें.** कारण शिला बर्फासारखी गार असून तींवर एक तासभर सारखें बसावें लागत असल्यामुळें पायांतलें रक्त गोठल्याप्रमाणें होऊन असह्य कळा लागतात. येथें सर्व कर्में कपडे घालून व मोठमोठे ओव्हरकोट चढवूनच होतात. कपड्यांचा बोजा असूनही माणूस सारखें थंडीनें कुडकुडत असतें. त्यांत पाऊस पडत असला तर कांहीं विचारूंच नये. छत्री घेऊनही कर्में होतात. छत्री नसलीच तर शिळेच्या पूर्वभागाला एक छप्पर उतरलें आहे तेथें बसूनही विधि उरकतां येतो. ब्रह्मशिलेच्या खालींच ब्रह्मकुंड अलकनंदेंत आहे. त्याच्या कांठांवर बसून १५।२० जणांचीं तर्पणें एकदम चटचट होतात. याशिवाय* नृसिंहशिला, वराहशिला, नारदशिला आणि मागें सांगितलेली गरुडशिला यांचें आणि नारदकुंड, गौरीकुंड, सूर्यकुंड या कुंडांचें दर्शनपूजन करितात. पश्चिमेकडील पहाड नारायणाचा, आणि त्याच्या समोरील पूर्वदिशेकडील पहाड नराचा, आजूबाजूचे पहाड, रुद्र व सुरूप, सत्यपथ आणि स्वर्गारोहणाचे म्हणून दाखविण्यांत येतात. या पहाडावर जाणे फार कठीण, सारा मार्ग हिमांतून आणि थंडी असह्य आहे. वसुधारा येथून चार मैलांवर आहे. याच मार्गानें पांडव स्वर्गारोहणास गेले. वसुधाराक्षेत्रीं हिमवताच्या अत्यंत उंच शिखरांवरून भीषण गर्जना करीत गंगेचा प्रचंड प्रवाह अनेक धारांनीं खालीं पडतो. महत्पु-

---

* नारदी नारसिंहीच वाराही गारुडी तथा ।
मार्कंडेयशिला रम्या शिलाः सर्वार्थसिद्धिदाः ॥

बदरीमाहात्म्य.

त्याशिवाय या ठिकाणीं स्नान घडणें अशक्यच. म्हटलें आहे.—

येऽशुद्धापितृजाः पापाः पाखंडमतिवृत्तयः !
न तेषां शिरसि प्रायः पतंत्यापः कदाचन ॥

मार्गांत व्यासाश्रम–जेथें व्यासांनीं महाभारत ग्रंथ लिहिला तें स्थान लागतें. याच ठिकाणीं मध्वाचार्यांनीं समाधि घेतली म्हणून सांगतात. पलीकडे २० मैलांवर तिबेटांत जाण्याचा मार्ग मानापास आहे.

बदरीनारायणाची वस्ती लहानशी फक्त शेंदीडशें घरांची असून टुमदार आहे. दुकानें विशेषतः खाण्यापिण्याच्या पदार्थांची आणि दर्शनी आंगठ्या, तसबिरा, फोटो, पुस्तकें, केदारकंकणें, शिलाजीत, कस्तुरी, चवरे यांचीं आहेत. येथें मिळणारे फोटो देवळांतील मूर्तीच्या बरहुकुम दिसत नसून दुसऱ्या कोठल्या तरी मूर्तीचे असावेत असें स्पष्ट दिसतें. केदारच्या फोटोसंबंधानें तर यांनीं उघडउघड लबाडीच केली आहे. कारण येथें फक्त त्रिकोणी शिला असून फोटोंत शिवाच्या मानवदेहरूपी अंकावर पार्वती बसलेली दिसते. दुकानांतून भूर्जपत्राचा उपयोग आपलेकडील कागदाप्रमाणें करितात. हें भूर्जपत्र रेशमाप्रमाणें चकाकदार आणि मृदु असून त्याचे पडद्यावर पडदे असतात. हीं पत्रें झाडांचे सालीचे पडदे म्हणजे पदर होत. इकडे भोजनास पत्रावळीप्रमाणें भूर्जपत्रांचा उपयोग करितात. कोणचीही वस्तु घ्यावयाची असल्यास ती त्यांतच बांधून देतात. या भूर्जवृक्षांचीं इकडे मोठमोठीं जंगलें असून भूर्जपत्र इतकें विपुल मिळतें कीं भांडीं घासण्यास आणि घरें शाकारण्यासही त्याचा उपयोग करितात. घरावर सागवानाचे पानांप्रमाणें हीं पत्रें घालून त्यावर माती घालून घरें शाकारतात. रामानें वनवासास जातांना भूर्जपत्राचींच वल्कलें धारण केलीं होतीं. इकडील घरें पायापासून दगडी बांधणीचीं फार मजबूत आणि सुंदर दुमजलीं असतात. हिमामुळें घराची फार दुर्दशा होते म्हणून सांगतात. सहा महिने तर हीं हिमांत खोल बुडलेलीं असून केदारप्रमाणेंच सर्व व्यवहार बंद होतो. हिम वितळत असतां पहाडावरील एखादा लहानसा खडा वरून खालीं निसटतो. तो हिमाच्या थरावरून घसरत असतां

त्याला खालचा हिम चिकटून प्रतिक्षणीं त्याचा आकार आणि वेग वृद्धिंगत होऊन त्याची बनलेली प्रचंड हिमशिला ( avalanche ) धाडदिशीं खालीं कोसळून आपटते. या हिमशिलांच्या तडाक्यांत एखादें घर सांपडलें म्हणजे तें बचावण्याची आशा नको. वस्तीच्या सुरवातीसच डांकघर व तारघर आहे. दोन्हीं कामें एकाच मास्तरला पहावीं लागतात. यात्रेकरूंनीं तावडतोब पत्रें न नेल्यास जोशीमठ, उरवीमठ, केदार, चमोली, वगैरे सर्व ठिकाणचीं डांकघरें मुळींच वाट न पहातां सर्व पत्रें येथेंच पाठवून देतात. यात्रेची तर सदोदित गर्दी असते. यात्रेकरूंच्या आणि पंड्यांच्या तारांवर तारांची सारखी झोड असते. त्यामुळें मास्तरला दम घ्यायला फुरसत नसते. सर्वांना येथल्या पत्त्यावर खात्रीनें पत्रें मिळतात. ही सर्व वस्ती बदरीनारायण पहाडाच्या पायथ्याशीं सपाट प्रदेशावर आहे. याठिकाणची उंची १०५०० फूट व चौखंबा शिखराची उंची २२९०१ फूट आहे.

---

# श्रीबदरीनाथाचे पुढील वसुधारेचा प्रवास.

( प्रो. डी. बी. देवधर यांचे लेखावरून ).

नगाधिराज हिमाचलाचे प्रांतांत किती तरी विलक्षण सृष्टिसौंदर्य भरलेलें आहे. ह्याचें राहूनराहून आश्चर्य वाटतें. जिकडे जावें तिकडे कांहीं ना कांहीं रमणीय स्थान व तेथें कांहीं ना कांहीं तरी देवस्थान आहेच. मोठमोठ्या अडचणीच्या ठिकाणीं असलेलीं प्राचीन ऋषींचीं तपोवनें पाहून तत्कालीन मंडळींची एकांतप्रियता, शोधकता व पर्यटनाची अभिरुचि वगैरे गोष्टी स्पष्ट होतात. बिकटविकट ठिकाणचीं लक्षावधीं तीर्थें ऐकिलीं म्हणजे बदरीनाथ व केदारनाथ या ठिकाणीं जाणें म्हणजे केवळ एक अगदींच साधी गोष्ट आहे, असें म्हणावें लागतें.

केदारनाथाचें स्थान पर्वताचे शिखरावर समुद्रसपाटीपेक्षां ११५०० फूट उंच आहे असें बरोबर घेतलेल्या बॅरोमीटरवरून कळलें. पर्वतांची एक सभोंवार उंचच उंच अशी शाळुंकाकार नैसर्गिक बर्फमय भिंत अस-

४५६९

त्यामुळें तें मंदिर फारच शोभा देतें; व त्या भिंतीपलीकडे लांब अंतरावर पर्वतशृंगें दिसतच असतात. केदारनाथाचे भिंतीपलीकडे किंचित् खोलगट भागांत केवळ दहाबारा मैलांवर बदरीनाथाचें स्थान आहे; परंतु शेसव्वाशें मैलांचा वळसा दिल्याखेरीज तेथें जातां येत नाहीं हें आपणांस ठाऊकच आहे. पण तेथील पंडेलोक असें सांगतात कीं कांहीं कालापूर्वी केदारनाथ व बदरीनाथ या दोहो ठिकाणचा एकच पुजारी असे; व प्रतिदिवशीं तो दोन्ही ठिकाणच्या पूजा करीत असे ! परंतु कांहीं चुकीमुळें एकेसमयीं नेहमींच्या मार्गांचें विस्मरण पडून त्यास परत फिरावें लागलें, आणि यानंतर तो मार्ग बंद पडला. पूर्वींच्या कालांत दररोज पांचपंचवीस मैल चालणें म्हणजे अगदीं स्वाभाविक गोष्ट असली पाहिजे; कारण आजकाल सुद्धां बदरीनारायणाचे यात्रेंत कांहीं लोक दररोज पंचवीस ते तीस मैल चालतांना आढळतात. हा बंद पडलेला मार्ग पुनः शोधून काढणें साध्य आहे असें तेथील रचनेवरून समजतें. अर्थात् मार्ग ठरविण्याकरितां ज्याप्रमाणें (Polar Expeditions) ध्रुवावरील मोहिमी निघतात तशा धर्तीवर शोधकमंडळींस मदत देऊन पाठविलें पाहिजे, व ज्या बाजूनें नेहमीं पक्का बर्फ असतो अशी बाजू निश्चित केली पाहिजे. मंदाकिनी नदीचे बाजूनें थोडें वर गेलें म्हणजे एक सरोवर लागतें त्यास कैलास असें म्हणतात व यांच सरोवरापासून मंदाकिनीचा उगम आहे. हें कैलास–सरोवर श्रावणभाद्रपदांत बर्फरहित असल्यामुळें दिसूं शकतें. या सरोवरांत मोठमोठीं कमलपुष्पें तयार होतात व तीं केदारनाथास चढविलीं जातात. या सरोवरापासून बदरीनाथाकडे जाण्यास सोपें पडेल असें वाटतें. केदारपुरींत असतांना एवढा विचार करून बदरीशधामाकडे जाण्याकरितां मागें फिरलों व बदरीनाथाचें दर्शनपूजन वगैरे करून त्याचेच पुढें वसुधारा म्हणून एक उत्तरेकडे स्थान आहे त्या बाजूस जाण्याकरितां आम्ही निघालों. ह्या ठिकाणीं पाहिलेल्या कांहीं गोष्टी व त्यावरून सुचलेले विचार या ठिकाणीं थोडक्यांत नमूद करण्याचा विचार आहे.

बदरीनाथाचे मंदिरापासून निघून ब्रह्मकपाल उजवीकडे टाकून पायवाटेनें २ मैलपावेतों साधारण चढण चढत अलकनन्दानदीचे किनाऱ्या-

किनाऱ्यानें उत्तरेकडे गेलें म्हणजे ' माणा ' उंची १०५६० फूट नांवाचा एक लहानसा गांव लागतो; ह्या ठिकाणीं अधिक रानटी स्थितींतील पहाडी राहतात. आतिशय बर्फ पडूं लागलें म्हणजे हे लोक दक्षिणेकडे दूर जोशीमठापावेतों सुद्धां येऊन राहतात व वैशाखज्येष्ठामध्यें पुनः आपल्या गांवीं परत जातात. या लोकांचा लोंकर, मीठ, लोकरीचे कपडे वगैरेंचा व्यापार चालतो. या गांवापासून आणखी उत्तरेकडे एक लहानशी पगदंडी ( पायवाट ) डोंगरावर चढत गेलेली दिसते व तिचे बाजूनें धोधो शब्द करीत " सरस्वती " नदी अति वेगानें येऊन खालीं माणागांवाजवळ अलकनन्देस मिळते. या वाटेनें ३०।४० मैल अत्यंत बिकट अडचणींतून गेले म्हणजे " भोट " देश लागतो. व त्या देशाशीं " माणा " गांवचे लोकांचा अति संबंध असल्यामुळें त्यांना " भोटिये " ही संज्ञा आहे. हे लोक खालच्या पहाडी लोकांपेक्षां अधिक लाल, गुलजार, सशक्त व सणसणीत दिसतात; स्वभावानें साधारणतः ते फार गरीब असतात.

यांचे चेहऱ्याची ठेवण मांगोलियन ( चिनी जपानी ) वळणावर गेलेली आहे. माणसें लोकरीच्या विजारी, कंबरेला दोरीनें बांधलेला लांब झगा व टोपी वापरतात. बायका चोळणा वापरीत नाहींत इतकेंच. बाकी त्यांच्या व माणसांच्या पोशाखांत फारशी भिन्नता नसते. विजारीऐवजीं घागऱ्याप्रमाणें घोंगडें गुंडाळतात व डोकीला कापड बांधतातः भोट देशांत "फुलिंग" नांवाचें एक महादेवाचें पवित्र व कठिण स्थान आहे असें ते लोक सांगतात. त्याच मार्गास ' माणाघाट ' उंची १८६५० फूट; असें नांव आहे; या घाटानें भोटचे पुढें आणखी ४० मैल गेलें म्हणजे तिबेट देश लागतो. माणाघाटाचे उत्तरपूर्व बाजूस एक पायरस्ता आहे त्याचें नांव " नीति" घाट, रस्ता असा नाहींच, कसा तरी मार्ग काढावा लागतो. घाटानें चीनदेशांत जातां येतें असें सांगतात. परंतु हे मार्ग फार कठिण, बर्फमय व चढाईचे आहेत आणि बर्फामुळें तो मार्ग माहितीशिवाय आक्रमण करितां येत नसल्यानें केवळ तेच लोक चीन देशांपावेतों जातात. माणाघाटाचा कांहीं भाग प्रत्यक्ष पाहिल्यामुळें त्या मार्गानें पुढें जाऊन तिबेटपर्यंत पोहोंचावें अशी उत्कट इच्छा

झाली; परंतु बरोबर परिवार असल्यामुळें व इतक्या कठिण प्रदेशाचा हा पहिलाच प्रसंग असल्यानें हा विचार तूर्त रद्द करावा लागला; पण आठदहा दिवसांत तिबेटपर्यंत नेऊन पुनः परत बदरीनाथास आणवून पोहोंचवूं असें दोनतीन भोटिये लोकांनीं कबूल केलें. अर्थातच हा मार्ग पुष्कळ ठिकाणीं उभ्या चढणीचा व बऱ्याच ठिकाणीं बर्फमय आहे असें ते म्हणाले. कधींकधीं इंग्रज प्रवासीही या भागांत शोधकबुद्धीनें फिरावयास येतात व भोटिये लोकांची विनवणी करून कामत शिखराची उंची २५,४४३ फुटासारखीं अडचणीचीं ठिकाणें पहातात असें कळतें. आमच्या प्रवासांतही एक गौरकाय विष्णुप्रयाग व बदरीनाथ यांचे दरम्यान बदरीनाथाकडे जात असलेला आम्हांस दिसला, त्यास यात्रेंत सामील होण्याचें कारण विचारतां असें कळलें कीं, त्याची हिमालयाचें सौंदर्य पहाण्याची व तेथील निरनिराळ्या वाटा पहाण्याची फार इच्छा होती; व या हेतूनें तो दुसऱ्यांदा चालला होता. असो.

माणागांवचे बाजूस उत्तरपश्चिम चालूं लागलें म्हणजे 'एक ' मातामूर्ती ' चें लहानसें पण जुनाट देऊळ लागतें; नंतर सरस्वतीनदीचें उल्लंघन करून पलीकडे जावें लागतें. नदी ओलांडण्याकरितां एक फारच मोठा दगड दोन्ही बाजूंच्या कड्यांवर पुलासारखा आडवा पडलेला आहे असें सांगतात; व यावरून त्याचें नांव भीमगोंडा असें पडलें असावें. ह्या ठिकाणीं सरस्वती नदी अतिशय आवाज करीत खडकावरून पडून दुसऱ्या खडकावर इतक्या जोरानें आदळते कीं त्या सर्व खालच्या भागांत पाण्याचे बारीकबारीक तुषार होऊन केवळ धूममय स्वरूप दिसत असतें. यापुढें हळुंहळूं चढत्या रस्त्यानें ( रस्ता विशेष कठीण नाहीं ) जात असतांना नानाप्रकारच्या वनस्पतींचे गंध घ्राणेंद्रियांत शिरून डोक्याचें भ्रमण होऊं लागतें. वाराही एकसारखा चाललेला असतो; म्हणून अशावेळीं डोकें बांधून चालावें व मधूनमधून खाण्याकरितांही पदार्थ बरोबर घ्यावेत म्हणजे पित्ताची उचल होणार नाहीं. अशारीतीनें बदरीनाथापासून सुमारें २॥ मैल चालून आल्यानंतर आम्हांस उजव्या बाजूच्या पहाडावरून एक दुधासारखा पांढरा जलौघ दिसूं लागला. हीच वसुधारा. अफाट प्रदेशांत तो भाग जरी दिसला

तरी आम्हांस निरनिराळ्या अडचणींतून व कांहीं ठिकाणीं बर्फांतून तीन साडेतीन मैल चालावें लागलें. तेव्हां आम्ही त्या धारेच्या जवळ येऊन पोहोंचलों. धारेचा देखावा फारच अप्रतिम होता यांत संशय नाहीं. ज्याठिकाणीं आम्ही उभे होतो त्यापासून सुमारें ४०० फूट उंचीवरून धार खालीं येत आहे; अतिशय उंची व वाऱ्याचा सपाटा या दोन्ही कारणांनीं अर्ध्या वाटेंतच पाण्याचे अतिसूक्ष्म तुषार होऊन ते चोहांकडे धुक्याप्रमाणें पसरतात. असा एक समज आहे कीं हे तुषार फक्त पुण्यवान् प्राण्यांच्याच अंगावर येतात, पाप्यांच्या अंगावर कधींही येत नाहींत. परंतु हा प्रकार केवळ वाऱ्याचे झोंकाचा आहे; तो झोंक पाहून तसें उभें राहिलें म्हणजे हिमजलाचे शीत तुषार आंगावर येऊन अति हर्ष होतो. थोडे वर उभें चढल्यावर एका कड्याचे आंतल्या बाजूस एक लहानशी कुटि बांधलेली आहे. तींत दोन वृद्ध साधु रहात असतात. ह्या साधूंनीं वसुधारेच्या आसपास बराच प्रवास केलेला आहे व त्यांच्या प्रत्यक्ष पाहिलेल्या गोष्टी फारच मनोरंजक असतात. हे साधु बर्फ पडूं लागलें म्हणजे जोशी–मठाकडे निघून जातात व पुनः अक्षय्यतृतीयेच्या सुमारास या कुटींतील बर्फ खोदून तींत रहातात. वसुधारेचें स्थान समुद्रसपाटीपेक्षां १५००० फूट उंच आहे. याठिकाणीं अष्टवसूंनीं फार कालपावेतों तपश्चर्या केली असें म्हणतात. येथें उभें राहून सभोंवार नजर फेंकली म्हणजे मन थक्क होऊन जातें. पश्चिमेकडचे बाजूकडे पाहिलें म्हणजे केदारनाथाचे आसपास शाळुंकाकार जी पर्वताची भिंत दिसत होती तिचाच पाठीकडील भाग जसाचा तसाच पुनः दिसूं लागल्यामुळें मोठा हर्ष होतो. ज्याठिकाणाहून वसुधारा पडते त्याठिकाणाचेवर आणखी बर्फमय शृंगें दिसत असतात. (सर्वांत उंच शिखर कामेत २५४४३ फूट) दिसत असतात व आसपास हिमनद्यांचा देखावा फारच अप्रतिम तऱ्हेनें दृष्टीस पडतो. अलकनंदेचें उगमस्थान येथेंच जवळपास आहे. चोहोंकडे ढांसळून खालीं येणाऱ्या बर्फांचे आवाज इतक्या जोरानें व एकामागून एक चाललेले असतात कीं एका मोठ्या सैन्याला "फायर" चा हुकूम दिल्यामुळें बंदुकांचा कडकडाटच होत आहे कीं काय असा भास होतो. मधूनमधून वसुधारेच्या मुखांत बर्फ जमून राहिल्यामुळें प्रवाह बंद

होतो व बर्फांचा फार जोर होतांच पाण्याच्या ऐवजीं बर्फांचे गोळेच्या गोळे मोठ्या वेगानें पांचपांच दहादहा मिनिटेंपावेतों खालीं वर्षाव करूं लागतात. अशा वेळीं धारेच्या खालीं कोणी सांपडल्यास अगदीं चिरडून मरावयाचा. म्हणून धारेच्या अगदीं खालीं जाऊन तुषार अंगावर घेण्याच्या भरीस कोणीं पडूं नये. दूर उभें राहून वाऱ्याचे झोंकानें पाणी उडून अंगावर येण्याची वाट पहावी.

वसुधारेच्या पुढें सुमारें एक मैलावर डोंगराच्या रांगा साधारण दूरदूर गेल्यामुळें बराच मैदानमुलख तयार झाल्यासारखा दिसतो व तेथें एक नैसर्गिक चौपाटी तयार झालेली आहे. पहिली खिंड बदरीनाथाकडून वसुधारेकडे आली आहे व दुसरी या मैदानमुलखापासून उत्तर-पश्चिम-दिशेकडे बर्फमय प्रदेशांत गेलेली दिसते. या बाजूला सहासात मैल गेलें म्हणजे सतोपंथ नांवाचें एक स्थान आहे. सत्यपथ हें वास्तविक पहातां सवातीन मैल परीघाचें अर्धवट गोठलेलें सरोवर आहे. याच्या तीन टोंकांना ब्रह्मा, विष्णु व महेश्वरघाट अशीं नावें आहेत. येथें जातां येतें. पण गुहांशिवाय निवासायोग्य स्थान मुळींच नाहीं व सैंपाकाची सोय कांहींच नाहीं. शिदोरी चार दिवस पुरण्याइतकी बरोबर घ्यावी लागते. येथें एक उत्तम कुंड असून याठिकाणीं पांडवांनीं कांहीं कालपावेतों निवास केला होता असें म्हणतात. ह्याच मार्गानें आणखी पुढें सहा मैल गेलें म्हणजे "गोमुख" लागतें. या ठिकाणापासून गंगेची उत्पत्ति आहे. ह्या गोमुखापासून १८ मैलांवर गंगोत्री आहे. यात्रेकरू बहुतकरून डेहराडून–मसूरीमार्गानें गंगोत्रीपा-पावेतों जातात व क्वचित् गोमुखापावेतोंही जातात; परंतु श्रावण-भाद्रपदांत बर्फ बरेंच वितळून गेलें असल्यामुळें प्रथम दाखविलेल्या गमतीच्या मार्गा-नेंही जाणें शक्य आहे. तिसरी खिंड समोरच म्हणजे उत्तरेकडे गेली आहे व तिच्यांत पुढेंपुढें फारच बर्फ असतें व तिला लागून असलेल्या डोंगरांचीं शिखरें बर्फमय असून त्यावर नेहमीं ढगांचें आवरण अस-ल्यामुळें आकाश कधींच दिसूं शकत नाहीं. या स्थानास "स्वर्गारोहिणी" म्हणतात व याच ठिकाणीं पांडव स्वर्गवासी झाले असें सांगतात. चौथी खिंड साधारण पूर्वेकडे झुकलेली आहे व तिचे मार्गानें पुढें काय आहे

याची अद्याप माहिती मिळालेली नाहीं. चोहों खिंडींच्या मिलाफाची जागा ( म्हणजे वर सांगितलेला मैदानमुलुख ) फारच रम्य असल्यामुळें त्या ठिकाणीं बदरीनाथाचें स्थान करण्याचा श्रीशंकराचार्यांचा प्रथम उद्देश होता; परंतु सर्वसाधारण लोकांस त्या जागीं येण्यास फारच त्रास पडेल असें वाटल्यावरून सध्याची जागा पसंत झाली अशी आख्यायिका त्या भागांतील साधुमंडळी सांगतात.

अशाप्रकारें वसुधारेचें स्थानावर दोन दिवस मुक्काम करून तेथील प्रदेशाची महती गातगात आम्ही परत बदरीनाथपुरींत दाखल झालों. खरोखरच अशा ठिकाणाहून परत आल्यानंतर दरवर्षी पुनःपुनः जावें असेंच वाटूं लागतें. कोणत्याहि दृष्टीनें कां होईना, कांहीं तरुण विद्वान् मंडळींनीं या प्रदेशांत अवश्य पर्यटन करावें. अशा कार्यास राजाश्रय असल्यास फारच उत्तम; पण तसें नसल्यास जर कोणी धनिक एकादें मंडल स्थापितील तर कित्येकप्रकारचे शोध लागण्यासारखे आहेत. कित्येक डोंगर अतिशय उत्तम अभ्रकानें भरल्याचीं स्पष्ट चिन्हें दाखवितात; कित्येक डोंगरांतून तांबें व लोखंड यांची समृद्धि आहे. कित्येक ठिकाणीं स्लेटीचे दगड अतोनात आहेत आणि वनस्पतींचें तर इतकें प्राधान्य आहे कीं,वैद्यमंडळींनीं नवीन पद्धतीनें शोध लाविल्यास मौल्यवान् औषधि सांपडून औषधांचे संबंधीं पराधीनता पार नाहींशी होईल, इतकेंच नव्हे तर परदेशांत देखील औषध पाठविण्याचें सामर्थ्य कालांतरानें आल्याशिवाय राहाणार नाहीं. परंतु इतक्या सर्व गोष्टी साध्य होण्यास राजबल, लोकबल व द्रव्यबल हीं आवश्यक आहेत.अशा प्रकारचें प्रयत्न अवश्य झाले पाहिजेत व तत्प्रीत्यर्थ निदान शोधक मंडळींनीं त्या प्रदेशांत फिरावयास जाण्याचें कार्य आरंभावें.

---

आतांपर्यंत जें एक उद्दिष्ट मनासमोर निरंतर ठेवून इतक्या लांबच्या अतिकष्टाचा रानावनांतून, दऱ्याखोऱ्यांतून भयंकर पहाडांतून आणि नदीनाले ओलांडीत पुष्कळसें द्रव्य खर्चून प्रवास केला त्याचें सार्थक झालें. जन्मजन्मांतरींच्या वाडवडिलांच्या पुण्याईनें व साधुसंतांच्या आशीर्वादानें आयुष्यांतील एक महत्कार्य निर्विघ्नपणानें आणि आनंदानें पार पडलें. आतां एक पंधरवड्यांत अभिष्ट स्वजनांत जाऊन पडूं म्हणून

प्रमुदित अंतःकरणानें यात्रेकरू परत फिरतात. यात्रेंतील हालांनीं कृश आणि म्लान झालेल्या चेहऱ्यावरही एकप्रकारचें समाधानाचें आणि संतोषाचें तेज झळकूं लागतें. आतां सबंध मार्ग उतरणीचा आणि घराची ओढ यामुळें मार्ग भराभर उरकून यात्रेकरू सपाट्यानें निघतात. चढतांना जेथें १। तास १॥ तास लागतो तेथें उतरतांना १ मैलास फक्त वीस मिनिटें, $\frac{1}{2}$ तास पुरें होतो. विष्णुप्रयागावरून पुन्हां जोशीमठास जाण्याची गरज नाहीं. जो मार्ग पूर्वी जोशीमठाजवळून खालच्या बाजूला जातांना दिसत होता त्याच मार्गानें रिव्हर्सिंग स्टेशनावरील आगगाडीप्रमाणें उलटसुलट गतीनें पहाड चढावा लागतो. हा पहाड चढतांना जोशीमठाची खरी उंची लक्षांत येते. २–२॥ मैलपर्यंत ही चढण सारखी उभी असून ती चढायला ३–३॥ तास लागतात. या चढणीमुळेंच परततांना कोणी जोशीमठास जात नसावेत. पुढें अशी बिकट चढण कोठेंच लागत नाहीं. चमोली–लालसांगापर्यंत पूर्वीच्याच मार्गानें परत यावें लागतें. तेथून पूर्वी एकदां बाजूस टाकलेल्या अलकनंदेवरील मोठ्या झुल्यावरून ( Hanging bridge ) पलीकडे गेल्यावर रामनगरचा रस्ता लागतो.

याच भागांत श्रीसीताराम महाराज म्हणून प्रसिद्ध सिद्ध पुरुष बदरीकेदारला फेऱ्या घालीत राहतात. अंगावर लंगोटीशिवाय दुसरें वस्त्र नाहीं., व तीही फक्त यात्रेपुरतीच–हातीं कमंडलू नाहीं, अंगाला राख आहे तर आहे नाहीं तर नाहीं, शय्येसी भूमी हे उत्तम पाषाण । वरी प्रावरण आकाशाचें ॥ निरंतर हंसतमुख, एकटे, रमतेराम, मुखांतून सदोदित नामोच्चारणाचा गजर सारखा चालू अशी यांची वृत्ति. वरवर पाहाणाराला वाटतें कीं कोणी वेडसर गांजाच्या लहरींत असेल बडबडत; पण जरा लक्ष लावून ऐकतांच सारखा वेदांताचा-ब्रह्मज्ञानाचा सपाटा चालू असतो. कोठेंही विसंगतपणा नाहीं. पैसा दिला तरी घ्यायचा नाहीं. सोनें आणि माती। आम्हा सारिखेंची चित्तीं ॥ कोणी दिलें प्रेमानें तर खाल्लें नाहींतर तर राहिले सीताराम म्हणत. उपदेश करावयाचा तो गृहस्थाला गृहस्थासारखा व संन्याशाला संन्याशासारखा. कोणी साधूंनीं अनुग्रहाची याचना केली तर सांगायचें कीं, " कोणीं पैसा किंवा भिक्षा खुषीनें दिली तर घ्या, नाहीं तर

रागावूं नका. क्रोध आला कीं केलें तप वृथा जाऊन वेप्रविटंबना होते. संसारी लोकांना अनेक चिंता असल्यामुळें त्यांचे हजार अपराध देवाच्या द्वारीं माफ आहेत. संन्याशी साधु म्हणविणाऱ्याला क्षमा नाहीं. शत्रुमित्रभाव ठेवूं नका. दुःख आणि सुख समसमान समजा. संसार आणि संन्यास दोहोंची योग्यता सारखीच आहे. पण ज्यांच्यायोगानें संन्याशांच्या पोटापाण्याची व्यवस्था होऊन आपली तपश्चर्या यथास्थित चालवायला मदत होते ते संसारी धन्य होत. सर्वांनीं सीतारामाचें भजन करावें. सन्मार्ग दाखविणारा तोच आहे. सर्व धर्म यांत आला आहे. " धन्य आहेत हे साधुसंत ! बदरीनारायणाला त्यांना कोणी वस्त्र दिलें होतें, पण दुसऱ्याच दिवशीं त्यांच्या अंगावर तें कोठें दिसलें नाहीं. शीतोष्णाची, वस्त्र-प्रावणांची त्यांना काय पर्वा ! ! स्थितप्रज्ञ ते हेच ! ! परमेश्वराचे अवतार ते हेच ! ! आमचें सर्वस्व गेलें तरी हरकत नाहीं पण हीं रत्नें जोंवर भरतभूमींत कायम आहेत तोंपर्यंत तिचा सौभाग्यरवि मध्यान्हींच आहे असें समजावयास हरकत नाहीं ! ! बदरीनारायणपासून कुंभारचट्टी-पर्यंत २६ मैलांचा पल्ला त्यांनीं एका खेपेस गांठला ! !

**नंदप्रयाग**—चमोलीला आल्यावर उरवीमठ गोपेश्वराचा सरळ पुढें गेलेला रस्ता सोडून अलकनंदेवरील झुल्यावरून १२० फूट लांबी पलीकडे जावें लागतें. येथें टपालघर, तारघर, दवाखाना व धर्मशाळा व दोनतीन दुकानें व मिशन आहेत. १८९४ च्या गोहना महापुरांत जुनी वस्ती वाहून गेल्यामुळें नदीपासून लांब नवीन गांव वसलें आहे. पाण्याच्या तापामुळें येथें कोणी थांबत नाहींत. २ मैलांवर असलेल्या **कुरडाचट्टीला** निघून जातात. यापुढें १॥२ मैलांवर एक चट्टी अगदीं पाण्यालगत असून पुढें २ मैलांवर **मठिआणा** व ३ मैलांवर अलकनंदा व मन्दाकिनीच्या संगमावर **नंदप्रयाग** वसलेलें आहे. कण्वमुनींचा आश्रम येथेंच असे. येथून हिमाचलांतील हिम जरी स्पष्ट दिसतें तरी थंडी बरीच कमी झालेली आहे. येथील पहाडांवरही कधींकधीं हिंवाळ्यांत हिम असतें. आतां उष्ण प्रदेशाला सुरवात झालेली असून आम्रवृक्ष जिकडेतिकडे दृग्गोचर होतात, यावेळीं उन्हाळ्यांत आंबे कोंवळे होते. ते श्रावणांत पिकतात. अद्याप कोय धरली नव्हती. येथें केळीचे बगीचेही

आहेत. वस्ती सुंदर आणि मोठी आहे. येथें भांडीं, जोडे व वाणसौदा मिळतो. तिबेटाहून भूत्या व्यापाऱ्यांनीं आणलेला Borax टांकणखार रामनगरास येथूनच जात असल्यामुळें व्यापार बरा चालतो. **हिंमालयांत आतांपर्यंत मुसलमानांची वस्ती मुळींच लागली नाहीं.** नंदप्रयाग येथें एकच मुसलमान राहतो. नन्दप्रयागापासून **सोनला** ३ मैल व जंगलचट्टी १॥ मैल आहे. येथून चढण व थोडें जंगल सुरू होतें. येथून **लंगास** उर्फ **नर्सिंगचट्टी** ३ मैल आहे; पण **पहाडावरून मोठ्या रस्त्यानें न जातां नदीच्या कांठाकांठानें पायरस्त्यानें गेल्यास २ मैलांचा चक्कर वाचतो.** पुढें १॥ मैल जयकंडी व तेथून ४ मैल **कर्णप्रयाग** आहे.

**कर्णप्रयाग**—उंची २३०० फूट. कर्णप्रयाग हें नंदप्रयागाप्रमाणें मोठें ठिकाण आहे; येथें कर्णगंगा ( पिंडर ) आणि अलकनंदेचा संगम आहे. पिंडरवरील २२१ फुटी झुल्यावरून मार्ग आहे. कर्णगंगेचें पाणी अगदीं पिवळट असून अलकनंदेचें पाणी नारायणाच्या सांनिध्यांत जें अगदीं शुभ्र होतें तें हळुहळू गढूळ वर्ण होत आलें आहे. अलकनंदा येथून सुटते. तिच्या कांठाकांठानें रुद्रप्रयागाला रस्ता गेला आहे. हल्लीं केदार न करतां बदरीला जाणारे कट्टर वैष्णव यात्रेकरू रुद्रप्रयागावरून याच मार्गानें येतात व येथून पुढें चमोलीस जातात. पूर्वी रुद्रप्रयागावरून केदारला रस्ता नसल्यामुळें अद्वैती यात्रेकरू ह्याच मार्गानें चमोलीवरून केदारास जात व केदारवरून पुन्हा चमोलीपर्यंत येऊन बदरीस जात. येथून रुद्रप्रयाग फक्त २० मैल आहे. या मार्गानें नारायणाचें दर्शन होऊन एक महिन्यांत यात्रा उरकते व केदार केल्यास कमींत-कमी १॥ महिना लागतो. पण या मार्गानें पहाडांतून खालीं पडणाऱ्या एखाददुसऱ्या झऱ्याशिवाय चांगलीशी वनशोभा पाहावयास मिळत नाहीं. येथें गंगाजल विकण्याचीं दुकानें बरींच आहेत. हीं गंगा थेट गंगोत्रीहून आणलेली आहे असें सांगतात. पण खरें काय तें एक परमेश्वर जाणें. गंगाजल सांठविण्याकरितां नुकताच एक मोठा गोदाम बांधण्यांत आला आहे. येथेंही तार, डाक, घरें, धर्मशाळा व दवाखाना आहे. गांव मोठें आहे. सॉवरिनचे रुपये मिळतात. कालीकमलीवालेबावांच्या सुंदर धर्मशाळेंत उतरण्याची उत्तम सोय आहे.

ही धर्मशाळा सकृद्दर्शनीं दुमजली दिसते; पण वास्तविक पहातां हिच्या चार पठारांवर चार इमारती गॅलरीप्रमाणें आहेत. त्यामुळें ती चार मजली इमारत असल्याप्रमाणें भास होतो. पण प्रत्येक मजल्याला जमीन व झाडेंझुडें आहेतच. पहिल्या मजल्यावर दुकानें, दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावर यात्रेकरू राहातात व चवथ्या मजल्यावर अश्वशाळा आहे. हें महत्त्वाचें क्षेत्र असल्यामुळें गर्दी बरीच असते. सोंवळेंओवळें व खाण्याचा आडपडदा बाजूस सारावा लागतो, आतांपर्यंत **देवप्रयाग, रुद्रप्रयाग, सोनप्रयाग विष्णुप्रयाग,** व **कर्णप्रयाग** अशीं पांच प्रयागें आटपलीं. **कर्णप्रयाग** हें शेवटलेंच महत्वाचें क्षेत्र आहे. येथेंच कर्णानें तप करून सूर्याकडून कवचकुंडलें मिळविलीं. या टापूपलीकडे बहुतेक हिमदर्शन होत नाहीं म्हटलें असतां चालेल. हिमाचलाला सोडून चाललों म्हणून वाईट वाटूं लागतें. यापुढें उष्णप्रदेशाला सुरवात होते; हिमजलावर मन धावूनही तें प्यावयास मिळत नाहीं; दहापासून पांच वाजेपर्यंत आंत मार्गक्रमण करवत नाहीं. उन्ह झोंबतें व थकवा जास्त भासूं लागतो.

**कर्णप्रयाग**वरून सेमली ४ मैल, पुढें सिरोली २ मैल व नंतर भटोली १॥ मैल आहे; भटोली येथें पाणी चांगलें विपुल आहे; करितां येथेंच मुक्काम करणें बरें. कारण पुढें आदिबद्री ४॥ मैल असून मार्ग बऱ्याच चढणीचा आहे, शिवाय आदिबद्रीला पाणी घाण असून लांब आहे व खावयास कांहीं धड पदार्थ मिळत नाहींत. मार्गांत सरासरी २।३ मैल पाइन (देवदार) वृक्षांच्या डहाळ्यांनीं रस्त्यावरून हिरवेगार छत, व पायाखालीं आपल्या शुष्क पल्लवांचा मऊमऊ बिछाना पसरून ठेवल्यामुळें बरेंच यात्रेकरू त्यांच्या सुगंधाचा आस्वाद घेऊन निसर्गमातेच्या अंकावर झोंपी गेलेले जागोजाग आढळतात. आदिबद्रीहून पाव मैलावर सरासरी १०० फुटावरून खालीं पडणारा मोठा सुंदर झरा आहे. त्याच्याकडे एकसारखी दृष्टि लावीत पलीकडील ओढ्याच्या कांठावरील वृक्षांच्या घनदाट छायेंत एकाद्या खडकावर डोकें टेंकून सारखें विश्रांति घेत लोळावेंसें वाटून दुसऱ्या कशाचें भान राहत नाहीं. ह्यापुढें मैलामैलावर दोन लहानशा चट्ट्या आहेत. पण त्यांत उतरण्याची चांगली सोय नाहीं. येथून हळुहळू चढण सुरू होऊन मंगळाचट्टीच्या

जंगलाप्रमाणें किर्र जंगल सुरू होतें. दुतर्फा वृक्षांच्या खांद्या एकमेकांत गुंतून त्यांची गुंफा बनल्यामुळें आकाश मैलांचे मैल दिसत नाहीं. आजूबाजूंच्या खोल दऱ्या आणि उंच पहाड यांवर सारखें हिरवें आवरण घातलेलें असल्यामुळें तीं दृश्यमान होत नाहींत. भरदुपारीं पहांटेचा किंवा सायंकाळचा भास होतो. घड्याळाशिवाय वेळ समजणें दुरापास्त. ही शोभा सहासात मैल सारखी लागलेली आहे. ही दिवाळीरेंज ( उंची ७९६३ फूट ) जवळजवळ शिखरालगत मार्ग आहे. ७२०० फुटांवर ही रांग ओलांडतांना एके बाजूस कुंडल ( ८५५३ फूट ) शुलीदंडा ( ८९३६ ) बिंतल ( ८३०० ) व दुसरे बाजूस दिवाळी ७९६३ व बर्ली (५४७९) हीं शिखरें एकदम दृग्गोचर होतात. आदिबद्रीपासून ५॥ मैलांवर ऐन जंगलांत जौंकापानीचट्टी लागते. येथून चढण २॥ मैलांची जरा खडी आहे. चढणीच्या शेवटीं **मोठी दिवाळी, छोटी दिवाळी, कालामाटी अरकू व घोनारघाट** या थोडथोड्या अंतरावरील चट्ट्या आहेत. तेथून एकदम थेट ५।६ मैलांची खडी उतरण सुरू होते. अशी वनशोभा आतां पुढील मार्गांत क्वचितच पहावयास मिळेल. कारण घोनारघाटाहून मैलचौरी फक्त ६ मैल असून गढवाल जिल्ह्यांत हिमाचलाचा शांत प्रदेश तेथून संपतो. करितां उतरूं लागण्यापूर्वी उंच पहाडावरील उंच टोंकावर उभें राहून चौफेर दृष्टि फेंकून डोळ्याचें पारणें फेडून घ्यावेसें वाटतें व अखेर नाइलाजास्तव ह्या रम्य प्रदेशाला शेवटचा नमस्कार करून खिन्न अंतःकरणानें मार्गक्रमण होतें. घोनारघाटापासून मैलचौरीपर्यंत रस्ता अगदीं सपाट प्रदेशांतूनच गेला आहे. मधूनमधून चट्ट्या मिळतातच. महेलचौरी मोठें गांव नाहीं. येथें गिनीचे रुपये मिळत नाहींत. दुकानदार एका गिनीला -॥- वट्टा मागतात. करितां नारायणापासून कर्णप्रयागपर्यंत रुपये करून ठेवणें अवश्य. कुली गिन्या घेत नाहींत. हरिद्वार हृषीकेश येथून आणलेले कुली, झंपानी, कंडीवाले आपले पैसे व इनाम घेऊन परत जातात. याच्या पलीकडे उष्ण प्रांतांत जाऊं तर मरूं अशी त्यांची समजूत आहे. तेथून रामनगरपर्यंत नवीन कुली करावे लागतात. येथील लोक पहाड्याप्रमाणें मजबूत नसल्यामुळें यांच्यानें कंडींत मोठ्या माणसास नेणें होत नाहीं

असें दिसतें. रामनगरपर्यंत बोजाकंडीला दरमणीं १४ रु. व झंपानाला १५ ते २० रु. सरासरी माणसाच्या वजनाप्रमाणें पडतात. घोड्याचा दर १॥ ते २. मैलचौरीला कंडीझंपानाची नवीन चिठ्ठी होते. परंतु पूर्वीप्रमाणें दर ठरीव नाहींत व सामानाचें किंवा सवारीचें वजनही करीत नाहींत. येथून रामनगर कमींतकमी ६० मैल येईल. मार्ग आलमोरा नैनीताल जिल्ह्याच्या सरहद्दीवरून गेलेला आहे.

येथून १ मैल खडी चढण आणि ३॥ मैल सारखा उतार आहे. याप्रमाणें मार्गांत चट्ट्या लागतात. नारायणचट्टीपासून ३॥ मैल गणाई असून

| | | |
|---|---|---|
| पंडु अरवाल | १ मैल, | |
| शिमली | १॥ ,, | |
| नारायणचट्टी | २ ,, | |

मार्ग मैदानांतून गेला आहे. गणाई येथें पोष्ट ऑफिस, दुकानें वगैरे आहेत. एका दुकानांत सुंदर, तऱ्हेतऱ्हेच्या काठ्या ठेवल्या असून कांठींचे मुठीवर चिकटविलेली किंमत कांठीच्या फळीवर ठेवून कांठी उचलून न्यावी अशा सूचनाचे तक्ते लाविले असून दुकानांत कोणी दिसत नव्हतें. आमच्या इकडे सत्ययुग सुरू झाल्याशिवाय अशी योजना करणें म्हणजे अवदसेचा फेराच बोलावणें होय. येथें रामगंगानदी जरा लांबून गेली आहे. नदीच्या पलीकडील वस्तीस चौखुटिया म्हणतात. लोखंडी हँगिंगब्रिजवरून जावें लागतें. पलीकडल्या वस्तींतच ( चौखुटियांत ) रहाणें सोईस्कर आहे. गणाईंत पाणी नाहीं. हें चांगलें मोठ्या वस्तीचें ठिकाण आहे. येथून पुलापलीकडून एक रस्ता राणीखेत नैनीतालवरून काठगोदाम रेलवेस्टेशनला गेला आहे व दुसरा रामनगरला गेला आहे. रामनगरपर्यंत मोटारी मिळत नाहींत. गणाईपासून नदीवरील पूल ओलांडून एक मार्ग राणीखेतवरून काथगोदाम रेलवेस्टेशनाला गेला आहे. येथून राणीखेत ३१ मैल असून तेथून मोटारनें काथगोदामपर्यंत ६० मैलांचा मोटार मार्ग अत्यंत सुखावह असून दोन दिवस वांचतात. या मार्गाच्या आरंभालाच Pilgrims are not advised to travel by this road अशा पाटीचें बुजगावणें लावलें असून त्याचा अर्थ हा लष्करी रस्ता असून यात्रेकरूंनीं त्या मार्गानें जाण्याची मनाई आहे असा करण्यांत येतो. उद्देश काय कीं कॉलरा वगैरे सांथीच्या रोगांचा प्रवेश यात्रेकरूंच्या द्वारें सैन्यांत होऊं नये ! परंतु सुशिक्षित यात्रेकरूला

खरा अर्थ कळत असल्यामुळें ते कोणाच्या दमपट्टीला भीक घालीत नसतात. राणीखेत हें भिकीयासेणपासून ३१ मैल असून फार सुंदर ठिकाण आहे. चीर, पाइन, ओक वगैरे वृक्ष मुद्दाम लावलेले आहेत. येथून कुलींना इनाम व ठरल्याप्रमाणें बरेलीदांडी वगैरे देऊन वापस लावावें. ह्या करारानें मेहलचौरीपासून ४ कूलींचा चार्ज ८ रु. पडतो. येथून काथगोदाम ६० मैल. सरासरी २ रु. स्वारीप्रमाणें मोटारी मिळतात. रामनगर रेलवेस्टेशन १९०७ सालीं उघडलें. त्यापूर्वी यात्रेकरूंचा मार्ग हाच असे. येथें काथाचा मोठा व्यापार चालतो म्हणून नांव काथगोदाम पडलें. वाटल्यास येथून नैनीताल बघून यावें. हें जिल्ह्याचें मुख्य ठिकाण व सुंदर शहर येथून फक्त २० मैल मोटरनीय आहे. राणीखेतचा रस्ता दर्शविणाऱ्या फळ्या लावल्या आहेत. चुकभूल होण्याची भीति नाहीं. बराच लांबवर मार्ग विशेष चढउताराचा नाहीं. सपाटीवरील शेतें प्रथम येथेंच दृग्गोचर होऊं लागतात. येथून जरा कपडालत्ता व रहाणींत सुधारलेला मुलुख दिसूं लागतो. पण अर्वाचीन सुधारणेचे ढंग, लांड्यालबाड्या, वेश्या, पत्त्यांचे डाव, चौर्य वगैरेंनाही सुरवात होते. पोलीस शिपायांची टेहळणी सुरू असते. मुलुख आबाद आहे. पण वहाते झरे अगर गिरिशिखरावरून पतन पावून मनाला आल्हाद देणाऱ्या जलधारा दिसेनाशा होतात. उष्णतेचें मान वाढूं लागतें. पाण्याकरितां पुढें कांहीं चट्ट्यांवर जलगृहें बांधल्यामुळें थंड पाण्याची उत्तम सोय झाली आहे. सुमारें सहा हात औरसचौरस मकान दगडांनीं बांधलेलें असून त्याला आंत जाण्याकरितां एक लहानसें दार ठेवलेलें असतें व त्यांत लहानसें औरसचौरस कुंड तयार करून तें चोहोंबाजूंनीं बांधून काढलेलें असतें. खडकांतून अगर वाळूंतून पाणी झिरपून आलेलें असतें. झरा वगैरे नसतो. हिमजलाच्या अभावीं हें थंडगार स्वच्छ पाणी पिऊन अंतःकरण जलगृहांची कल्पना काढणाऱ्याला आशीर्वाद देतें. ह्या जलागारांना दारें लावून जर आंतून बाहेर तोट्या सोडल्या तर हें निसर्गस्वच्छ जल दूषित होण्याची भीति रहाणार नाहीं.

गणाईपासून चट्ट्यांचीं नांवें व अंतरें खालीं लिहिल्याप्रमाणें आहेतः—

| | | |
|---|---|---|
| भटकोट | १॥ मैल. | |
| चंदनचट्टी | १ ,, | येथेंच वर वर्णन केलेलें पहिलें जलगृह आहेः— |
| भगोती | ·॥· ,, | येथें जलगृह आहे. शिवाय आम्रवृक्षांची गर्द छाया झाली असल्यामुळें हें स्थान मोठें रम्य दिसतें. |
| माशी | ३ | येथपर्यंत मार्ग अगदीं सपाट मैदानांतून अगर शेतांतून होता. आतां पुन्हा जरा डोंगर लागून रामगंगेच्या कांठाकांठानें जावें लागतें. मात्र उत्त-रोत्तर लहान लहान डोंगरांच्या रांगा दिसतात. मैल दीड मैल अंतरावरील लहान चट्ट्या सोडून दिल्या असतां येथून— |
| बुढाकेदार | ४ ,, | आहे. महादेवाचें देऊळ रस्ता सोडून नदीच्या पलीकडच्या कांठावर आहे. पुढें— |
| शाणणा | ½ ,, | येथें जलगृह आहे. पुढें— |
| वसेरी | १ ,, | आम्रवृक्षांच्या दाट छायेंत आहे पण पाणी नाहीं. यापुढें— |
| नौलाचट्टी | १ ,, | असून उतरण्यालायक आहे. येथें इकडे प्रथमच दहीं फार उत्तम मिळतें. यापूर्वी निदान आदिबद्रीपर्यंत दहीं कोठेंही मिळत नाहीं. येथें मोठें जलागार जवळच असून वाटल्यास फार दिव-सांत नदींतील थंड पाण्यांत स्नान करण्याची इच्छा तृप्त करतां येतें. पुढें १ मैलांवर लहानशी चट्टी आहे पण सोईस्कर नाहीं. यानंतर— |
| बाइकोट | २ ,, | हीं मोठीं गावें आहेत. येथें मासे पकडणाऱ्या लोकांचें थवेच्याथवे दृष्टीस पडतात. जणूं काय |
| भिकीयासेन | १ ,, | |

मोठा बाजार भरलेला आहे. प्रत्येकाच्या ढुंगणाला लंगोटी. एका हातीं माशांची टोपली व दुसऱ्या हातीं जाळें, परंतु गळ्यांत जानवें घातलेलें पाहून मोठी मौज वाटतें. महाराष्ट्रांत यांना धीवर म्हणून कोणी शिवणार देखील नाहीं. पण इकडील ब्राह्मण यांना क्षत्रिय म्हणून त्यांचा व्रतबंध करितात आणि त्यांच्या हातचें अन्न ( रोटी ) खुशाल झोडतात. मागें सांगित-

त्याप्रमाणें इकडे ब्राह्मण आणि क्षत्रिय ह्या दोनच मुख्य जाती असून रोटीपाणी आणि स्पर्शास्पर्शाचें बंड नाहीं. प्राचीन हिंदुसमाजाचें साधें स्वरूप येथें अद्यापिही स्पष्टपणें दृष्टोत्पत्तीस येतें. असो. भिकियासेनपासून रामगंगा ओलांडून पहाड चढावा लागतो. आतां येथून नदी सुटली ती रामनगरच्या जवळजवळच मिळते. हा प्रदेश बराच सुपीक असून लोक सुखी दिसतात. हवामानही आरोग्यदायक आहे. ग्यालरीवजा (पायऱ्या-सारख्या) शेतांनीं दऱ्या हिरव्यागार दिसत असून मोठा आनंद वाटतो. संध्याकाळच्या वेळीं आरोग्य आणि तारुण्यानें मंडित झालेल्या निसर्गरमणीय गिरिकन्या पहाडाच्या निरनिराळ्या भागांत आम्रवृक्षांच्या आडून शेतकाम करतांना आपल्या मधुर आणि मोकळ्या आवाजांत पहाडी गाणीं म्हणून पथिकजनांच्या श्रांत चित्तांचें रंजन करितात. चौघी पांचजणी आळीपाळीनें एकाच गाण्याची कडवीं म्हणतात. तेव्हां निरनिराळ्या बाजूंनीं भिन्नप्रकारचा आवाज ऐकू येतो व त्याचे पुन्हां ध्वनिप्रतिध्वनी पहाडांतून पुन्हां पुन्हां उमटतात; परंतु आवाजाच्या बाजूनें नजर फेंकली असतां सहजरीत्या कोणीच दिसत नाहीं. तेव्हां मोठी मौज वाटतें. मार्ग सावकाशपणें चढत जातो. चढ ११ मैलांचा एकंदर आहे. पण तो इतका सावकाश होत गेला आहे कीं, चढ असा मुळींच भासत नसून मनुष्य अगदीं न कळत शिखरावर जातो. रस्ताही अगदीं साफ व रुंद आहे. भिकियासेनपासून सिरकोट ३ मैलांवर आहे. पहाडाच्या शिरप्रांतीं आल्यावर झाडेंझुडपें मुळींसुद्धां दिसत नाहींत. **रस्यांत झरे, पाणी किंवा पाणपोई नाहीं.** सिरकोट येथेंही पाणी लांबूनच आणावें लागतें. पाण्याचा ताप आहे खरा पण कोणालाही अर्धा आणा देऊं केला कीं एक घडा पाणी मिळतें. सिरकोटपासून बैलगाड्या मिळतात. रामनगरपर्यंत माणशीं रुपयापासून दीड रुपयापर्यंत भाडें घेतात. बैल दिसण्यांत बरे मोठे दिसतात, पण चाल इतकी धिम्मे असतें कीं पायीं चालणारे वाटसरू त्यांच्या अगोदर एक दिवस रामनगरला पोंचतात. महेलचवरीपासून कंड्या, झंपानें थेट रामनगरपर्यंत करावींत. सिरकोटपर्यंतच केल्यास फसगत होते. गाडीवाले असेंही सांगतात कीं अगोदर केलेले कंडीझंपानवाले परतून घ्या व रामनगरपर्यंत जरी त्यांच्याशीं करार केलेला असलां

तरी तुम्हांकडून वरती जास्त पैसे न घेतां आम्ही आपल्या भाड्याचे पैसे त्याजकडून परभारें घेऊं. कुलीलोक नेहमीं या गोष्टीला तयारच असतात. कारण त्यांना सिरकोटपर्यंत वाजवीपेक्षां जास्त मजुरी पडते आणि सिरकोटपासून रामनगरपर्यंत जाण्यांत होणारा श्रम व वेळ वांचतो. पुढें प्रत्येक चट्टीला गाड्या मिळतात व भाडें उत्तरोत्तर उतरत जातें. सिरकोट येथील गाडीवाला साधल्यास कमी दाम चुकते करून आपले उतारू वाटेंत दुसऱ्याच्या गाडींत भरती करून मधेंच कमिशन खातो. हे गाडीवाले फार मगरूर असून उतारू त्यांच्या कह्यांत न वागल्यास खुशाल शिवीगाळ करावयास मागेंपुढें पाहात नाहींत. गरीब व सात्विक पहाड्यांचा हा मुलुख नसून आडदांड रांगड्या पुरभय्यांचा आहे ही वारंवार जाणीव होते.

बैलगाड्या आपल्याइकडील गाड्यासारख्या नसून फार मोठ्या अवजड पण मजबूत असतात. त्यावर बांबूंचा तट्टया नसून दोपाखी झोंपड्यांप्रमाणें वर सुखवाशांचें चट्यांचें छप्पर केलेलें असतें. त्याच्याखालीं ५।६ माणसें खुशाल बसूं शकतात. चाकें भरींव असून त्यांना आरे नसतात व लोखंडी धांवा पण नसतात. ह्या गाड्यांना रथ म्हटलें असतां चालेल. यांची चाल इतकी धिम्मी व कंटाळवाणी असते कीं गाडी सोडून पायींच चालणें बरें वाटतें. सिरकोटही मोठी चट्टी नाहीं. आतां मोठ्या चट्ट्या मिळत नाहींतच. त्यावर पूर्वीप्रमाणें स्वच्छता अगर दुसरी कोणतीच व्यवस्था नसून त्याचें मूळ स्वरूप अगदींच पालटलें म्हटल्यास चालेल. येथें यात्रेकरू, गाडीवाले व कंड्यावाले यांचा एकच गोंधळ होतो. बसावयास देखील जागा नसते. मग स्वयंपाक व निद्रा कोठली ? परंतु उघड्या मैदानांत मोकळेपणीं जेवणखाण करण्यास अगर हातपाय ताणण्यास कोणाची आडकाठी नाहीं. ह्या उष्ण प्रांतांत पहाडाच्या शिखरावरील थंडगार वाऱ्याच्या झुळकांत खड्यागोट्यांवर निजून जशी झोंप लागते व हुशारी येते तशी राजप्रासादांत परांच्या मऊ गिर्द्यांवर विजेच्या पंख्यांनीं वारा खात असतांही यावयाची नाहीं. येथून रामनगर २ किंवा फार तर ३ दिवसांचा रस्ता आहे. पुढें—

**वासकोट ३ मैल**—याच्यापुढेंच मुद्दाम यात्रिकरूंकरितां भव्य व सुंदर दवाखाना बांधला आहे. पुढें—

**सीम २ ,,** —येथें फक्त पाणपोयींत पाणी मिळतें.

**गुजरचट्टी ३ ,,** —आहे. मार्गांत पाणी मिळत नाहीं. उतरण्याची सोय गुजरचट्टीलाच आहे. पाण्याचा झरा लांब आहे तरी पाणी विकत मिळतें. ८॥। ला एक केरोसीनच्या पिंपभर पाणी मिळतें. शिवाय पाणपोयी आहेच. येथें सर्वच खाण्याच्या जिनसा बऱ्या मिळतात. दहीं पण मिळतें. ह्या चट्टीच्या अलीकडचे पावमैलावर एक लहानशी चट्टी व पाणपोयी आहे. त्याच्या पलीकडून पगदंडीनें गेल्यास बराच चक्कर वांचतो. सिरकोटपासून सर्व रस्ता भयंकर नागमोडीचा असून पहाडांच्या शिखरावरून अतिशय खोल दऱ्यांच्या कांठांनीं गेलेला आहे. वासकोटपासून गुजरचट्टीपर्यंत सरासरी ३ मैल रुंदीची एक भली जंगी दरी आहे व तिच्या पलीकडच्या कांठावरील दवाखाना गुजरचट्टीहून अगदीं नजीक व स्पष्ट दिसतो. गुजरचट्टीपासून सरकारी फर्स्ट क्लास सडक लागते. रामनगर येथून ३२ मैल आहे. पगदंडीच्या रस्त्यानें गेल्यास १० मैलांचा फेरा वांचतो म्हणजे फक्त २२ मैल. येथून मैलांचे दगड लागतास. तेव्हां अंतरें मोजायला चांगलें साधन आहे. पण श्रीनगरपासून केदारपर्यंत आणि परत फिरतांना बदरीनारायणापासून कर्णप्रयागपर्यंत मार्गक्रमण किती झालें तें मोजायला विश्वसनीय असें कोणतेंच साधन नाहीं व श्रीनगर, कर्णप्रयाग रस्त्याला जे दगड एकदां रोवले त्यांची पुन्हां तपासणी वगैरे कधीं झाली नाहीं असें स्पष्ट दिसून येतें. पहाडाचे कडे दरवर्षीं कोसळतात; परंतु नेहमीं नवीननवीन वाटा पडतात त्यामुळें चट्ट्यांतील अंतरें कमीजास्त होतात; परंतु त्याप्रमाणें मैल-दगडांत फरक झालेला दिसत नाहीं. गुजरचट्टीवरून—

**मछोड ३ मैल**—पाणी नाहीं व डिखोन २ मैल आहे. या पांच मैलांत चूळ भरण्यापुरतें देखील पाणी मिळावयाचें नाहीं. पुढें—

**गोदी २ मैल आहे.** येथून बैलरस्ता सोडून पगदंडीवरून गेल्यास ४॥ मैलांचा चक्कर वांचतो. ही पगदंडी गोदीच्या अंमळ पुढें बैलरस्त्याच्या उजव्या बाजूस लागत असून short cut to Ramnagar

( रामनगराला जवळचा रस्ता ) अशी येथें फळी लागली आहे. या रस्त्याला वर पगदंडी म्हटलें, पण तो पहाडांतील राजमार्गापेक्षांही अधिक साफ रुंद आणि निर्भय आहे. गुजरचट्टीपासून आतांपर्यंत कळत न कळत पण सारखा उतार होता; पण गोदीपासून टोटामपर्यंत १॥ मैल खोल व खडा उतार असल्यामुळें रस्त्यानें सावकाशपणें चालवत नाहीं. जवळजवळ पळतच सुटावें लागतें; गुजरचट्टीपासून लागलेला मार्ग अत्यंत रमणीय अशा वनप्रांतांतून आलेला आहे; रस्त्याच्या दुतर्फा अगदीं दाट झाडी, खालीं सारखी लांबच्या लांब पसरलेली खोलदरी व व वरच्या बाजूला पहाड आणि जंगल; जिकडे नजर फेंकावी तिकडे सारी हिरवीचार सृष्टि, पहाडाच्या मध्यभागापासून गेलेला पांढरा नागमोडी रस्ता जणूं काय सर्पाकृति कटिबंधाप्रमाणें शोभतो, परंतु गोदीपासून लागलेली पगदंडी किर्र झाडींतून गेल्यामुळें वनश्रीच्या सौंदर्याबरोबर किंचित् भीतीचाही पगडा मनावर बसतो; या जंगलांत श्वापदें असण्याचा संभव फार आहे अशी एकदम कल्पना होते; परंतु दगाफटका झाल्याचें कोणी सांगत नाहीं. येथून टोटाम पायरस्त्यानें १॥ मैल व गाडीरस्त्यानें ६ मैल आहे; २६ व्या मैलावर राजमार्ग सोडला तो ¾ तासांत २० व्या मैलांवर येतो; येथेंही पाण्याचा तापच आहे, येथून अर्धमैलावर पुन्हा पगदंडी लागते. मार्ग पूर्वीच्या पगदंडप्रमाणें साफ नाहीं. खडकादगडांतून जावें लागतें. पण केदारबद्रीच्या मार्गाप्रमाणें हा मार्ग खडबडीत नाहीं, जंगल अतिशय भयंकर आहे. दिवसादवळ्या भीति वाटतें, ह्याप्रमाणें सरासरी २ मैल उतरल्यावर एक नदी लागते.नदीच्या कांठानें थोडा वेळ चालत गेल्यावर नदी ओलांडून पुन्हा आपण राजमार्गास लागतो. एकदम १२ वा मैल आलेला पाहून फार आनंद होतो. ५ मैलांचा फेरा वांचतो. आतां राजमार्ग सोडण्याचें कांहींच कारण नाहीं. पावसाळा जास्त असल्यास टोटामपासून पगदंडीनें येण्यांत अर्थ नाहीं. कारण नदीला पूर वगैरे असल्यास पंचाईत.तेव्हां पर्जन्यवृष्टींत कुमरियावरून ५ मैलांचा फेरा खाऊन यावें लागतें.पगदंडीनें गेल्यास कुमारियाबाजूनें मागेंच पडतें. पुढें मोहन ४मैल आहे.पाण्याचा भारी ताप आहे. मध्यें कित्येक उताऱ्याच्या जागा असून पुढें रामनगर लागतें.

# गंगोत्तरी व जमुनोत्तरी.

आतां बदरीकेदार यात्रेचें वर्णन संपलेंच आहे. पण गंगोत्री, जम्नोत्रीशिवाय या त्रिस्थळींची पूर्तता नाहीं, करितां त्यांचेंही दिग्दर्शन थोडक्यांत करीत आहे.

हीं क्षेत्रें ब्रिटिशगढवालांत नसून टिहरी संस्थानांत आहेत. इकडे जाण्याला मार्ग दोन. पहिला देवप्रयागावरून कष्टांचा पण यात्रेकरूंचे वहीवाटींतला व दुसरा देहराहून-मसूरी-धरासूचा, देहराडूनपर्यंत रेल्वेनें पुढें मसूरीपर्यंत मोटारनें व मसूरीवरून ९।१० मैल धरासूपर्यंत पायवाटेनें असा हा मार्ग अंमळ सुलभ व जवळचा आहे. देवप्रयागवरून येणारी वाटही येथेंच मिळते. धरासूहून पुढेंही गंगोत्री जन्मोत्रीचे भिन्न, दिशेनें दोन मार्ग फुटतात. गंगोत्री कठीणच. त्याहून जन्मोत्री अधिकच कठीण. चट्या लांब लांब अंतरावर. कोठें १२ मैल तर कोठें १६ मैलांवर. त्याही रस्ता सोडून आंत असून त्यावर शीधाआटा मनासारखा मिळत नाहीं. दूध दोनचार ठिकाणींच मिळतें व तेंही महाग. महाग कां होईना पण तांदूळ, दाळ, आटा मात्र मिळतो. तेव्हां अन्नाशिवाय उपाशीं रहाण्याचा प्रसंग येत नाहीं. रस्ता असा नाहींच. मार्ग खडकादगडांतून व जंगलांतून. गंगोत्री करणारे थोडे, त्याहून जम्नोत्री करणारे फारच थोडे, तेव्हां रस्ता वर्दळीचा नाहीं. जाणारे येणारे एकटेदुकटे मिळतात. करितां धरासूला पंड्या सोबत घेणें बरें. कारण मार्ग इतरांच्या माहितीचा नसतो. धरासूपासून पहिली चट्टी गंगाणी १६ मैलांवर मध्यें चट्टी नाहीं. गंगाणीपासून यमुनेच्या कांठाकांठानें मार्ग खडकादगडांतून गेला आहे. येथून पुढला मुक्काम खरसाळीचा. येथें लहानसें शनीचें ( यमुनेच्या भावाचें ) मंदीर असून त्याची पालखी काढतात. आरती करितात. येथून थंडी मनस्वी आहे. पुढें कोठें रहाण्याची स्वयंपाकाची पण सोय नाहीं. लांकडें सर्व ओलीं मिळतात. पुढें ४।६ मैलांवर भैरवाचें स्थान आहे. रस्त्यांत व आजुबाजूला अनेकविधरंगांचे दगड रत्नांप्रमाणें चकाकत असतांना पाहून फार आश्चर्य वाटतें. त्याहून आश्चर्याची गोष्ट ही कीं, आपलेकडील

उष्ण हवेंत ह्या दगडांचें सौंदर्य नाहींसें होऊन ते साध्या दगडाप्रमाणें दिसतात.

भैरवचट्टीनजीकच जम्नोत्री आहे. मार्ग फारसा चढउतारीचा नाहीं. म्हणण्यासारखा एक सरळ कडा चढावा लागतो. त्यानंतर लगेंच आकाशाला जाऊन भिडणारे वाफेचे लोळ दिसूं लागतात. ही शोभा अवर्णनीय आहे. याला तुलना ज्वालामुखीच्याच देखाव्याची, ती तरी पाहिली कोणी ? जम्नोत्रीच्या तप्तकुंडांतून निघालेल्या उष्ण वाफेचे लोटच्या लोट थंडीनें तावडतोब मेघरूप बनून आकाशीं भिडतात. तशी कमीअधिक उष्णतेचीं कुंडें ४ आहेत. सर्वांत उष्ण असलेल्या कुंडांत तांदुळाची पुरचुंडी बांधून टाकावी. तावडतोब शिजून भात तयार होऊन पुरचुंडी वर तरंगते. कणकेच्या रोटाचेंही असेंच पक्वान्न तयार होतें. दुसरा स्वयंपाकच येथें शक्य नाहीं. कुंडांतील पाणी स्वच्छ व उत्तम आहे. गंधकाची किंवा कसलीच घाण नाहीं. एवढ्या कडक थंडींत उन पाणी मिळल्यावर तासचेतास स्नान करीत बसण्याचा मोह कोणास होणार नाहीं ! पण स्नान लवकर आटपावें लागतें; नाहीं तर ताप येतो.

जम्नोत्रीचें छोटेसें देऊळ व त्यांतील गंगा–यमुना–भागीरथीच्या मूर्ति सर्व लांकडांच्या. धर्मशाळाही लांकडीच. हिवाळ्यांत पूजा खरसाळीहून होते. ह्या ठिकाणची उंची १०८०० फूट. येथून ४ मैलांवर बंदरपुंच्छ नामक २०७३१ फूट उंचीच्या शिखरांतून जम्नोत्री उगम पावली आहे. याच्याच पूर्वबाजूला सरळ रेषेंत सुमारें २० मैलावर भागीरथीचें उगमस्थान गायमुख ( उंची १०३१५ फूट) आहे. पण या दोन नद्यांचा संगम किती लांब अलाहाबादेस झाला आहे. जम्नोत्रीच्या तप्तकुंडाच्या उष्णतेनें खडक सारे काळे पडले आहेत. वाफेच्या लोटांची फारच मौज वाटते. त्रिजुगीनारायणाला वर्णन केलेला वाफ, धुकें व ढगांचा कारखाना येथें केवढ्या मोठ्या प्रमाणांत असेल याची कल्पनाच करावी.

जम्नोत्री आटपून परत धरासूला यावें. गंगाणीपासूनही उत्तरकाशी–

वरूनच गंगोत्रीचा मार्ग गेला आहे पण तो अतिकष्टाचा. चढउतार अति. पांचसहा डोंगर चढावें व तितकेही उतरावें; वाटेनें पाणी नाहीं; झाडांचा आश्रय नाहीं; मध्यें चट्टी तर मुळींच नाहीं. इकडील प्रवासांत खाण्याचे पदार्थ जवळच बाळगलेले बरें. कारण मुक्काम गांठायला किती वेळ लागेल याचा नेमच नाहीं.

उत्तरकाशी धरासूहुन १६ मैल व गंगाणीहूनही १८ मैल वाईट मार्गानें असून फार महत्वाचें क्षेत्र आहे. सर्व देवस्थानें मणिकर्णिकेचा देखावा वगैरे वारणशीकाशीप्रमाणेंच आहे. गांव ५०।६० घरांचा असून बाजार, धर्मशाळा, सदा वर्त, पोष्ट, दवाखाना वगैरे आहे. तारघर नाहीं. पुढें गंगेच्या कांठानेंच भटवाडी १७ मैलांवर लागतें. रुपाया भाडें पडलें तरी डाकबंगल्यांत रहाणेंच सोइस्कर. जागा तरी निवाऱ्याची मिळते. भटवाडीहून एक रस्ता गंगोत्रीस व दुसरा झुल्यावरून केदारास गेला आहे. केदारचा मार्ग अत्यंत अडचणीचा पहाडांच्या शिखरांवरून व बर्फांतून गेला आहे. पण इलाज नाहीं. गंगोत्रीला जाणारा रस्ताही यथातथाच. येथून मुकी १८ मैल; मध्यें ९ मैलावर धंगरनामा लागतें. व मुकी येथून ९ मैल. मुखी येथून गंगोत्री ११ मैल. हिंवाळ्यांत गंगोत्रीची पूजा मुखवा उर्फ मुकीहून होते. मधें १५ मैलांवर भैरवघाटी भागीरथी व जान्हवीच्या संगमावर आहे. देवप्रयाग सदराखालीं याचें थोडेसें वर्णन आलें आहे. झुल्याखालून ३०० फूट खोलीवर नदीचें पात्र वेगानें वहात असून देखावा अत्यंत भयानक रम्य आहे. जान्हवी तिबेटांतून वहात आली आहे व दोन्ही नद्यांचीं पात्रें सरळ तुटलेल्या कड्यांतून कोंडल्यामुळें घोर गर्जना करीत वहात आहेत. जान्हवी व भागीरथी एकच नव्हत!

भैरवघांटीहून ६ मैल गंगोत्री. उंची १०३१९ फूट. येथून १८ मैलांवर गौमुख. हिमसंचयांतून १३५७० फुटावरून गंगावतरण झालें आहे. याला थागाघाट म्हणतात. सरळ रेषेंत १५।२० मैल पूर्वेस केदारशृंग व २० मैल पश्चिमेस जम्नोत्रीचें उगमस्थळ बंदरपंच व याचे उत्तरेसच २०।२५ मैलांवर सिंधु लागते.

देवळाची उंची २० फूट व तें चौकोनीं आहे. आंत गंगा, यमुना, सरस्वती, शंकर, भैरवाच्या मूर्ति आहेत. मूळ मंदिर आचार्यांच्या हातचें.

त्यानंतर तें मोडल्यामुळें हल्लींचें मंदिर १९ व्या शतकाच्या आरंभास गुरखा पलटणीचे सरदार अमरसिंग थापा यांनीं बांधलें. पुढें १८ मैलांवर गायमुख आहे. तिकडील प्रदेशाचे शोध लावण्याकरितां किंवा निदान शोभा पाहण्याकरितां युरोपीअन लोक नेहमीं जातात. गंगोत्रीहून गंगाजलाच्या कुप्या घेऊन भटवाडीपर्यंत परत फिरावें लागतें. येथून ३६ मैलांवर वृद्धकेदार नामक लहानसें क्षेत्र आहे. मधें ८ ते १० मैलावर चुरणा, पांगराणा वगैरे चट्ट्या आहेत. नदी, नाले, बर्फ, चढ, उतार, पहाड, दऱ्या, जंगलांतून कसाबसा मार्ग गेलेला आहे. येथून ३६ मैल त्रिजुगीनारायण. लांबलांब अंतरावर मधें तीनचार चट्टया लागतात. त्रिजुगीनारायणापुढील केदारबद्रीचें वर्णन मागें आलेंच आहे.

---

## परिशिष्ट नंबर २.

### यात्रेच्या पूर्वतयारीकरितां उपयुक्त माहिती.

**यात्रेला केव्हां निघावें ?**—मागें केदारवर्णनांत सांगितल्याप्रमाणें अक्षय्यतृतीयेला केदारमंदिराचीं कपाटें उघडतात. तेवेळीं प्रथमज्योतीच्या दर्शनाचें महात्म्य फार. करितां महान् महान् साधुसंत अक्षय्यतृतीयेस केदारेश्वराचें दर्शन घेतां येईल अशा बेतानें, यात्रा सुरू होण्याचे अगोदरच चैत्रीपौर्णिमेच्या सुमारास एप्रिल अर्धा उलटल्यावरच हरिद्वाराहून प्रयाण करून केदारपर्यंत मजल एका पंधरवड्यांत मारतात. ह्यावेळीं हिम वितळण्यास नुकती कोठें सुरवात झालेली असते; व थंडी इतकी मनस्वी असते कीं ती आपणास सोसावयाची नाहीं; करितां अक्षय्यतृतीया झाल्यावर एखाद्या आठवड्यानें साधारणतः मे महिन्याचे आरंभीं यात्रेस सुरवात करावी. मे महिन्याच्या सुट्टींत या यात्रेचा बेत अनायासें जुळून येण्यासारखा आहे. गंगोत्रीजम्नोत्रीस न जातां बदरीनारायण व केदारनाथ इतकेंच आटपावयाचें असल्यास सहा सात आठवड्यांत ही यात्रा सहज उरकतां येते. गंगोत्री जम्नोत्री देखील करावयाची झाल्यास तीन साडेतीन महिने लागतील. पावसाळ्यांत श्रावणमासापर्यंत देखिल कित्येकजण ह्या यात्रेस जातात. पण भाद्रपदानंतर पुनश्च थंडीला सुरवात होऊन यात्रा बंद होते.

## (२) ही यात्रा कोणाला साध्य आहे ?



उत्तरखंडीय सिद्धबाबा सुंदरनाथजी.

हें धाम सर्वांत श्रेष्ठ, अतएव इतर सर्व यात्रा आटपल्यानंतर करावयाचें होय. करितां म्हातारपणींच इकडे येणें उत्तम. म्हणजे एक तर

या देवभूमींत मृत्यु तरी येईल, किंवा येथून जगून परत जातां आल्यास निदान संसारकर्मांत पुनश्च गुरफटण्याचें कारण पडणार नाहीं, अशी जुनी समजूत आहे. संसारकर्तव्यें चोख बजावून नंतर वानप्रस्थ किंवा संन्यासाची ज्यानें दीक्षाच घेतली असेल त्यांच्या दृष्टीनें असें करणें एकप्रकारें योग्यही होईल. परंतु म्हतारपणीं " अंगं गलितं पलितं मुंडं " झाल्यावर यात्रेजत्रेची दगदग सोसवत नाहीं, शिवाय धर्मसंस्कार मनावर म्हातारपणीं म्हणण्यासारखे होत नाहींत व ते तसे झाले तरी त्यांचा उपयोग होईल असें आयुष्य शिल्लक नसतें. प्रौढदशेनंतर उत्तरोत्तर विषयग्रहण–सामर्थ्याच्या ऱ्हासाबरोबर यात्रेची गोडी येण्याची शक्ति व मनाचें संस्कार्यत्वही नष्ट होऊं लागतें. करितां जवानपणींच अंगांत शक्ति आहे तोंवर सर्व उरकून घेणें उत्तम. पन्नाशीच्या वरचे म्हतारे, रोगानें जर्जर झालेले, अगदीं अशक्त, पांचसहा वर्षांच्या आंतील बालकें, गर्भिणी स्त्रिया, किंवा थंडी सोसवत नाहीं अशा लोकांनीं ही यात्रा करूं नये. घऱ्याकऱ्या तरुण माणसांसही यात्रेनंतर कांहीं दिवस अपचनादि विकार जडून एकभुक्त व्रत कडकडीतपणें पाळावें लागतें. तथापि वाटेल तसा पैसा खर्चून सर्व सुखांची सोय करता आल्यास अंगावरचीं मुलें व गर्भिणी स्त्रिया यांशिवाय कोणालाही ही यात्रा करतां येईल. मात्र "सुखंच मे शयनंचमे" याशिवाय दुसऱ्या कल्पनेचा ज्यांना जन्मांत विटाळ झालेला नाहीं अशा सुखलोलुप लोकांनीं या यात्रेचा विचारही मनांत आणूं नये.

( ३ ) खर्चाचा अंदाज.

२५ रेल्वेभाडे, पॅसेजर तिसऱ्या वर्गाचें जातां येतां ( अकोला ते हरिद्वार १४–७–० पै. )

४५ सुमारें मणभर सामानाची पूर्ण हमाली हृषीकेशापासून रामनगर रे. स्टे. पर्यंत.

२५ अन्न व रोजचा व्यवहाराचा खर्च -।।- रोजप्रमाणें सात आठवड्यांचा

२० देवधर्म पंडे, वगैरे.

१५ हरिद्वार येथें घ्यावें लागणारें सामान.

१५ येथील तयारीकरितां गांवीं विकत घ्यावें लागणारें सामान, औषधें वगैरे.

१० गुप्तकाशी ते केदारपर्यंत कंडीभाडें, अगर घोडे वगैरे.

५ टांगा हमाली वगैरे.

१६० एका मनुष्याला पायीं यात्रा करावयाची झाल्यास लागणारे खर्चाचा अंदाज याशिवाय.

८५ कंडी केल्यास रामनगर रेल्वेस्टेशनपर्यंत एकंदर भाड्याचा अंदाज–साधारणतः वजनाच्या माणसास.

१५० वरीलप्रमाणेंच झंपानाचें भाडें. अगर दांडीचें भाडें.

एवंच,

१६० पायीं जाणाऱ्यास.

२२५ कंडी करणाऱ्यास.

३०० झंपानदांडी करणाऱ्यास.

असा एका माणसाच्या खर्चाचा अघळपघळ जास्तींत जास्ती अंदाज धरला आहे. जितकीं माणसें अधिक तितकें खर्चाचें प्रमाण उतरत जातें. दोन माणसांस १५० ऐवजीं फार तर २५० खर्च येईल व तीन माणसांचें ३२५ त खुशाल उरकेल.

इकडील लोक नोटा मुख्य ठिकाणाशिवाय मुळींच घ्यावयाचे नाहींत. मोड जेथें डांकघर, तारघर वगैरे आहे असल्या ठळक ठळक ठिकाणींच वेळोवेळीं करून घ्यावी लागते. चट्टीवाले लोकांचा सारा संसार १०-१५ रुपयांचा. तेव्हां प्रत्येक चट्टीवर मोड मिळणें शक्य नाहीं. यात्रेला लागणारे सर्व पैसे बरोबरच घेणें उत्तम. तारेनें मनिऑर्डर येण्यास देखील या पहाडी स्थानांत विलंब लागून विनाकारण एखाद्या लहानशा ठिकाणीं दिवस खर्ची पडण्याचा संभव आहे. कुली व कंडीवाल्यांना सर्वच पैसे एकदम द्यावे लागत नाहींत. तसें दिलें असतां ते घेणार देखील नाहींत. आरंभीं एक तृतीयांश रक्कम, वाटेंत मैलचौरीपर्यंत जसजशी लागेल तसतशी पोटगीकरितां सुमारें एक तृतीयांश व बाकीची सर्व रक्कम मैलचौरीस द्यावी लागते. ते लोक सॉवरिन घेत नाहींत व मैलचौरीस मोड मिळत नाहीं. करितां आगाऊच धोरण राखून मोड करावी लागते. ठरवि भाड्याशिवाय कुलींना प्रत्येकीं दररोज अर्ध

आणा; देवप्रयाग, केदार व बद्री येथें एकएक रुपया इनाम व खिचडी; जे दिवशीं मुळींच वाट चालणार नाहींत ते दिवशीं पोटगीबद्दल खर्च व अखेरच्या टप्यास मर्जीस येईल त्याप्रमाणें प्रत्येकीं रुपया दोन रुपये इनाम द्यावे लागतात. शिवाय आडजुनीं वस्त्रें दिल्यास ते फार खुष होतात. रेल्वेखर्चास लागणारी व अंदाजाशिवाय म्हणून जी अधिक रक्कम आपण घेत असतो तेवढ्या रकमेच्या नोटा सोबत घेण्यास हरकत नाहीं. इकडे मोठमोठ्या ठिकाणीं सोन्याचे लहानसहान दागिने नुकसान न येतां सहज विकले जातात.

( ४ ) पूर्व तयारी:—इकडे येतांना बरोबर काय सामान घ्याव- याचें, खाण्यापिण्याचे पदार्थ वाटेंत कसेंकाय मिळतात, वगैरे भाग बराच सविस्तरपणें हरिद्वारवर्णनांत येऊन गेल्यामुळें त्याच गोष्टी पुन्हां लिहिण्याची आवश्यकता नाहीं, तथापि कांहीं अधिक व नवीन माहिती आवश्यक वाटल्यावरून देत आहे:—

इकडील तूप केवळ घाण किंवा टाकाऊ जरी नसलें तरी ज्याला लोणकढ्या ताज्या साजुक तुपाशिवाय होत नाहीं त्याला तें आरंभीं- आरंभीं बरेंच जाचण्याचा संभव आहे. करितां चांगलें तूप बरोबर घेणें बावगें होणार नाहीं व तेलतुपासारखे पातळ पदार्थ दुकानांतून स्वतां न आणतां दुसऱ्याच्या हातानें आणणें, माशांचा ताप असेल अशा ठिकाणीं अधिक सोईस्कर होय. कारण कांहीं दुकानदारांच्या संवयी इतक्या गलिच्छ असतात कीं, तेलतुपांत पडलेल्या माशा आपल्या दृष्टीसमोर पिळून मूठ भरभरून बाहेर फेंकण्यांत त्यांना बिलकुल दिक्कत वाटत नाहीं ! आपणांला तर शिसारी बसून त्या दिवसापुरतें तरी घांसभर तोंडांत जाणार नाहीं ! पण दृष्टिआड सृष्टि !

माशा पकडण्याकरितां हल्लीं Fly Trap Balloons निघालेले आहेत. त्यांची एखादी जोडी बरोबर घेतल्यास ह्या माशांवर मोहीम करतां येईल. एरवीं तर कांहीं उपाय दिसत नाहीं. △

△ Army and Navy Co., Bombay यांजकडे हीं -॥- दराप्रमाणें विकत मिळतात.

स्टोव्ह बरोबर नेल्यास ह्या पहाडी मुलखांत निर्वात स्थळें फारशा मिळणार नाहींत. करितां स्टोव्हला वारा लागूं नये म्हणून Wire gauze बारीक तारांची जाळी स्टोव्हभोंवतीं गुंडाळण्यास घेणे सोईस्कर होय.

स्वयंपाकांचीं भांडीं प्रत्येक चट्टीवर मिळतातच. तथापि मुख्यमुख्य आल्युमिनिअमचीं हलकीं भांडीं आपल्याजवळ असावींत हें बरें. सर्व भांडीं प्रत्येक चट्टीवाल्याकडून मिळतीलच असा नेम नाहीं. यात्रेकरूंची गर्दी असली म्हणजे केव्हां उघड्या मैदानांत स्वयंपाक करण्याची व एखादें वेळ रात्रही पण काढण्याची पाळी यावयाची. परत येतांना रामनगरच्या मार्गांत असले प्रसंग कित्येकदां येतात.

## आवश्यक लागणारा कपडालत्ता व इतर वस्तु.

१ तीनचार साधे कुडते.

१ सुती मळखोर कोट दोन.

१ असल्यास हलकासा जुना ओव्हरकोट–फार अवजड किंवा किंमतीचा नसावा.

१ मफ्लर किंवा गळपट्टा.

१ स्वेटर किंवा फ्लॅनेलची डबलब्रेस्टची बंडी.

१ लोंकरी कानटोपी.

१ गेटीस–पायपट्ट्या.

१ पायमोजे जोड ३।४. विजारी लांब. मजबूत खिनखिळ्याचे व बिननालाचे बूट–जोड दोन.

१ साबण–अंग व कपडे धुण्याचे ( जरा जास्तच घेणें बरें ).

१ ब्लँकेट, दुलई, पातळशी सतंजी, लहानशी पासोडी.

१ सुईधाग्यांचे चपडें दोन डझन, बिंदी ( कपाळास लावण्यास चमकदार टिकल्या) व सुया पन्नास, जानवी जोड (प्रत्येक ठिकाणीं पहाडी लोकांस वाटण्याकरितां. )

१ मेणकापड, छत्री; आमांश, आंवरक्त, अपचन, हागवण, पटकी व तापावरील औषधें. कंदील, लांब काठी, असल्यास वोअरहॅट, मेण-बत्त्या, लवंग, सुपारी, वेलचीसारख्या तलफेच्या वस्तु, हळद, मसाले,

मिरची व लोणचीं वगैरे; ट्रंक नेण्याची आवश्यकता नाहीं, विनाकारण १०।१५ शेर ओझें होतें. शिवाय इकडे आपल्या वस्तु अगदीं मोकळ्या टाकल्या तरी त्या जाण्याची भीति नाहीं. बोजा शक्य तितका कमी हवा. एक शेर बोजास एक रुपयापेक्षां अधिक खर्च येतो व प्रवासांत सामान इतकें खराब होतें कीं त्याचा पुन्हा उपयोग होत नाहीं.

## परिशिष्ट नंबर ३.

### हरिद्वारापासून रामनगरपावेतों संपूर्ण बद्रीकेदार–यात्रेंतलि चट्यांचीं नांवें अंतरें, व समुद्रसपाटीपासून उंची.

| +हरिद्वारपासून ठिकाण. | मैल. | शेरा. |
|---|---|---|
| भीमगोडा | १ | |
| सत्यनारायण | ६ | |
| ÷ हृषीकेश (येथें पोष्ट आहे.) | ७॥ | हृषीकेशरोड स्टेशन-वरून ७ मैल अंतर आहे. |
| शत्रुघ्नमंदीर | १ | |
| तपोवन | १ | |
| लक्ष्मणझूला | १॥ | झूला मोडल्यामुळें धर्मार्थनौका आहे. झुल्याचें काम सुरू आहे. |
| फुलवाडी | २ | |
| गरुडचट्टी | २ | |
| मोहनचट्टी | १ | केळीचें बन. |
| गुलरचट्टी | २ | |
| छोटी बिजनी.................... | | पाणी मुबलक पण लहान. |
| बिजनी चढाई | ४ | चढण आहे; पाणी दुर्मिळ. |

+ महत्त्वाचीं स्थळें जाड्या टाइपांत दिलीं आहेत.

÷ हरिद्वार ते लछमन झूला मोटार मिळते. दर -।- स्वारी मधें नाका कारकून टेहरीचा स्वारी वजन वगैरे नोंदतो. मजुरीमागें १ रु. स ८१ आ. कुलीपासून घेतात.

| ठिकाण | मैल | शेरा. |
|---|---|---|
| चंदरमेल | ६ | उतार. |
| महादेवचट्टी | ४ | |
| रामचट्टी | १॥ | |
| कांडीचट्टी ( येथें दवाखाना आहे. ) | १॥ | |
| व्यासघाट १४१४ फूट | ४॥ | व्यासगंगा व भागीरथीचा संगम. कोटद्वाररेलवेचा मार्ग. |
| झालुडी चट्टी | २ | |
| उमरासू | २ | |
| सौरचट्टी | ३ | |
| देवप्रयाग * ( येथें तारघर व पोष्ट आहे. ) | २ | भागीरथी व अलकनंदेचा संगम टिहरीला एक मार्ग जातो. पौडीला जाण्याचा |
| चाडा १६५० फूट | | १५ मैलांचा मार्ग. |

## देवप्रयागपासून केदारनाथपावेतों.

| ठिकाण. | मैल. | शेरा. |
|---|---|---|
| विद्याकोटी | ३ | |
| राणीबाग | ५ | |
| रामपूर | २॥ | |
| बिल्वकेदार | ५ | |
| श्रीनगर ( येथें तारघर, पोष्ट, दवाखाना आहे. )१७०६फूट | ४ | टिहरीची राजधानी जुनी बदरीनाथ सेवासमिति |
| सुकृत | ५ | |
| भट्टीसेरा | ४ | बिकट चढण |
| खांकरा | ३॥ | |
| नरकोटा | २॥ | |
| गुलाबराई | ३॥ | |

* देवप्रयाग येथून एक मार्ग गंगोत्रीस व केदारबद्रीला गेला आहे.

| ठिकाण | मैल | शेरा |
|---|---|---|
| रुद्रप्रयाग + (येथें पोष्ट आहे.) | १॥ | बिकट मार्ग सेवा समिती. |
| छतौला | ६ | उजवे बाजूचा मार्ग केदारचा डावे बाजूचा मार्ग बदरी नारायणाचा. |
| छतोली | ६ | |
| अगस्तंमुनी | ४ | |
| चंद्रपुरी | ४॥ | |
| भीरी | ३॥ | |
| कुंडचट्टी | ३ | बिकट चढण |
| गुप्तकाशी (येथें पोष्ट आहे) | ४ | ,, |
| नाला × | १ | ,, |
| व्योम | १ | |
| फाटाचट्टी | ५ | |
| रामपुरचट्टी | ४॥ | बिकट चढण |
| त्रियुगीनारायण | २॥ | |
| सोनप्रयाग | १॥ | |
| चीरबासाभैरव | २ | |
| गौरीकुंड | २॥ | तप्तकुंड |
| रामवाडा | ३ | |
| श्रीकेदारनाथ (येथें पोष्ट आहे.) | ४॥ | ११७५३ फूट |

केदारनाथापासून लालसांगापावेतों.

| ठिकाण. | मैल. | शेरा. |
|---|---|---|
| (त्याच मार्गानें येऊन | | |
| नालाचट्टी | २४ | उतार |

+ रुद्रप्रयाग येथें अलककंदा व मंदाकिनीचा संगम आहे. येथून एक मार्ग केदारला व दुसरा कर्णप्रयागला गेला आहे.

× बदरीनारायणास जाण्याकरितां केदारहून परत येथेंच यावें लागतें.

| ठिकाण. | मैल. | शेरा. |
| --- | --- | --- |
| उषामठ ( येथें पोष्ट व दवाखाना आहे. ) | ४ | उतार |
| ग्वालियाबगड | ६ | |
| पोथीबासा | ३ | चढण व जंगल |
| चौपत्ता | ३ | बिकट येथून तुंगनाथ |
| * तुंगनाथ (तुंगनाथावरून) | | अति बिकट चढण मार्ग सोडून |
| भीमउडार | ३ | उतारीचा मार्ग |
| पांगरवासा | २॥ | |
| मंडलचट्टी | ३ | उतरण्यास उत्तम |
| गोपेश्वर | ६ | पाणी नाहीं |
| लालसांगा ( पो. तार. दवा. आहे. ) | ३ | पाण्याचा त्रास |
| मठचट्टी | २ | उतरण्यास बरी |
| सियासैण | ४ | |
| पीपलकोटी ( येथें पोष्ट आहे. ) | ३ | वाटेंत चार मैल पाणी नाहीं. |
| गरूडगंगा | ४ | |
| टंगणी | २ | |
| पाँतालगंगा | २ | |
| गुलाबकोटी | २ | |
| कुम्हारचट्टी | ३ | उतरण्यास सोइस्कर |
| खनोटी | २ | |
| स्युंधार | ३ | |
| जोशीमठ ६१०७ ( ता. १ पोष्ट व दवाखाना आहे. ) | | टुमदार गांव. महत्त्वाचें क्षेत्र. |

* शक्ति असेल त्यानें चौपत्त्याहून तुंगनाथास जावें व सोबतचे मंडळीस कुलीसह मंगळाचट्टीवर पुढें पाठवावें व तेथें वाट पाहाण्यास सांगावें.

| | |
|---|---|
| टोटाम* | ६ |
| कुमरिया | ९॥ |
| मोहन | ४ |
| गजरिया | १२ |
| रामनगर | ७ |

# गढवाल व टेहरी.

## सामान्य माहिती.

वायव्यप्रांताच्या उत्तरेकडील टोंकास, तिबेटच्या दक्षिणेस हिमालयाचे गर्भांत गढवाल जिल्हा (क्षेत्रफळ ५६२१ चौरस मैल) असून याचे टेहरी गढवाल व ब्रिटिश गढवाल असे दोन विभाग केले आहेत. यांत पूर्वी ५२ गढ ( किल्ले ) असल्यामुळें याला गढवाल हें नांव मिळालें. बद्रिनाथ किंवा चौखंबा व नंदादेवी ह्या पाहाडांच्या रांगा त्यांतून गेलेल्या असून सदैव हिमाच्छादित शृंगांच्या उंचउंच भिंतींनीं बहुतेक भाग दुर्लंघ्य असून दळणवळणाचे मार्ग कमी असल्यामुळें या भागांत व्यापार अगर उद्योगधंदा नाहीं व लोक दरिद्री आहेत. गढवालचे दक्षिण व उत्तर गढवाल असे दोन भाग असून, दक्षिण गढवालांत कोटद्वार रे. स्टे. पासून ४८ मैलांवर पौडी, ( उंची ५३९० फूट ) जिल्ह्याचें मुख्य ठिकाण आहे. पौडीजवळच लॅन्डस्डाउनची छावणी असून येथूनच रस्त्याचे फांटे ठिकाठिकाणीं गेले आहेत. पौडी येथें मुद्दाम लावलेलीं ओक, देवदार,

* टोटामवरून पुन्हां पायवाटेनें निघून नदीच्या कांठाकांठानें गेल्यास पांच मैलांचा फेरा वांचतो. असें केल्यास कुमरिया बाजूसच रहातें; पण पावसाळ्यांत हा नदीकांठचा प्रवास शक्य नाहीं.

पाइनचीं मोठमोठीं राखीव जंगलें असून येथूनही हिमदर्शन होतें. सबंध जिल्ह्यांत शहरें दोनच, एक पौडी व दुसरें श्रीनगर.

शेतीः—येथील मुख्य धान्यें तांदूळ, गहूं, तूर, ( हरड, अर्हड, हर्हर ) जव, झांगोरा, आणि मुंडवा ( कुळीथ–बाजरीसारखीं हलकीं धान्यें ). भावर म्हणून एक लहानसा सपाटीचा प्रदेश आहे तेथेंच फक्त तंबाखू व कापूस पिकतो. कित्येक उष्ण ठिकाणीं तीळ, तूर, उडीद, मिरीं, आलें, हळद, उंस होतो. दक्षिण गढवालांतील उष्णभागांत थोडीशीं मिरचीही होते. पहाडाच्या उतरत्या बाजूवर दगडांच्या भिंती रचून पायऱ्या पायऱ्या सारखीं शेतें करितात. तांदूळ व झांगोरा हीं खरीपाचीं पिकें असून सप्तेंबरचे सुमारास यांची कापणी होते. रब्बीचीं पिकें एप्रिलांत निघतात. हंगामाचें कालमान प्रदेशाच्या उंचीप्रमाणें बदलतें. ६००० फूट उंचीवर खरीपाचीं पिकें मे महिन्यांत तर ७००० फूट उंचीवर जून महिन्यांत, ८००० फुटांवर जुलई महिन्यांत आणि ९००० फुटांवर आगष्ट महिन्यांत याप्रमाणें समजावें. ९००० फुटांवर गहूं होत नाहीं. दर हजार फुटाला हंगाम एक महिना पलीकडे जातो. जमीन थकूं नये म्हणून पिकें बदलण्याची पद्धत या पाहाडी लोकांच्या पूर्ण परिचयाची आहे. बहुतेक ठिकाणीं पाण्याच्या अनुकुलतेप्रमाणें वर्षांतून दोन पिकें काढण्यांत येतात. एप्रिलमध्यें धानाची पेरणी करून तें पीक सप्तेंबरांत काढल्यानंतर ऑक्टोबरांत गहूं पेरून एप्रिलांत काढतात. मंडवा हें पीक ऑक्टोबरांत पेरतात व याच महिन्यांत काढून घेतात. बहुतेक अर्ध्या भागांत तांदुळ व अर्ध्या भागांत मंडवा पेरतात. जव मे व जून महिन्यांत; छूवा एप्रिल ते सप्तेंबरपर्यंत पेरतात. बहुतेक भाग शेतीला निरुपयोगी असल्यामुळें लोकांना एकंदर शेतीचें धान्य अपुरें पडतें. पीक हातीं येण्याच्या अगोदर गरीब लोकांना छुव्याचीं पानें उकडून त्यांत थोडें इतर धान्य मिसळून आपली भूक शमवावी लागते. बऱ्या स्थितींतील लोकानांच काय ते गहूं-तांदूळ खावयास मिळतात. गरीब लोकांना मंडवा व झांगोरा सारख्या क्षुद्रधान्यावर निर्वाह करावा लागतो. धान्याच्या कमतरतेमुळेंच मांस व मत्स्याहाराचा प्रघात कांहीं ब्राम्हणांखेरीज सर्वांत पडला असावा.

येथें चहाचे मळे करण्याचे अनेक प्रयत्न झाले व त्याकरितां सरकारनें मुद्दाम चिनांतून चहाचें बीं व तज्ज्ञ आणले होते. परंतु या गरीब लोकांना अगोदरच धान्य अपुरें पडत असल्यामुळें चहाची लागवड करणें म्हणजे त्यांना उपाशीं मारणेंच होय, असा निसर्गानें आपला शेरा दिल्यामुळें चहाच्या लागवडीचे प्रयत्न बहुतेक विफल झाले. आल्मोराजिल्ह्याचे सरहद्दीला लागून असलेल्या ह्या लांबच्या भागांत चहाचे मळे आहेत. इतर दोन तीन ठिकाणींही लहान लहान मळे आहेत. १९०७ सालीं एकंदर उत्पन्न ५२००० वजनी पौंड झालें.

**व्यापारः**—तिबेटांतील भूतेलोकांच्या हातांत बहुतेक व्यापार आहे. मीठ, टाकणकार, घोडे, कुत्रीं, लोंकर, चीनी जोडे, चवऱ्या ( याक जनावरांचीं पुच्छें ) हा माल तिबेटांतून आणून त्या ऐवजीं विलायती माल, कापड, गूळ, साखर धान्यें वगैरे तिबेटांत पोंचवितात. सर्व व्यापार शेळ्या, मेंढ्या व क्वचित् घोड्यावरून चालतो. दक्षिण--गढवालांतील व्यापार नजीबाबाद येथील मुसलमान वंजारी यांचे हातीं आहे व दुष्काळाचे दिवसांत हे लोक भलताच नफा कमावतात. पाहाडी लोक व्यापारांत कुशल नाहींत. रोखीऐवजीं बहुतेक अदलाबदलीची पद्धत खेड्यापाड्यांतून आहे.

**वजनें व मापेंः**—नाली हें मुख्य माप आहे. परंतु गव्हाची नाली पक्के दोन शेर तर तांदुळाची नाली पावणेदोन शेर इतका फरक आहे. २० मुठी ( मुष्टि )= १ नाली; १६ नाली= १ डोन किंवा पिराई; २० डोन= १ खार. उत्तर गढवालांत वजनी शेर ८४ तोळ्यांचा आहे तर भावभागांत ९० तोळ्यांचा आहे. लांबीचें ही माप नालीच. नाली म्हणजे २४० स्क्केअर यार्ड. २० नाली= १ एकर.

**शिलाजीत:**—जिल्ह्यांतून बराच शिलाजित ( सल्फेट ऑफ अल्यूमिना ) बाहेरगांवीं जातें. सरकारकडून शिलाजिताचे मक्ते लिलांव होतात. सरकारला यापासून सालीना सात ते आठ हजार रुपये मिळतात.

**व्याजाचा दर**— ।।= पासून १। असल्याचें कळतें.

**दळणवळणाचे मार्गः**—नजीबाबादवरून कोटद्वारपर्यंत औध-रोहिलखंड रेल्वेचा फांटा गेलेला असून पुढें कोटद्वारपासून श्रीनगरपर्यंत चांगला रस्ता आहे. मुख्य व्यापाराचा मार्ग हाच. तेथून रुद्रप्रयाग, कर्ण-प्रयागवरून पंडुकेश्वर वगैरे मार्गे वर्णन केलेल्या मार्गानें नीती व माना-घाटांतून तिबेटपर्यंत व्यापार चालतो. १९०७ सालीं रोहिलखंड-कमाउन रेल्वेचा मोरादाबाद-रामनगर फांटा जोडण्यांत आल्यामुळें रामनगर-वरूनही बराच माल गढवालांत चढतो.

**खनिज–संपत्तिः**—तांबें, लोखंड, व शिश्याच्या खाणी पूर्वी असत. परंतु त्यांतील उत्पन्न दिवसेंदिवस कमी होत आहे. व बाहेरून येणाऱ्या तयार वस्तूसमोर हा धंदा टिकाव धरीत नाहीं. शिसें अगदीं खलास झालें. खाणी चालविण्याच्या प्रयत्नांत पुन्हांपुन्हां अपयश व नुकसानीचा अनुभव आल्यानंतरही एका युरोपियन सिंडिकेटनें १९०९ सालापासून तांबें काढण्याचा प्रश्न पुन्हां हातीं घेतला आहे. लोखंडाचीही तीच स्थिति आहे. लोहाराचें काम उच्च प्रकारच्या डोमलोकांकडे असतें. त्यांचा मूळ पुरुष काल्या लोहार यानें पांडवांचीं आयुधें केलीं अशी दंतकथा आहे. अद्याप त्याला पांच कोळसे अर्पण केल्याशिवाय हे लोक कामाला सुरु-वात करित नाहींत. लोखंडाचें प्रमाण शेंकडा ७० असतें तथापि कारा-गिरांच्या अडाणीपणामुळें १ मणाला फक्त पांच शेराचें प्रमाण पडतें. अलकनंदा नदीतून सोनेंही काढतात. सुवर्णाचे उगम–स्थळाचा इंग्रजांना अजून तपास लागला नाहीं. सोनें काढण्याची पद्धत जुनीच आहे. ती येणेंप्रमाणेंः—वाश्यांच्या बारीक बारीक कामट्यांची एक चाळणी, दोन लाकडांची उथळ वाटगी ( भांडीं ), एक नावेच्या आकाराचें एक भोंक असलेलें लांबट पात्र, थोडासा पारा, चामड्याचे तुकडे, हेंच सोनें काढण्याचें साहित्य. नावेच्या आकाराचें पात्र चार फूट लांब एक हात रुंद आणि एक हात खोल असून एका टोंकाला एक छिद्र असतें. छिद्रांकडील भाग थोडा उतरता करून तें पात्र नदीकाठीं ठेवल्या-नंतर त्यावर बांबूची चाळणी घेऊन त्यांत वाळू ओततात व भोपळ्यानें पाण्याची संतत धार धरतात. पाण्याबरोबर रेतीचे कण व सुवर्णाचे बारीक रज खालच्या भांड्यामध्यें पडतात व पाणी छिद्रांतून निघून जातें;

याप्रमाणें खालील पात्रांत वरीच बारीक रेती जमली म्हणजे त्यावर आणखी हलक्या हातानें पाणी ओतून हातानें ढवळतांच जड सोन्याचे कण खालीं बसलेले चमकूं लागतात. ते अलग करून त्या चामड्याचे तुकड्यामध्यें नीट गुंडाळून ठेवतात. बाकीच्या रेतींत बारीक रज मिसळलेलें असतात, त्यांत पारा टाकला असतां पाऱ्याचें व सोन्याचें रसायन बनतें, त्याला अंमळ आंच देतांच पारा उष्णतेनें उडून जातो व शुद्ध सोनें बाकी उरतें. या पद्धतीनें तिकडील मजूरांचे पदरांत चार आणे रोजमुरा काय तो पडतो !

**जंगल:**—येथील जंगलांतील वृक्षांचे व पशुपक्षांचे प्रकार, प्रदेशाची उंची व हवामानावर अवलंबून आहेत. साल, सिसम, खैर, टैंटू, चीर, पाईन, ओक, देवदार वगैरे वृक्ष बहुतेक सर्वत्र आहेत, बांबूही पुष्कळ व अत्यंत मोलवान आहेत. परंतु ३५०० फूटांचे वर तो वाढत नाहीं. त्याचप्रमाणें उष्ण प्रदेशांतील फळझाडें, आंबा, संत्री, लिंबू, सिताफळ, पेरू, पपई, पिंपळ, वड, वगैरे ३००० फूटांपलिकडे होत नाहींत. चीर नांवाचीं सुरूंसारखीं झाडें फार मोठालीं होतात व त्यांतून राळ काढतात. याच झाडापासून टरपेंटाईन काढतां येतें. गंगोत्रीचे बाजूला असलींच मोठमोठीं सुरूचीं झाडें तोडून त्यांचे स्लिपर बनविण्याचा कारखाना असून तीं गंगेंत टाकून देतात वगैरे वर्णन मागें आलें आहेच. या झाडाचीं फळेंही तिकडील लोक खातात. जरदाळूला ते लोक गौरी–फळ म्हणतात पण तें खाल्ल्यानें हिंवताप लागतो अशी त्यांची समजूत आहे.

चीर ( सुरू ) चीं लांकडें पेटविल्यास त्यांचा मशालीप्रमाणें उत्तम प्रकाश पडतो.कारण त्यांत राळ, टर्पेंटाईन असतें.ॲपल पीअर,चेरी,एप्रीकॉट प्लम आणि पिचेस हीं फळ-झाडेंही ३००० फुटांपलीकडे पुष्कळ विपूल आहेत. बद्रीनारायणाचे बाजूला कोठेंकोठें बोरीचीं लहानलहान झुडपें दिसतात. त्या बदरीफलावरून बदरीनारायण नांव पडलें असावें. बोरीच्या जातीची स्ट्रॉबेरी, गूजबेरी वगैरेंचीं आणि इतर वन्य फलझाडेंही आहेत. कैलासाच्या ऊतरणीवर चीर ( सुरू )च्या झाडांचा घेर २०-२५ फूट, व उंची १५०. फूट असते. कित्येक ठिकाणीं पाईन, ओक, चीर व देवदारांच्या

जंगलाची मुद्दाम लागवड करण्यांत आली आहे. टेहरी राज्यांतलें जंगल फारच श्रेष्ठप्रतींचें आहे.

पशुः—हत्तींच्या कळपासंबंधीं मागें वर्णन आलेंच आहे. पूर्वीप्रमाणें आतां रानोमाळ हिंडण्याइतके हत्ती विपुल राहिले नाहींत तथापि ते पुष्कळच असून राखीव जंगलाचे कायदे मोडण्यांत मोठे पटाईत आहेत. वाघांची वस्ती १०००० फुटांपर्यंत देखील असते. वाघ व आस्वल यांपासून एक मिश्रपशूंची जात क्वचित् ठिकाणीं आढळतें. ३००० फुटांवर हिमांत रहाणारीं आस्वलें आहेत. जंगलीं मांजरें तर बहुतेक हूबेहूब चित्त्याप्रमाणें दिसतात. इकडील सांबर आपलेकडील सांबरापेक्षां मोठें मजबूत असून त्याचीं शिंगेंही सुंदर व मोठीं असतात. मात्र हीं दाट जंगलाबाहेर कदापि येत नाहींत. चीतल ( ठिपक्यांचीं हरणें ) ७०,८० चे कळप करून राहतात, पण टेंकड्यावर कधीं येत नाहींत. कस्तुरीमृग ८००० फुटांपेक्षां कमी उंचीच्या प्रदेशांत मिळावयाचे नाहींत. त्यांना शिंगें नसतात. वरच्या जाभाडांत तीन तीन इंच लांबीचे सुळे असतात. शामालेदर ज्यापासून मिळतें तो गुरल नांवाचा प्राणी ११००० फुटांपलीकडे वस्ती करतो. पक्षी तर नानातऱ्हेचे आहेत. त्यांचीं नांवें देणें शक्य नाहीं. कारण कांहीं कोंबड्यांच्या तर कांहीं कबुतरांच्या कांहीं घारींच्या तर कांहीं चिमण्यांचा जातीचे; सर्वांचेच पंख सुंदर व आवाज मधूर. याक ( वनगौ ) माणसाळून त्यांच्यावर बैलाप्रमाणें ओझीं लादतात. त्यांवर दोन, तीन मण ओझें सहज लादतां येतें. पण १०,००० फुटांखालीं आणल्यास हें जनावर जगणें संभवनीय नाहीं म्हणून गांवठी गाई बैलांची व त्यांची संमिश्र प्रजाच खालच्या जंगलांत आढळते.

**गढवाली लोकः**—लोकसंख्या सुमारें ४३०००० ( इ० स० १९०९ सेन्सस ) आहे. पैकीं शेंकडा दोन मुसलमान आहेत. ४४४१ मुसलमान पुरुषांपैकीं फक्त ९१८ स्त्रिया आहेत. त्यावरून मुसलमान या जिल्ह्यांत फक्त व्यापाराकरितां येत असून कायमचे रहिवासी फार थोडे आहेत, हें उघड आहे. संबंध गढवालांत नुकती कोठें कोटद्वाराला एक मशीद झाली आहे. ख्रिस्ती लोकांचीं मिशनें बऱ्याच ठिकाणीं आहेत. १९०९

सालीं ख्रिस्ती लोकांची संख्या ८०० होती. हिंदूंचे मुख्य भाग दोन वीथ आणि डोम. या विथामध्यें, ब्राह्मण, खास--ब्राह्मण व रजपूत आणि खास–रजपूत अशा जाती आहेत. ब्राह्मणांच्या मुख्य जाती दोन, सरोळे आणि गंगारी. रजपूतांची संख्या २,४५,०००. रजपूतांमध्येंही अनेक जाती आहेत. डोम ६७६०० व बनिये फक्त १४०० आहेत. शेंकडा ७५ लोक शेतीवर व बाकी सैन्य, मजूरी, जंगल, नोकरी वगैरे-वर आहेत. बांबूच्या चटया व करंड्या विणणें, घोंगडीं बनवणें वगैरे कामांशिवाय महत्वाचे उद्योगधंदे नाहींत. फक्त भूर्जपत्र ( सातपुडा ) साली उकलून त्याच्या लगद्यापासून कागद बनविण्याचे कारखाने दोन ठिकाणीं आहेत. हे कागद पैशाला एक प्रमाणें मिळतात.

दक्षिण गढवाल्यांत व इतर प्रांतीयांत फारसा फरक दिसून येत नाहीं. पण थंड प्रदेशांत उत्तरोत्तर जातांच त्यांची कांती गौर–पिंगट, डोळे नील-वर्ण, चेहऱ्याची ठेवण-मांगोलियन ( चीनी–जपाना ) वळणाची, उंच गाल-फडाचीं हाडें खोल, डोळे दिसूं लागतात. बऱ्याच ठिकाणीं ते युरोपियन लोकांप्रमाणें लाल गुलजार ही दिसतात. बायका अगदीं कंगाल गांवढळ वेषांत व गलिच्छ असल्या तरी सुस्वरूप असतात. ह्या नीलाक्षी गौर-वर्ण किन्नरी ओझें पाठीवर घेऊन वांकतवांकत झरदिशीं पहाड चढ-तांना पाहून फार मौज वाटतें. बिचाऱ्यावर कामाचा बोजा अति व स्थिति फार कनिष्ठ आहे.

**पोशाखः**—पुरुषांना सर्वत्र पायांत विजार, अंगांत पायघोळ सैल लांब कोट व डोक्यांस लोकरीची गोंडेदार टोपी असते. उत्तरगढवाल्यांत थंडीचे प्रदेशांत त्यांचे सर्व कपडे लोंकरीचे असतात. बायका विजारी-ऐवजीं घागऱ्याप्रमाणें एक वस्त्र ( थंड प्रदेशांत घोंगडी ) गुंडाळतात. व तेंच वस्त्र खांद्यावरून समोर आणून पुढें गांठ मारतात. कोठें कोठें त्या अंगांत रंगीत कुडता घालतात व क्वचित् त्यांचे खांदे आणि हात उघडे असतात. त्या लहानशा पागोट्या किंवा चुंभळीप्रमाणें डोकीलाही कापड गुंडाळतात. स्त्रिया बहुतेक पाठीवर वेणी सोडतात. कपाळाला कुंकुमतिलक व वर बिंदी असतें. हातांतील बांगड्यांकडे अगर दागि-न्यांकडे लक्ष नाहीं. स्त्रियांस पडदा नाहीं.

**स्वभाव:**—गढवाली शूर, उमदा व मनाचा मोकळा असतो. मानवी स्वभावाप्रमाणें किंवा दारिद्र्यामुळें तो लोभी असला तरी लुच्चा, लबाड नाहीं. इमान हा त्याचा पहिल्या प्रतीचा गुण. चौर्याचा त्याला विटाळ झालेला नसतो. मात्र तो थोडा भांडखोर, कामचुकार व आळशी आहे. बायकांवर सर्व कामें टाकतो. दिसण्यांत धिप्पाड नसतो. हा दाढी कधीं राखीत नाहीं. हा आपली पहाडी भाषा गाण्याचा आवाजाप्रमाणें नीचोच्च स्वर काढून बोलतो. गढवाल्यांना हिंदी चांगलें येतें. यांचा जर कोणचा दुर्गुण असेल तर घाणेरडेपणा. पण हे शूर, उदार व उमदे असून गढवाल रायफल्स ही पलटण आतां सुप्रसिद्ध झाली आहे.

**चालीरिती:**—कांहीं थोडेसे ब्राम्हणांशिवाय सर्व लोक मत्स्याहारी आहेत. मांसाहाराला त्यांची कांहीं हरकत नाहीं. मात्र कोंबडी निषिद्ध मानतात. विवाहप्रसंगीं जांवयाकडून बाप आपल्या मुलीचे पैसे घेतो. घरांतील व शेतांतील फक्त नांगर–वखराखेरीज सर्व कामें बायकांसच करावीं लागतात. नवरा मेल्यानंतर स्त्री आपल्या दिराशीं संबंध ठेवतें. अशा संबंधाच्या संततीला कोणी नांवें ठेवीत नाहींत. सख्खा दीर नसल्यास चुलत-मावस दीर अगर कोणीही लांबचा दीर अगर नातलग चालतो. एकाहून अधिक स्त्रिया करण्याची चाल यांच्यांत आहे.

**इतिहास:**—गढवालाच्या प्राचीन इतिहासाची चांगलीशी माहिती मिळत नाहीं. प्राचीनकाळीं या प्रदेशाला केदारखेड हें नांव असून येथें शक, नाग, खासे, हूण, व किरात हे राज्य करीत असत असें कळतें. नाग लोकांचें राज्य बरेंच विस्तृत असावें. अद्यापिही चमोलि तें गुप्तकाशींच्या टापूला नागपूर परगणा असें नांव प्रचलित आहे. पुढें बाराव्या शतकाचे सुमारांस नेपाळांतील मल्ल घराण्याचा अम्मल येथें चालत होता, असें गोपेश्वर येथील त्रिशूल व ताम्रपटावरून दिसून येतें. यानंतर कल्युर (कालचुरी ?) राजांचा अमल सुरू झाला. पुढें पाल राजे झाले. १३५८ ते १३७० पर्यंत अजयपाल नांवाचा राजा राज्य करीत होता. याच घराण्यानें पुढें शहा हें नांव पालऐवजीं धारण केलें. याचा व कुमाऊनच्या चंदराजाचे नेहमीं झगडे चालत असत. फेरिस्ता यानें कुमाऊनच्या

राज्यासंबंधानीं अत्यंत भडक वर्णन लिहून ठेवलें तें अर्थात् गढवालसंबंधींच आहे. अकबराचे साम्राज्यांत गढवालाचा समावेश झालेला नव्हता. याचें कारण असें सांगतात कीं अकबरानें एकदां गढवाली राजाला खंडणी घेऊन दरबाराला बोलाविलें असतां त्यानें एक रोडका उंट बादशहास नजर करून माझा प्रदेश या जनावराप्रमाणें उंचनीच असून अत्यंत गरीब आहे असें सांगितलें. बादशहानें खुष होऊन राजास खंडणी माफ केली.

या प्रदेशाला मुसलमानांचा फारसा संपर्क लागलासा दिसत नाहीं. फक्त १६५४–५५ त एकदां व त्यानंतर दुसरी स्वारी शहारणपूरचा नबाब नजीबखां रोहिला यानें १७५७ सालीं करून १७७० पर्यंत आपलें वर्चस्व गाजविलें. गढवाल व कमाऊन येथील राजांचीं युद्धें आपसांत सारखीं चालू असत व त्यांत गढवाल्यांचा नेहमींच पराजय होई. पुढें अठरावे शतकाचे अखेरीस नेपाळच्या गुरख्यांनीं सर्व प्रांत काबीज करून आपला कडक व जुलमी अम्मल गाजविला व पुढें त्यांच्यापासून १८१५ सालीं हा प्रांत इंग्रजांच्या ताब्यांत आला. टेहरी व गढवाल हे १८१५ पर्यंत एकाच राजाच्या अमलाखालीं असत; परंतु नेपाळच्या गुरख्यांशीं लढत असतां अखेरीचा राजा प्रधमानशहा मृत्यु पावल्यावर इंग्रजानें त्याचे मुलाला टेहरीसंस्थान तोडून दिलें.

---

## टेहरी.

क्षेत्रफळ ४२०० चौ. मैल.

**मर्यादा**:—उत्तरेस तिबेट, पश्चिमेस देहरादून, पूर्वेस व दक्षिणेस ब्रिटिश गढवाल. सबंध प्रदेश हिमालयाच्या उंच रांगांनीं व्यापलेला असून त्यांत २०००० ते २३००० फूट उंचीचीं शिखरें आहेत. गंगोत्री आणि जम्नोत्री हीं तीर्थस्थानें याच संस्थानांत असून गौमुख नाम हिमसंचयांत १३५७० फूटांवरून भागीरथी, निघाली आहे; तिलाच भैरवघांटी येथें

मिळणारी जान्हवी तिबेटांतून उगम पावली आहे. अलकनंदा आणि भागीरथी ह्या टेहरी व ब्रिटिश गढवालाच्या कांहीं भागांतील सीमेवरून वाहतात. यमुना ही बंदरपंचनामक हिमसंचयांतून निघाली आहे.

लोक:—येथील लोकसंख्या ( १९०१ च्या सेन्ससप्रमाणें ) २६८८८५:-पैकीं १,६१००० रजपूत,५५०००ब्राह्मण, ४८००० डोम आहेत. यांत मुसलमान शेकडो एक देखील नाहीं. १९०१ सालीं साक्षरतेचें प्रमाण २.२ होतें. टेहरी येथें हायस्कूल आहे.बाकी वर्णन गढवालप्रमाणेंच आहे. येथें बटाट्याचें पीक बरेंच आहे.

शहर:—टेहरी लोकसंख्या ३३८७ ( १९०१ सालीं ) हेंच राजधानीचें व तहसिलीचें ठिकाण. उंची फक्त १७५० फूट असून उन्हाळ्यांत फार उष्मा होतो. करितां राजेसाहेब येथून ९ मैलांवर पतापगर्डी ८००० फूट उंचीवर राहण्यास जातात. हल्लीं नरेंद्रनगर नांवाचे नवीन शहर वसवून तेथें राजधानी नेण्याची खटपट चालू आहे. कमाऊन येथील कमिश्नर हाच टेहरीचा पोलिटिकल एजंट आहे. महाराज सर्वसत्ताधीश आहेत. देहदंडाच्या शिक्षेचा अधिकार फक्त राजालाच आहे. १९०८-९ सालीं उत्पन्न ६१४००० होतें. गंगोत्रीवरून गंगा नेणाऱ्या यात्रेकरूंना कर द्यावा लागतो. येथें बहुतेक माल डेहराडून-मसूरीमार्गानें येतो.

---

## हिमाचलांतील कांहीं दिव्य औषधी आणि इतर दुर्मिळ वस्तुः—

शिलाजित—-बदरी नारायणाजवळील पहाडांच्या शिखरांवर अत्यंत बिकट ठिकाणीं खडक-शिला पाझरून त्यांचा रस जमून खडकास चिकटलेला असतो त्याला आपल्या वैद्यशास्त्रांत शिलाजित अथवा शिलाजतु हें नांव दिलेलें आहे. अशुद्धस्थितींत असतां ह्यांत माती आणि इतर क्षार यांची भेसळ झालेली असते. सरकार दरसाल ह्या पहाडांतील शिलाजित काढून नेण्याचा मक्ता-मक्त्याचा लिलाव करीत असतें तेथून काढून अनेक प्रकारांनीं शोधन करून हा बाजारांत विकावयास येतो. ह्याची

परीक्षा करणें सुलभ नाहीं. वैद्यशास्त्रात सांगितलेलीं मुख्य लक्षणें येणेंप्रमाणें आहेतः-हा खाण्याला कडू आणि दिसण्याला गुग्गुळासारखा असून ह्याला थोडी गोमूत्रासारखी घाण येते. पाण्यांत टाकला असतां तांबडे तंतू निघून भांड्याचे तळापर्यंत जातात व पाणी लाल होतें. आणि अग्नींत टाकला असतां जळत नाहीं, धूर उठत नाहीं व महादेवाच्या लिंगासारखा आकार होतो. शिलाजिताचें शोधन अग्नि आणि आतप (ऊन्ह) या दोन प्रकारांनीं करितात. त्यांत सूर्यशोधित श्रेष्ठ आणि अग्निशोधित कनिष्ठ होय. पण ही परीक्षा स्थूलमानानें झाली. अशी कसोटी लावल्यानंतरही ग्राहक फसण्याचा संभव असतो. शिलाजितांत वरील कसोटीस उतरूनही माती वगैरे किती उरली आहे, मिश्रद्रव्यें किती आहेत, त्याचें शोधन कोठवर झालें आहे आणि कोणच्या प्रकारांनीं झालें आहे तें समजण्यास कांहींच मार्ग नसतो. तेव्हां भलत्याच नादाला लागून पैसे घालवण्यांत अर्थ नाहीं. कोठें ८= तोळा देतात तर कोठें त्याच दुकानदारापासून स्वस्त माल खरीद करून इतर दुकानदार त्यावर आपली मखलाशी चढवून तोच माल २ रु. तोळ्याप्रमाणें विकतात. निवळ किंमतीवरून मालाची परीक्षा होत नाहीं. तेव्हां सर्वांत सावधागिरीचा मार्ग म्हटला म्हणजे स्थूल परीक्षा करून मालाचा थोडा नमुना विकत आणून आपल्या गांवीं एखाद्या तज्ज्ञ माणसाकडून पुरी पारख केल्यावर व्ही. पी. नें मागवावा. गरज लागेल तेव्हां माल मिळतो. संग्रह करून ठेवण्यांत पुष्कळदां वाया जातो. पीपळकोटीपासून बदरीनारायणापर्यंत प्रत्येक मोठ्या चट्टीवर व शिवाय आलमोऱ्यास याचीं पुष्कळ दुकानें आहेत. शुद्धशिलाजितासारखी दुसरी उत्तम औषधी नाहीं. वैद्यशास्त्रांत याचा उपयोग फार वर्णिला आहे. पण शुद्ध मिळेल तेव्हां.

**निर्विशीः**—ह्या एक प्रकारच्या मुळ्या आहेत. आणा दोन आण्यांचीच बाब आहे तेव्हां घेण्यास हरकत नाहीं. वृश्चिकदंशावर उगाळून लावल्यानें व्यथा तत्काळ शमते.

**दगड मोहराः**—हा एक प्रकारचा हिरवट दगड आहे. दोन चार पैसे तोळा मिळतो. नायटे, फोड, गजकर्णावर याचें गंध लावतात. या

दगडाला सूत गुंडाळून अग्नींत टाकलें असतां सूत जळत नाहीं असें सांगतात. यावरून तुकोबारायाच्या एका अभंगाची आठवण येते:—

मोहोरा तोचि अंगे । सूत न जळे ज्याच्या संगें ॥

**ममीरी**:—ममीरेका सुर्मा म्हणून नेत्ररोगावर याचा उपयोग करितात. ८४, ८८ ला एक डब्बी मिळते. पण नेत्रासारख्या नाजूक अवयवावर पारख केल्याशिवाय भलत्यासलत्या वस्तु लावणें किती धोक्याचें आहे तें नव्यानें सांगण्याची गरज नाहीं. याची परीक्षा प्रयोगाशिवाय कांहींच नाहीं.

**चवरे**:—वनगाईच्या ह्या सुंदर झुबकेदार शेंपट्या त्यांच्या संहाराला कशा कारणीभूत होतात, ह्याचा विचार केला म्हणजे अंगावर शहारे उठतात. शोभेशिवाय ह्याचा दुसरा उपयोग कांहीं नाहीं. तसें म्हटलें तर माशा, मुर्कुटें वारण्याकरितां याचा थोडाबहुत उपयोग होतो. चवरें लहानमोठे पाहून शेरानें मापून किंमत होते. चवराचा भाव ५ रु. पासून १५ रु. शेरपर्यंत असतो. चांगल्या चवऱ्याला १०।१२ रु. पडतात. हीं बरींवाईट पाहिल्यानें सहज कळतात म्हणून ह्यांत फसवणूक व्हावयाची भीति नाहीं. पौषमासांत भूतानचे भूते लोक ह्या विकण्याकरितां हिंदुस्थानांत येतात त्यावेळीं माल फार स्वस्त मिळतो.

**कस्तुरी**:—कस्तुरी कोषांत बंद असलेली घेऊं नये असें म्हणतात. उघड करून घेतल्यास २० पासून ४० रु. तोळ्यापर्यंत भाव पडतो. कपड्याच्या चौघडींतून वास घेतल्यास नाकांतून रक्तबिंदु पडावे असा हिचा गुण आहे. तपकिरीप्रमाणें हुंगावयास दिलेल्या कस्तुरींत बरेचसें मिश्रण आहे असें समजावें. परीक्षा असल्यास ही वस्तु संग्रहीं ठेवणें अवश्य होय हें सांगण्याची गरज नाहीं.

ह्या सर्व वस्तूंचे दुकानदार आलमोरा किंवा जोशीमठ येथील वस्तीवाले असतात. आलमोरा येथें व्याघ्र वगैरे श्वापदांची कातडीं फारच उत्तम अगदीं रेशमासारखीं मऊ कमावितात.

जी औषधि दुसऱ्या कोठें मिळणार नाहीं ती येथें पाहून घ्यावी. परीक्षक मात्र पाहिजे. येथल्यासारखी वनस्पतींची समृद्धि दुसऱ्या कोठेंही नसेल. पण त्यांचें ज्ञान नसल्यामुळें उपयोग करून घेतां येत नाहीं.



---

# उपसंहार.

आतां बद्रीकेदारवर्णन संपलेंच आहे. ह्या यात्रेची शक्य तितकी उपयुक्त माहिती एव्हांपर्यंत आलेलीच आहे. ही लेखमाला सुरू झाल्यापासून बऱ्याच लोकांनीं लेखकांशीं पत्रव्यवहार करून आणखीही बारिकसारिक माहिती विचारली ती सर्व येथें ग्रथित केली आहे. तिकडील मुलुख अतिशय लांब व परिस्थिति अगदींच भिन्न; प्रवासांत काय अडचणी येतात याची बिचाऱ्या भोळ्या यात्रिकरूंना योग्य कल्पना नसल्यामुळें त्यांचे फार हाल होतात. करितां पाल्हाळीपणाचा व पुनरुक्तीचा दोष पत्करूनही समग्र प्रवासाचें अगदीं थोडक्यांत सार काढून, आतांपर्यंत लेखांतून इतस्ततः विखुरलेल्या सूचना सर्वांच्या सोयीकरितां एके ठिकाणीं संकलित करण्याचें योजिलें आहे.

**मार्गक्रमण:**—हरिद्वारपर्यंत रेल्वे असल्यामुळें कांहीं अडचणच नाहीं. दिल्ली एक्सप्रेसनें निघाल्यास दिल्लीपर्यंत गाडी बदलण्याचेंही प्रयोजन नाहीं. दिल्लीहून हरिद्वाराला आउध-रोहिलखंड आणि नॉर्थ वेस्टर्न—अशा दोन रेलवेंचे फांटे गेलेले आहेत. मध्यें सहारणपूर, लष्कर वगैरे एकदोन ठिकाणींच गाडी बदलावी लागते. हरिद्वारस्टेशनपासून गांव १५ मिनिटांचा रस्ता आहे व टांग्यांचीही सोय आहे. धर्मशाळांच्या रेलचेलीमुळें उतरण्याची मुळींच पंचाईत नाहीं. कलकत्त्याचे शेट श्रीमान विनायकराव यांची भव्य व प्रशस्त धर्मशाळा उतरण्यास उत्तम आहे. हरिद्वारनंतर हृषीकेशरोड स्टेशन लागतें. तेथून मात्र पायमार्ग लागला. हा मार्गही धोपट व सरळ आहे. मध्यें फांटे फुटलेले नाहींत व गरजच पडल्यास कोणीही माहिती देतो. रस्त्यानें यात्रिकरूंची सारखी रांग लागलेली असते. यामुळें वाटाड्याची अगर पंड्याच्या गुमास्त्याची कांहीं गरज नाहीं. भाषेचीही अडचण नाहीं. कारण इकडील मूळची भाषा जरी पहाडी असली तरी थेट नारायणापर्यंत हिंदीचा सार्वत्रिक प्रसार आहे. कंड्या-झंपानें हरिद्वार अगर हृषीकेष येथूनच करावींत. पुढें गुप्तकाशीपर्यंत मिळत नाहींत. घोडीं ठिकठिकाणीं मिळतात.

हृषीकेशानंतर सुमारें ४० मैलांवर देवप्रयाग नामक महत्त्वाचें क्षेत्र आहे. येथून एक मार्ग टिहरीसंस्थानांतून गंगोत्री-जम्नोत्रीकडे गेलेला असून दुसरा बद्रीकेदारकडे ब्रिटिशहद्दींतून सरळ गेला आहे. रुद्रप्रयाग येथून ३७ मैल असून तोंवर रस्ता विचारण्याचें मुळींच कारण नाहीं. रुद्रप्रयागावरून एक मार्ग केदारनाथाकडे गेला आहे; केदार अजीबात वगळणें झाल्यास दुसरा मार्ग, कर्णप्रयाग, नंदप्रयाग, चमोलीवरून सरळ बद्रीशधामास गेला आहे. बद्रीशधाम आटपल्यावर कर्णप्रयागपर्यंत याच मार्गानें परत फिरावें लागतें. कर्णप्रयागवरून रामनगर रेल्वे-स्टेशनला मार्ग गेला आहे. दुर्दैवानें कोणी आजारी पडून त्याला रुद्रप्रयागजवळून परत फिरणें भागच पडल्यास रुद्रप्रयाग-कर्णप्रयाग-रामनगर या मार्गानें सुमारें १०० मैल पायीं प्रवास करावा लागणार आहे. त्याचप्रमाणें मार्गांत देवप्रयागवरून २० मैलांवर श्रीनगर म्हणून टिहरीसंस्थानची राजधानी आहे. तेथूनही एक ५८ मैलांचा मार्ग व व्यासघाटाहून केवळ ४० मैलांचा बिकट मार्ग कोटद्वार रेल्वेस्टेशनाला गेलेला आहे * वाटेंत मुख्य ठिकाणीं दवाखानेही आहेत. असो.

केदारेश्वराच्या मार्गानें गेल्यास २५ मैलांवर गुप्तकाशी हें पुण्यक्षेत्र लागतें. येथें केदारला जाणाऱ्या आणि केदाराहून व गंगोत्रीहून येणाऱ्या यात्रेकरूंचा त्रिवेणीसंगम होऊन उतरण्यास जागेची पंचाईत पडते. म्हणून यात्रेकरू येथें फक्त स्नान व दर्शन करून १ मैलावरील नाला-ग्रामीं जेवणखाण करतात. केदारची यात्रा उरकल्यावर पुन्हा बद्री-नारायणाकरितां नालाग्रामापर्यंत त्याच मार्गानें परत फिरून गुप्तकाशीस न येतां खालच्या उतारीच्या मार्गानें गुप्तकाशीसमोर चार मैलांवरून दिसत असलेल्या उषामठास उतरावें लागतें. गुप्तकाशीस कंड्या-झंपानें मिळण्याची सोय आहे व येथून त्रिजुगी-नारायण व केदारचा मार्ग अत्यंत बिकट आहे; म्हणून जमल्यास अखेर मुक्काम मैल-चौरीपर्यंत किंवा किमानपक्षीं केदारपर्यंत तरी वाहनें केल्याशिवाय राहूं नये. गुप्तकाशी-पासून त्रिजुगीनारायण १४ मैल व पुढें गौरीकुंड ( तप्तकुंड ) ६ मैल

* दोन्ही मार्ग औंध-रोहिलखंड रेलवेच्या मोठ्या फांट्याला मिळतात.

व पलीकडे केदारनाथ १० मैलच आहे. कंडीला येथपर्यंत ५।६ रुपये व झंपानास १०।१२ रुपये आकार पडेल. त्रिजुगीनारायणाला थंडी भयंकर, अन्न लवकर शिजत नाहीं व रात्रीं राहण्याची सोय नाहीं.

केदारहून परत फिरतांना त्रिजुगी-नारायणाची बिकट चढण चढावयाचें कारण नाहीं. कारण तें अंमळ बाजूस रहातें. गौरीकुंडास गौरीनें आपल्या न्हाण्यानें पवित्र केलेल्या कुंडांत यात्रेकरूंस फार दिवसांत मिळालेलें उष्णोदकाचें स्नान उरकून घ्यावयास मिळतें. विशेषतः स्त्रीजनांस तर न्हाऊन वेण्याफण्या करण्यास भारीच उल्हास वाटतो. पुढें लागणाऱ्या रामवाड्यास जेवणखाण करून शिवाय दशम्याझुणक्याची भरभक्कम शिदोरी केदारधामाकरितां जवळ बांधून नेणें आवश्यक आहे. कारण केदारला कांहीं जिन्नस धड मिळत नसून थंडीमुळें स्वयंपाकाचा बराच त्रास वाटतो व लांकडेंही ओलींच मिळतात. पुष्कळ जण अनावश्यक असलेलें सामान रामवाड्यासच ठेवून जातात. कारण पुढच्या बिकट चढणींत कुलींना विनाकारण सामानाचें ओझें वागविणें कठीण जातें. परंतु रामवाड्यास रात्रीं राहण्याचें मात्र कोणीं मनांत आणूं नये. कारण येथून केदारपर्यंतचा प्रांत सदासर्वदाकाळ बर्फांत गुरफटलेला असतो व येथें केदारसारखी व्यवस्थित घरांची व पडदपोशांची सोय नाहीं.

केदारेश्वर येथें थंडी कमालीची आहे. ता. २८।५।१९१४ इ. रोजीं देखील छातीएवढाले बर्फाचे ढीग कित्येक घरासमोर दिसत होते. तथापि कालीकमलीवालेबावांच्या धर्मशाळेंत शेकोटी, स्वच्छ घुस्से व उत्तम पडदपोषीची जागा देऊन शीतनिवारणार्थ सर्वप्रकारची उत्तम तजवीज करण्यांत येते. पंडेही या बाबतींत यात्रेकरूंच्या पुष्कळच उपयोगी पडतात हें कबूल करणें भाग आहे. देवाच्या दर्शनाकरितां फक्त ८-॥ चें टिकीट पडतें. पुजाऱ्यांची कोणत्याही प्रकारची शक्ति अगर जाच नाहीं. याशिवाय यात्रेंत पट्ट्या, कर वगैरे कोठेंही द्यावें लागत नाहींत. केदारला तारघर नाहीं. येथून नारायण ९४ मैल.

केदारपासून नालाग्रामापर्यंत त्याच वाटेनें परत फिरून उषामठास यावें लागतें हें मागें सांगितलेंच आहे. तेथून १२ मैलांवर तुंगनाथ आहे

तुंगनाथाची चढण अतिबिकट म्हणून प्रसिद्ध असल्यामुळें भरेच यात्रेकरू तुंगनाथाच्या भरीस न पडतां पलीकडे जातात. येथून लालसांगा १७ मैल आहे. केदारहून बद्रीनारायणाला जाणारा व रुद्रप्रयाग-कर्णप्रयागवरून येणारा असें दोन्ही मार्ग लालसांग्यास मिळतात.

लालसांगा येथील मंदाकिनीवरून पूल एव्हांशींच ओलांडण्याचें कारण नाहीं. परंतु फिरतांना मात्र या पुलावरून पुढें कर्णप्रयागास मार्ग गेला आहे. नारायणाच्या मार्गांतच येथून२८मैलांवर श्रीमच्छंकराचार्यांनीं स्थापना केलेला परंतु हल्लीं उध्वस्त असलेला ज्योतिर्मठ आहे. मठावरून ह्या सुंदर गांवालाही जोशीमठ असें नांव पडलें आहे. जोशीमठावरून कैलासाचीं १२५ मैलांवर असलेलीं हिमधवल शिखरें स्पष्ट दिसतात. येथून कैलास व मानससरोवराला अत्यंत बिकट स्थानांतून एक मार्ग गेलेला आहे. जोशीमठ ज्या पहाडावर आहे त्याच्याच पायथ्याशीं विष्णुगंगा, अलकनंदा व धवलगंगा याच्या संगमावर विष्णुप्रयाग आहे. बद्रीशधामाचा हा दिंडीदरवाजाच शोभतो. येथून नारायण अवघा १७ मैल आहे.

बद्रीनारायणाचा मार्ग केदारइतका बिकट खास नाहीं. शिवाय येथें आपल्या प्रिय यात्रेकरूंकरितां भगवंतानें तप्तकुंडाची सोय करून ठेवल्यामुळें येथें राहणें फारच सुखदायक वाटतें.

बाजारांत सर्व जिन्नस उत्तम मिळत असून, शिवाय दुपारीं तीनचारचे सुमारास देवाचा नैवेद्यही विकण्यांत येत असल्यामुळें खाण्यापिण्याची पंचाईत बिलकूल नाहीं.

बद्रीनाथावरून लालसांग्यापर्यंत ४५ मैलांचा व तेथून पूल ओलांडल्यावर कर्णप्रयागपर्यंत २० मैलांचा मार्ग सरळच आहे. कर्णप्रयागवरून रुद्रप्रयागचा मार्ग सोडून रामनगरच्या मार्गानें जावें लागतें. येथून बिकट चढण जरी कोठें नाहीं तरी उष्ण मुलुख लागल्यामुळें चालण्याचा शीण वाटतो. पुढेंपुढें कित्येक ठिकाणीं पाण्याचाही भयंकर दुष्काळ आहे. येथून महेलचौरी २८ मैल आहे. तें अगदीं लहानसेंच गढवालांतलें शेवटचें गांव आहे. हरिद्वारहृषीकेश येथून आपल्याबरोबर आणलेले, कुली, झंपानी व कंडीवाले आपापले पैसे व इनाम घेऊन महेलचौरीहून

परत जातात. याच्यापलीकडे आपण उष्णप्रदेशांत गेल्यास जगणार नाहीं अशी यांची समजूत आहे. ते सॉवरिन किंवा नोट घेत नाहींत. व मैलचौरी येथें तर मोडीच्या नांवानें नन्ना ! एका सॉवरिनमागें -।।- बट्टा मागतात ! ! करितां नंदप्रयाग–कर्णप्रयागसारख्या प्रत्येक मोठ्या ठिकाणीं मोड घेऊन ठेवणें अवश्य होय. येथून रामनगरपर्यंत नवीन कुली करावे लागतात. बोजा कंडीला सुमारें १५ रु. मण व झंपानाला २० रु. मणप्रमाणें दाम पडतात. घोडेहि मिळतात. पण इकडील घोड्यासारखे हाडकुळें व त्रासदायक वाहन घेण्यापेक्षां पायीं चालणें सहस्रपटीनें बरें ! येथून रामनगर साठ मैल. वाटेंत रामगंगेच्या कांठीं गणाईनांवाचें मोठें शहर लागतें. तेथून पुलापलीकडून एक रस्ता राणीखेत नैनीतालवरून काथगोदाम रेल्वेस्टेशनला गेला असून दुसरा रामनगरला गेला आहे. रामनगरला वाटेंत मोटारी मिळत नाहींत. राणीखेत ते काथगोदाम ६० मैल अंतर मोटारीमुळें कांहींच वाटत नाहीं. करितां काथगोदाम मार्गच आतां बरा. शिवाय नैनीताल्ला वाटल्यास जातां येतें. रस्ता दाखविणाऱ्या फळ्यामुळें चूकभूल होण्याचा संभव नाहीं. येथून वीसच मैलांवर सिरकोटपासून बैलगाड्या मिळतात. पण त्यांची चाल अत्यंत धिम्मे व लोक कोंबून भरलेले असतात. त्यामुळें बैलगाडीचा विशेषसा उपयोग होत नाहीं. त्यामुळें कंड्या-झंपानें महेल-चौरीपासून थेट रामनगरपर्यंतच्च करणें बरें. येथून रामनगर दोन किंवा फार तर तीन दिवसांचा रस्ता आहे. बैलगाडीस भाडें १।-१।।- पडतें. येथून रामनगरपर्यंत पाण्याचा दुष्काळच दिसतो.

सिरकोटहून पुढें आठ मैलांवर गुजरचट्टीपासून सुंदर राजमार्ग लागतो. मोठ्या रस्त्यानें रामनगर ३२ मैल आहे. परंतु पगदंड्यांनीं गेल्यास कमींत कमी १० मैलांचा फेरा वांचतो. गुजारचट्टीपासून पांच मैलांवर गोदी म्हणून चट्टी आहे. हिच्या अमळ पलीकडे गेल्यास बैलगाडीच्या मार्गाचे बाजूस Short cut to Ramnagar अशी फळी लावलेली असून एक लहान रस्ता फुटलेला दिसतो. या पायरस्त्यानें ४।।मैलांचा चक्कर वांचतो. टोटाम येथें पुन्हा राजमार्ग लागतो. त्यानें सुमारें ½ मैल गेल्यावर पुन्हा पगदंडी लागते. या पगदंडीनें कांहीं वेळ चालल्यावर रामगंगा

नदी लागते. तिच्या कांठाकांठानेंच मार्ग आहे. पुढें नदी ओलांडल्यावर राजमार्ग येतो. या पायवाटेनेंही पांच मैलांचा फेरा वांचतो. आतां राजमार्ग सोडण्याचें कांहीं कारण नाहीं. पुढें १२ मैलांवर रामनगर आहे.

रामनगरस्टेशनावर आगगार्डींत बसलें असतां मार्गांत हरिद्वार येत नाहीं, तें बरेंच मागें राहिलेलें असतें. यात्रेस जाण्यायेण्याचा मार्ग एक नाहीं. करितां यात्रेला निघण्याचें वेळीं हरिद्वारास मागें कोणचेंही सामान ठेवूं नये. कोटद्वार, काथगोदाम व रामनगर, यांवरून निघणारे सर्वच फांटे केवळ यात्रिकरूंकरितांच काढलेले असल्यामुळें लहानलहान असून रेलवेच्या एकाच मुख्य फांट्याला येऊन मिळतात. महाराष्ट्रीयांकरितां रामनगर किंवा काथगोदामवरूनच उतरणें सोईस्कर आहे.

दिल्लीला जातांना मार्गांत आग्रा व मथुरा हीं पहाण्यासारखीं स्थळें दृष्टीस पडतात व रामनगरवरून परत येतांना लखनौ, कानपूर हीं शहरें लागतात. वेळ व द्रव्य असल्यास काशी, अयोध्या, प्रयाग आटपून झांशीस यावें.

पुढें कांहीं प्रसिद्ध स्थळांचीं अंतरें दिलीं आहेत त्यावरून प्रवास किती लांबचा आहे, याची कांहींशीं कल्पना येईल.

## रेल्वे–प्रवास.

| | | | |
|---|---|---|---|
| भुसावळ ते दिल्ली | ६८१ | रामनगर—मोरादाबाद | ४८ |
| दिल्ली ते सहारणपूर | ११२ | मोरादाबाद—लखनौ | २०२ |
| सहारणपूर ते लष्कर | ३३ | भुसावळ—लखनौ | ६०९ |
| लष्कर ते हरिद्वार | १६ | | |
| | ८४२ | | ८५९ |
| | | | १७०१ |

४५६९

## कांहीं प्रसिद्ध स्थळांचीं अंतरें.

हरिद्वार—देहरादून ८॥≈ रे. खर्च.

देहरादून—गंगोत्री ११८ मैल.

हरिद्वार—देवप्रयाग ५८॥ ”
—केदारनाथ १४२ ”
”—गंगोत्री ( देवप्रयाग व टिहरीवरून ) १६२ मैल.
”—बद्रीनाथ ( केदारनाथ केल्यास ) २४० ”
—बद्रीनाथ
—बद्रीनाथ ( रुद्रप्रयागवरून केदारनाथाचा रस्ता सोडून सरळ कर्णप्रयागवरून ) १७८॥ मैल.
”—बद्रीनाथ ( गुप्तकाशीवरून केदारचा जातांयेतां सुमारें ६० मैल मार्ग वगळल्यास १८० मैल.)
”—केदार, बद्री संपूर्णयात्रा रामनगरपर्यंत ( गंगोत्री, जम्नोत्री वगळल्यास )१४२+८७॥+९३+६०=३८२॥ मैल.

देवप्रयाग—केदारनाथ ८७॥ मैल.
”—बद्रीनाथ १२१ ” ( केदार सोडून ).
”—रुद्रप्रयाग ३७ ”

रुद्रप्रयाग—बद्रीनाथ ८४ ” ( रुद्रप्रयागवरून केदारला जाणारा रस्ता सोडल्यास कर्णप्रयागमार्गानें).

केदार—बद्रीनाथ ८७॥ ”

बद्रीनाथ—लालसांगा [ चमोली ] ४५ मैल.

महेलचौरी— ९३

लालसांगा—रामनगर ( रेल्वे स्टेशन )

गंगोत्री—यमुनोत्री [ जम्नोत्री ].५२ ”

हरिद्वार—हृषीकेश १७ ”

जोशीमठ—कैलास १२८ ”

जोशीमठ—मानससरोवर १४० ”

वाटेंत खालील ठिकाणीं डांकघरें आहेत, मोठ्या टाइपांत छापलेल्या गांवीं तारघरेंही आहेत. शिवाय अशी * खूण केलेल्या ठिकाणीं दवाखानेही आहेत.

हरिद्वार, हृषीकेश, **देवप्रयाग**, **श्रीनगर**,* रुद्रप्रयाग, **गुप्तकाशी**,

केदारनाथ, उषामठ *, लालसांगा *, पीपळकोटी जोशीमठ *, बद्रीनारायण * नंदप्रयाग, कर्णप्रयाग, * आदिबद्री, महेलचौरी, गणाई *, रामनगर. *.

लक्ष्मणझूला, बिजनी, व्यासघाट, देवप्रयागचे नजीक, राणिबाग, श्रीनगर, रुद्रप्रयाग, कर्णप्रयाग, सुनला, चमोली, पिपळकोटी, गुलाबकोटी जोशीमठ, आदिबद्री, बद्रीनाथ वगैरे ठिकाणीं सरकारी उतारू बंगले डांक बंगले आहेत. आगाऊ डेप्युटी-कमिशनरची परवानगी घ्यावी लागते.

समाप्त.

REFBY-CCC4569
REFBK-0004569